# इंदुमती सुखात्मे

# बदलते जीवन

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3229
REFBK-0025702

संदर्भ विभाग
3229
२४७०२

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 SEP 1988
2 8 SEP 1988
28 SEP 1988
23 OCT 1988
30 OCT 1988
16 JAN 1988
14 DEC 1988

1 FEB 1989
23 APR 1989
22 OCT 1989
27 JUN 1990

(क्रु. मा. पहा)
५०००–११–८६

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© इंदुमती सुखात्मे

प्रकाशनकाल प्रथमावृत्ती
१५ जून १९८८

मुखपृष्ठ : अपर्णा सोहोनी

मूल्य : ४५ रुपये

मुद्रक :
चं. गो. फडके
किर्लोस्कर प्रेस,
वीर सावरकर नगर,
पुणे ४११ ०३७.

पुस्तक मिळण्याचा अमेरिकेतील पत्ता:
DR. UDAY SUKHATME
460 PARK VIEW PLACE
BURR RIDGE
ILLINOIS 60521
Tel. (312) 325-2624

# अनुक्रमणिका


१) निवेदन ........................................ १
२) हेच ते डॉ. पां. वा. सुखात्मे .................... ६
३) जानबा ........................................ २४
४) "पारू" ........................................ ४३
५) एक सामाजिक दृश्य ............................. ५३
६) स्त्रीस्वातंत्र्य व कुटुंब संस्था ................... ६८
७) पाहुणा ........................................ ८२
८) मला दिसलेले रोम ............................. १०३
९) जया ........................................ ११९
१०) एडस् (AIDS) ................................. १२६
११) पराधीनता .................................... १४०
१२) "उभा जन्म उन्हात" ........................... १४५

दा. क्र.

# बदलते जीवन

## (काही आठवणी)

इंदुमती सुखात्मे

REFBK-0025702

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ३०

. . . . १
. . . . ६
. . २४
. . ४३
. . ५३
. . ६८
. ८२
१०३
११९
२६
४०
५

दा. क्र.

# बदलते जीवन

## (काही आठवणी)

इंदुमती सुखात्मे

REFBK-0025702

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ३०

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© इंदुमती सुखात्मे

प्रकाशनकाल प्रथमावृत्ती
१५ जून १९८८
मुखपृष्ठ : अपर्णा सोहोनी

मूल्य : ४५ रुपये

मुद्रक :
चं. गो. फडके
किर्लोस्कर प्रेस,
वीर सावरकर नगर,
पुणे ४११ ०३७.

पुस्तक मिळण्याचा अमेरिकेतील पत्ता :
DR. UDAY SUKHATME
460 PARK VIEW PLACE
BURR RIDGE
ILLINOIS 60521

Tel. (312) 325-2624

## अनुक्रमणिका


१) निवेदन ........................ १
२) हेच ते डॉ. पां. वा. सुखात्मे ........................ ६
३) जानबा ........................ २४
४) "पारू" ........................ ४३
५) एक सामाजिक दृश्य ........................ ५३
६) स्त्रीस्वातंत्र्य व कुटुंब संस्था ........................ ६८
७) पाहुणा ........................ ८२
८) मला दिसलेले रोम ........................ १०३
९) जया ........................ ११९
१०) एडस् (AIDS) ........................ १२६
११) पराधीनता ........................ १४०
१२) "उभा जन्म उन्हात" ........................ १४५

## अर्पण

ज्या मातृतुल्य सासूबाईंच्या सहवासात वयाची पस्तीस वर्षे सुखाच्या सावलीत वाढले, ज्यांनी योग्य संस्कार माझ्या मुलांवर घडविले, इतकेच नव्हे तर वयाच्या पंच्चाहत्तराव्या वर्षी लेखणी हातात घेतली व स्वतःचे आत्मचरित्र 'गेले ते दिवस' हे लिहिण्यास ज्यांनी मला उद्युक्त केले, त्यांच्या स्मरणार्थ ही लेखमाला त्यांना अर्पण करण्यास मला आनंद होत आहे.

**इंदुमती**

# बदलते जीवन

(काही आठवणी)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध

# निवेदन

हे निवेदन लिहिताना चार तपांचा काळ डोळ्यांपुढे उभा राहातो. तंत्रज्ञान व विज्ञानाच्या युगात आपण चंद्रावर जाण्याची भाषा बोलू लागलो आणि त्याबरोबरच जगात जितक्या चांगल्या तितक्याच काही विपरीत गोष्टी घडू लागल्या. जीवनातही तसेच बदल घडू लागले. हजारो वर्षे जतन केलेल्या संस्कृतीवर आघात होत आहेत, असे दिसू लागले. जीवन धक्काबुक्कीचे झाले आहे, हे कळू लागले. माणसाची वृत्ती बदलली. भावना व श्रद्धा लोप पावल्या. श्रीमंत असो वा गरीब असो पैशाची व सत्तेची हाव वाढत गेली. आणि विशेषेकरून आईवडील, गुरुजन, कुटुंब यांचेबद्दल आदर कमी झाले. लग्नसंस्थेचे महत्त्व व संस्कार तर जवळजवळ कळेनासे झाले. वस्तुस्थितीचे खरे दर्शन व्यक्तिचित्राच्या रूपाने आलेले अनुभव वाचकांपुढे ठेवावे हा पुस्तकाचा मुख्य हेतू आहे.

माझे बालपण बडोद्याला गेले. तो बालपणीचा ऐन तारुण्यातला उषःकाल आपण आता स्वप्नात तर पाहात नाही ना, असा कधी कधी भास होतो. त्या वेळी आमच्या घरात वावरणारा जानबा, ज्याने आपले सर्व आयुष्य आमच्या घरी घालविले. आईच्या पश्चात आम्हाला वाढविले, लहानाचे मोठे केले. स्वतःचा स्वार्थ न बघता त्यागी वृत्तीने, आत्मविश्वासाने आलेल्या अडचणींना तोंड दिले. प्रामाणिकपणा सचोटी असलेला असा आमचा जानबा ह्या युगात क्वचितच सापडेल. त्याचे व्यक्तिचित्र कुठे व आत्ताचा काळ कुठे याची तुलनाच न केलेली बरी.

आमची आत्या 'उभा जन्म उन्हात' ह्या शीर्षकाप्रमाणे तिला सबंध आयुष्यात सावली मिळालीच नाही. आज वयाच्या ८४ वर्षांपर्यंत देह झिजवतेच आहे. अशा

स्त्रीचे व्यक्तिचित्र खास नावीन्य उभे करेल. माझ्या सासूबाईंनी तर वयाच्या ७५ व्या वर्षी 'गेले ते दिवस' पुस्तक लिहून स्त्री–जीवनात व समाजात कसा बदल झाला ते पुष्कळांना विहीतच आहे.

इंदिरा कम्युनिटी किचन ही पुण्यात एकमेव गरिबांच्या करता उभारलेली संस्था आहे. या बायकांचे जीवन मला जवळून बघायला मिळाले. त्यांच्यात पतीची निष्ठा, कष्ट, सामाजिक बंधने, अंधश्रद्धा, यांत त्या कशा जखडल्या आहेत, त्यांच्यात असहाय स्त्रीवर कसे प्रसंग येतात व बदलत्या जीवनात ती या प्रसंगाला कसे तोंड देते ही 'पारू' ही कथा हृदयस्पर्शी आहे. त्या किचनच्या बायकांना थोडे लिहायला–वाचायलाही शिकविले आहे. खेड्यात काही प्रकल्प घेतले आहेत. शिक्षणातून आचरण घडवून आणायला शिक्षण हे लहान वयात दिले पाहिजे. त्याकरता बालवाड्यांचे वर्ग सुरू केले आहेत. त्या संदर्भात एक सामाजिक दृश्य ही 'सखू'ची कहाणी वाचण्यासारखी आहे.

शहरात राहाणाऱ्या भारतातल्या काही स्त्रिया शिक्षणक्षेत्रात अग्रगण्य आहेत. त्या पुरुषांच्या बरोबरीने कामे करतात. त्या घर, नवरा व मुले सांभाळून आनंदात आहेत. त्यांना स्त्रीमुक्तीचा अर्थ कळला आहे. पण काही नुसत्या ग्रॅज्युएट असून जरूर नसताना ऐट म्हणून नोकरी करतात. स्त्रीमुक्ती, कुटुंबसंस्था, स्त्री–संघटना, नारीमंच वगैरेत भाग घेऊन ना नवरा ना संसार अशा विवंचनेत आहेत. स्त्रीस्वातंत्र्य व कुटुंबसंस्था यांचा घनदाट संबंध कसा आहे, यासंबंधी दोन लेख 'सोबत'ला पाठविले व ग. वा. बेहरे यांनी ते छापले, हे लेख स्त्रियांना बोलके करणारे आहेत.

रोमच्या २१ वर्षांच्या कालावधीत तेथील जीवन अथपासून–इतीपर्यंत पाहाण्याची संधी मिळाली. त्यांची भाषा व मैत्रिणींचा सहवास तर खूपच घडला. अजूनही त्या ख्रिसमास कार्ड पाठवतात व आठवण करतात. सुरुवातीला त्यांच्या व आपल्या जीवनराहाणीत साम्य दिसते. अविभक्त कुटुंबपद्धती, नवऱ्याची मिळकत भरपूर असेल तर स्त्रिया, गृहिणी या नात्याने घर व मुले संभाळीत व्रते–वैकल्ये करीत अशा जीवनात मी रमून गेले. मला त्या जीवनात भारतापेक्षा जास्त फरक दिसत नाही. त्या वेळी शेजारच्या मैत्रिणी जवळून पाहायला मिळाल्या व इटालियन लोकांचे थोडे चांगले, वाईट अनुभव आले. ते वेळपरत्वे पुस्तकात टिपले की, वाचकांना तिथल्या राहाणीची कल्पना येईल. आम्ही रोम सोडले तेव्हा

त्यांच्या जीवनात बराच फरक पडलेला दिसला. धर्मगुरू व Nuns पोपचा कायदा झुगारून लग्न करू लागले. शिक्षणात बायका आघाडीवर जाऊ लागल्या. यांत्रिकी युगात रोम बदलले व अमेरिकन लोकांचीही थोडी नक्कल जीवनात येऊ लागली. 'मला दिसलेले रोम' ह्यात रोमला फेरफटका मारल्याचा आनंद मिळेल.

कोणीही महाराष्ट्रीयन रोमला आला की तो आम्हाला भेट देणार हे ठरूनच गेलेले. किती पाहुणे आले याचा हिशोब ठेवणे कठीण आहे. मुकुंदराव किर्लोस्कर हे आमचे सुरुवातीचे पाहुणे. त्यांनी रोम पाहिले, माझ्याशी गप्पा मारल्या व जेव्हा जायला निघाले तेव्हा म्हणाले, 'इंदूबाई, रोमच्या जीवनावर एक लेख लिहा.' मला तर हसूच आले व मी म्हटले, 'अहो मी लेखिका नाही.' तेव्हा ते म्हणाले, 'कोण लेखक आहे हे आम्हाला बोलण्यावरून समजते. तुमचा हा गुण सुप्तावस्थेत आहे. मी म्हटले, 'तुम्ही यशस्वी संपादक आहात.' आणि खरोखरच तो लेख 'स्त्री' मासिकातला माझ्या आयुष्यात यशस्वी ठरला. त्यानंतर ३–४ लेख त्यांनी छापले. आचार्य प्र. के. अत्रे हेही आमचे पाहुणे मला लेखनाला अनुमोदन देणारे व माझ्या लेखात रस घेणारे मिळाले. ते आमच्याकडे तीनचार दिवस राहिले. आमच्याशी मनसोक्त गप्पा झाल्या. इतकेच नव्हे तर माझ्या यजनांच्यावर मराठात त्यांनी अग्रलेख लिहिला व मराठा हे वर्तमानपत्र आम्हाला विमानाने रोज येऊ लागले. त्यांनी आमचे 'गेले ते दिवस' या पुस्तकाला प्रस्तावना दिली. दत्तो वामन पोतदार यांनीही भरपूर करमणूक केली. सकाळचे संपादक परुळेकर यांनी तर आंबे विमानाने पाठवले. केसरीचे जयंतराव टिळक व त्यांच्या पत्नी इंदूताई येऊन गेल्या. उषा किरण ह्या सिनेमातील अग्र तारका होत्या. सिनेमासृष्टीत राहून नवरा, मुले व घर व्यवस्थित आहे. आम्ही मुंबईला त्यांचे घरी पाहुणचार घेतला. पु. शं. पतके सध्या समाजकार्याच्या आघाडीवर असलेले तेही आले. डॉ. महाजनी, डॉ. सुरू, आणखी कित्येक वैमानिक, अमेरिकन, इंग्लिश वगैरे परदेशी पाहुणे तर नेहमीच येत असत. यादी फार मोठी आहे. पण त्यांचे साहाय्य मी कधीच विसरू शकत नाही. असा हा 'पाहुणे' हा लेख वाचनीय वाटेल.

परदेशात जाऊन आलेला आमचा नोकर बदलत्या काळात कसा बदलला हे चित्र मन बेचैन करणारे आहे.

लंडन व एडिंबरो येथे असताना वृद्धाश्रम कसे असतात, त्यासंबंधी वृद्धांच्या समस्या व तिथले जीवन काही लेखात वाचायला मिळेल.

अमेरिकेला आमची मुले स्थायिक झाली आहेत. त्यामुळे अमेरिकेतही आमचे जाणे वाढले आहे. तिथला अनुभव व बदलते जीवन पाहून वाटले पु. ल. देशपांडे यांच्या —'जावे त्यांच्या देशा'— या प्रवास वर्णनाची आठवण होते.

आपल्याला माहीतच आहे की, अमेरिकेसारखे पुढारलेले श्रीमंत देश विज्ञानाच्या जगात किती आघाडीवर आहेत. आपले हजारो बांधव आज तिकडे शिक्षण घेत आहेत. जमेची बाजू म्हणजे आघाडीत पुढे असलेली विश्वविद्यालये, बर्कले, स्टॅनफर्ड, शिकागो, एम्.आय.टी. प्रिन्सटन व अशी अनेक शिक्षणक्षेत्रात काम करीत आहेत. संशोधनाला लागणारी आधुनिक सामग्री, उत्तम प्रोफेसर, तेथे संशोधन करीत आहेत. पैसा, श्रीमंती सर्व काही आहे आणि म्हणूनच प्रत्येकाला उच्च डिग्री घ्यायला अमेरिकेला जायला आवडते. आपल्या भारतीयांनीही तेथे चांगले नाव मिळविलेले आहे, पण तिथल्या शिथिल जीवनातून हे लोक शक्य तो अलिप्त आहेत, पण कित्येक तरुण—तरुणी अशा जीवनाला कंटाळले आहेत. या चैनीच्या गोष्ट कडे कानाडोळा करणे वाटते तितके सोपे नाही. अमेरिकेत ह्या दोन बाजू दिसतात.

तेव्हा सर्व असून 'अती तेथे माती' असा काहिसा प्रकार आढळतो. स्त्रीमुक्ती व कुटुंबसंस्था मोडकळीस येणार हे निश्चितच दिसत आहे. वैचारिक स्वातंत्र्य, अलोट पैसा, वयात येणाऱ्या मुलामुलींच्या समस्या, घटस्फोटाचे प्रमाण व शेवटी आता AIDS ह्या रोगाने ग्रासलेले जीवन त्यांना नकोसे झाले आहे.

आता लाखो लोक जेव्हा ह्या रोगाला बळी पडतील असे दिसून आले तेंव्हा कळले की, कुटुंबसंस्था हा समाजाचा एक अविभाज्य भाग आहे. त्याशिवाय तत्त्वज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान याचा समुचित योग होऊन उन्नती होणार नाही, हे विचार आता अमेरिकन जोराने करू लागले आहेत. AIDS ह्या लेखात तिथल्या जीवनाचे दृश्य दिसेल. माझ्या ओळखीत अशी काही उदाहरणे मला माहीत आहेत की, शिक्षण व संस्कृतीमुळे त्यांचा संसार सुखाचा दिसतो. तसेच आंतरजातीय विवाहाच्या कथा चित्तथरारक व मार्गदर्शनही करतील.

आपले काही भारतीय लोकही नागरिकत्व घेऊन कित्येक वर्षे तिकडे राहात आहेत. अशा स्वैर वातावरणात आपली मुले कशी वाढवावी असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा आहे. म्हणून आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी याकरता सणवार, मंदिरे, गीतेचे व विवेकानंदांसारख्या आदर्श पुरुषांच्या चरित्रांचे वाचन

सुरू झाले आहे. दिवाळी, दसरा, लग्नकार्यही आता वैदिक पद्धतीने होऊ लागली आहेत. पण त्याबरोबर अमेरिकेत आढळणारा सर्व धर्म समभाव पण वाढविण्याकडे भारतीय लोकांचा कल दिसू लागला आहे.

तेथील वैदिक पद्धतीने लग्न प्रसंगाची कथा वाचून वाचकांना भारतातच आहोत असा भास होईल. मी स्वतः ही लग्ने यंदा पाहिली.

वाचकाला ह्या विविध रंगाच्या छटा वाचून परदेशात जाऊन आल्याचे समाधान वाटेल.

अमेरिकेला आमची मुले स्थायिक झाली आहेत. त्यामुळे अमेरिकेतही आमचे जाणे वाढले आहे. तिथला अनुभव व बदलते जीवन पाहून वाटले पु. ल. देशपांडे यांच्या —'जावे त्यांच्या देशा'— या प्रवास वर्णनाची आठवण होते.

आपल्याला माहीतच आहे की, अमेरिकेसारखे पुढारलेले श्रीमंत देश विज्ञानाच्या जगात किती आघाडीवर आहेत. आपले हजारो बांधव आज तिकडे शिक्षण घेत आहेत. जमेची बाजू म्हणजे आघाडीत पुढे असलेली विश्वविद्यालये, बर्कले, स्टॅनफर्ड, शिकागो, एम्.आय.टी. प्रिन्सटन व अशी अनेक शिक्षणक्षेत्रात काम करीत आहेत. संशोधनाला लागणारी आधुनिक सामग्री, उत्तम प्रोफेसर, तेथे संशोधन करीत आहेत. पैसा, श्रीमंती सर्व काही आहे आणि म्हणूनच प्रत्येकाला उच्च डिग्री घ्यायला अमेरिकेला जायला आवडते. आपल्या भारतीयांनीही तेथे चांगले नाव मिळविलेले आहे, पण तिथल्या शिथिल जीवनातून हे लोक शक्य तो अलिप्त आहेत, पण कित्येक तरुण–तरुणी अशा जीवनाला कंटाळले आहेत. या चैनीच्या गोष्ट कडे कानाडोळा करणे वाटते तितके सोपे नाही. अमेरिकेत ह्या दोन बाजू दिसतात.

तेव्हा सर्व असून 'अती तेथे माती' असा काहिसा प्रकार आढळतो. स्त्रीमुक्ती व कुटुंबसंस्था मोडकळीस येणार हे निश्चितच दिसत आहे. वैचारिक स्वातंत्र्य, अलोट पैसा, वयात येणाऱ्या मुलामुलींच्या समस्या, घटस्फोटाचे प्रमाण व शेवटी आता AIDS ह्या रोगाने ग्रासलेले जीवन त्यांना नकोसे झाले आहे.

आता लाखो लोक जेव्हा ह्या रोगाला बळी पडतील असे दिसून आले तेंव्हा कळले की, कुटुंबसंस्था हा समाजाचा एक अविभाज्य भाग आहे. त्याशिवाय तत्त्वज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान याचा समुचित योग होऊन उन्नती होणार नाही, हे विचार आता अमेरिकन जोराने करू लागले आहेत. AIDS ह्या लेखात तिथल्या जीवनाचे दृश्य दिसेल. माझ्या ओळखीत अशी काही उदाहरणे मला माहीत आहेत की, शिक्षण व संस्कृतीमुळे त्यांचा संसार सुखाचा दिसतो. तसेच आंतरजातीय विवाहाच्या कथा चित्तथरारक व मार्गदर्शनही करतील.

आपले काही भारतीय लोकही नागरिकत्व घेऊन कित्येक वर्षे तिकडे राहात आहेत. अशा स्वैर वातावरणात आपली मुले कशी वाढवावी असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा आहे. म्हणून आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी याकरता सणवार, मंदिरे, गीतेचे व विवेकानंदांसारख्या आदर्श पुरुषांच्या चरित्रांचे वाचन

सुरू झाले आहे. दिवाळी, दसरा, लग्नकार्यही आता वैदिक पद्धतीने होऊ लागली आहेत. पण त्याबरोबर अमेरिकेत आढळणारा सर्व धर्म समभाव पण वाढविण्याकडे भारतीय लोकांचा कल दिसू लागला आहे.

तेथील वैदिक पद्धतीने लग्न प्रसंगाची कथा वाचून वाचकांना भारतातच आहोत असा भास होईल. मी स्वतः ही लग्ने यंदा पाहिली.

वाचकाला ह्या विविध रंगाच्या छटा वाचून परदेशात जाऊन आल्याचे समाधान वाटेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3229
24602

# हेच ते डॉ. पां. वा. सुखात्मे

दहा–बारा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. तळेगावला मराठी विज्ञान संमेलनाचे अध्यक्ष म्हणून (आण्णासाहेबांना) डॉ. सुखात्मे यांना आमंत्रण आले. ते भाषण मराठीतून द्यायचे ही गोष्ट तितकीशी सोपी नंव्हती. बरीच वर्षे परदेशात गेल्यामुळे मराठी बोलण्याचा सराव कमी झाला होता. त्यांचा मराठीचा पहिलाच प्रसंग, त्यामुळे मराठी शब्दकोशातून शब्दांचे अर्थ काढून ते भाषण त्यांनी तयार केले. भाषण अर्थातच छापलेले असल्याने ते वाचणे सोपे होते.

तीन दिवस अधिवेशनाचा कार्यक्रम भरगच्च झाला व आम्ही दोघे पुण्याला आमच्या निवासस्थानी आलो. त्यानंतर एक दिवस सकाळी आण्णासाहेब ऑफिसमध्ये गेले होते व मी एकटीच घरात होते. दारावरची घंटी वाजली व पाहते तो दोन अपरिचित व्यक्ती. त्यांनी मला त्यांची ओळख करून दिली. मी म्हटले, 'डॉक्टरसाहेब घरात नाहीत.' तेव्हा ते म्हणाले, 'आम्ही तुम्हालाच भेटायला आलो. डॉक्टरांचा व्यक्ती परिचय आम्हाला हवा आहे, तो तुम्हीच द्यावा अशी आमची इच्छा आहे.' तेव्हा मी म्हटले, 'अहो परिचय कसला, एक सामान्य माणूस विशेष काय?' ती मंडळी म्हणाली, 'तुम्हाला ते कसे वाटतात हेच आम्हाला पाहिजे आहे.' त्यांनी तो परिचय–नवनीत–(मराठी डायजेस्ट)–मध्ये छापला, त्याच्याच अनुसंधानाने मी हे लिहीत आहे.

यांच्याविषयी परिचयात्मक स्वरूपाचा लेख मी लिहावा अशी सूचना मला झाली आणि सर्वप्रथम माझ्या मनात जर काय येऊन गेलं असेल तर आमच्याकडे यांच्या भेटीसाठी जेव्हा कोणी एखादी अपरिचित व्यक्ती येते, तेव्हा नित्यशः घडणारा प्रसंग. आम्ही त्या वेळी बडोद्याला होतो. हे अगदी पुढ्यात जरी समोर

उभे असले तरी यांची किरकोळ देहयष्टी व साधी राहणी पाहून हेच ते डॉ. सुखात्मे असतील. . . यावर कदाचित विश्वास न बसून अपरिचित व्यक्ती मलाच म्हणते, 'डॉ. सुखात्मे यांना मला भेटायचंय. . .' आणि मग यांच्याकडे अंगुली निर्देश करीत मलाच सांगावे लागते हेच ते. तेव्हा डॉ. सुखात्मे यांचा परिचय करून देण्याचं काम एका परीनं मला तसं काही नवीन नाही. यावरून सहज पूर्वीचा काळ आठवला. लग्नानंतर प्रथमच आम्ही बडोद्याला माझ्या माहेरी थोडे दिवस राहायला गेलो होतो. माझ्या मैत्रिणींना माझे यजमान (आण्णासाहेब) पाहण्याची इच्छा होती म्हणून मी एक दिवस सर्वांना चहाला बोलाविले. त्या काळी फारच थोडी मुले विलायतेत शिकायला जात व जी शिकून येत ती सुटाबुटात वावरत. आण्णासाहेब मैत्रिणींच्यापुढे घरी धुतलेला पायजमा व शर्ट घालून आले. सर्वांना हे दृश्य पाहून आश्चर्य वाटले व काहींनी तर मला तुझा नवरा अगदीच बावळट ग, असे चिडवले. स्वाभाविकच मला जरा वाईट वाटले. यांना घरी सारेजण आण्णासाहेब म्हणतात. आण्णासाहेबांना पहिली नोकरी—इंडियन इन्स्टिटयूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी—कानपूर येथे लागली. आम्ही तेथे दोन वर्षे होतो. प्रथमच संसार मांडलेला. ऐन तारुण्याचा भर, नोकरी व पगार चांगला, त्यामुळे मी खूप आनंदात होते. मला वाटायचं आताच लग्न झालं आहे, थोडे स्वच्छंदीपणे, मनमोकळं हिंडावं, सिनेमाला जावं, मजा करावी, चांगले कपडे घालावे. मी नुकतीच शाळा संपून बाहेर आलेली. मैत्रिणींच्या घोळक्यात मला हिंडायची सवय आणि आता एकदम संसाराची जबाबदारी मला अवघड वाटू लागली. पण आण्णासाहेब ह्या गोष्टींना अपवाद ठरले. त्यांचे लक्ष अभ्यासातच भिरभिरत असे. तरुणपणी व लग्न झाल्यावर इतके अभ्यासाचे गांभीर्य मी प्रथमच पाहत होते. त्यांची एक पीएच.डी. (डॉक्टरेट) लंडनला पुरी झाली होती व दुसरी डी.एससी. (डॉक्टरेट)चा प्रबंध पुरा व्हायचा होता. त्यामुळे नोकरी सांभाळून रिकामा वेळ जास्त मिळत नसे. तेव्हा सकाळी ४ वाजता ते उठत व मलाही उठवत. मला त्यांनी गणना करण्याचे काम मशिनवर शिकविले व ते मी त्यांच्या मदतीने करीत असे. अशा तऱ्हेने दोघांनी मिळून ते काम पुरे केले व त्याच वर्षी त्यांना बाय पार्टीशनल फंक्शन (एक विर्शिष्ट बीजगणित किती तऱ्हेने करता येते) ह्या प्रबंधावर लंडन युनिव्हर्सिटीची डी.एससी. बहुमानाची पदवी मिळाली. ह्या प्रबंधाचे वैशिष्ट्य म्हणजे तो लंडनच्या Royal Society ने 'Philosophical

Transactions'मध्ये प्रसिद्ध केला. हळूहळू मला कामाची सवय लागली. त्यांना अभ्यासाची जिद्द किती आहे हे ध्यानात आले. आधी अभ्यास मग चैन हा पहिला धडा मी शिकले.

त्यानंतर कलकत्त्याला All India Institute of Hygiene & Health ह्या संस्थेमध्ये एक वर्ष काम केले. तिथली हवा मानवली नाही. त्यातच ॲपेंडिक्सचे ऑपरेशन करावे लागले. मेडिकल डॉक्टर्स त्यांचे प्राध्यापक सहाध्यायी, त्यातल्याच एक सर्जनने त्या वेळच्या गव्हर्नरचे ॲपेंडिक्सचे ऑपरेशन केले होते, पण ते यशस्वी झाले नाही. शिवाय त्यांच्या सहाध्यायांपैकी दोघा प्रोफेसरांना ॲपेंडिक्स विकार असून त्यांनीही ऑपरेशन केले नव्हते. हे सर्व पाहून आण्णासाहेब मुंबईला डॉ. मुळगांवकरांकडे आले. मी त्या वेळी पुण्याला वडिलांकडे होते. मला आदले दिवशी बोलाविले. डॉ. मुळगांवकर ऑपरेशन करीत असताना काही थोडी शंका आली. त्यांनी ऑपरेशन न करता टाके टाकले व खोलीत आणले. खोलीत आल्यावर हे मला म्हणाले, 'ॲपेंडिक्स दाखव.' मी काय बोलणार? दोन दिवसांनी Local Anaesthesia देऊन पुन्हा ऑपरेशन झाले व बाटलीतला Appendix त्यांना दाखविला. कलकत्त्याला लॅबमध्ये तपासला तेव्हा त्यांचे समाधान झाले. प्रत्येक गोष्ट कळून घेणे हा स्वभाव.

त्यानंतर दहा वर्षं दिल्लीला होतो. ICAR (इंडियन काऊन्सील ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च) ह्या संस्थेमध्ये संख्याशास्त्राचे प्रमुख म्हणून ते काम पाहात होते. आई–वडील, भाऊ–बहीण व आमची मुले असे आम्ही एकत्र राहात होतो. त्यांच्या आई–वडिलांनी खूप गरिबीत दिवस काढले, कष्ट केले,पण मुलांनी सदा अभ्यासाची वृत्ती ठेवली व मुलांच्या शिक्षणात अडथळा आणायचा नाही हे त्यांचे ध्येय होते, हे सर्वजण विसरले नाहीत. आई–वडिलांच्या भावना त्यांनी कधीच दुखविल्या नाहीत. पगाराचे पैसे वडिलांजवळ देत व वडिलमंडळीच आमचा संसार पाहात होती. माझ्या मुलांच्यावरही त्यांचेच संस्कार घडले. शिकविण्यापेक्षा पाहिलेल्या व अनुभवलेल्या गोष्टीच मनात जास्त भरतात याचा अनुभव मलाही आला.

आण्णासाहेबांना शिक्षणाची आवड आहे हे आता माझ्या लक्षात आले होते. घर व संसार सासू–सासरे पाहात होते, तेव्हा आपल्याला ह्या संधीचा फायदा घ्यायला पाहिजे असे ओळखून मी सर्वांच्या संमतीने लेडी आयर्विन कॉलेजमधून

तीन वर्षांचा होम सायन्सचा कोर्स पुरा केला. वडिलमंडळींनी माझी दोन लहान मुले त्या वेळी सांभाळली. आण्णासाहेब मुलांचे जेवण, फिरायला नेणे व कधी कधी झोपविणे ही कामे प्रेमाने करीत असत. मुख्य म्हणजे मला त्यांच्यामुळे अभ्यास नेटाने कसा करायचा व चिकाटी किती महत्त्वाची आहे हे कळले. माझी अल्लड वृत्ती जाऊन मी अभ्यासू बनले. ते स्वतः खूप कामात असत, त्यामुळे रात्री अथवा सकाळी लवकर उठून माझा अभ्यास घेत. त्यांच्या सान्निध्यात माझीही प्रगती होत होती.

आण्णासाहेब लहानपणापासून कसे वाढले ही एक मनात मला न उमगणारी गोष्ट होती. सासूबाई मला आईप्रमाणे होत्या व त्यांच्याकडून मला त्यांचे लहानपणचे व्यक्तिमत्त्व कळले. लहान ७–८ वर्षांपर्यंत बुध पाचेगाव या खेड्यात राहात असत. नंतर पुण्याला आले. वडिलांच्या काकी म्हाताऱ्या होत्या, त्यांना पुराणाला देवळात पोचवायचे त्यांचे काम असे, पण त्याकरता एक ते दीड तास जात असे. वडील म्हणत अभ्यास कर नाही तर नादारी जाईल. ह्यांनी एवढ्या लहानपणी धीर करून वडिलांना सांगितले, 'मी अभ्यास चांगला करीन, पण काकीला पुराणाला रोज नेणे जमणार नाही.' वडिलांनी विचार केला व ते काम मोठ्या भावाला दिले. वडिलांचा उपदेश त्यांना जन्मभर पुरत आहे. तेव्हापासून घरातले काम त्यांना कोणी दिले नाही आणि अभ्यास हे एकच ध्येय ते पाळत. अशा कितीतरी गोष्टी सासूबाईंनी मला सांगितल्या.

दिल्लीला असताना ते जेवायला घरी येत,पण वेळेवर येत नसत. आईवडील जेवायचे थांबत. शेवटी त्यांनी आई–वडिलांना सांगितले, 'तुम्ही जेवून घ्या, मला वेळेवर येणे जमणार नाही.' अशा तऱ्हेने सर्व मंडळी आम्ही तडजोडीने राहात असू. सकाळी चहाची वाट मात्र आईवडील पाहात व हे नेहमी तेवढी दहा मिनिटे त्यांच्याबरोबर असत. संध्याकाळी मात्र आम्ही मुलांना घेऊन जेवत असू. हे मुलांची चौकशी करीत व गणिताची कोडी त्यांना घालत. फालतू गप्पा त्यांना आवडत नसत. सुट्टीच्या दिवशी मुलांना व आम्हा सगळ्यांना गाडीतून फिरायला नेत. मुलांना आम्ही पुस्तके नेहमी आणून देत असू. वडील सारखे काम वाचन यात मग्न, तेव्हा मुलांनी तोच कित्ता गिरवला होता. आम्ही संसारात पूर्ण रमलो होतो. पण आण्णासाहेबांचा कामाचा व्याप वाढत चालला होता.

त्या वेळी आण्णासाहेबांना खेडोपाडी जाऊन पिकाची चाचणी करावी लागे.

नमुन्याकरता काही खेडी व त्यातील थोडी शेते यांची ते पाहणी करीत. कोणती खेडी व कोणती शेती पाहणीकरता घ्यायची हे संख्याशास्त्राचे आधारे ठरवीत. निवडलेल्या शेतीचे पीक काय असावे हे त्या त्या शेतकऱ्यांच्या अनुमतीने त्यांच्या देखत कापून, वजन करून ठरवीत. ज्या पद्धतीने शेतकरी स्वतःचे पीक कापतो व वाळवून गोळा करतो तीच पद्धत ह्यांनी वापरली होती. निवडलेल्या शेतीची पाहणी करून त्यांना एकंदर पीक किती आले याचा अंदाज ठरविता येत असे. सुरुवातीला एक–दोन प्रांतात गहू आणि तांदूळ याची चाचणी करून त्यांनी पिकांचा अंदाज दिला. हे काम सरकारला इतके पसंत पडले की, अवघ्या तीन वर्षांत हिंदुस्थानभर त्यांनी आपल्या प्रांतीय सहकाऱ्यांच्या मदतीने ते सुरू केले. त्याकरता लागणारा खर्च केंद्र सरकारने देऊ केला. महाराष्ट्रात श्री. कोशाल, मध्य प्रदेशात कै. डॉ. कळमकर व उत्तर प्रदेशात श्री. किशन यांच्या साहाय्याने काम झपाट्याने होऊ लागले. ह्या क्षेत्रात कामाकरता पुष्कळ सेवकवर्ग निर्माण करण्यात आला व खुद्द दिल्लीत तर दररोज येणाऱ्या पिकांचे शेकडो नमुने पाहणीच्या अहवालावरून सबंध प्रांताकरता कसा अंदाज काढायचा ह्याकरता एक मोठे ऑफिस सुरू केले. कामास लागणारे जरूर ते तज्ज्ञ लोक तयार करण्याकरता आण्णासाहेबांनी डिप्लोमाचे वर्ग सुरू केले. काहींना आपल्या मार्गदर्शनाखाली एम.एस्सी. व पीएच.डी. करता सोय केली. १९४० मध्ये सुरुवातीला एक कॉम्प्युटर आणि एक ॲसिस्टंट एवढेच ऑफिस होते व निरनिराळ्या प्रांतांत तर खूपच मोठा कार्यकर्ता वर्ग तयार झाला. संख्याशास्त्राचा आधार घेऊन ही नवी पद्धत कशी वापरली जाते ह्याबद्दल बरेच लेख व व्याख्याने आण्णासाहेबांनी हिंदुस्थानात व परदेशात दिली. असेच एक व्याख्यान (१९४९) वॉशिंग्टनमध्ये देत असताना त्यांना 'आमच्याकडे येऊन ही पद्धत आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका वगैरे देशांत करून दाखवा' म्हणून युनोतर्फे आमंत्रण आले, पण त्या वेळी त्यांनी ते स्वीकारले नाही. आपल्या देशात संख्याशास्त्र विभागातून शक्य तर कायम स्वरूपाची संस्था निर्माण करून दिल्लीतच काम करावे असे त्यांना वाटत असे, पण त्यात अनपेक्षित अडचणी आल्या. कलकत्त्यामध्ये (संख्याशास्त्रज्ञ) प्रो. महालनोबीस यांचेही संशोधन याच विषयावर चालत असे आणि आण्णासाहेबांच्या योजनेस त्यांच्याकडून कडाक्याचा विरोध झाला. भांडण विकोपाला गेले. महालनोबीस यांची पाहणीची पद्धत पाश्चात्त्यांच्या धर्तीवर आधारलेली होती व ती वापरण्यास खर्च कमी होईल व तीच सर्व देशभर

वापरावी असा त्यांचा आग्रह होता. आपल्या देशातील परिस्थितीत ही पद्धत वापरणे योग्य होणार नाही असे त्यांना वाटे. अशा वेळी आण्णासाहेबांच्यावर पुष्कळ दडपण घालण्यात आले. दोघांना खुद्द पंडित नेहरूंनी बोलाविले, पण तडजोड होऊ शकली नाही. प्रो. महालनोबीस व डॉ. सुखात्मे यांचे दोघांचे मिळून एक ऑफिस करावे व सुखात्मे यांनी डेप्युटी म्हणून काम पाहावे. डेप्युटी असले तरी त्यांचा पगार डायरेक्टरबरोबर राहील, असे सांगण्यात आले, पण असं काही करण्यापेक्षा मी राजीनामा देणेच बरे असे ह्यांनी सांगितले.

कोणापुढे हाजी हाजी करून न राहण्याचा स्वभाव असल्यामुळे काम करेन ते विचारपूर्वक करेन असेच ते नेहमी म्हणत.

दिल्लीत असताना खेडेगावातले काम करायचे म्हणजे प्रवास सतत करावा लागे. शिवाय खेड्यात जाऊन पाहाणी करायची हे काम बिकटच होते. प्रवासात मला आठवते, त्यांचे जेवणाकडे मुळीच लक्ष नसायचे. प्रवासाची बॅग व होलडॉल नेहमी तयारच असे. कित्येक वेळा जेवायला अगर घरी यायला वेळ नसे तेव्हा मी सामान घेऊन चपराश्याबरोबर नवी दिल्ली स्टेशनवर उभी राहात असे. गाडी सुटायच्या आधी हे पळत येऊन बसत. आम्ही सामान ठेवीत असू व गाडी सुटे. आळस नाही, जिवाची धडपड, कंटाळा नाही, त्यामुळे सर्व कामे अशीच गडबडीत होत. घरी येऊन तीन–चार दिवस राहात की पुन्हा प्रवास. कधी कधी कामाचा ताण आम्हाला दिसे. कामाच्या बाबतीत थोडा हटवादी स्वभाव. काम करायचे म्हणजे करायचे. एकदा मला आठवते, अंगात ताप, Antibiotics ची औषधे चालू आणि पलंगावर उठून बसून ऑफिसचे काम सुरूच असे. दोन–तीन मंडळीही ऑफिसची बसलेली असत. ताप उतरला की विसावा हा शब्द कोशात नाही. तारुण्याची उमेद काम म्हणजे काम, खाण्याची आबाळ, घरातल्या सर्व मंडळींना हा स्वभाव माहीत होता, त्यामुळे आम्हाला त्यांची दया यायची.

एकदा उन्हाळ्याची कसली तरी सुट्टी होती व पाहुणे घरी आले होते म्हणून माझ्याबरोबर भाजी आणायला बाजारात आले. पायजमा व शर्ट घालून आले व पिशवी घेऊन माझ्याबरोबर चालले. आमचे दोघांचे काहीच बोलणे नाही. ते विचारात चाललेले. दिल्लीला मेमसाबबरोबर नोकर पायजम्यात जातो अशी पद्धत आहे. मी भाजी घेतली व तो भाजीवाला म्हणाला, 'बीबीजी सब्जी नोकरके थैले में डालू.' मी या वाक्याने सर्द झाले. मी रागाने यांचेकडे पाहिले. मी काय घेते इकडे

आण्णासाहेबांचे लक्षच नव्हते, त्यामुळे ही पदवी मिळाली. त्यांना त्याचे काहीच नाही. मी घरी येऊन त्यांना सांगितले, 'भाजीवाला तुम्हाला नोकर म्हणाला.' तेव्हा मला वाटलं राग येईल, पण ते मला हसतच म्हणाले, 'अगं तो नोकर म्हणाला तरी मी तुझा नवराच राहाणारे.' मला हसू आले.

गुरुजनांबद्दल आण्णासाहेबांना फार आदर. ज्या गुरुजनांनी त्यांना शाळा–कॉलेजमध्ये शिकविले त्यांचे ऋण ते विसरले नाहीत. उदा. किंकर, मालशे ह्यांनी फीचे पैसे भरायचे, पुस्तके द्यायची व वेळोवेळी मार्गदर्शन, तसेच लिमये मास्तरही. ते म्हणत, माझ्या गुरुजींच्यामुळे मला शिक्षणाची आवड उत्पन्न झाली.' विलायतेला जाताना कर्ज मिळाले ते केवळ ह्या सगळ्यांची सदिच्छा. हरिभाऊ आपटे यांना ते मानाचे समजत. आम्ही परदेशात होतो तरी भारतात आलो म्हणजे हे गुरुजींना नमस्कार करण्यास आम्ही दोघे पुण्याला मुद्दाम येत असू. जुन्या शाळेतल्या मित्रांना भेटत व एकत्र वेळ घालवीत. ती मैत्री व मित्र अजूनही आहेत.

प्राध्यापक सर रोनाल्ड फिशर (नामांकित संख्याशास्त्रज्ञ) ह्यांच्याकडे लंडनला संशोधन करीत असताना ते त्यांना नेहमी अवघड प्रश्न घालीत व म्हणत, विचार कर तुला उत्तर आलंच पाहिजे. तेव्हा ते रात्रंदिवस तोच विचार करीत. झोप नाही, खाण्याचा विचार नाही सतत संशोधनाचा विचार. शेवटी फळ मिळे तो आनंद निराळाच.

दिल्लीला दहा वर्षांत केलेल्या संशोधनाचा परिणाम असा झाला की, १९४८ मध्ये वॉशिंग्टनला त्यांना बोलाविले त्या वेळी ते गेले नाहीत; पण त्यानंतर वॉशिंग्टनचे युनोचे ऑफिस रोमला आले आणि १९५१ मध्ये आम्हाला युनोच्या फूड ॲन्ड ॲग्रिकल्चरल ऑर्गनायझेशन (F.A.O.) तर्फे 'तुम्ही इकडे या आम्हाला तुमच्यासारखा माणूस संख्याशास्त्र विभागाचा चालक म्हणून पाहिजे आहे,' असे बोलाविणे आले व ह्या वेळी त्यांनी ते आमंत्रण स्वीकारले. ह्याबद्दल बऱ्याच वर्तमानपत्रात ह्यांच्याबद्दल छापून आले. ह्या वेळी केसरीत आलेला मजकूर नमुन्यादाखल थोडक्यात देते.

शास्त्रज्ञांमध्ये सर सी. व्ही. रामन किंवा डॉ. भाभा ह्यांचे जे स्थान आहे तेच संख्याशास्त्रात (Statistics) डॉ. पां. वा. सुखात्मे यांचे आहे, पण दुर्दैवाने आपल्या देशात गुणी जनांची जितकी बूज राखावयास पाहिजे तितकी राखली

जात नाही, हेच खरे. म्हणूनच ज्या ज्ञानाचा आजच्या आणीबाणीच्या काळी भारताला उपयोग व्हायला पाहिजे होता ते ज्ञान परदेशाच्या अधिक उपयोगी पडण्याची वेळ येत आहे. डॉ. सुखात्मे ह्यांचा हा व्यक्तिशः बहुमान आहे आणि जगात भारताचे नाव उजळ करण्याच्या दृष्टीनेही ह्या नेमणुकीचा उपयोग होईल, पण त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा भारताला प्रत्यक्षपणे उपयोग होऊ शकणार नाही हा भारताचा विलक्षण तोटाच नव्हे काय? अन्नमंत्री कन्हैयालाल मुन्शी ह्यांनी मुद्दाम ह्या प्रसंगी बोलताना डॉ. सुखात्मे यांची उणीव भरून काढणे कठीण असे मत व्यक्त केले वगैरे मजकूर केसरीत आला होता.

त्यानंतर (१९५१) रोममध्ये एफ.ए.ओ.च्या संख्याशास्त्राचे प्रमुख सल्लागार म्हणून आण्णासाहेबांनी २१ वर्षे काम केले. आयुष्यातले महत्त्वाचे व घडामोडीचे प्रसंग तेथेच घडले व जे काम ते भारतात करीत होते त्याच कामाची मुहूर्तमेढ परदेशात घातली गेली असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

त्या वेळी आण्णासाहेबांच्या संचालकत्वाखालील या संस्थेची शाखा लहान होती व मला वाटते अवघे ३० तज्ज्ञ त्यांच्या विभागात होते. हळूहळू शाखेचा विस्तार वाढू लागला आणि सध्या १०० तज्ज्ञांक जाऊन पोचला आहे. ही सर्व ह्यांची तपश्चर्या आहे. हा विस्तार वाढविण्यास प्रथमतः त्यांनी भारतीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांची निवड केली. केवळ ते भारतीय म्हणून घेतले अशातला भाग नाही, तर ही तज्ज्ञ मंडळी I.C.A.R. मध्ये असताना त्यांचेबरोबर सहमताने संशोधन करीत होत. त्यांपैकी श्री. लेले, अयाचित, आमले, शास्त्री व प्यारासिंग वगैरे कार्यक्षम मंडळी त्यांनी आपणहून बोलावून घेतली व आफ्रिकेतल्या काही विकसनशील देशांत हे तज्ज्ञ काम पाहू लागले व आपली कामाची चाचणी पद्धत त्यांनी शेतकऱ्यांना समजावून सांगितली. श्री. कोशाल (शेतकी खात्याचे मुख्य संख्याशास्त्रज्ञ) यांना ते भारतातून येतानाच बरोबर घेऊन आले. त्यांनी रोम, इजिप्त, बगदाद वगैरे ठिकाणी अतिशय भरीव काम केले व वयाच्या ७० वर्षांपर्यंत ते परदेशात होते. डॉ. किशन व डॉ. पानसे यांनाही ते सल्ला देण्यास बोलावीत असत. धारवाडला प्रोफेसर असलेले डॉ. नारायण यांना रोमला बोलाविले. अजूनही ते तेथेच आहेत. त्यांचे जुने मित्र कै. संगपाल यांनी (Chile) चिलीत बरीच वर्षे काम केले.

पुष्कळ वेळा आंतरराष्ट्रीय बैठकी होत व काही मंडळींना वशिल्याने शिरकाव

व्हावा असे वाटे व ह्यांच्यावर दडपण येई;पण ह्या गोष्टींना ते दुजोरा देत नसत. उलट ते ज्या वेळी अशा बैठकीला जात तेथे येणाऱ्या तज्ज्ञांवर ते लक्ष ठेवीत व कोण कार्यक्षम आहे याची ते पाहाणी करीत व जागा रिकामी पाहिली की स्वतः ते त्याला तू रोमला येतोस का ? म्हणून विचारीत. त्यावेळी ते देश व जात पाहात नसत, फक्त कार्यक्षमता पाहून त्याला बोलावून घेत.

श्री. कोशल परदेशात गेल्यावर पुण्याचे शेतकी खात्याचे संख्याशास्त्रज्ञ डॉ. रंगराव, आसाममधील प्रो. थवानी, मुंबईचे डॉ. तेलंग यांना त्यांनी बोलावून घेतले व बँकॉक, इराक वगैरे निरनिराळ्या ठिकाणी ते ह्यांना पाठवीत असत. F.A.O. च्या शाखा जगात जेथे जेथे होत्या व ज्या ठिकाणी संख्याशास्त्रज्ञांची जरुरी होती त्या ठिकाणी निवड करण्याचे ह्यांचेच काम होते. त्यामुळे सगळीकडे जाऊन देखरेख करण्याचे मोठे काम असे. त्यांचेबरोबरच शिकत असलेले Dr. Tang हे वॉशिंग्टनला काम पाहात. जपानहून Dr. Midguno व Dr. Kavakatsu ह्यांनाही त्यांची कार्यक्षमता पाहून रोमला बोलावून घेतले. नेपाळला गेले असताना श्री. थिताल यांना घेऊन आले. ते रोमलाच असतात. त्याशिवाय श्री. व्यंकटरमण, बसू, आगरवाल, मुजुमदार, दिलवाली वगैरे मंडळीही त्यांनी दिल्लीहून बोलावून घेतली.

ह्या आंतरराष्ट्रीय संस्थेचे मुख्य पदाधिकारी डायरेक्टर जनरल बी. आर. सेन हे भारतीय असून ११ वर्षे ते ह्या पदावर होते ही भारताला अभिमानाची गोष्ट आहे. आण्णासाहेबांनी आपली कार्यक्षमता दाखवून त्यांचा विश्वास पूर्ण संपादन केला होता. प्रत्येक देशाचे प्रतिनिधी रोमच्या शाखेत किती घ्यायचे हा आकडा ठरलेला असतानासुद्धा काही तज्ज्ञ जास्त घेतले गेले तरी वरिष्ठांचा विरोध झाला नाही.

अशा तऱ्हेने ही सर्व तज्ज्ञ मंडळी एकोप्याने काम पाहात होती. आण्णासाहेबांची व त्यांची चाचणी पद्धत एकच असल्याने मतभेद होत नसे. उलट कामे सलोख्याने होत. अशा मित्रमंडळींच्या सहकार्यामुळे त्यांना स्वतःला कधीही त्रास झाला नाही, उलट जास्त संशोधन करण्यास वेळ मिळाला.

या नोकरीत अधिकाराने कामे करण्याची त्यांना सवलत होती. एकदा प्रो. महालनोबीस यांनी आण्णासाहेबांना एक पत्र लिहिले व विचारले की, पुढच्या वर्षी जपानला एफ.ए.ओ.चे काही काम असेल तर मला जाण्याची इच्छा आहे

लगेच पूर्वीचा मतभेदाचा विचार न करता त्यांनी त्यांची जपानला जाण्याची व्यवस्था केली. ज्या प्रो. फिशर व प्रो. नेमन (Neyman) यांच्या मार्गदर्शनाखाली आण्णासाहेबांनी पदव्या घेतल्या. त्यांनाही ते विसरले नाहीत. आंतरराष्ट्रीय अधिवेशनात ते त्यांचा समावेश करीत व त्यांच्या सूचनांना मान देत. Prof. Yates, Prof. Finney वगैरे आणखी किती तरी मंडळींना ते बोलावीत. मी त्या सर्वांना घरी जेवायला बोलावीत असे. परदेशात असताना मी अशी किती जेवणे दिली असतील याची गणतीच नाही.

संसारी माणूस जसा घरातल्या माणसांचे सुखदुःख बघतो त्याचप्रमाणे ऑफिसमध्ये काम करीत असताना तज्ज्ञ मंडळींवर ह्यांचे बारीक लक्ष असे. सिलोनला गेले असताना त्यांच्याबरोबर लंडनला शिकत असलेला मि. विल्यम ह्याची भेट झाली. हा सिलोनला संख्याशास्त्र विभागाचा प्रमुख होता. त्याला ते तेथून डेप्युटीच्या जागेवर घेऊन रोमला आले. एकदा एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात तो वृत्तान्त लेखक (Reporter) होता. दोन दिवसांनी रिपोर्ट द्यायचा. पण विल्यमकडून तो रिपोर्ट ह्या वेळी फार त्रोटक आला व चांगला नव्हता. पूर्वी असे कधीच झाले नव्हते. त्या दिवशी रात्रभर आण्णासाहेबांनी बसून तो रिपोर्ट दुसरे दिवशीकरता चांगला लिहिला व लगेच सकाळी उठून ते त्याचे घरी गेले. दाढी करायला उभे राहावत नव्हते अशी त्याची स्थिती त्याच्या बायकोने सांगितली. दोन महिने झाले वजन कमी होत आहे व प्रकृती बरी नाही. महत्त्वाचे अधिवेशनात आण्णासाहेबांना त्रास होऊ नये म्हणून तो बोलला नाही. असे बंधुत्वाचे नाते होते. ह्यांनी ताबडतोब त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. आणखी एक दुसरे उदाहरण म्हणजे त्यांनी थायलंडमधून (Bankok) एक तज्ज्ञ श्री. दरदारनंदा आपल्या शाखेत घेतला होता. त्याला मुळव्याधीचे दुखणे बरेच दिवस होते. ते दुखणे त्याचे विकोपाला गेले व डॉक्टरांनी ऑपरेशनची जरूर आहे असे सांगितले. आपण रजा कशी घ्यायची हे विचारायला त्याला लाज वाटत होती. एक दिवस तो ऑफिसात आला नाही तेव्हा बायकोने फोन करून सर्व हकीगत सांगितली. आण्णासाहेबांनी लगेच त्याची रजा मंजूर केली.

अधिकाराच्या दाबा दडपणात त्यांनी कोणाकडूनही कामे करवून घेतली नाहीत. आत्मविश्वास व प्रेम ह्याच्याच साहाय्याने त्यांना सगळीकडे यश आले.

काही वर्षांपूर्वी जेव्हा प्रथिनांचा प्रश्न आण्णासाहेबांनी हाती घेतला तेव्हा

लोकांनी त्यांना वेड्यात काढले. ' टाईम्स ऑफ इंडिया 'ने आपल्या अग्रलेखात " आम्हाला अशा आकडेशास्त्रज्ञाची जरुरी नाही, त्याने परदेशातच राहावे " असे सुचविले. प्रथिनांच्या प्रश्नावर बराच ऊहापोह झाला. परदेशात त्यांनी काही लोकांना त्यांचे निष्कर्ष पटवून दिले. प्रथिने आणि उष्मांक ह्यांचा अन्योन्य संबंध लक्षात घेण्यास संख्याशास्त्राचा वापर करून निष्कर्ष कसे बदलतात हे दाखवून दिले. अर्थात ह्याला खूपच मेहनत व वाचन करावे लागले. प्रयत्न केल्यास यश मागोमाग येते ही त्यांची गुरुकिल्ली आहे. एक साथेच उदाहरण, पुण्याला आम्ही घर बांधायचे ठरविले. घराचा मुहूर्त केला. त्याच महिन्यात आण्णासाहेबांना लंडनला Royal Society पुढे प्रथिनांचा प्रश्न या विषयावर पेपर वाचण्यास बोलावणे आले. मी म्हटले, ' जरा उशिरा गेलो तर नाही का चालणार ? ' तेव्हा मला उत्तर मिळाले ' हे बघ आता मी सेवानिवृत्त आहे मला हे आमंत्रण झुगारून चालणार नाही, संधी दवडता उपयोगी नाही. ' घर हे बांधले जाणारच, त्याचं आपल्याला काय समजते. पंधरा दिवसांचे आत आम्ही पतिपत्नी लंडनला जाऊन पोचलो. पुण्याहून निघताना मित्रमंडळी म्हणत होती, ' अहो Contractor वर घर सोपवू नका, फसवतील. ' पण ह्यांचे लक्ष कामाकडे. आपल्याला कोणी फसवेल हे त्यांच्या कधी मनातच येत नाही. नेहमी दुसऱ्यावर विश्वास टाकायचा हा त्यांचा स्वभाव आणि खरोखरच आजपर्यंत त्यांना कोणी फसविले नाही. लंडनला पेपर वाचला तो त्या लोकांना इतका आवडला की, त्यांना मानाचे पदक Guy Meda हे मिळाले. घर बांधताना माणूस काही तरी आवडीच्या सूचना देतो, त्यांनी सांगितले मला खोलीभर पुस्तके ठेवण्यास कपाट पाहिजे, पुस्तके हीच त्यांची खरी संपत्ती. कोणी पैसे मागितले तर काढून देतील, संस्थांना मदत करतील. गरीब विद्यार्थ्यांना पैसा देऊन शिकवतील हा त्यांचा स्वभाव. रोमला असताना भारतीय संगीत ऐकायला मिळत नव्हते. आम्ही मराठी गाणी रेकॉर्ड करून नेली होती. दोन/तीन तासांचा टेप लावून त्या मधूर संगीताच्या वातावरणात रोमला रात्रंदिवस काम करीत.

जेवणात आवडीनिवडी अजिबात नाहीत. प्रकृति स्वास्थ्याकरता जे पचणार नाही ते खात नाहीत, घरगुती स्वयंपाक पसंत करतात. रोमला असताना रोज सूटच घालावा लागे. आंतरराष्ट्रीय कचेरीत काम करायचे म्हणजे थोडे त्यांचे नियम पाळावे लागतात. दारूच्या पार्ट्या, जेवणे वगैरे नेहमी द्यावी लागत. जेवताना

शाकाहारी व मांसाहारी पदार्थ बरेच असत. दारू दुसऱ्याला देत; पण स्वतः पिण्याची आवड नव्हती. सिगरेट तर परदेशात भयंकर पिण्याची चाल आहे. दारू, सिगारेट व भरपूर खाणे हे जर नसेल तर What is life for? (आयुष्य कशाकरिता आहे?) असे म्हणतात. ह्यांच्या एकदोन मित्रांना हार्ट ॲटॅक आले. तरी व्यसनाधीन राहिले व शेवटी आजारी पडले. आण्णासाहेबांना घरकामाची आवड नाही. आम्ही रोमला असताना एकदा त्यांच्या आईला दिल्लीला बरे नव्हते व मी दिल्लीला आले होते. रोमहून निघताना हे मला म्हणाले, " भात कसा करायचा ते लिहून ठेव. " त्याप्रमाणे एक दिवस भात चुलीवर ठेवला व लक्षात राहाणार नाही म्हणून २० मिनिटांचा गजर लावून वाचायला बसले. गजर झाल्यावर गॅस विझवला. अशी कामे ते सांगमाम्याप्रमाणे करतात, खरी आवड नाही. जेवणाला कोणाला बोलाविले तर कोणत्या जातीची माणसे व किती एवढे ते मला सांगणार. स्वयंपाक मी काय करणार याची चौकशी नाही. नंतर मला शाबासकी मिळे, छान स्वयंपाक झाला. माझ्या कुठल्याही घरकामात ढवळाढवळ नाही. काही जबाबदारी टाकलीच तर करतील;पण नंतर वेळ वाया गेला म्हणतील. मुख्य आवड वाचन व जे वाचतील त्यावर चिंतन व संशोधन.

जगभर प्रवास केला, पण गावे बघण्यात आवड नाही. तिथे आपल्याला ज्ञानाचे खाद्य काय मिळते याचा विचार. त्यामुळे प्रवासात खूप शिकायला मिळाले. कामाच्या निमित्ताने भेटलेली मंडळी तेच मित्र. मुद्दाम कुणाकडे जाऊन ओळख करणार नाहीत. आपला विषय सोडून गप्पा बारणे पसंत नाही. त्यामुळे मला हे सर्व सोशल पाहावे लागे. मला कुठलीही आडकाठी नाही. त्यामुळे रोमला मला खूप मैत्रिणी झाल्या.

भाषा शिकण्याची आवड नाही. इटालियन भाषा इतकी वर्षे राहून शिकले नाही. दिल्लीला राहून हिंदी भाषा शिकले नाहीत. रोमला त्यांचे ऑफिसची खोली खूप मोठी. दोन सेक्रेटरी मुली बाहेर बसलेल्या. त्यांना इटालियन, स्पॅनिश व इंग्लिश येत असे. कित्येक वेळा भेटायला येणारी मंडळी खोलीत येत व हे आपले फिरत्या खुर्चीत पुस्तकात डोके घालून वाचीत बसलेले. त्या लोकांच्या मानाने दिसायला लहान, त्यामुळे पाहुण्यांना त्यांना शोधावे लागे.

रोमचे जीवन फार तणावाचे व त्यात ह्यांचा धडपडा स्वभाव. एकदा एका मीटिंगला बँकॉकला गेले, तेथून रोमला परत येताना दिल्लीला धाकट्या भावाच्या

लग्नाला हजर राहून यायचे ठरविले. पण निघण्याच्या आदल्या दिवशी त्यांना खूप ताप आला. डॉक्टरकडे गेले. औषधांनी ताप उतरला. लगेच दुसऱ्या दिवशी लग्नाला हजर. दोन दिवसांनी रोमला. विसावा मुळीच नाही. रोमला आल्यावर मी म्हटले, ' थोडी विश्रांती घ्या, ' पण कसचे काय ? काम सुरूच होते. त्यानंतर थोडेच दिवसांत एक घटना घडली. एक दिवस त्यांना हार्ट ॲटॅक आला. हॉस्पिटलमधून सहा आठवड्यांनी घरी आले. त्यानंतर ऑफिसमधून सहा महिने रजा घेतली. आता ऑफिस नाही, पण स्वस्थपणा नाही. डॉक्टर (हार्ट स्पेशालिस्ट) त्यांचे मित्र बनले. E.C.G. (Electro-Cardiogram) कसा वाचायचा त्याचा अभ्यास केला. रक्तातले घटक, कलोस्टेरोल वगैरे चाचण्यांचा अभ्यास केला. रोममधले जीवन, पार्ट्या, खाणे यावर विचार व संशोधन सुरू झाले. आजारी पडण्याचे कारण हे धावते जीवन असे विचार मनात येऊ लागले आणि पोषण–शास्त्रावर संशोधनाची जरुरी त्यांना भासू लागली. त्यांचे जीवन बदलले. आहार किती महत्त्वाचा हे आजारी पडल्यामुळे कळले आणि तेच संशोधन आता त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करीत आहे.

त्यांचा स्वभाव तसा हळवा आहे. त्यांची आई वयाच्या ८६ व्या वर्षापर्यंत जगली. तिला पुण्याला यायची इच्छा होती. तिला आम्ही पुण्याला आणले. रात्री खोकला आला म्हणून आम्हाला हाक मारली. आम्ही दोघे तिच्याजवळ गेलो. आम्हाला तिने जवळ घेतले. पण काय कुणास ठाऊक एकदम ओरडून म्हणाली, ' आण्णा, तू कामाचा माणूस जा कामाला. ' आम्ही दोघे उठलो व झोपायला गेलो. आण्णासाहेब नेहमीप्रमाणे उठून आतल्या खोलीत कागद पसरून बसलेले. ती साडेसहा वाजता आले, आईला हाक मारली. अंगाला हात लावला. डॉक्टर आले, ते म्हणाले, रात्री साडेतीनलाच प्राण कुडीतून गेला. ह्यांच्या डोळ्यात अश्रू आले. ते म्हणाले, 'आईचे अंग गरम आहे, ती कशी गेली.' आईवर खूप माया होती त्यांची.

धाकट्या भावावर व बहिणीवरही त्यांचे खूप प्रेम. कुटुंबातल्या सगळ्या मंडळींचे ते प्रेमाने करीत. तसेच स्वतःच्या मुलांचा अभ्यास वगैरेकडे त्यांचे लक्ष असे. कितीही कामात असले तरी कौटुंबिक जिव्हाळा घरात असे. सांभाळून घेण्याची वृत्ती.

आता भारतातले ऑफिसचे वातावरण वेगळे; पण तरीसुद्धा आपले काम व आपण कुणाच्या मध्ये पडणार नाहीत. हाताखालच्या लोकांना सांभाळूनच कामे

करतात. अरेरावी, उलट बोलणे हे कधीच नाही. मुख्य म्हणजे काहीतरी नवीन शिकत राहाणे. कोणीही हुशार गृहस्थ वाटला तर त्याला कामात प्रोत्साहन देतात व मार्गदर्शनही करतात. कुठेही व्याख्याने देऊन आले की त्याचा गाभा मला सांगतात. आम्ही दोघे असलो तरी विविध विषयांवर चर्चा चालते, दुसऱ्याला समजेल अशा शब्दात समजावून सांगणे हे त्यांचे वैशिष्ठ्य.

समाजजीवनाचा अभ्यास करण्याची खूप आवड. खेडेगावात प्रकल्प व सुधारणा घडवून आणल्या. विविध संस्कृतीतून देशोदेशी प्रवास, संस्कृती जीवनातील मूल्ये यावर खूप वाचन, विवेकानंदांची पुस्तके, कर्मयोग, भक्तियोग तसेच विनोबा भावे यांचे गीता–प्रवचनवर सखोल अभ्यास.

माझ्या सांगण्यावरून मला तिरुपतीला नेऊन आणले. तेथेच एक Convocation Address दिला. भारतीय व भारतीयजीवनाचा अभ्यास सतत चालू. भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य ते परदेशात पटवून देण्याचा प्रयत्न करतात. मनःशांती असेल तर माणूस आनंदात असेल. तिथल्या घसरत्या जीवनाचे परिणाम आम्ही नेहमी पाहातो.

आता मुले आपल्या संसारात व मुलाबाळांत रमली आहेत. आमच्या सर्व मुलांना अभ्यास व संशोधन हेच बाळकडू वडिलांकडून मिळाले आहे. आमच्या तीन्ही मुलांनी M.I.T. (Massachusetts Institute of Technology) मधून डॉक्टरेट पदव्या घेतल्या आहेत. मोठा मुलगा मेकॅनिकल इंजिनिअरिंग, मधला थियरिटिकल फिजिक्स व थाकटा Solid State Physics मध्ये डॉक्टरेट व Harward Medical School मधून M.D. (Medical) झाला. त्याचे Genetic Engineering वर Research सुरू आहे. त्याने बरेच genes done केले आहेत. नुकत्याच त्याच्या एका विद्यार्थ्याला Cancer gene done separate केल्याबद्दल २१,००० डॉलर्सचे पारितोषिक मिळाले. मुलगी M.R.C.P. लंडन व आता अमेरिकेतच आहे. तिचे यजमान Padiatrics लहान मुलांचे किडनीवर संशोधन करतात. अशी सर्व मंडळी उद्योगात रमली आहेत. त्यांच्या बायकाही शिकलेल्या आहेत. तीन मुले अमेरिकेतच स्थायिक आहेत. फक्त मोठा मुलगा पवईला I.I.T. (Indian Institute of Technology) येथे प्रोफेसर आहे. तो Ph.D. च्या मुलांना मार्गदर्शन करतो.

आम्ही दरवर्षी अमेरिकेला जातो व दोन महिने मुलांच्याकडे राहातो. नातवंडे तिथल्या वातावरणात वाढत आहेत. आण्णासाहेब त्यांच्याशी बोलण्यात रमतात, त्यांना गणित वगैरे शिकवतात. तेथे असलो तरी घरी सतत ह्यांचे वाचन सुरू असते. त्यांना टेबल, खुर्ची, एक स्वतंत्र खोली मुले देतात. कारण हे पुस्तकाशिवाय रिकामे बसणार नाहीत, हे मुलांना माहीत आहे. तेथे सकाळी फिरायला जाताना पुस्तकाच्या दुकानात अगर लायब्ररीत जाऊन बसतात. नेहमी नवीन संशोधनाची पुस्तके विकत घेतात. प्रवासाच्या सामानात पुस्तकेच जास्त असतात. घरात गप्पा हा शब्दकोषात नाही. मुलांशी वेगवेगळ्या विषयांवर त्यांची चर्चा चालते. डॉक्टरी ज्ञानही जाणून घेण्याची ह्यांना इच्छा असते.

नातवंडे टेलिव्हिजन बघतात तेव्हा तेथे काय चालते हे त्यांना मुले समजावीत असतात. मग मध्येच हे पुस्तक उघडून वाचीत बसतात. नातवंडांना कळते, ती गप्प बसतात; पण मनातून त्यांना उत्कंठा असते की आजोबा काय वाचतात. आमचा सहा वर्षांचा एक नातू आहे. तो रोज पाही की आजोबा एकच पान सारखे वाचतात. शेवटी एक दिवस त्याने विचारले, ' तुम्ही एकच पान किती दिवस वाचता. ' ते म्हणाले मी विचार करतो, तेव्हा तो म्हणाला संशोधन करता. होय व उदाहरण म्हणून ते म्हणाले, ' काही मुले भराभर वाढतात व काही हळूहळू, पण दोघांचा आहार सारखाच का ? वाढ ही आहारावर किती अवलंबून व आईवडिलांच्या बांध्यावर किती अवलंबून ? मी अमेरिकन मुलांपेक्षा का लहान ?' तो म्हणाला, सांगा, मी काय खाऊ ? ' त्याने आपल्या वडिलांना सांगितले, ' डॅडी, आजोबा रीसर्च करतात. ' लहानपणापासून विचार करण्याची वृत्ती असावी असे ते नातवंडांना सांगतात व आपली संस्कृती ही आचरणाने दुसऱ्याला शिकवावी असे ते सांगत असतात.

एकटे प्रवास करताना एकदोन गंमतीच्या गोष्टी घडल्या. कित्येक वेळा विमानतळावर त्यांना तीनचार तास थांबावे लागते. आता एवढा वेळ कसा घालवायचा, तेव्हा विमानतळावर एका टेबलावर बसून काम करीत बसले. एकदा ह्यांचे स्टॉकहोमला जातांना कोपनहेगन (Copoenhegen) येथे विमान बदलायचे होते. ते विमान आले व गेले, पण त्यांना पत्ता नाही. काही वेळाने कोपनहेगनला चौकशी म्हणून टेलिफोन आला तेव्हा त्यांना आपले विमान चुकले हे कळले. आपण इंग्रजीत ज्याला Absent Minded म्हणतो त्याचेच हे

उदाहरण. मी सिनेमा अगर नाटक पाहून आले की म्हणतात सांग गोष्ट आणि मी सांगू लागले की पाचसहा मिनिटे ऐकतात व मनात विचार सुरू होतात. मी गप्प बसते. काय करणार? दिवसातून कित्येक क्षण असे जातात. एकदा एक ब्लाऊजचे कापड घेऊन मी घरी आले. मी म्हटले, 'हे टू बाय टूचे कापड छान असते.' तेव्हा म्हणाले, 'ब्लाऊजच्या कापडात कसले गणित केलेस.' त्यांना वाटले टू बाय टू कापडाला कसे म्हणतात. ते विचार करू लागले. मी म्हटले, अहो एवढा विचार करू नका. ह्याचा अर्थ २ धागे सुती व २ धागे सिंथेटिक. सांगायचा मुद्दा सगळ्याचा विचार. रोज जेवल्यावर काय खाल्ले याचे पृथक्करण व हिशोब असे चालते.

एकदा एक शाळेतला मित्र आमच्याकडे शोध काढून आला. हे एकटेच घरात होते. टेबलावर पुस्तकांच्या पसाऱ्यात काहीतरी काम चालले होते. मित्राला दार उघडले. दोघांच्या थोड्या जुन्या गप्पा झाल्या. ह्यांनी त्याला चहा करून दिला. तो म्हणाला, 'वयोमानाप्रमाणे आता काम कमी कर. मी बघ कसा आराम करतो.' तेव्हा ते म्हणाले, 'अरे बसून वेळ कसा जाईल. काम केलेच पाहिजे.' मलाही पुष्कळ मंडळी सांगतात अहो डॉक्टरसाहेबांना काम कमी करायला सांगा. मी म्हणते काम करतात तेच बरं, नाहीतर माझ्या डोक्याशी कटकट.

सध्या ते महाराष्ट्र असोसिएशन फॉर दी कल्टिव्हेशन ऑफ सायन्स (विज्ञानवर्धिनी) ह्या संस्थेशी संलग्न आहेत. संख्याशास्त्राचा आधार घेऊन त्यांनी नवनवीन संकल्पना मांडल्या आहेत. त्यावर प्रयोग सुरू आहेत. त्याकरता एक Metabolic Laboratory बांधून त्यात प्रयोगास लागणारी उपकरणे तयार ठेवली आहेत. आहारातून मिळणाऱ्या उष्मांकाचा विनियोग एकाच क्षमतेने होत नसून तो स्वनियंत्रित स्वरूपाचा असतो हे त्यांच्या प्रयोगातून प्रथम दिसून आले. त्यांनी केलेल्या प्रयोगाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने (Department of Science & Technology) त्यांना Human Calorimeter ही आधुनिक उपकरणांनी सज्ज केलेली Laboratory बांधायला परवानगी दिली आहे. आण्णासाहेबांचे Department of Biometry and Nutrition हे National Facility म्हणून सर्वत्र ओळखले जाते व त्यातून मुलांना M.A., M.Sc., M.Phil. व Ph.D. ह्या पदव्या घेता येतात. तसेच पुण्यातील आठ खेडी त्यांनी संशोधनाकरता दत्तक म्हणून घेतली आहेत. येथे बालवाड्या व शालेय

शिक्षण ह्यावर विशेष भर दिला जातो व मुलांच्या व समाजाच्या वृत्तीत फरक घडवून आणून सामाजिक व वैयक्तिक परिवर्तन म्हणजे त्यामागच्या सिद्धान्ताचे संशोधन, आध्यात्म हाच शिक्षणाचा गाभा हे प्रत्यक्षात दिसते.

क्रिकेटच्या मॅचेस बघायचे खूप वेड आहे. ऑफिसचे काम बाजूला ठेवून ते बघतात. लहानपणी खो खो व वेताचा मल्लखांब हे नेहमी करीत. कितीही काम केले तरी व्यायाम हा पाहिजेच. अजूनही ४–५ मैल चालण्याचा व्यायाम, शिवाय घरात आसने, प्राणायाम वगैरे नियमित करतात. खाण्यात नियंत्रण, त्यावर नेहमीच विचारमंथन चालते. अजून मीटिंग निमित्त बराच प्रवास मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणी चालू असतो व तसेच परदेशातही.

आण्णासाहेबांना कशाचा आनंद जास्त होत असेल तर त्यांच्या संशोधनातून त्यांच्या लेखनाच्या पुस्तकांचा. त्यांचे sampling वरचे पुस्तक Ames (IOWA) अमेरिका येथे शिकवत असता १९५२ मध्ये प्रसिद्ध झाले. ते विद्यार्थ्यांना इतके उपयोगी ठरले की लगेच त्याचे भाषांतर स्पॅनिश व फ्रेंचमध्ये झाले. पुस्तकाची १९८५ मध्ये तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. 'Statistical Methods for Agricultural Research Workers' हे त्यांचे दुसरे पुस्तक त्यांनी व डॉ. पानसे ह्यांच्या बरोबर लिहिले. शेतकी कॉलेजात ते सर्वत्र Text म्हणून वापरले जाते. आहार व स्वास्थ्य ह्यावर त्यांचे निबंध प्रथम वैज्ञानिक नियतकालिकातून व नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. ह्या सर्व नवीन संकल्पना "Newer concepts in Nutrition and Health" ह्या पुस्तकात आल्या आहेत (१९८२).

मुलांनी तोच कित्ता पुढे ठेवला आहे. मुलांचे संशोधन पाहून व मुलांच्या बरोबर बोलून ते कितीतरी आधुनिक ज्ञान मिळवितात. मोठ्या मुलानेही लिहिलेली दोन पुस्तके (१) Heart Transfor (२) Solar Energy ही Texts म्हणून सर्वत्र वापरली जातात. तसेच मधला मुलगा याने फिजिक्स विषयात बरेच पेपर्स प्रसिद्ध केले आहेत. मुलीचे Haemetology मध्ये संशोधन चालू आहेत. धाकटे चिरंजीव अगदी नवीन विषय माणसांचे जीन्स ह्यावर संशोधन व जावई किडनी संबंधी. अशा विविध विषयांतील संशोधन पाहून आम्हा दोघांना खरा आनंद होतो.

मुलांनी जरी परदेशात शिक्षण घेतले तरी त्यांच्या आचारविचारात व

संस्कृतीत काहीच बदल झाला नाही. आईवडिलांची भाषा ते विसरले नाहीत. अजूनही अमेरिकेत बोलाविणे आले की, आमचे पाय आपोआप तिकडे वळतात. आमचा धाकटा मुलगा तर लहानपणापासूनच रोमला वाढला, त्याच्याकरता मी मुद्दाम आपला स्वयंपाक करीत असे व त्याच्याकरता मराठी गाणी व भजने आम्ही रेकॉर्ड करून नेली होती. हे नेहमी त्याच्याबरोबर अभ्यासाची पुस्तके वाचत. आईला वयाच्या ७५ व्या वर्षी तुझ्या आठवणी लिही, असे आणासाहेबांनी सांगितले आणि मुलाचे ऐकायचे म्हणून त्या आठवणी त्यांनी लिहून काढल्या व "गेले ते दिवस" ह्या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या जन्माला आल्या.

मला पुष्कळ वेळा वाटायचं की, आपण खूप शिकावं, करिअर करावी. पण तसे केले असते तर चुरशीचे सामने घरातच सुरू झाले असते व संसार सुरळीत चालला नसता. संसारात पतीबद्दल आत्मीयता व त्याग हे गुण अंगी आणावे लागतात, तरच तो संसार सुखी होतो. आता खरे म्हणजे मुलेबाळे घरात कोणीच नाहीत, पण ह्यांच्या गडबडीत कधीच एकटे वाटत नाही. मला शिवणकाम, विणकाम, वाचन व लेखन याची आवड आहे. त्यामुळे आमची दोघांची कामे आखणीप्रमाणे स्वतंत्रपणे चाललेली असतात. कुणालाच कामाचा अडथळा येत नाही. घरात कुणाला बरे नसेल तर मात्र आण्णासाहेब बेचैन होतात व त्यांचेकडून जी मदत करणे शक्य आहे ती ते करतात. त्यांचा स्वभाव दिलदार व प्रेमळ आहे. त्यांचेपुढे आलेला अतिथी कधीही विन्मुख जात नाही.

त्यांची दोनतीन जिवावरची दुखणी झाली. त्यामुळे ते प्रकृतीला सांभाळून असतात. पण बरे वाटल्यावर कामात खंड पडू देत नाहीत. योग्य ती प्रकृतीची काळजी घ्यावी व कामात मन रमवावे असे त्यांचे मत आहे. मात्र उगीच कोणी तरी येऊन त्यांचा वेळ घेतला तर मात्र ते चिडतात. वेळेचे महत्त्व व आयुष्यातला एक क्षणही वाया जाऊ नये, असा त्यांचा कार्यक्रम असतो.

आम्हाला इतकी वर्षे न मिळालेली झुणका–भाकर आम्ही येथे आनंदात खातो व तीच लोकांना पुरेशी मिळावी अशी हे घोषणा करीत आहेत. आज ४० वर्षांनंतर महाराष्ट्रात परत आलो. जग हिंडून पालथे घातले; पण मातृभूमीची जी तहान लागली होती ती तृप्त करण्याकरता ही पुण्यनगरीच बरी वाटली. आपल्या नावाप्रमाणे हे दोन सुखी आत्मे सांख्यदर्शनमध्ये सुखी आहेत. आपण केव्हाही त्यांना भेट द्यावी.

* * *

# जानबा

सेवानिवृत्तीनंतर पुण्याला आलो तेव्हाची गोष्ट. सायंकाळी ५ चा सुमार असेल. माझे यजमान फिरायला गेले होते आणि मी बागेत बसले होते. एकटं बसलं की काही सुखद आठवणी डोळ्यापुढे दिसतात आणि त्यात आपण रंगून जातो. मला भूतकाळाच्या आठवणी डोळ्यापुढे दिसू लागल्या व एक कवन आठवले. —'बाळपणीचा काळ सुखाचा दिसतो मम लोचनी—संसाराच्या वृक्षावरुनी जाणवतो मम मनी.' हे कवन मी मनातच गुणगुणत होते आणि खरेच ज्याने माझे बालपण घडविले तो जानबा डोळ्यापुढे दिसू लागला.

मी ८–१० वर्षांची असेन व माझी बहीण माझ्याहून ४–५ वर्षांनी लहान. आम्ही बडोद्याला साठे यांच्या बंगल्यात भाड्याने राहात होतो. आमची आई लहानपणीच वारली. पण आमच्या मालकीणबाई साठे काकू आमचे लहानपणी वेणीफणी व सर्व करीत व पुष्कळ वेळा आपल्या बरोबर बाहेर नेत. आमच्या वडिलांच्या घरी एक जानबा नावाचा नोकर होता. तोच आमचे घर चालवीत असे. त्याला आम्ही जानू म्हणत असू.

एकदा मला आठवते चैत्र महिना होता आणि काकूंना कुठे तरी हळदी–कुंकवाला ज़ायचे होते म्हणून आम्हाला त्या म्हणाल्या, 'चला ग इंदू–बेबी, घरी जाऊन नवीन कपडे घालून या.' आम्ही दोघी गेलो. जानबाने आम्हाला नवीन परकर पोलके घालायला दिले व आनंदाने आम्ही काकूंच्याबरोबर निघालो.

हळदीकुंकवाचा समारंभ छान होता. आम्हाला हळदीकुंकू, आंब्याची डाळ, पन्हे वगैरे व्यवस्थित दिले. तेवढ्यात काकूंच्या ओळखीच्या एक बाई तेथे आल्या

व आमचेकडे पाहून काकूंना म्हणाल्या, 'का हो या देवलांच्या मुली ना, छान दिसतात हो, पण आई नाही बिचाऱ्यांना.' तेव्हा काकू म्हणाल्या, 'त्यांच्याकडे जुना नोकर आहे, तो घरातले सर्व काम प्रेमाने करतो.' त्यावर त्या बाई म्हणाल्या, 'नोकर तो नोकर, त्याला आईची सर कशी येणार?' माझ्या मनाला हे शब्द लागले व मला रडूच कोसळले. काकूंनी माझी समजूत घातली. पण कुचक्या बोलणाऱ्या बाईचा मला फार राग आला. आम्ही घरी आलो. आई नाही त्यात आमचा काय दोष ? घरी आल्यावर जानबाला सर्व हकीगत सांगितली. त्यानेही आमची समजूत घातली. मात्र तेव्हापासून काकूंच्या बरोबर असल्या समारंभाला जायचे नाही असे आम्ही ठरविले. बालपणाची ही आठवण मी कधीही विसरू शकत नाही आणि हाच तो गडी आमच्या घरात ७० वर्षे राहिला.

तो गडी म्हणून आला, पण माझ्या आईने त्याला मालकिणीची सूत्रे दिली. ते १९११ साल असावे. माझा जन्म झाला त्या वेळी कोल्हापूरला माझे आईवडील व आजी आजोबा राहात होते. त्यावेळी जानबाला कोकणातून कोणाच्या तरी ओळखीने त्याचा भाऊ माझ्या वडिलांच्याकडे घेऊन आला. तो घरगडी म्हणून आमच्या घरी राहिला. मला आठवते, त्याला कुणी जन्मतारीख विचारली तर तो पंचम जॉर्ज दिल्लीच्या गादीवर बसला त्यावेळी कोकणातून आलो आणि त्या वेळी तो १४–१५ वर्षांचा होता असे सांगे. माझ्या आईचे लग्न लहान वयात झालेले. त्या काळात तिला सात मुले झाली. त्यातली आम्ही तीन भावंडे राहिलो. माझा मोठा भाऊ व मी जन्मले त्या वेळी आमची आई तापाने आजारी पडली व ती बरेच दिवस आजारीच होती. त्यामुळे घरातली कामाची जबाबदारी जानबावरच पडली. माझ्यानंतर माझी धाकटी बहीण १–१॥ वर्षांचीच असेल तेव्हा आमची आई आम्हाला अचानक सोडून गेली. मरताना तिने माझ्या वडिलांना सांगितले, 'तुमचा संसार उघडा पडला, मुलांचे करायला कोणी नाही,पण दुसरे लग्न केलेत तर मुलांचे हाल होतील.' त्या वेळी जानबाने माझ्या आईला वचन दिले व म्हटले, 'बाई तुम्ही काही काळजी करू नका. मी मुलांना सांभाळेन' आणि वडिलांनी आईला सांगितले, 'मी विधुरावस्थेत राहीन.' त्याप्रमाणे दोघांनी आमचे प्रेमाने केले. जानबाला त्या वेळी आमचेकडे येऊन दहा वर्षे झाली होती, त्यामुळे तसा तो जाणता होता.

त्यानंतर माझ्या वडिलांनी बडोद्याला नोकरी धरली. ते सिव्हिल इंजिनियर

होते. माझे आजोबा एकटेच कोल्हापूरला राहात. आई गेल्यावर आजीला घेऊन आम्हां बडोद्याला आलो. पण मधून मधून सुट्टीत जानबा आम्हाला कोल्हापूरला आजोबांचेकडे घेऊन जाई.

माझ्या आईच्या पश्चात आजी बडोद्याला आली. थोडे फार काम करीत होती. पण दुर्दैवाने हाय खाल्ली आणि आईनंतर ४–५ वर्षांतच आजीही हे जग सोडून गेली. आता मात्र आमची सर्व जबाबदारी एकट्या जानबावर पडली. वडिलांना जानबासारखा विश्वासू माणूस मिळाला आणि सर्व संसाराची व मुलांची जबाबदारी त्यांनी जानबावर सोपविली. आमचे सर्व जीवन जानबाने घडविले असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. माझे वडील पगाराचे सर्व पैसे त्याचे हातात देत. आम्हाला लिहिता वाचता येऊ लागल्यावर तो आमच्याकडून वहीत हिशोब लिहून घेत असे. स्वतः मात्र लिहायला व वाचायला शिकला नाही. तशी त्याची कधी इच्छाही नव्हती. त्याला फक्त सही करता येत होती.

आमचेकडे तीन नोकर होते. एक स्वयंपाकी. त्याला आम्ही महाराज म्हणत असू. गुजराथेत स्वयंपाक्याला महाराज म्हणण्याची पद्धत आहे. दुसरी कामवाली बाई ती धुणी–भांडी करी व तिसरा जानबा, वरची कामे करीत असे. माझे वडिलांना आम्ही दादा म्हणत असू. जानबाचे काम सर्वांवर देखरेख ठेवण्याचे. आला गेला पाहुणा व आमची कामे ही जबाबदारी होती.

आमचे कपडे जानबा शिंप्याकडून शिवून घेत असे. जानबाला स्वयंपाक उत्तम करता येत असे. दुपारचे खाणे तोच करी. पुरणाच्या पोळ्या, गुळाच्या पोळ्या, करंज्या, दिवाळीचे पदार्थ, चकल्या, अनारसे, चिवडा वगैरे तो स्वतः करीत असे. माझ्या आत्या वगैरे कधी कधी राहायला येत. जानबा त्यांचे सर्व आदरातिथ्य इतके करीत असे की त्या त्याला जनाबाईच म्हणत.

आमचे दादा घरातले काहीही पाहात नसत. आम्ही मोठ्या होऊन शाळेत जाऊ लागलो तेव्हा दादांनी आपल्या ऑफिसमध्ये जानबाला चपराश्याची नोकरी दिली. आम्ही १०–३० वाजता शाळेत जात असू व जानबाही ११ चे सुमारास ऑफिसमध्ये चपराशी म्हणून कामाला जाई. ऑफिसमध्ये जाताना पायजमा, शर्ट व पांढरा गुडघ्यापर्यंत कोट व टोपी, पायात चपला अशा पोषाखात जाई. घरी मात्र पांढरी लांडी चड्डी व शर्ट घाली. घरून निघताना तो आमच्याकरता खाण्याचा डबा नेत असे. आम्ही दोघी शाळेतून दादांच्या ऑफिसमध्ये येत असू व

डब्यातले खात असू. मला आठवते, जानबा रोज आमच्याकरता वेगवेगळे आवडीचे पदार्थ आणी. लहानपणी केळे मला फार आवडे म्हणून डब्यात काहीही असले तरी केळे व दूध तो हमखास आणीत असे. माझा भाऊ नेहमी स्वतंत्र वृत्तीने वागे. तो शाळेत एकटा जाई व एकटा येई. तो जानबावर अवलंबून राहात नसे. आम्ही अनुभवाने बऱ्याच गोष्टी शिकत होतो व मोठ्या होत होतो. मुख्य म्हणजे काहीही करायचे झाले तरी आम्ही दोघी जानबाला विचारून मिळूनच सर्व करीत होतो. जानबाचे ऐकायचे एवढेच आम्हाला माहीत होते. आम्हाला साड्या व कपडे यावर किती खर्च करायचा तेही तोच ठरवीत असे. मला आठवते, मला सायकल शिकायची इच्छा होती, पण त्याने मला शिकू दिली नाही. आम्ही मुली म्हणून त्याला काळजी वाटत असे. लहान वयात खूप काही शिकावे असे वाटते, पण जानबाची शिस्त. यामुळे आम्ही दबूनच वागत होतो व निर्भयपणा जो अंगी यायला पाहिजे, तो आला नाही. सगळ्यांबरोबर प्रेमाने वागावे, कोणाला उलट बोलू नये, अशा तऱ्हेचे संस्कार आमच्यावर त्याने लहानपणी घडविले.

वर्षातून एक महिना तो सुट्टी घेऊन कोकणात जात असे. त्याचे गाव चिंद्रवली होते. त्या गावी त्याची बायको व तीन मुले शेतीभातीवर आपल्या काकाजवळ राहात होती. स्वतःच्या संसारात त्याने कधी लक्ष दिले नाही. दादांचा संसारच त्याने स्वतःचा समजून केला. त्याचे मुलांची जबाबदारी काकाने घेतली व हा निर्धास्तपणे शेवटपर्यंत शहरात आमचेकडे राहिला.

आम्ही भावंडे लहानाची मोठी होत होतो. मी मोठी झाले व शिवाय घरात आईसारखे माणूस कोणी नाही, तेव्हा साहजिकच माझ्या लग्नाची चर्चा सुरू झाली. जानबा व दादा काही तरी बोलत असत. दादांनी माझ्या बऱ्याच जन्मपत्रिका छापून घेतल्या. त्यातली एक आजोबांना कोल्हापूरला पाठविली होती. माझे नशीब की, घरीच दादांचे जावई सांगून आले व त्यांनी पत्रिका बघितलीच नाही. तेव्हा माझ्या लग्नाची गोष्टसुद्धा नमूद करण्यासारखी आहे.

आमचे घराचे मालक साठे यांना आम्ही काका म्हणत असू. ते दादांचे मित्रच होते. इतकेच नव्हे तर काकूंनी लहानपणी आमच्यावर खूप माया केली ते आम्ही कधीही विसरणार नाही. काकांवर दादांचा पूर्ण विश्वास होता. त्यांच्या ओळखीचे एक तरुण विद्यार्थी त्यांनी कर्ज देऊन लंडनला शिकण्याकरता पाठविले होते.

शिकून आल्यावर ते आपली मुलगी कदाचित त्यांना देऊ करणार होते, पण ते गृहस्थ येण्याचे आधीच काकांचे मुलीचा विवाह एका होतकरू तरुणाबरोबर झाला. त्यामुळे पुढे तो प्रश्न निघाला नाही. तेव्हा माझ्याकरता हे स्थळ सुचवावे असे त्यांना वाटत होते, आणि म्हणूनच हा विद्यार्थी लंडनला असतानाच भारतात आल्यावर मला भेट, असे काकांनी त्यांना पत्र लिहिलेले होते.

त्याप्रमाणे हे गृहस्थ भारतात आल्यावर प्रथम आपल्या आईवडिलांकडे पुण्याच्या स्वतःच्या घरी गेले. लंडनची संख्याशास्त्राची डिग्री त्या वेळी फार मोठी समजली जात असे. त्यामुळे वधुपिते ह्यांच्या घरी फेऱ्या मारू लागले. पण साठे–काकांच्या कर्जामुळे आज आपले उच्च शिक्षण झाले ही जाणीव त्यांना होती. तेव्हा प्रथम साठेकाकांना बडोद्याला भेटून येतो, मग पुढचा विचार करू, असे त्यांनी आईवडिलांनी सांगितले व ते काकांना भेटायला आले.

एक दिवस सकाळी बागेत फुलांची परडी हातात घेऊन मी देवाकरता फुले तोडीत हिंडत होते. इतक्यात फाटकाजवळ एक तरुण गृहस्थ टांग्यातून उतरून दारात उभे राहिलेले दिसले व साहजिकच माझी नजर तिकडे वळली. तेव्हा त्यांनी विचारले, "साठे साहेबांचा बंगला हाच का ?" मी चटकन, "हो, हाच !" म्हटले. ते हातात बॅग घेऊन बंगल्याच्या पायऱ्या चढून आत गेले. दारावरची घंटी वाजविली व काकांनीच दार उघडले व म्हटले, "अरे पांडुरंग, तूच का ? केव्हा आलास ? बैस !" म्हणून खुर्चीकडे बोट दाखविले. काकूही तेवढ्यात बाहेर आल्या. तिघांच्या गप्पा व चहापाणी झाले. दुसरे दिवशी काकांनी सांगितले, "आमचे मित्र दादा इथेच आमच्या घरात राहातात. ते आपल्या मुलीकरता स्थळे बघत आहेत. तुझे शिक्षण आता पुरे झाले आहे, तेव्हा पुण्याला परत गेल्यावर तुला वधूपिते घरी येतील. त्या आधी ही मुलगी उद्या पाहाशील का ? तुला पसंत असल्यास विचार कर. माझा आग्रह नाही." पाहुणे मुलगी पाहायला कबूल झाले.

दुसरे दिवशी सकाळी काकांनी आम्हाला त्यांच्या घरी बोलाविले. काकांनी दादांना मुलाची माहिती सांगितलेलीच होती, त्यामुळे मलाही थोडी कल्पना होती. मी चांगली साडी नेसले. पावडर कुंकू केले व दादा, जानबा व मी काकांच्याकडे गेलो. पाहुणे एका खुर्चीवर बसले. दादा पलीकडे बसले. जानबा दरवाज्याच्या आत होता व डोकावून पाहुण्यांना पाहात होता. काका व मी एका कोचावर बसलो. काकांनी दादांची पाहुण्यांना ओळख करून दिली व माझ्याकडे बघून ते म्हणाले,

"पांडुरंगा, ही आमची फुटाणी बरं का? (फुटाणी हे काकांनी ठेवलेले नाव!)" त्यांनी क्षणभर माझ्याकडे दृष्टी टाकली व नकळत त्यांचे तोंडून उद्‍गार निघाला, "वा! छान आहे की!" मीही मनात हसले. हृदयाची ओळख हृदयाला पटली आणि जन्माची खूणगाठ बांधली गेली.

यापूर्वी कोणाही तरुणाला मी जवळून पाहिले नव्हते. माझ्या आयुष्यात पहिलाच सुखाचा क्षण होता. त्यानंतर मी खाली मान घालून काकांच्या शेजारीच बसून राहिले. चहापाणी, खाणे-पिणे झाले. मी लाजून काहीच घेतले नाही. थोड्या वेळाने आम्ही घरी गेलो.

दुसरे दिवशी काकांनी त्यांना सरळच विचारले, "का रे काही विचार केलास का?" ते म्हणाले, "साठेकाका, मी आजच काही सांगू शकत नाही, पण दोन दिवस मी इथे रहाणार आहे तेव्हा तुमची हरकत नसेल तर आम्ही दोघे फिरायला जाऊ."

त्याप्रमाणे काकांनी दादांना निरोप दिला व मला त्यांचेबरोबर फिरायला जाण्याची परवानगी दिली.

आम्ही साठेकाकांच्या गाडीतून कमाठी बाग, आजवा तलाव वगैरे सर्व हिंडून आलो. मात्र जानबाला आमच्या गाडीत दिले. तो आमच्या मागून लांबून चाले. तो माझा रखवालदार होता आणि मलाही तो मागे असला की आधार वाटे.

पाहुणे माझ्याशी वाटेत खूप गप्पा मारीत होते. मी मात्र लाजेने खाली मान घालून चालत होते. पहिले दिवशी मला 'अहो' म्हणत होते, पण दुसरे दिवशी अहोचे रूपांतर 'ए'मध्ये झाले. घरी आल्यावरसुद्धा मी काकांचेकडे त्यांचेशी गप्पा मारायला जाऊ लागले. मला लंडनमध्ये घेतलेल्या फोटोंचा अल्बम दाखविला. तेव्हा मी म्हटले, "तुम्ही एवढी मोठी पदवी घेऊन आलेले आणि मी मॅट्रिक हे कसे काय जमायचे?" तेव्हा ते हसले व म्हणाले, "ह्याचा विचार मी तुला पाहण्यापूर्वीच केलेला आहे. काकांनी मला तुझी सर्व माहिती सांगितली आहे. मी घराण्याला महत्त्व देतो. शिक्षण पुढेही घेता येईल." मला ह्या उत्तराने खूप हायसे वाटले.

तीन दिवसांनी ते निघण्याचे आधी दादांनी विचारले तेव्हा ते म्हणाले, "माझे उत्तर 'हो' आहे असे समजा." त्यानंतर ते लगेच म्हणाले, "उद्या मी पुण्याला जाणार आहे. पाहिजे तर आपण सर्वजण बरोबरच जाऊ." दादांना व जानबाला

माझे लग्न ठरले म्हणून आनंद झाला. दुसरे दिवशी निघण्याचे आधी आजोबांचे पत्र आले. त्यांनी लिहिले होते इंदूची जन्मपत्रिका मी इथे एका ब्राह्मणाला दाखविली. त्याने सांगितले, "मुलगा घरी येईल व पहिल्याच ठिकाणी लग्न जमेल." दादांनी पत्र वाचले व 'खरोखरीच पत्रिकेप्रमाणे होणार' असे ते मनात म्हणाले.

आम्ही सामानाची बांधाबांध केली व सर्वजण आगगाडीने बरोबरच निघालो. गाडीत आम्ही सर्वजण खूप गप्पा मारत होतो. माझी धाकटी बहीण प्रभा ही आमच्याबरोबरच होती. तीही गप्पांत थोडा भाग घेत होती. सकाळी मुंबईला पोहोचल्यावर ते त्यांच्या मोठ्या वहिनीच्या माहेरी, 'सरदारगृहात' गेले व दादा, जानबा व आम्ही दोघी माझे आत्याचे सासरी गिरगावात गेलो. दोन दिवस मुंबईला राहून मग पुण्याला जायचे ठरले होते.

पाहुण्यांनी मुंबईला उतरताना जानबाला सांगितले, "मी उद्या सकाळी १०॥ चे सुमारास तू सांगितलेल्या पत्त्यावर उभा राहीन. तू त्यांना (मला) घेऊन बाहेर ये. आम्ही फिरायला जाऊ." आत्याचे सासरे जुन्या वळणाचे. त्यांना मी लग्नाचे आधी बाहेर गेलेली आवडणार नाही म्हणून असा गुपचुप बेत ठरविला होता. दुसरे दिवशी सकाळी मी तयार झाले. जानबाने घरी सांगितले हिला मुंबई माहीत नाही म्हणून बरोबर जातो. असे म्हणून आम्ही दोघे बाहेर पडलो. कोपऱ्यावर पाहुणे उभेच होते.

आम्ही दोघे मलबारहिलवर तासभर फिरलो व परत घरचा रस्ता धरला. पण रस्ता सापडेना. कितीतरी वेळ हिंडतच राहिलो. घरी पोहोचेपर्यंत जवळजवळ एक वाजला, जानबा तर काळजी करीत उभा होता. शेवटी मला पाहिल्यावर रागावला, "अगं किती उशीर झाला." मी काहीच बोलले नाही. घरी ती मंडळीही काळजीत दिसली. पण मी पाहुणी म्हणून मला कोणीच बोलले नाही. पाहुणे सरदारगृहात गेले. दोन दिवस खूप हिंडलो. जानबाच्या सहकार्यामुळे हे सर्व घडले.

पुण्याच्या स्टेशनवर उतरल्यावर ते म्हणाले, "उद्या दुपारी तुम्ही सर्वजण आमचेकडे चहाला या." आम्ही त्याप्रमाणे सर्वजण तुळशीबागेजवळ साठे यांच्या वाड्यात पाहुण्यांचे घरी गेलो. त्यांचे घर लहानच होते. खाली एक खोली व लहानसे स्वयंपाकघर व वरती एक खोली. त्यांचे घरी त्यांचे आईवडील, एक थोरला भाऊ, भावजय, एक धाकटा भाऊ व बहीण एवढी मंडळी होती. त्यांची आई वाकलेली व वडील म्हातारेच दिसले. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा

झाल्या. त्यांच्या आईने गोड शिरा व चहा केला होता. चहापाणी झाल्यावर मी वडील मंडळींना नमस्कार केला. त्यांच्या वडिलांनी दादांना सांगितले, "पांडुरंगाला मुलगी पसंत आहे तेव्हा आम्हालाही पसंत आहे." त्यांच्या आईने मला हळदकुंकू लावले व पेढ्याचा पुडा हातात दिला. आम्ही निघालो. त्यानंतर दोन महिन्यांनी लग्नाचा मुहूर्त होता. आठ दिवस पुण्याला राहून आम्ही कोकणात गेलो व नंतर लग्नालाच पुण्याला आलो.

पुण्याच्या आठ दिवसांच्या मुक्कामात मी रोज संध्याकाळी जानबाबरोबर त्यांचे घरी येत असे. हे रोज मला दोन आण्यांचा रस प्यायला देत असत. संध्याकाळी ह्यांचे आईवडील बहुतेक पुण्याला गेलेले असायचे. शेजारी मला पाहात व ह्यांच्या आईला सांगत, "मुलगी रोज येते बरं का!" तेव्हा आई म्हणे, "मुलीबरोबर जानबा असतो तेव्हा मला तसे काही वाटत नाही." फिरायला जात असू तेव्हाही जानबा मागून चालत असे. म्हणजे मी कुठेही गेले तरी जानबा मागे असायचा.

ठरल्याप्रमाणे दोन महिन्यांनी आम्ही कोकणातून पुण्याला आलो. लग्नात सर्व पुढाकार घेऊन जानबाने सर्व तयारी केली. साड्या, दागिने खरेदी सर्व केले. तोच आमच्याकडचा पुढारी. लग्नमंडपात त्याची धावपळ, कार्यालयात त्याचीच जबाबदारी होती. दादा नुसते पैसे देत असत. पांढरा स्वच्छ कोट, टोपी व सदरा, पायजमा घालून हा सगळीकडे हिंडून कोणाला हवे नको पाहात असे.

लग्नानंतर आम्ही बडोद्याला आलो. तेथे आल्यावर तर जावयांचा थाट विचारू नका. माझ्या शाळेतल्या मैत्रिणींना मी चहापाण्याला एक दिवस बोलाविले होते. तेव्हा जानबाने स्वतः फराळाचे केले. मैत्रिणी जानबाचे कौतुक करीत. जानबा सदैव ह्यांच्या तैनातीत असायचा. त्याला कुणी विचारले की, 'जावई काय करतात' तर त्याने एक युक्ती केली होती. हे कॉलेजात असताना एका मासिकात यांची माहिती छापून आली होती, ते मासिक त्याने माझ्या जवळून मागून घेतले होते. सर्वांना अभिमानाने ते तो वाचायला देत असे. त्याला एक सवय होती ती म्हणजे पान खाणं व दिवसभर तोंडाने हळूहळू गुणगुणत राहाणे. त्यामुळे तो घरात कुठेही असला तरी आम्हांला कळत असे.

आमची पहिली नोकरी १९३६ सालात कानपूरला झाली. तेथे बिऱ्हाड मांडायला मी जानबाला नेले होते. मला खरे म्हणजे स्वयंपाक व घरकामाची मुळीच सवय नव्हती, म्हणून दादांनी मुद्दाम त्याला पाठविले होते. तेथे घरातील सर्व

काम बाजारहाट, स्वयंपाक वगैरे सर्व तो भैय्ये करीत असे. शिवाय कानपूरला भैय्ये लोक कामाला मिळतात. तेथली हिंदी भाषाही तो शिकला. ३–४ महिने तो राहिला. मला एक घरगडी पाहून दिला. मीही तेवढ्या अवधीत बरेच घरकाम शिकून घेतले. माझे सर्व स्थिरस्थावर झाल्यावर तो बडोद्याला दादांचेकडे गेला.

जानबाला सतत आमची सर्वांची सारखी काळजी असे. तो घरातल्या मालकिणीचीच भूमिका वठवत होता. . .माझी अडचण म्हणून कानपूरला आला व अडचण दूर झाल्यावर दादा एकटे, शिवाय प्रभा त्यामुळे लगेच बडोद्याला परत गेला.

त्यानंतर सहा महिन्यानंतरची गोष्ट ! मी पहिल्या बाळंतपणाकरता बडोद्याला आले होते. जानबाची कोण गडबड. मला हॉस्पिटलमध्ये नेणं, आणणं व मी बाळंतपणाकरता हॉस्पिटलमध्ये गेले तेव्हा बाहेर बसलेला होता. नर्सने बाहेर येऊन सांगितले, 'साहेबांना सांग नात झाली.' केवढा आनंद त्याला झाला.

आठ दिवसांनी घरी आले तो सर्व जय्यत तयारी घरी केलेली. माझी आत्या पुण्याहून आली होती. तिला विचारून डिंकाचे लाडू,अळीवाचे लाडू, शिरा, गरम जेवण वगैरे. आत्याने व त्याने खूपच प्रेमाने केले. माझी प्रकृती उत्तम होती. आत्या दीड महिना राहून पुण्याला परत गेली.

माझ्या मुलीला जन्मापासून तो स्वतः पायावर घेऊन आंघोळ घालीत असे. मांडीवर घेऊन निजवीत असे. इतक्या प्रेमळपणाने तो सर्व करी की मला कशाचीच काळजी वाटत नसे. माझी बहीण प्रभा हिला तर माझ्या मुलीचे खूपच कौतुक. आमच्या घरात हे मूल आज वीस वर्षांनी झाले होते. त्यामुळे सर्वांनाच तिचे कौतुक करावेसे वाटे. बारसे खूप थाटात केले. दादांनी खूप मंडळी फराळाला बोलाविली. पेढे व बर्फी दोन्ही वाटले. दादासुद्धा मधून मधून येऊन पाळण्यात डोकावून तिला पाहात असत. तिचे नाव आम्ही नीला ठेवले.

बाळंतपणाला २॥ महिने झाल्यावर मी कानपूरला जायचे ठरविले. दादांनी जानबाला बरोबर दिले. थर्ड क्लासचा दोन दिवसांचा प्रवास, त्यात मध्यान्हीची गाडी बदलायची. एका कोपऱ्यात बाकावर जानबा व मी आलटून पालटून नीलूला घेऊन बसत होतो. जानूने पायात चपलासुद्धा पाय घसरेल म्हणून घातल्या नव्हत्या. गाडीतून उतरताना त्याने नीलूला दुपट्यात गुंडाळून घेतले होते व स्टेशनवरून तो अनवाणी चालत होता. कानपूरच्या स्टेशनवर आमचे यजमान आपल्या पहिल्या

कन्यारत्नाला पाहायला आले होते. नीला २॥ महिन्यांची, स्टेशनची गर्दी पाहून रडू लागली. तेव्हा माझे यजमानानी तिला बिस्किटाचा पुडा फोडून बिस्किट खायला देऊ लागले. संख्याशास्त्रज्ञांनी इतके लहान मूल काय खाते याचा विचारच केलेला नव्हता ! मला मात्र हे पाहून हसू आले.

जानबा कानपूरला आल्यामुळे मला खूपच मदत झाली. नीलू लहान. तिचे काम करण्याची सवय नव्हती. पण जानबा तिचे सर्व हौशीने करी. दोन-तीन महिने तो राहिला व परत बडोद्याला गेला.

कानपूरला आम्ही दोन वर्षे होतो. तेवढ्या अवधीत मी पुन्हा एकदा बडोद्याला बाळंतपणाकरता गेले. त्या वेळी आम्हाला पुत्ररत्न झाले. त्याचे नाव आम्ही सुहास ठेवले. दादांचा पहिला नातू म्हणून पुन्हा कौतुकच झाले. ह्याही वेळेला जानबाने सर्व पहिल्यासारखेच केले. त्याला सर्व कामाची हौस होती. कधी कुरकूर नाही व मनात गुणगुणणे चालूच असे. त्या नादात तो काम करी. जणू काय ते पार्श्वसंगीतच (Background music) होते.

ह्या वेळी जवळ जवळ सहा महिने बडोद्याला राहिले. कारण माझ्या यजमानांची बदली कलकत्त्याला झाली. कानपूरपेक्षा ही नोकरी त्यांना चांगली वाटली. घर घेऊन स्थिरस्थावर होईपर्यंत आमचा सुहास सहा महिन्यांचा झाला. त्यानंतर बडोद्याला मी, दोन बच्चे व जानबा कलकत्त्याला आलो. या वेळी २-३ महिनेच जानबा राहिला. माझी कुठलीही अडचण असली तरी दादा त्याला पाठवत.

जानबा बडोद्याला गेल्यावर माझे सासू-सासरे काही दिवस आले. ते जमशेदपूरला ह्यांच्या मोठ्या भावाकडे राहात. ह्या दोघांची मला खूप मदत झाली. एक वर्ष तेथे होतो. एकदा ह्यांना टॉयफाईड झाला व हॉस्पिटलमध्ये ठेवले. तेव्हा पुन्हा जानबाला बोलाविले. त्याला वाचता येत नसले तरी बसमधून काहीतरी खुणा लक्षात ठेवून तो हॉस्पिटलमध्ये वेळेवर पोहोचे.

नंतर १९४० चे सुमारास दिल्लीत आलो. हे एकसारख्या नोकऱ्या बदलत व मला संसार, मुले यांची जबाबदारी ! त्यामुळे दर वेळेला जानबाचा आसरा घ्यावा लागे. हे घरात काहीही बघत नसत. त्यांचे ऑफिस व ते ह्यात रमलेले.

दिल्लीला आल्यावर मी लेडी आयर्विन कॉलेजमध्ये नाव घातले. माझी शिकण्याची खूप इच्छा होती व मुख्य म्हणजे ह्यांनी संमती दिली व मला खूप शिकवीतही असत. आता नीलू २॥ वर्षांची व सुहास तिच्याहून लहान तेव्हा

मुलांना सांभाळून कॉलेज कसे जमायचे हा प्रश्न पडला होता. परमेश्वराला माझी काळजी,तो प्रश्नही सहज सुटला. दिल्लीला आम्ही कॅनॉट प्लेसमध्ये ब्लॉक घेतला होता. एक दिवस आम्ही मुलांना घेऊन फिरत होतो. समोरून एक जर्मन बाई आल्या व आमचे जवळ थांबल्या व नीलूकडे बघून त्यांनी विचारले, " मुलगी किती वर्षाची,शाळेत जाते का ? " आम्ही वय सांगितले. नीलू तिच्याकडे पाहून हसली व ऑंटी करून ओरडली. त्या बाईने सांगितले, " मी नवीन शाळा काढली आहे,फक्त दहा मुलेच घेणार आहे. " आम्ही दुसरे दिवशी शाळेत नेले व ती मजेने बसली. तिची शाळा ९ ते १ पर्यंत असे. माझे कॉलेज ९ ते ३॥ पर्यंत असे. मी सायकल शिकले. त्यामुळे वेळ वाचू लागला. आता सुहासला एवढा वेळ नोकरांवर ठेवणे बरे वाटेना. तेव्हा दादांना पत्र लिहिले. त्यांनी लगेच जानबाला पाठविले व माझी सोय झाली. दोन महिने जानबा राहिला सुहासला जानबाची खूप सवय झाली. दादांनी लिहिले, ' सुहासला नवसारीला घेऊन ये. ' आणि त्याप्रमाणे तो गाडीने गेला. जाताना मला हसून ' बाय बाय ' केले. मला रडू आले,पण तो खुशीत गेला ! तो गेल्यावर माझे यजमान म्हणाले, " मी एक वाजता लंचला येईन. " नीलू त्या वेळीच येई. दोघे बरोबर जेवत व नीलू पलंगावर झोपत असे. तेवढ्यात मी ३॥ वाजता घरी येई. असा छान प्रोग्राम झाला.

इकडे नवसारीला दादा सुहासचे खूप लाड करीत. जानबा त्याच्या आवडीचे लहान लहान लाडू करी. सुहासला मोटारीत बसायला आवडे म्हणून जानबाच्या मांडीवर बसून तो एक चक्कर मारून येई. सुहास माझी आठवण विसरला. त्याला विचारले, " आई कोठे " तर " दिल्लीला " एवढेच म्हणे. दादा त्याला गोष्टीची पुस्तके वाचून दाखवीत. अशी दोन वर्षे तो दादांच्याकडे राहिला.

त्यानंतर १९४२ सालात माझे सासू-सासरे, दीर-नणंद जमशेदपूरला दंगा झाला म्हणून दिल्लीला आले. मग सुहासला आणायला मी नवसारीला गेले. तेथे गेल्यावर जानबाने सांगितले, " सुहास तुझी आई आली आहे. " तेव्हा, " आई दिल्लीला " असे म्हणाला. त्याला सवय व्हावी म्हणून १॥–२ महिने मी तिथे राहिले व त्याला घेऊन आले. दिल्लीला आल्यावर तो म्हणे, " माझे घर नवसारीला आहे. " तिकडे दादा व जानबा यांनाही सुहासशिवाय करमेना.

माझा तीन वर्षाचा कॉलेजचा कोर्स पूर्ण झाला व मला Home-Science मध्ये डिग्री मिळाली. माझी पूर्व पुण्याई अशी की, मला सर्वांची मदत मिळे.

१९४५ साल असावे. प्रभाचे लग्न झाले. जावई रिझर्व बँकेत नोकरीला होते. ती सर्व जबाबदारी जानबानेच घेतली व लग्न पुण्याला पार पडले. लग्नाचे वेळी मला पुन्हा दिवस होते; पण लग्नानंतर १५ दिवसांनी आमचे पुत्ररत्न जन्माला आले. त्याचे नाव उदय ठेवले. तेही बाळंतपण दादांनी केले. जानबा होताच.

प्रभाच्या लग्नानंतर ८–१० महिन्यांत माझ्या भावाचे राजाभाऊचे लग्न झाले. प्रभा ठाण्याला राहात होती. राजाभाऊचे लग्नात मात्र मुलीवाल्यांनी सर्व पुढाकार घेतला होता. दादा पेन्शन घेऊन पुण्याला माडीवाले कॉलनीत भाड्याचे घरात राहात होते. जानबावरच घरातली जबाबदारी होती. आमच्या वहिनी एम.ए.च्या शेवटच्या वर्षात अभ्यास करीत होत्या. त्यांना जानबाची खूप मदत होती.

मी दर वर्षी मुलांना घेऊन पुण्याला १–१॥ महिना सुट्टीत दादांच्याकडे येत असे. प्रभाही येत असे. जानबा मुलांचे व सर्वांचे काम करी. आम्हांला माहेरी आल्याचा आनंद मिळे. त्याच्या प्रेमळपणामुळे हा ' प्रोग्राम ' दर वर्षीचाच ठरून गेला होता. कधी कधी माझे सासू-सासरे, दीर-नणंद, मुले अशी आम्ही सर्व येत असू. जानबाला सर्व गोष्टींची हौसच फार! त्यामुळे सतत मंडळी येत जात असत. माझ्या सासूसासऱ्यांबरोबर त्याच्या गप्पा नेहमी चालत. आमच्या घरात तो इतका रमला होता की, बायकोमुलांची त्याला आठवणही होत नसे. पैसे मात्र नियमित पाठवीत असे. पण दादा मात्र वर्षातून एकदा त्याला कोकणात पाठवीतच असत. दादांना तर तो जिवापाड जपे. सदैव दादांच्या सावलीत राहिला.

माझे सासरे १९४८ सालात वारले. स्वाभाविकच नणंदेचे लग्न करण्याची जबाबदारी आमच्यावर आली. त्यानंतर दोन वर्षांनी जेव्हा मी पुण्याला मुलांना घेऊन आले, त्या वेळी माझे यजमान व नणंद हेही माझ्याबरोबर आले. आम्ही सर्वजण दादांच्याकडेच राहात होतो. नशिबाने पुण्यालाच ह्यांच्या मित्राच्या ओळखीचा मुलगा होता. तो फिजिक्समध्ये पीएच्.डी. करीत होता. हुशार होता. त्याला मुलगी पसंत पडली व लग्न पुण्याला करण्याचे ठरले.

दिल्लीहून माझ्या सासूबाई, धाकटे दीर व जमशेदपूरचे मोठे दीर, जाऊबाई त्यांची मुले वगैरे सर्व आली होती. घरासमोरचा एक तीन खोल्यांचा ब्लॉक लग्नाकरता भाड्याने मिळाला होता. त्यामुळे मंडळींची राहण्याची सोय झाली. जेवणखाण सर्व दादांचेकडेच होते. त्या वेळी लग्नाची जबाबदारी सर्व माझ्यावर होती. साड्या, कपडे, व्याही मंडळींचे आहेर मला त्यातले काहीच कळत नव्हते

पण जानबाच्या मदतीनेच ते सर्व व्यवस्थित झाले. घरच्या एखाद्या म्हाताऱ्या बाईप्रमाणे जानबाने मला सांगितले. " सासूबाईंना लेकीच्या लग्नात सोन्याच्या बांगड्या कर " आणि मी सोने विकत घेऊन सासूबाईंना बांगड्या दिल्या. त्या जन्मभर जानबाचे कौतुक करीत होत्या. घरच्या बाईप्रमाणे जानबाचे लक्ष असे. लग्न पुण्याला पटवर्धन हॉलमध्ये झाले व संध्याकाळी रिसेप्शन झाले. सर्व व्यवस्थित पार पडले. सासरची मंडळी समारंभात आनंदात दिसली.

आता लग्न झाल्यावर माझी नणंद पुण्यालाच सासरी राहिली. आम्ही दिल्लीला गेलो. पुन्हा जानबाचीच जबाबदारी. सासूबाई निघताना जानबाला सांगून गेल्या, आणि त्याप्रमाणे जानबा तिला माहेरवाशीण म्हणून दादांचे घरी घेऊन येत असे. जानबा म्हणजे घरचा आधारस्तंभ ! त्याचा जन्म आमचे करण्यातच गेला. माझ्या नणंदेला दिवस राहिले. परत जानबाचीच जबाबदारी. तिची सासूही जानबालाच बोलावी आणि तो सर्वांच्या हाकेला ओ देत असे. दादांची कोणत्याच बाबतीत हरकत नसे. शेवटी नणंदेच्या बाळंतपणातही जानबाचीच खूप मदत झाली. ती बाळंतीण होऊन मुलगा झाला. तेव्हा मेहुण्यांना दिल्लीलाच नोकरी लागली. तेव्हा १॥ महिन्याने ती दिल्लीला गेली.

आम्ही सर्वचजण त्या वेळी दिल्लीला होतो. मध्यंतरीच्या काळात आमचे शेवटचे शेंडेफळ पुत्ररत्न विकास जन्माला आला. ह्या वेळी मात्र मी पुण्याला गेले नाही. दिल्लीलाच राहिले. तसे म्हणजे ह्या वेळी माझी सासरची माणसे होती तरी सुद्धा जानबाला राहावले नाही. तो १-१॥ महिना आलाच व बाळाचे कौतुक करून परत गेला.

आता विकास ४–५ महिन्यांचा असेल. माझ्या यजमानांना रोमला नोकरी मिळाल्याचे कळले. विकास वर्षाचा होत आला व आमचे रोमला जाण्याचे नक्की ठरले. पुन्हा मनाची चिलबिचल. मोठी तीन मुले अर्धवट वयाची. शालेय शिक्षण चालू होते. त्यांना नेणे शक्य नव्हते. विकासला परदेशातले हवापाणी कसे मानवेल असा मोठ्या मंडळींनी प्रश्न काढला. सासूबाई व दादा यांनी आतापर्यंत मला कौतुकात वाढविले. लहान मुलाचे काम मला खूप पडे. परदेशात कोणाची मदत नसते हे कळल्यावर दादांनी विकासला आम्ही १-१॥ वर्षे सांभाळतो असे सांगितले. मला दादांचे व जानबाचे मन मोडवेना. मोठी मुले दिल्लीला राहिली व मी विकासला दादांची व जानबाची सवय व्हावी म्हणून पुण्याला थोडे दिवस राहिले. मोठ्या माणसांचे ऐकायचे, हीच मला सवय त्यामुळे मी काही बोलू शकत नसे.

मी दोन महिने पुण्याला राहिले. जानबाने आपल्या मदतीकरता त्याची भाची शांती हिला कोकणातून बोलाविले. त्यामुळे दोघे मिळून व शिवाय दादा होतेच तेव्हा विकासची व्यवस्था उत्तम होती. त्यानंतर मी दिल्लीला आले व आम्ही दोघेच विमानाने रोमला गेलो. मला मुलांची फारच सवय त्यामुळे माझी स्थिती पंख तुटलेल्या पाखरासारखी झाली ! प्रवासात आमचे विमान जेव्हा वर उडाले तेव्हा मी मनात म्हणे, " घार उडे आकाशी, तिचे लक्ष पिलापाशी. "

आम्ही तिकडे रोमला गेल्यावर विकासचा वर्षाचा वाढदिवस जानबाने केला. शेजारची मुले बोलाविली. एक स्टेनलेस स्टीलचा डबा त्याला लाडू ठेवायला दिला. विकासचे खाणेपिणे सर्व मी सांगून गेले होते. त्याप्रमाणे तो वेळेवर खायला घाली. जानबाला शांतीची मदत खूप झाली. तिला मुलांची आवड, त्यामुळे दोघांच्या-बरोबर तो आनंदात राही. रात्री मात्र त्याला रडण्याची सवय होती त्यामुळे जानबा अगर शांती त्याला मांडीवर घेऊन निजवीत असत. तशी त्याची प्रकृती उत्तम होती. एकदा त्यांच्या कॉलनीत बालकांची स्पर्धा होती. त्यात विकासला सुदृढ बालक म्हणून पहिले बक्षीस मिळाले. बक्षीस घेण्यास जानबा त्याला कडेवर घेऊन गेला. तेव्हा साहेबांनी विचारले. ह्याचे आईवडील कुठे आहेत ? जानबाने उत्तर दिले, " ते परदेशात रोमला असतात. मी त्याला सांभाळतो. व खायला अंडे, केळे, दूध वगैरे चांगले पदार्थ देतो. " साहेबांना जानबाचे कौतुक वाटले. मला मात्र रोमला मुले नसल्याने करमत नसे.

माझी बहीण प्रभा हिची मुलगी माधुरी ती विकासच्याच वयाची. ती मधून मधून पुण्याला येई व दोघे एकत्र खेळत. माधुरी आपल्या आईला 'आई' म्हणे तेव्हा विकासही प्रभाला 'आई' म्हणायचा. कधीतरी जानबा विकासला घेऊन ठाण्याला जात असे. मला आठवते त्या वेळी जानबाने त्यांना एक गाणे शिकविले. दोघेजण गोल गोल फिरत व म्हणत 'व्यंकोजीराव पेहेलवानजी, मालोजीलाव लुकलोजी.' माधुरी बारीक व विकास गुटगुटीत म्हणून हे गाणे रचले. दोघांनाही त्याचा अर्थ कळत नव्हता. इतर मंडळी गाणे ऐकून हसत. अशी दोन वर्षे विकासची दादांच्या व जानबाच्या सहवासात गेली.

दोन वर्षांनी आम्ही रोमहून सुट्टीवर आलो. पुण्याहून मी विकासला घेऊन दिल्लीला आले. तो पुण्याहून निघताना रडू लागला व जानबाला व दादांनाही वाईट वाटले. पण मुले कुठल्याही वातावरणात लगेच रुळतात हेही तितकेच खरे.

मुंबईहून आम्ही दोघे विकासला घेऊन रोमला जायला निघालो. विमानतळावर निरोप देताना जानबाचे व दादांचे डोळे पाण्याने भरून आले. मलाही रडे आवरेना. विकास तर बावरून गेला व मोठमोठ्याने रडू लागला. शेवटी त्याला मी उचलून घेतले व विमानाची शिडी चढले. काही उपायच नव्हता. एकदाचे रोमला पोहोचलो.

रोमला आल्यावर सर्व वेगळे, भाषा वेगळी, रीतिरिवाज वेगळे, खाणेपिणे, हवामान सर्व वेगळे. सुरुवातीला आजोबांकडे व जानबाकडे जाऊ म्हणत असे. त्याला तिथले अन्नही आवडत नव्हते. प्रकृती थोडी बिघडली, पण डॉक्टरांचे औषधाने हळूहळू बरे वाटले. नंतर पाच-सहा महिन्यांत उदय तेथे आला. मग दोघेजण खेळण्यात रमले. दिवस मजेत जाऊ लागले.

आम्हांला दर दोन वर्षांनी भारतात जायला दोन महिन्यांची सुट्टी मिळे. त्या वेळी थोडे दिल्लीलाव थोडे पुण्याला जात असू व मुंबईला प्रभाकडे जात असू.

असेच १९५७ साल असावे. थोडे दिवस पुण्याला दादांना भेटून आम्ही दिल्लीला निघून गेलो. थोडेच दिवसांत अचानक पुण्याहून मला तार आली की, 'दादा बेशुद्ध अवस्थेत आहेत. ताबडतोब भेटायला ये.' मी व माझा भाऊ ताबडतोब विमानाने पुण्याला आलो. माझा भाऊ त्या वेळी दिल्लीलाच होता. दादा कोयाजींच्या हॉस्पिटलमध्ये निपचीत पडले होते. नळ्यावाटे अन्नपुरवठा होत होता. जानबा पलंगाच्या पायथ्याशी बसला होता.

तेथे पोहोचल्यावर मला सविस्तर हकीगत कळली. दादा नेहमीप्रमाणे फिरायला चालले होते. रस्त्यात त्यांना भोवळ आली व ते पडले. त्यांच्या भोवती माणसांची गर्दी जमली होती. जानबा संध्याकाळी नेहमीप्रमाणे भाजी आणायला चालला होता. वाटेत गर्दी का जमली म्हणून घोळक्यात वाकून पाहू लागला. पाहातो तो त्याचेच साहेब! तो म्हणाला, 'यांना हॉस्पिटलमध्ये न्या, हे माझे मालक आहेत' तेव्हा त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले व हा तेव्हापासून काहीही न खाता त्यांच्या पायाशी बसून राहिला. प्रभा व बापूराव (तिचे यजमान) सर्व व्यवस्था बघत होते. बेशुद्धावस्थेत दादा म्हणत होते, 'माणसाने प्रामाणिक राहावे' एवढे एकच वाक्य शेवटपर्यंत त्यांच्या तोंडात घोळत होते.

आम्ही तेथे गेलो,पण आम्हाला त्यांनी ओळखले नाही. फक्त ते त्या वेळी जिवंत होते एवढेच. पंधराच दिवसांपूर्वी पुण्याला भेट झाली व आनंदाने निरोप घेतला आणि

इतक्या लवकर ते आम्हांला सोडून जातील यावर विश्वासच बसेना. परमेश्वरी इच्छा ! आईच्या पश्चात त्यांनी स्वतः आम्हांला वाढविले तो माहेरचा वृक्ष आज संपला. जानबाला तर दुःख आवरेना. त्याने खरोखरच आपले प्राण पणाला लावले, पण फळ मिळाले नाही. खरे म्हणजे तो निराधार झाला असे, आम्हांला वाटू लागले. सर्वस्वी तो दादांच्या जीवनात सामावून गेला होता. आम्ही मुंबईला प्रभाकडे आलो. जानबाला दादांचा आधार तुटल्यामुळे साहजिकच त्याची जबाबदारी घेणे हे आमचे भावंडांचे कर्तव्यच होते. तेव्हा त्याने कुठे राहायचे हा प्रश्न उद्‌भवला. राजाभाऊ दिल्लीला होता; पण दिल्लीला जाणे त्याला पसंत नव्हते. मी परदेशात तेव्हा तेथे नेणे त्याला शक्य नव्हते. आता तसे पाहिले तर तो म्हाताराच झाला होता व आमच्याही जबाबदाऱ्या संपल्या होत्या. माझे मेहुणे बापूराव व प्रभा यांनी त्याची जबाबदारी घ्यायची असे ठरले व तो मुंबईला त्यांचेकडे राहू लागला.

पुण्याचे घर थोडेच दिवसांत सोडले. पण वरची एक खोली रु. ५ भाड्याने जानबाने आपल्याकरता ठेवली. मधून मधून तो पुण्याला जात असे. बापूराव त्याला पगार वगैरे व्यवस्थित देत असत व मधून मधून मी रोमहून येत असे तेव्हा त्याची अडचण भागवीत असे. त्याचे वय त्या वेळी ६० च्या पुढे होते. आता प्रभाच्या संसारात तिला हरतऱ्हेची मदत करीत होता. तिचा संसार तसे पाहिले तर व्हायचा होता. त्यामुळे तिला जानबाचा खूप आधार होता. त्यांच्या घरात त्याला स्वतंत्र खोली बाहेर बाजूला होती. कोकणातली मंडळी त्याला नेहमी भेटायला येत असत. सर्वांना पान खायला देऊन खूष ठेवीत असे. सुरुवातीला त्याने आपला जावई बापूरावांकडे कामाला ठेवला होता. पुढे त्याची मुलगी वारली व जावई दुसरीकडे कामाला गेला. नंतर मुलाचा मुलगा म्हणजे नातू कामाला आला. त्याचे नाव गोपाळ. तो आजोबांचे सर्व काम करीत असे. स्वयंपाक जानबा करीत असे व बाकीचे गोपाळ करीत असे. वयाच्या मानाने जानबाची प्रकृती चांगली होती. जानबाचे काम माधुरीला खेळायला नेण्याचे असे व तोही थोडा मोकळ्या हवेवर बसत असे. जानबाचा प्रभाला खूप आधार होता. त्याच्या जिवावर ती कुठेही बाहेर जात असे. तो म्हणजे घराचे कुलूप होते.

माझी मोठी मुलगी मेडिकल कॉलेजात मुंबईला होती. ती पुष्कळ वेळा मावशीकडे येई. तिच्या आवडीचे पदार्थ तिला जानबा करून घाली. माझ्या

मुलीच्या व सुहासच्या लग्नात काम करण्यातही त्याचा खूप सहभाग असे. आमची मुलेही त्याला प्रेमाने वागवीत असत.

माझा मोठा मुलगा सुहास अमेरिकेहून शिकून आल्यावर पवईला I.I.T. मध्ये नोकराला लागला. त्या वेळी त्याचाही संसार जानबाने मांडून दिला व कामाच्या बाईला स्वयंपाक व घरकाम शिकविले. ती त्याला मामा म्हणे. उतार वय,पण उमेद दांडगी होती.

प्रभाला माधुरीनंतर १० वर्षांनी मुलगा झाला. त्याचे नाव महेश ठेवले. तो झाल्यापासून तर जानबाचे काम खूपच वाढले. त्याला लहानाचा मोठा त्यानेच केला. मला आठवते महेशला शाळेत जायला आवडत नसे तेव्हा जानबा सकाळी ९ वाजता त्याचेबरोबर जाई. दुपारी त्याला सुट्टीत खाऊ घाली. दुपारी ३॥ वाजता घरी घेऊन येई. सबंध दिवस तो महेशकरता शाळेत बसे. केवढी ही चिकाटी. घरी आल्यावर महेश आईस्क्रिम व बटाटे चीप्स खायचा. तसा तो थोडा हट्टीच होता.

आता १९६२ सालापासून आमची नातवंडे सुरू झाली. चि. नीलूला मुलगा झाला. बाळंतपण रोमला झाले. त्यानंतर ते दोघे लंडनला उच्च शिक्षणाकरता गेले. छोटा नातू २॥ महिन्यांचा माझ्याकडे रोमला राहिला. तो २॥–३ वर्षांचा असताना मी त्याला घेऊन भारतात प्रभाकडे मुंबईला आले होते. जानबाला केवढा आनंद. आता तो पुढची पिढी पाहात होता.

जानबाला फोटोची खूपच आवड होती. तो फावल्या वेळात फोटो पाहात असे. ती त्याची करमणूक होती. मी त्याला आलबममध्ये फोटो लावून दिले होते. तसेच खोलीतही सर्वांचे फोटो लावले होते.

मधून मधून तो पवईला जाऊन राहात असे. सुहासचा मुलगा गौरव तो जानबाला 'जानूआजोबा' म्हणत असे. माझी सून शोभा जानबाला नेहमी प्रेमाने बोलावीत असे. गौरवचे कामही तो करी. आमच्या मुलांना त्याने लहानाचे मोठे केले ही जाणीव होती. मुले परदेशात असली तरी दर वेळेला त्याला काहीतरी आणीत असत.

खरे म्हणजे आता वयाची सत्तरी उलटली. कधी कधी ब्लडप्रेशर वाढत असे. बापूराव,प्रभा त्याची काळजी घेत असत. तो मधून मधून कोकणात जाई,पण तेथे कायमचे राहायला जाणे त्याला पसंत नव्हते. त्याची बायको वारली त्या वेळी तो महिनाभर गेला होता. बापूराव त्याला सांगत होते की 'आता मुलगा, सून व

नातवंडे यांच्यात राहा' पण त्याला तिकडे करमत नसे.

आमची तीन मुले आता अमेरिकेत स्थायिक झाली आहेत. तशी भारतात मधून मधून भेटायला येतात तेव्हा जानबाला नेहमी मुंबईला भेटतात.

आम्ही १९७२ मध्ये पेन्शन घेऊन पुण्याला राहायला आलो. जानबाला आता प्रभाकडेही विशेष काम होत नसे. तेव्हा तो काही दिवस कोकणात राहून बघतो म्हणून गेला होता.

इकडे १९७५ सालातली गोष्ट. आमच्या विकासचे लग्न ठरले. तेव्हा मी त्याला कोकणात पत्र टाकले आणि आश्चर्याची गोष्ट एका मुलाला सोबतीला घेऊन हा बसने पुण्याला आला. आम्ही सर्वजण लग्नाच्या गडबडीत होतो. लग्नाच्या आधी दोन दिवस ही स्वारी पुण्याला येऊन दाखल झाली. मला तर तो खूपच म्हातारा दिसत होता. प्रवासाने दमलेला होता. चालवतही नव्हते. पण आम्हांला त्याला पाहिल्यावर खूपच आनंद झाला. एकदम डोळ्यात आनंदाश्रू आले. आमचेही हे शेवटचे कार्य;पण योगायोग चांगला होता. त्याला लग्नाकरता नवे कपडे आणून दिले. सकाळी लग्नाचेआधी त्याला गाडीने मांडवात नेऊन खुर्चीवर बसविले. त्याने लग्नविधी व्यवस्थित पाहिला व सबंध दिवस तो आनंदात होता. विकासबरोबर त्याचा फोटो काढला.

दुसरे दिवशी लग्नाला आलेली प्रभा वगैरे मंडळी मुंबईला गेली. त्यांचे सोबतीने तो गेला. मुंबईला थोडे दिवस राहून कोकणात कायम राहायला गेला.त्या वेळी त्याचे वय ८६चे घरात असावे. आम्ही त्याला पैसे पाठवीत होतो. त्याने शेवटपर्यंत सुखात दिवस काढावे असे आम्हांला वाटत होते.

आमचे दोघींचेही संसार त्याने बघितले. मुले नातवंडे भेटली. त्याची आयुष्यातली जबाबदारी त्याने आनंदाने संपविली होती. आमचे दोघींचे जीवन सुखी व्हायला परमेश्वराने त्याला जन्म दिला होता. स्वतःचा स्वार्थ, मुले, बायको खरे म्हणजे त्याला सर्व होते. पण आईचे वचन पाळायचे हेच त्याचे ध्येय होते. त्याने माझ्या आईच्या वेळेचा पोळपाट मला द्यायला दादा गेल्यापासून ठेवला होता. तो त्याने मला भारतात आल्यावर दिला. माझ्या आईची आठवण म्हणून मी तो रोज वापरते, हीच त्याची भेट मला शेवटची ठरली.

आता म्हातारपणी घरी गेला,पण घरातली माणसे मुलगा, सून,नातवंडे, जावई लेक सर्व त्याला प्रेमाने सांभाळीत होते. शहरात सबंध आयुष्य गेल्यामुळे

खेडेगावात राहणे तितके सोपे नव्हते. त्याला घरात संडास बांधून दिला व पोळी भाजी जे काही पाहीजे ते खाऊ घालत असत. त्याचे काम करायला एक माणूस ठेवला होता. तसा तो सुखी होता. बसून खायला मिळत होते. त्याचा नातू गोपाळ बरीच वर्षे प्रभाकडे काम करीत होता. तो वर्षातून एकदा कोकणात जाई, आजोबाला भेटून प्रभाला जानबाची खुशालीही कळवीत असे. जानबा प्रमाणेच तोही प्रेमळ आहे.

तीन-चार वर्षांपूर्वी मला प्रभाचे पत्र आले व अल्पशा आजाराने जानबाचे देहावसान झाले असे कळले. पत्र वाचताच ते माझ्या हातातून गळून पडले व डोळ्यातून अश्रू वाहू लागले. गतकाळचा चित्रपट डोळ्यापुढे दिसू लागला व २-३ रात्री बेचैन अवस्थेत गेल्या. काहीही आजाराने खितपत न पडता मृत्यू येणे हे सुद्धा भाग्यच लागते असे समजून मी एक उसासा टाकला. त्याचा व आमचा ऋणानुबंध संपला.

दोन-तीन महिन्यानंतर जानबाचा नातू गोपाळ मुंबईला आला. त्याने ५०० रुपये प्रभाजवळ दिले व तुम्ही दिलेल्या पैशातले शिल्लक राहिले असे सांगितले व ते पैसे माझे आहेत असे नातवाने सांगितले म्हणून ते पाकीट तिने मला पाठवून दिले. खरे म्हणजे आम्ही त्याला कधीच हिशोब विचारला नव्हता. केवढा हा प्रामाणिकपणा.

स्वतःचा विचार न करता आमच्याकरता त्याने सर्व देह झिजविला. माझ्या आईला दिलेले वचन त्याप्रमाणे म्हातारपणापर्यंत आमच्या संसाराची जबाबदारी घेतली व प्रामाणिक राहिला. त्याचा व आमचा पूर्वीचा ऋणानुबंध म्हणा किंवा काही म्हणा अशी माणसे असा त्याग आता क्वचितच आढळेलं व धन्य तो माणूस. त्याच्या आत्म्याला शांती मिळावी एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना. त्यागी वृत्ती व दुसऱ्याकरता देह झिजवणे हे त्या काळचे वैशिष्ट्य आहे.

# "पारू"

प्रत्येकाच्या आयुष्यात समस्या येत असतात. त्यातून बाहेर पडण्यात काहींना आपलं आयुष्य खर्ची घालावं लागते व काहींच्या समस्या तर जन्मभर सुटतही नाहीत. निदान माझ्या घरी काम करणारी पारू, तिचे काम करताना भिरभिरणारे डोळे मला बरंच काही सुचवितात, पण विचारण्याचे धैर्य नाही. तिला पाहिल्यापासून का कुणास ठाऊक तिच्याबद्दल एक विलक्षण कुतूहल वाटते. तिच्या घरात काय समस्या असतील बरं ?

मागच्याच वर्षीची गोष्ट. अमेरिकेहून दोन महिन्यांची सुट्टी संपवून आम्ही पुण्याला आलो. ३०-३५ तासाचा कंटाळवाणा प्रवास करून आम्ही दोघेही थकून गेलेलो. घरी आल्यावर पारू स्वागताला हसतमुखाने उभी असेल. स्वयंपाक तयार असेल. दुपारी मस्त विश्रांती घ्यायची अशा विचारात मी होते. पण घरी पाहते तो पारू आलेली नाही, घरात केरवारा काढलेला नाही, स्वयंपाक केलेला नाही. यावरून पारूचे काहीतरी विपरीत घडले हे कळायला वेळ लागला नाही.

आता कसला थकवा नी कसलं काय ? कपडे बदलून कामाला लागावं या विचारात होते. तितक्यात समोरचे डॉक्टर आले. त्यांनी टिफीनमध्ये आमच्याकरता जेवण आणले होते. चला जेवण तरी आयते मिळाले म्हणून दिलासा वाटला. ते सांगू लागले, पारूच्या घरात एक दुःखद घटना घडली. तिची थाकटी मुलगी उज्वला नदीत पाय घसरून बुडून हे जग सोडून गेली. त्यामुळे गेले १०-१२ दिवस पारू कामाला आलीच नाही. हे ऐकलं आणि माझं मन सुन्न झालं. रात्रभर मला पारूच डोळ्यापुढे दिसत होती. ही धाकटी मुलगी पारूला जीव की प्राण होती.

दुसऱ्याच दिवशी सकाळीच मी पारूकडे गेले. तिची ती लहानशी खोली, जावई खाटेवर बसलेले, थोरली मुलगी शशी आणि आई चुलीजवळ, तिची तान्ही मुलगी जमिनीवर लोळत पडली होती. पारू एका कोपऱ्यात पोत्यावर रडत होती. कुणीच कोणाशी बोलत नव्हतं. खरं म्हणजे मी पारूला धीर द्यायचा पण मलाच रडू आवरेना. मी तिच्या जवळ बसले. तीने मला मिठी मारली व धाय मोकलून रडू लागली. मी पाठीवरून हात फिरवला. आम्ही कितीतरी वेळ गप्पच होतो. मला काय करावे तेच कळेना. ती हळूहळू सांगू लागली.

गेल्याच महिन्यात पारूची थोरली मुलगी शशी बाळंतपणाकरता आली होती. पारूला नात झाली म्हणून ती आनंदात होती. गरिबी असली तरी पारूनं लेकीचं आणि नातीचं सारं हौसेने केलं. तान्ही मुलगी महिना दीड महिन्याची झाली आणि जावई शशीला मुंबईला न्यायला आले. नुकतीच बाळंतपणातून बाहेर पडलेली ओली बाळंतीण तिला घरातले सगळे काम झेपणार नाही अशा विचाराने पारूने तिच्या धाकट्या बहिणीला उज्वलाला पण तिच्याच बरोबर पाठविले. शशीच्या सासरी सुरुवातीचे आठ–दहा दिवस मजेत गेले.

एक दिवस उज्वला आणि शशीचे आठ आणि दहा वर्षाचे धाकटे दीर करवंदे खायला म्हणून उन्हाचे निघाले. चालून चालून मुलं दमली. जवळच एक तळे होते. आदल्याच दिवशी वळवाचा पाऊस येऊन गेला होता. त्यामुळे तळ्याकाठची माती ओली व भुसभुशीत झालेली. मोठा दीर पाणी पिण्यासाठी तळ्याच्या काठाजवळ गेला व आत पाय ठेवून उभा राहिला. पाण्याला ओढ फार व जमीन भिजलेली त्याचा पाय त्यावर सरकला व लाटे सरशी तो पाण्यात गेला. धाकटा त्याला पाहायला गेला. त्याचीही तीच गत. पाण्याच्या ओढीमुळे काही कळायच्या आतच दोघे पाण्यात गटंगळ्या खाऊ लागले व दिसेनासे झाले.

उज्वला काठावर उभी पण ती तर भांबावूनच गेली. कुणाला हाक मारावी, मदतीला बोलवावं काहीच तिला सुचले नाही. तिला थोडे पोहता येत होते. कदाचित आपण या दोघांना बाहेर काढू असा एक क्षणिक विचार तिच्या डोक्यात आला असावा आणि ती पाण्यात उतरली आणि बघता बघता भोवऱ्यात अडकली. आजूबाजूची माणसं गोळा झाली पण तोपर्यंत फार उशीर झाला. हाताशी लागली ती गळ्यात हात घातलेली तीन मुलांची प्रेते. पारूला घ्यायला जावई व वडील आले.

नदीच्या काठावर तीन प्रेते पाहून पारूला भोवळ आली. तीने हंबरडा फोडला, तिचे दिवसपाणी करून पारू व वडील पुण्याला परत आले. पारूवर आलेल्या संकटाची मला कल्पना करवेना.

मी तिची पुन्हा पुन्हा समजूत घालीत होते. हे दुःख तिच्या आवाक्याबाहेर होते. मी तिला सांगितले कामावर यायची घाई करू नकोस. तू पूर्णपणे सावरलीस की मग ये, असे सांगून मी घरी आले.

दहा–बारा दिवसांनी पारू कामावर आली. चेहरा भकास, डोळे निस्तेज, जेवणाची इच्छा नसताना तिला बळे बळेच चार घास खायला लावीत होते. तिला वेळोवेळी सांभाळून घेणे आणि धीर देणे यापलीकडे मी तरी काय करणार ?

या प्रसंगालाही जवळ जवळ वर्ष उलटून गेलं. हळूहळू पारू सावरू लागली, पण मधून मधून ती सतत बडबडायची, 'माझं नशीबच वाईट आहे. मी असं काय केलंय की देवानं मला ही शिक्षा दिली, मी अभागी आहे, मला सुख कधीच लागणार नाही. 'मला तिचा पूर्व इतिहास फारच थोडा माहिती होता. आमच्या एका स्नेह्यांनी तिला माझ्याकडे आणले होते. प्रामाणिक आहे, पडेल ते काम करण्याची तयारी आहे, एवढंच सांगितलं होतं.

एकदा माझे यजमान दिल्लीला गेले होते. घरामध्ये मी आणि पारू अशा दोघीचजणी. मी एक दिवस तिला जवळ बसवून घेतले.' हे बघ पारू रोज तू मला तुझ्या घरच्यांच्या बद्दल काहीतरी सांगत असतेस. इथं बस आणि मला तुझ्या जीवनाची सगळी काहाणी सांग. 'माझ्या शब्दांनी पारूला धीर आला व इतर कुणाशीही नसेल पण माझ्याशी पारू खूप मनमोकळेपणाने बोलली. आमच्या दोघींच्यात कसलाच आडपडदा राहिला नाही. तिच्या बोलण्यावरून मला तिची जीवनगाथा कळली. मी आतुरतेने ऐकत होते.

पारूचा जन्म मुळशी तालुक्यात एका खेडेगावी झाला. वडिलांची शेतीभाती व किराणामालाचे दुकान. तसं खाऊन पिऊन सुखी कुटुंब. एकच की खेडेगावात शाळा नाही. त्यामुळे पारूही शाळेत गेली नाही. पारूच्या जन्मानंतर दर दोन वर्षांनी घरात तिच्या आईचा पाळणा हालतच राहिला. त्यामुळे पारूला लहानपणापासून घरात कष्ट करायची सवय.

बघता बघता पारू १६ वर्षांची झाली. अंगकाठी बारीक पण गौरवर्णी आणि सुडौल बांधा आणि तरूण त्यामुळे ती चारचौघांत उठून दिसायची. खणाचा परकर, लांब बाह्याची चोळी, डोकीवर घट्ट बुचडा, कमरेवर घागर आणि डोईवर

हंडा अशा थाटात ती नदीवरून पाणी आणत असे. तिच्या सौंदर्याची कुणाला भुरळ पडली नसती तरच नवल. एक दिवस अशीच तिच्याकडे काही माणसे निरखून पाहात उभी होती. पारूचे लक्ष गेले. तिनं मान खाली घातली आणि लाजेनं चूर होऊन घराकडे परतली.

नंतर कळलं की ती वर पक्षाकडची मंडळी होती. ती पारूच्या वडिलांकडे मागणी घालायला आली. पारूला त्या दिवशी नऊवारी साडी व चोळी घालायला दिली. डोक्यावर पदर दिला. ठरावीक प्रश्नोत्तरे झाली. मुलगी पसंत पडली. पारूला विचारण्याचा प्रश्नच नव्हता. खेडेगावातली ती चालच नव्हती. आई–वडिलांनी निवडलेल्या मुलाच्या गळ्यात माळ घालायची एवढंच तिला माहीत. यात तिचा दोष नव्हता. तो त्या काळातला प्रभाव होता.

मुलाकडच्या घरचं सगळं चांगलं होतं. त्यामुळे आईला या मुलीनं नशीब काढलं असंच वाटलं. साखरपुडा झाला. देण्याघेण्याचा प्रश्न वडिलांनी सोडविला. वरपक्षाकडचे मानपान, दोन्हीकडचा लग्नाचा खर्च रु. ७०००-०० हुंडा, शिवाय दागदागिने, मुलीला साड्या, जोडवी, मणी मंगळसूत्र, गंठण, बांगड्या वगैरे सर्व व्यवस्थित केलं. मुख्य म्हणजे कुठलेही कर्ज न काढता लग्न उरकले.

पारूची सासरी पाठवणी करताना मायलेकींनी पोटभर रडून घेतले. पारू लग्न करून सासरी आली. सासर पण खेडेगावातच. घरामध्ये नवरा शंकर, सावत्र सासू, सासरे शिवाय सख्खी आणि सावत्र अशी बरीच बहीणभावंडे असा वाढता पसारा. घरामध्ये आईची आता सावत्र सासूची बाळंतपणं सुरू म्हणजे कष्टांना अंत नाही. तसं खायला प्यायला कमी नाही पण सासूची अधिकार गाजवण्याची वृत्ती, त्यातून शंकर सावत्र मुलगा, शिवीगाळी, मारहाण, उपाशी ठेवणे, भातात पाणी घालणे अशा प्रकारच्या सासुरवासाच्या दिव्यातून तिला जावे लागले. नवरा मातृभक्त. त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलायची सोय नाही. त्यातून वडील-माणसाविरुद्ध बंड करण्यासाठी लागणारी धमकही त्याच्यात नव्हती.

पारूला दिवस गेले. पहिले बाळंतपण आईनं माहेरी हौसेने केले. मुलगा झाला म्हणून शंकर व पारू दोघांनाही आनंद झाला. पण सासरच्या रहाटगाडग्यात या नातवाचं कुणाला कौतुक त्यातून सावत्रपणा प्रत्येक वेळी आडवा यायचा. मुलगा ४-५ महिन्यांचा असेल. एक दिवस पारू पाणी आणायला गेली असताना पोरगं फार किरकिर करतं म्हणून त्याला झोपविण्यासाठी सासूनं अफू ऐवजी चुकून काय दिलं कुणास ठाऊक पण पोरगा झोपी गेला तो पुन्हा उठलाच नाही. पारूनं हंबरडा

फोडला. शंकरलाही वाईट वाटले. चूक सासूची पण पांढऱ्या पायाची म्हणून सुनेच्या नावाने खडे फोडायला मोकळ्या.

पहिल्या मुलाला जाऊन वर्ष होत नाही तोच पारूला पुन्हा दिवस गेले. या वेळी बाळंतपण सासरी, कसलेही कोडकौतुक नाही. विश्रांतीचा प्रश्नच नाही. ह्या वेळी मुलगी झाली. नाव शशी ठेवले. आठ पंधरा दिवसांतच नेहमीप्रमाणे काम सुरू. तिच्याबरोबर सासूचीही बाळंतपणं. मर मर कष्ट उपसायचे आणि वर पुन्हा उठता बसता शिव्यागाळी आणि मारहाण, दिवसामागून दिवस जात होते. त्यात मुलीच्या पाठीवर आणखी एक मुलगा. आता मात्र पारूचा जीव कातावून गेला. तिने शंकरला विश्वासात घेऊन व मनाचा हिय्या करून एक दिवस सांगितले की, अशा राहाण्यानं कोणालाच सुख लागत नाही. शंकरलाही ते पटले. एक दिवस मनाचा हिय्या करून शंकरने वडिलांजवळ शेतीचा हिस्सा मागितला तर त्याचा हिस्सा तर मिळाला नाहीच, उलट शिव्या देऊन मारहाण करून अंगावरच्या नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर काढले.

घर तर सुटले पण पुढे काय? हा प्रश्नच होता. सुदैवाने पुण्यात एका कारखान्यात नोकरी मिळाली. चतुःशृंगीजवळ लहानशी खोली पण मिळाली. संसारात थोडी सुखाची चाहूल लागते आहे असं वाटू लागलं, आणि त्याप्रमाणे जवळ जवळ २ वर्षे झाली. आता पारूला पुन्हा दिवस गेले. शंकर तिचे लाड करी. पारूला अस्मान ठेंगणं झालं. पाहता पाहता नऊ महिने संपले व पारूला मुलगी झाली. नाव उज्ज्वला. आता २ मुली व एक मुलगा. संसाराचा वाढता पसारा वाढतच राहिला. आपल्याला हे कसं झेपणार याचा विचारच नाही. मुले म्हणजे देवाची ठेव असंच ती म्हणे. तिचे आपले सारखे कष्ट कष्ट आणि कष्ट. मिळवायचं आणि खर्चून टाकायचं. उद्याचा विचारच नाही.

चौथ्या बाळंतपणातून नुकतीच ती उठलेली. नेहमीप्रमाणे शंकर कामावरून घरी आला. पोटात दुखतंय म्हणून तसाच झोपला. मध्यान्ह झाली तरी शंकरला झोप येईना. पोटात सारख्या कळा येत राहिल्या. शेजाऱ्यांनी टांग्यात घालून हॉस्पिटलमध्ये नेले. ॲपेंडिक्सचं निदान झालं. ॲपेंडिक्स पोटातल्या पोटातच फुटला. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पारूनंही कर्ज काढून दुखण्यावर पाण्यासारखा पैसा खर्च केला. पण सारे व्यर्थ. शंकरने या जगाचा निरोप घेतला. पारूवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. आई आली, नातलग आले, चार सांत्वनपर गोष्टी सांगितल्या. पारूचे वय २१ वर्षांचे, पदरात तीन मुले.

वर्षभराचं घरात भरलेलं धान्य होतं ते संपत आलं. तीन पोरांना पोसणार कोण? पारूला शिक्षण नाही, दुसरीही काही कला नाही, नोकरीवर तरी कोण ठेवून घेणार, दागिने विकून संपले, धान्य संपलं, आता पुढे काय? पदर खोचून कामाला लागायलाच हवे. परमेश्वराने काळजीत टाकले, आता तोच तारणार.

शेवटी एक दिवस आशेचा किरण दिसला. तिच्या घरापासून जवळच एक राधाबाई नावाच्या बंगलेवाल्या बाई होत्या. त्यांचेही पती नुकतेच वारलेले. त्यांचीही दोन लहान मुले. पारूचे दुःख त्यांना कोणीतरी सांगितले. त्या बाईंनी पारूला नोकरीला ठेवले. त्यांनाही कोणाची तरी सोबत हवी होती. पारूनं धाकट्या उज्ज्वलाला आईकडे ठेवले व थोरला मुलगा आणि मुलीला घेऊन ती राधाबाईंकडे राहायला आली. दोन वेळेस जेवायला मिळतंय, कपडालत्ता मिळतोय ह्यातच ती समाधानी होती. राधाबाईंची मुलं शाळेत जात पण पारूला शिक्षण हा शब्दच माहीत नव्हता. मुलांनाही अभ्यासाचा कंटाळा, शिक्षणावाचून आपलं पुढं अडेल ही कल्पनाच नाही. तसे तिला संस्कारच नाहीत.

मुलं मोठी होत होती, खर्चही वाढत होता, एका घरी मिळालेला पैसा अपुरा पडू लागला. तेव्हा राधाबाईंच्या ओळखीने एका बँक मॅनेजरकडे धुणं–भांड्याचे काम मिळाले. मॅनेजरच्या मनात पारूचे रूप भरले आणि एक दिवस त्यांची बायको झोपली असताना, मॅनेजर साहेबांनी कोणी आसपास नाही हे पाहून पारूचा पदर ओढला. सर्व प्रकार पारूच्या लक्षात आला, तिच्या आयुष्यातला हा पहिलाच प्रसंग. साहेबांच्या नजरेला नजर देत तिने त्यांच्या हाताला हिसडा दिला व शिव्यागाळी करत बडबडली, सोन्यासारखी बायको असताना हे पाप कुठं फेडशील, असे ओरडून ती त्यांच्या हातून निसटली आणि पळत सुटली. शिव्या देणं आणि मनातल्या मनात चरफडणं एवढंच ती करू शकली.

पती गेला तेव्हापासून परपुरुषाकडे वर मान करून पाहायचे नाही असं पारूनं जरी ठरवलं तरी तिचे तारुण्य तिला दरवेळी अडचणीत आणत गेलं. मॅनेजरचं काम सुटलं, पुढं काय? पैसा हवाच, एका देवळात देवाची भांडी घासायचं काम मिळालं. सात–आठ दिवस बरे गेले पण पुढं त्या देवळातला पुजाऱ्याची वाईट नजर तिच्यावर गेली. मला वश हो म्हणून म्हणू लागला. ती बडबडली, 'अरं पुजा करतांय की काय हाय, तुझं पाप बाहेर काढीन.' हे ऐकून आपली नोकरी जाईल या भितीने तो मुकाट्यानं निघून गेला. पारूने तीही नोकरी सोडली.

आता अनाथाश्रमात आया म्हणून काम मिळाले. आश्रमाचे मुख्य अधिकार

विधूर होते. ते म्हणाले, 'माझी बटीक हो. मुलांना आश्रमात टाक.' पारू गरीब असली तरी मानी होती. एक दिवस नको तो प्रसंग आलाच. जाता जाता ओरडली, 'नराधमा; तुझ्या गळ्याचा घोट घेईन.' साहेब घाबरून निघून गेले.

आता तिला काय करावे ते कळेना. आता सांगलीच्या राणीसाहेबांकडे चांदीची भांडी घासायचे काम मिळाले. तिथे बरेच नोकरचाक़र होते. एक दिवस भांडी चोरीला गेल्याचा आळ मॅनेजरने तिच्यावर घेतला. ती सरळ राणीसाहेबांना भेटली. तशी ती मानी होती. तिने स्वतः सर्व खुलासा केला. शेवटी चौकशी केली व कळले की मॅनेजरने हळूहळू भांडी लंपास केली होती. पारूच्या मनाला ही गोष्ट लागली. आपला इथे अपमान आहे. तीही नोकरी सोडली.

समाजात कुठेही गेलं तरी तरुण विधवा असल्यामुळे पुरुषी वासना तिचा सतत पाठलाग करत राहिली. आता राधाबाईंची मुलेही मोठी झाली. त्यामुळे तिला तेही घर सोडावे लागले. ती स्वतःच्या खोलीत राहायला आली. पारू आता तीन मुलांची आई असल्यामुळे ती अब्रूला जपत होती. प्रत्येक वेळी तिनं स्वतःची सुटका करून घेतली. पण एकही वेळी ती या पाशवी वृत्तीला थडा शिकवू शकली नाही.

दिवसामागून दिवस जात होते, वर्षामागून वर्षे जात होती. पारूची मुलं मोठी होत होती. पुण्यात असलेल्या इंदिरा कम्युनिटी किचनमध्ये ती कोणाच्यातरी ओळखीने कामाला लागली. आमचेकडे येण्याचे आधी ती तिथंच काम करीत होती. शेजाऱ्यांची मुले शाळेत जात हे पाहून ही मुले शाळेत जाऊ लागली. धाकटी मुलगी वारलेली, थोरली कसंबसं दहावीपर्यंत पोचली. मुलाचे तर शिक्षणात लक्ष नाही. तो ५–६ बुकं जेमतेम शिकला. पारूला शिक्षणाचं महत्त्व न कळल्याने ती मुलांना तरी कसे शिका म्हणणार ? थोरलीचे लग्न कर्ज काढून केले पण जावई चांगला नाही म्हणे. मुलाला शिक्षण नसल्याने नोकरी मिळत नव्हती. आता कुठेतरी कंपनीत सध्या नोकरीत आहे. पगारही चांगला मिळतो. पारू सध्या आनंदात दिसते.

आमच्याकडे पारू आली ती गरीब व गरजू म्हणून. प्रथमतः नजरेत भरले ते तिचे रूप, स्वच्छता व टापटीप, हळूहळू ती कष्टाळू आणि प्रामाणिक आहे हेही लक्षात आले. पडेल ती कामं करायची तिची तयारी आहे. घरात कितीही पाहुणे आले तरी कुरकुरत नाही.

तिची हकीगत कळल्यापासून पारूला चांगले दिवस यावे असं मला सतत वाटू लागले. अजून तुझं फारसं वय झालेलं नाही. तू थोडं लिहायला, वाचायला शीक. तेवढा तुला विरंगुळा. पण तिकडे तिचं लक्षच नाही. शिवणकाम, विणकाम काही तरी शीक, मुलाला शिकव, मी पैसे देते. तुझा मुलगा काहीतरी शिकला तर हेही दिवस पालटतील. पण माझ्या बोलण्याकडे ती लक्षच देत नाही. तिचे आपले एकच तत्त्वज्ञान."बाईसाहेब काय मागल्या जल्मीचं प्रारब्ध. इतके कष्ट करून सुख नाही. परमेश्वरानं दुःखं दिलीत तेव्हा तोच दूर करणार."

माझ्या मनात आलं, ज्या वेळी राधाबाईंकडे होती त्या वेळी त्यांनी तिला व मुलांना आसरा दिला. पण स्वतःच्या मुलांप्रमाणे पारूला व मुलांना शिकवण्यासाठी आधार दिला असता तर चित्र पालटलं असतं. पण पारूचे संस्कार वेगळेच होते. आता पारूला आम्ही आमच्या घरच्यासारखेच मानतो. आम्ही जे जेवतो तेच तिला देतो. मधून मधून आमच्या बोलण्यातून तिला आमचे विचारही ऐकायला मिळतात पण तिच्यात बदल होत नाही.

पारूला आमच्याकडे येऊन आता पाच–सहा वर्षे झाली. आता ती तितकी तरुण नाही. चाळिशी अजून यायची असे ती नेहमी म्हणते. पुरुषांचा ससेमिरा तिचा पाठलाग करतोच आहे असे ती कधी कधी म्हणते, पण मी त्या गोष्टीत विशेष लक्ष घालत नाही. तरीपण एक दोन प्रसंग आमच्याच घरी घडले हेही तितकेच सत्य आहे.

एकदा माझे यजमान गावाला गेले होते व मी सकाळपासून एका मैत्रिणीकडे गेले होते. पारू एकटीच घरात होती. आमच्या घरी पाठीमागल्या बाजूला थोडे बांधकाम सुरू होते. त्यामुळे गवंडी, सुतार व काही रंगारी व त्यांचेवर लक्ष ठेवणारा Contractor अशी मंडळीही वावरत होती.

मैत्रिणीकडे जेवण, गप्पा वगैरे करून मी साडेचारचे सुमारास घरी परतले. दारावरची बेल वाजविली, कुणी दार उघडेना. पारू मागच्या बाजूला असेल असे समजून मी माझ्या किल्लीने दार उघडून आत आले. घरात पारू दिसली नाही म्हणून मागच्या दारी गेले. पाहते तो पारू तावातावाने बोलत होती. चेहरा रागाने लालबुंद झालेला होता. पदर खोचला होता व संताप अनावर झालेला दिसला. मनात येईल त्या शिव्या ती साहेबाला देत होती. मी तेथे उभी असल्याची तिला जाणीवही झाली नाही. शेवटी मी तिच्याजवळ गेले व म्हणाले, 'अग पारू शांत हो

३२८१ २५७०२ निबंध २०/८/८८



शांत हो, काय झालं?' सर्व मंडळी माझेकडे बघू लागली. Contractor मात्र खाली मान घालून उभा होता. माझ्या विचारण्याने पारूला हायसे वाटले. ती साहेबाकडे सरळ बोट दाखवून उद्‌गारली, 'बाईसाहेब काय सांगू, एवढे मोठे साहेब, पण लाज नाही वाटली माझ्या अंगावर हात टाकायला, निर्लज्ज मेला.' आजूबाजूची गवंडी, सुतार, रंगारी सर्व बघू लागले. बाई काय सांगते तेच त्यांना कळेना. साहेबाने मोठे डोळे केले, पण आज पारू त्यांची भीड ठेवायला तयार नव्हती. त्यांची अब्रू चव्हाटयावर ती आणणारच होती. ती पुढे म्हणाली, 'बाईसाहेब ऐका. ती स्वयंपाकघरात कट्टयावर भाजी चिरत होती व शेजारच्या खोलीला रंगारी रंग देत होते. साहेब हलक्या पावलांनी स्वयंपाकघरात शिरले व तिच्या मागे उभे राहून तिच्या पदराशी चाळे करू लागले. तिने हातातली भाजी तशीच टाकून त्याच्याकडे तोंड फिरवले व रागाने सरळ तिने त्यांच्या श्रीमुखात भडकावून दिली. तेव्हा तरी गप्प बसावं की नाही, पण खिशातून नोटांचे पुडके काढून तिला आमीश दाखवू लागले. त्यांना वाटले पैसे पाहून ती भाळेल, पण तसे काहीच न होता उलट ती जोराने ओरडली. शेजारचे रंगारी इकडे तिकडे पाहू लागले. त्यांना काय झाले काहीच कळले नाही. साहेब मात्र मुकाटयाने काहीच घडले नाही असे दाखवून स्वयंपाकघराच्या बाहेर बागेत निघून गेले. रंगारी त्यांच्याकडे संशयाने पाहात राहिले.

पारू स्वयंपाकघरातून बाहेर आली. साहेबांना वाटले आपण सहीसलामत सुटलो. जणूकाय काहीच घडले नाही असे दाखवून ते म्हणाले, 'पारूबाई थोडं पाणी देता का प्यायला.' ती म्हणाली, 'मेल्या पाणी मागतोस, लाज नाही वाटत! त्या गटारातलं मूत पी जा. वाटेल तिकडे मर जा.' रंगाऱ्याच्या लक्षात ही गोष्ट आली. ती रंगाऱ्यांना म्हणाली, 'हा नराधम मला दम भरतोय, पैसे दावतोय. हा काय फुकटचा माल आहे? मी अब्रूला जागणारी बाई आहे. असे छप्पन पाहिले याच्यासारखे.' तिचा तोंडाचा पट्टा चालूच होता. साहेबाचा चेहरा पडला. त्याला वाटले आता बाईसाहेबांच्या पुढे उभे राहणे नको. म्हणून मी काहीतरी बोलायच्या आतच साहेब निघून गेले. त्या दिवसापासून त्याने मला तोंड दाखविले नाही.

असे प्रसंग अजूनही तिच्यावर येतात. एकदा सांगत होती, गर्दीतसुद्धा जर एखाद्या पुरुषाने धक्का दिला तर लगेच म्हणते, डोळं फुटलं का? बाईमाणूस दिसत नाही? परपुरुषाचा वास तिला सहनच होत नाही.

तिच्या समाजात रूढी आणि अंधश्रद्धा यांचा पगडा इतका जबरदस्त आहे की, त्यातून तिला बाहेर पडणे वाटते तितके सोपे नाही. लहानपणी तारुण्य व विधवा यामुळे तिच्यावर खूप वाईट प्रसंग आले. पण कुठल्याही पुरुषाच्या पाशवी वृत्तीला ती बळी पडली नाही.

मंदिरातल्या एका ब्राह्मणावर मात्र तिची फार श्रद्धा आहे. त्याने तिची कुंडली पाहून तिचे दिवस लवकरच पालटतील असं सांगितलं आहे. असे नुसते दिवस बदलणार नाहीत, त्यासाठी तुला प्रयत्न करायला हवेत असे मी तिला सांगते. हळूहळू कदाचित तिला ते पटेल असे मला वाटते, पण तिचे उपास व अंधश्रद्धा कायम आहे. तिला शिक्षण नाही, ती सुशिक्षित नाही पण सुसंस्कृत व पवित्र आहे. कष्ट करून पैसे मिळवीन पण लाचारी नको हे तिचे ब्रीदवाक्य आहे.

तिचा पिंड वेगळ्या तऱ्हेने वाढलेला आहे. किती बदल होणार. अजूनही ऐन वेळेला तिच्या घरी पाहुणे आले तर पिठलेभात ती खायला घालते.

आता जावई व लेक आनंदात आहेत. दोन नाती आहेत. मुलाला एका कंपनीत नोकरी आहे. पगार चांगला आहे. त्यामुळे तशी ती सुखी आहे. सुनबाई येण्याची वाट पाहात आहे.

असे हे भारदस्त व्यक्तिमत्त्व असलेली पारू आमच्या घरात घर सांभाळायला योग्य बाई आहे. आम्ही दोघे सुखात राहावे ह्याकरता मात्र ती सतत प्रयत्न करते. आमच्या सुखात तिचा महत्त्वाचा वाटा आहे हे निश्चितच.

तिचा पिंड वेगळ्या तऱ्हेने वाढलेला आहे. शिक्षणाचे महत्त्व सांगूनही तिला पटत नाही व ते पटवून घेण्याचा ती प्रयत्न करीत नाही. त्यामुळे अंधश्रद्धेवरच ती जगते. प्रारब्धात असेल तरच सुख लागेल असेच ती सर्वांना सांगते.

* * *

# एक सामाजिक दृश्य

"माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे ही आजच्या काळाची खरी गरज."

"शिक्षण म्हणजे नुसते लिहायला वाचायला शिकवणे नव्हे." खेडेगावातला समाज अशिक्षित तर आहेच, व त्यातच गरिबीची समस्या मोठी असल्यामुळे माणसाला माणूस म्हणून राहण्याइतक्यासुद्धा सुविधा नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. प्रयत्न खूप झालेत; पण त्यांना यश आलेले नाही हे खास. किती जरी सामाजिक कार्य करण्याची हौस असली तरी खेडेगावात गेल्यास संध्याकाळ झाली की पुण्यास परत यावेसे वाटते; किंबहुना भाग पडते. माश्या व डास ह्यांचा उपद्रव, पिण्याच्या पाण्याचा अभाव, सांडास तर नाहीतच, सांडपाण्याचा निचरा होण्याच्या सोयींचा अभाव, हगवण, आमांश, फुफ्फुसाचे रोग व ताप यांचे मोठे प्रमाण. हे प्रमाण विशेषेकरून मुलांच्यामध्ये जास्त आढळून येते. वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव व त्यातून निर्माण होणारे त्वचेचे व इतर रोग हे तर आहेतच. शिक्षकसुद्धा संध्याकाळ झाली की परत घरी जातात.

शिक्षण मिळाले तर शहरात नोकरी मिळते एवढीच जाणीव असते; पण शिक्षणातून माणूस घडवू शकतो, शेती व तत्संबंधी विषयात कौशल्य मिळविता येते, मनाशी संवाद साधून जीवनाला आवश्यक असणाऱ्या मुलांचा विकास करता येतो. नागरिक म्हणून स्वतःची व समाजाची जबाबदारी ओळखता येते याची अंधुक कल्पना पण मुलांना दिली जात नाही. शिक्षणासाठी मागची भूमिका व सिद्धान्त काय आहे हेच जेथे कधी कळले नाही तेथे व्यसन व भ्रष्टाचाराला आळा तो कसा बसणार. जेथे आपण राहतो त्या गावाबद्दल व आपल्या संस्कृतीबद्दल अस्मिता उत्पन्न झाली नाही त्या शिक्षणाचा उपयोग काय?"

असे एक ना अनेक गोष्टींबद्दल माझे यजमान नेहेमी बोलत असत व दिल्लीला

जाऊन आपले विचार विज्ञान व तंत्रज्ञान डिपार्टमेंटपुढे व योजना मंडळापुढे मांडीत असतात. नुसत्या आहार योजना व आरोग्यसेवा उपलब्ध करून हा प्रश्न कदापि सुटणार नाही असे ते ठासून सांगत असत. ह्या त्यांच्या विचाराला हळूहळू पुष्टी मिळाली व त्यातूनच पुण्यानजिक सात-आठ वर्षांपूर्वी आठ खेडेगावांत त्यांनी शैक्षणिक प्रकल्प सुरू केले. हा त्यांचा प्रकल्प पाहावा म्हणून एक दिवस, प्रथम आम्ही वांगी ह्या खेडेगावात गेलो. आमच्याबरोबर रँग्लर महाजनी व त्यांच्या पत्नी सौ. इंदुताई होत्या.

तेथील सरपंच आम्हाला शाळेत घेऊन गेले. शाळेभोवती उकिरड्याकडे बोट दाखवून रँग्लर महाजनी म्हणाले की, "अशा उकिरड्यात खेळणे चांगले नाही. त्यातूनच जंतुंचा प्रसार होतो व मुले आजारी पडतात." ह्यावर सरपंचांचे व शिक्षकांचे उत्तर तयार होते. "रात्री शेजारचे लोक केरकचरा टाकतात." परिसर स्वच्छ ठेवण्यास उपाय एकच व तो म्हणजे तारेचे कुंपण. पण जिल्हा परिषदेचे अधिकारी कुंपण बांधण्यास लागणारे पैसे देण्यास तयार नव्हते. ज्या खोल्यांत शिकायला विद्यार्थी बसतात ती शाळा, सभोवतालचे आवार शाळेच्या सर्व्हे नंबरात येत असले तरी ते स्वच्छ राखण्यास व कुंपण घालण्यास जिल्हा शिक्षण अधिकारी यांना परवानगी नाही. जे शाळेच्या परिसराबद्दल आढळून आले तेच विहिरीच्या पाण्याबद्दल पण दिसून आले. बादली जरी स्वच्छ घासून विहिरीतून पाणी काढले तरी पाण्यामध्ये कोली फॉर्मचे जंतू खूप आढळतात. ज्या मातीने आपण बादली स्वच्छ करतो तीच माती पाण्याबरोबर विहिरीत जाते हा अनुभव, पण तेच जर आपण विहिरीतले पाणी काही अंतरावर टाकी बांधून त्यात साठविले व क्लोरीन पावडरच्या सहाय्याने जंतुप्रसाराला आळा घातला व विहीर बंद केली की आपोआप जंतुंचा प्रसार कमी होतो. हे बघण्याकरिताही म्हणून आम्ही वांगीहून मारणेवाडीला गेलो, आणि खोरोखरच शाळेचे आवार पाहून एकदम दिसून आले की, उकिरडा तर नाहीच; पण आवारात जिकडे तिकडे झाडे, खेळण्यास भरपूर जागा व त्याच आवारात बालवाडीजवळ खड्डा संडास व स्वच्छतागृह. जो तो मुलगा "सर" माझे झाड बघा म्हणून अभिमानाने दाखवितो, मुले जेवणाच्या आधी हात धुतात. स्वच्छतागृहात जायचे असेल तर शिक्षकांना सांगतात. जो तो धुतलेला शर्ट घालून येतो, भांग पाडून येतो, नखे स्वच्छ आहेत का नाहीत याची काळजी—ह्या गोष्टी त्यांच्या इतक्या अंगवळणी

पडतात की मुलांत जी शिकण्याची जन्मजात क्षमता असते ती त्यांना योग्य परिस्थिती उपलब्ध करून दिली, की त्यांच्या अंगवळणी पडते. मारणेवाडी पाहिल्यावर मुलांची जीवनसरणी किती बदलते याचा एकदम प्रत्यय आला. पण ह्याहीपेक्षा जास्त प्रत्यय येतो तो स्वच्छतागृह वापराबद्दल. सर्व गावभर खड्डा संडास बांधले आहेत व प्रत्येकाने तो वापरावा ह्याबद्दल ती दक्ष असतात. शाळेत येण्यापूर्वी आपल्या घरात व शेजारच्या घरात कोणी आजारी आहे का, ह्याबद्दल ती चौकशी करतात व तसे आढळून आल्यास माहिती पुरवितात. अशा देखरेखीतून पुढचा मार्ग उपलब्ध होतो व आचरणात फरक दिसू लागतो. मुले जणू काही कॉम्प्युटरचंच काम करतात. त्यांचा बुद्ध्यांक काढल्यास ती मुले शहरातल्या मुलांपेक्षा तसूभरही कमी नाहीत असा अनुभव आहे.

खेडे बघून झाल्यावर सरपंचांनी आग्रह करून त्यांच्या ओटीवर आम्हाला नेले. मी घराच्या आत डोकावले. शेणामातीचे घर;पण स्वच्छ दिसत होते. रखमाबाई ओचा पदर बांधून चुलीजवळ काहीतरी करीत होत्या. मी आल्याची चाहूल त्यांना लागली. त्या माझ्याजवळ आल्या व सुनेवर खेकसल्या, "ए लक्ष्मी जरा पाट दे की पाहुण्यांना बसायला." बिचारी सून घाबरत आली व एक गोणपाट जमिनीवर टाकला. मी त्यावर बसले. रखमाबाई सरपंचांची बायको. गावात तिचा तसा दबदबा होता. मी आत बसलेली पाहताच आणखी ४–६ शेजारपाजारच्या बायका तिथेच जवळपास येऊन बसल्या.

रखमाबाईंनी गॅसवर चहा केला. ओटीवरच्या लोकांना दिला व मला एक कप दिला व म्हणाल्या, "बाई तुमचे लई उपकार बघा. आता गावात पण घाण नाय. मुलं शिकल्यात, आजारीपण कमी झालीया, सगळ कसं मस्त जीवन चाललंय बघा."

मी म्हटले, "रखमाबाई, बसा जरा. किती काम करताय." तिला वाटलं बाईंना आता सर्व सांगायची ही संधी बरी आहे. म्हणून तिने आपल्या थोरल्या जावेलाही बोलाविले व त्या दोघी सांगू लागल्या. "आहो बाई, तुमची वेळोवेळी भाषणे की काय म्हणता ती ऐकायला ठीक आहे. पोरं लिहायला वाचायला शिकतात ते बी बराय, पण घरात येऊन जेवायच्या आधी हातपाय धुतात व पाणी वाया जाते, आणि म्हणतात, 'आई स्वच्छता पाहिजे. तू पण जेवायच्या आधी हात धुवत जा. हाताची माती व घाण जेवणात जाते व आजारीपण येते असे आम्हाला मास्तरांनी

शिकवलं, असं सांगतात. आता काय बाई मास्तर शहरातून येणार, त्याला पाण्याची टंचाई कशी कळणार?"आणि म्हणतात, 'आई, तू पण लिहायला वाचायला शिक.' आहो बाई मी शिकेल तर मग माझी कामं कोण करेल?" म्हणून तिने कामाचा पाढा आमच्या समोर वाचला. शिकण्याची इच्छा नाही हे दिसले व त्यावाचून काही अडतही नव्हते. पण पोरांनी शिकायला हवं असं मात्र त्या कबूल करतात. त्या म्हणाल्या, "सकाळी चारला आम्ही बायका उठतो, पाणी विहिरीतून आणतो, जनावरांचा गोठा साफ करतो, त्यांना चारापाणी करायचे, दूध काढायचे सर्व कामे आमचीच. आमचे मालक दुकान चालवतात व शेतीभाती पण करतात. त्यांना दुपारची कांदाभाकर आमच्या सुना नेऊन देतात. सगळा वेळ कामात जातो. आता सरकार सांगतं की, पोरं बी दोन किंवा तीन, जास्त नको." मी मध्येच म्हटलं, "रखमाबाई खरंच तुमच्या घरात बरीच माणसे दिसतात. तुम्हाला पोरं किती हो?' त्या म्हणाल्या, "सहा हायती. दोन मुले दुकानात बसल्यात अन् दोन पुण्यात दुकान चालवतात. दोन पोरी, ही सखू व ही विठा. त्या घरातच काम करत्यात. पण आताच्या दिवसांत बाई तुम्ही म्हणता त्येच 'बेस'हाय"सगळा सरकार बंदोबस्त करत हाय, काय ऑपरेशन, गोळ्या समदं वेगळं बघा. बाकी महागाई काय, बरं पोरं थोडी, आमच्या वेळेला नव्हतं असं."

मी त्यांना परत अडवून म्हटलं, "आता माझं थोडं ऐकता का ? हे बघा आता तुम्हीच सांगा गेली तीन-चार वर्षे आम्ही येतो. तुमचं गाव पूर्वी कसं होतं आणि आता काही सुधारलं असं वाटतं का तुम्हाला ?" तेव्हा रखमाबाई पुन्हा बोलू लागल्या आणि शेजारपाजारच्या बायकाही तेथे सामील झाल्या. मग काय त्या बायकांना जोर आला. कुणी म्हणाल्या, "आमची मुलं अशक्त म्हणून त्यांना कुणीतरी कंपनीकडून बिस्किट, पावडर, दूध, इंजेक्शन, व्हिटॅमिन्स्च्या गोळ्या समदं देत्यात पन गुन न्हाई बघा. हगवण, आमांश, ताप, ब्रॉन्कायटीस, नेहमी आजारपण. पण आता निराळं हाय. इथं विहिरीतलं पाणी स्वच्छ हाय, शाळेतलं अंगण स्वच्छ, खड्डा संडास सर्वत्र वापरतात. खाण्यापूर्वी मुलं हातपाय धुतात, विहिरीतून पाणी आणायला मदत करतात, कपडे धुतात, भांग पाडतात, नखं स्वच्छ ठेवतात—एक ना दोन. मुलं पार बदलली बघा. विज्ञान की काय ते शिकवतात ना. अहो काही काही घरांत तर संडासला बायोगॅस जोडला आहे; त्याचा फायदा म्हणजे संडासाची घाण कुजून त्यातून स्वयंपाकाला गॅस मिळतो.

"आमची मुलं सारखी शाळेविषयी बोलतात व आता तीच आम्हाला शिकवू लागली आहेत. 'आचरणात येतं तेच शिक्षण' ही म्हण त्यांनी खरी करून दाखवली आहे. त्याच्याही पलीकडं आमची मुलं जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'दारू पिणं चांगलं नाही' म्हणून ठासून आपल्या बाबाला सांगतात व आम्हा बायकांना 'हातभट्ट्यांचे लायसेन्स काढून घ्या' म्हणून मोर्चे पण काढा म्हणून सांगतात. व्यसन लई वंगाळ. काहीजण रुद्राक्षांच्या माळा बी घालत्यात व शपथा बी घेतल्यात आणि दारू सोडली म्हणे हो. त्ये जर गेलं तर खरंच आम्ही सुधारणा झाली म्हणून अभिमानाने सर्वांना सांगू." रखमाबाई पुढे म्हणाल्या, "पण हे व्यसन घालविणं तितकं सोपं न्हाय. व्यसनापायी कितीतरी संसार धुळीला मिळाले." सखूकडे बोट दाखवून त्या म्हणाल्या, "आमची सखू बघा त्यातच चिरडली हाय. चांगले पैले खर्चून लग्न केलंया, नोकरी बी व्हती पण व्यसन, व्यसनापायी नोकरी बी गेली. आता भाऊ घरी बसूनशान जेवायला फुकट घालणार व्हय? नशीब बिचारीचं, दुसरं काय? आता आम्ही हाय पन जन्मभर पुरणार काय?"

रखमाबाई पुढे म्हणाल्या, "सखूसारख्या कितीतरी बायकांचा संसार पुरुषांच्या व्यसनापायी धुळीला गेला हाय. आता हे बघा नवरा मारणार, पिणार, जावेला बी मूल नाही म्हणून ती बी छळणार. दागिने काढून घेतल्यात. उपाशी ठेवत्यात व शेवटी घराबाहेर एकटीला हाकलून देत्यात. आता बाई तुम्हीच सांगा पोरीनं काय करायचं?"

मी सखूकडे बघितले. ती रडत होती. मी जवळ गेले, तिच्या पाठीवरून हात फिरवला व म्हटले, "मी तुमच्या मारणेवाडीला नेहमी येते. बघू आपण काही मार्ग सुचला तर."

सायंकाळ झाली म्हणून आम्ही घरी परत आलो. सखूचा विचार सतत माझ्या डोळ्यांसमोर उभा राही. त्या तरुण मुलीची अवस्था पाहून मला वाटे, तिला आपल्या पायावर उभी करणे हे आपले कर्तव्य आहे. नवरा संभाळत नाही. आईवडिलांकडे कायम राहणं बरं नाही. शिवाय तरुण वय, समाज वाकड्या डोळ्यांनी पाहणार. माझ्या मनात तिचे विचार सतत घोळत असत, व एक कल्पना मनाला चाटून गेली.

खेडेगावात जसे माझे यजमान काम करीत, तसेच पुण्यातच एक इंदिरा कम्युनिटी किचन ही संस्था गेले काही वर्षे उदयाला येत आहे. माझ्या मनात

विचार आला, ह्या संस्थेमध्ये तिच्या वयाच्या समदुःखी स्त्रिया आज सुखाने घास खात आहेत व स्वतः स्वावलंबी होत आहेत. सखूला मदत करायलाच पाहिजे. म्हणून मी एकदा मारणेवाडीला गेले असताना रखमाबाईंच्या जवळ सखूबद्दल बोलले, "मी स्वतः किचनमध्ये आहे. तुम्ही तिची काळजी करू नका", असे आश्वासन दिले, आणि त्याप्रमाणे सखू किचनमध्ये कामाला येऊ लागली. सुरुवातीला रखमाबाईंनी तिला तिच्या मावशीकडे ठेवले.

माझे यजमान नेहमी किचनसंबंधी घरी बोलत असतात. त्यांच्या बोलण्यातून मला किचनच्या बारीकसारीक सर्व गोष्टी माहीत आहेत. ह्या किचनमध्ये दररोजच्या जेवणातले पदार्थ तयार करणे व गोरगरिबांच्या खिशाला परवडेल ह्या दराने ना नफा ना तोटा ह्या तत्त्वप्रणालीवर ते विकणे हे इंदिरा कम्युनिटी किचनचे मुख्य उद्दिष्ट आहे. ह्या संस्थेचे कार्य करण्यास काही सल्लागार मंडळी, विश्वस्त मंडळी, तसेच रोजचा व्यवहार पाहण्यास काही मंडळी सातत्याने काम करीत आहेत. गरिबातल्या गरीब बायका जातपात न पाहता कामाला घेतलेल्या आहेत. जेवणात भाकरी, पोळी, भाजी, भात, डाळ रोजच्या रोज तयार करून किचनच्या दहा केन्द्रांतून विकले जातात. बाजारभावापेक्षा यांची किंमत निम्म्याने ठरविलेली आहे. कामाचा उरक मात्र फार आहे. त्यामुळे कामगारांना पुरेसा रोजगार मिळतो, व रोज घरी संध्याकाळी उरलेले अन्न पण नेता येते.

रोजचे पदार्थ निम्म्या किंमतीला मिळाल्यामुळे इतर गरिबांची खूप सोय झाली आहे. जणू काही त्यांच्या रोजगारातूनच २५ ते ३० टक्के वाढ झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणजे हा वाचलेला पैसा त्यांना आता दुसऱ्या गरजेसाठी वापरता येतो, कोणी कपडे विकत घेतात तर कोणी निवाऱ्याची जागा घेतात अथवा मुलांच्या शिक्षणाकरता वापरतात. हा फरक दिसायला ३–४ वर्षे लागली, आणि दिसून आले की ह्या सोयीमुळे दारिद्र्यरेषा ओलांडायला मदत होते म्हणजेच आर्थिक उन्नती पण होते हा अनुभव आला.

प्रथम प्रथम अन्नपदार्थ तयार करण्याचा वेग फारसा नव्हता. तासाला फार तर १५ ते २० भाकऱ्या होत, त्यामुळे ना नफा ना तोटा हे तत्त्व वापरूनही गरिबांना परवडेल त्या दराने विकणे शक्य होईना. यावर उपाय म्हणजे कार्यक्षम व्यवस्थापन आणि उत्पादन वाढविण्यास उत्तेजन म्हणून वेतनात वाढ, त्याचा परिणाम म्हणजे तासाला ६० ते ७० भाकऱ्या पडू लागल्या. काही बायका दिसायला इतक्या लहान

की त्यांचे वजन ३६ किलो, तर काहींचे वजन ५० किलोहून जास्त; पण उत्पादनाचा वेग दोघींचा सारखाच. तसेच एकाच वजनाच्या बायका काही दिवस १५०० हूनही कमी कॅलरीज घेत तर काही दिवस त्याच्या दीडपट खाताना आढळल्या. ह्याचाच अर्थ दोन घास कमी खाल्ले तर उष्मांकांचा विनियोगाची क्षमता वाढलेली दिसली, व जास्त खाल्ले तर त्या प्रमाणात चयापचयनात पण वाढ दिसून आली. आहार योजना यशस्वी होत नाहीत, त्याचे कारणच मुळी हेच आहे. निम्म्याहून अधिक लोक भुके आहोत असे म्हणतो हे विधानच चूक आहे. कम्युनिटी किचनमध्ये झालेल्या प्रयोगांनी हे प्रथम दाखवून दिले. ठराविक काम करीत असताना व वजनात फरक होऊ न देता माणसाच्या दैनंदिन आहारात जो फरक दिसतो त्यातून ही अंतशक्ती माणसाला प्राप्त होते व तिचे रूपांतर आनुवंशिक होते.

आज अडीच रुपयात २ भाकऱ्या अथवा ३ पोळ्या (ताटाच्या आकाराच्या), एक वाटी सुकी भाजी, अथवा उसळ, एक वाटी भात व एक वाटी पातळ भाजी किंवा आमटी येवढे जेवण मिळते. हा आहार माणसाला भरपूर ऊर्जा देतो व गुणवत्तेच्या दृष्टीने पण त्यात कमतरता नाही. नुसती दीड रुपयाची झुणका भाकर घेतल्यास अंदाजे ९०० कॅलरीज मिळतात. असा आहार पोटभर मिळाल्यास प्रथिनांची वगैरे क़सलीच कमतरता आढळून येत नाही. रोगराई व अपूरा आहार ही शरीराच्या नाशाची कारणे आहेत.

पण ही रोगराई बाहेरूनच येते म्हणणे चूक होईल. ती वाढण्याचे कारण आपल्या सवयी आपल्याला नडतात. पान, तंबाखू, विडी, मिशरी, दारू, बाई—एक ना दोन किती सवयी आपण, विशेषतः पुरुष लावून घेतात. मग कॅन्सरसारख्या रोगाने महिनोन्‌महिने आपण खितपत पडतो; तीच गत हृद्रोगाची आहे. आपल्या रक्तवाहिन्या काही एका दिवसात अरूंद होत नाहीत. जसा आहार घ्यावा त्यावर ते अवलंबून आहे. रक्तवाहिन्यांवर जी फूट किंवा थर येतात त्याला विडी, दारू आणि. . .जबाबदार आहेत आणि आजारी पडलो तर मुलं किंवा बायको आपल्याकडे लक्ष देत नाही हे म्हणण्यात काय अर्थ आहे ? आपला आहार, व्यायाम, शिस्त व संस्कृती यावरच आपले स्वास्थ्य अवलंबून आहे व हे सर्व आपल्याच हातात आहे. ह्यातूनच आपण रेंगाळलो तर मोठा आजार होतो हे कळणे फार जरुरीचे आहे. पाश्चात्त्यांच्या मांसाहाराच्या व पेयाच्या कल्पना पुढे

जबाबदारी आहे असे मी संचालकांना सांगितले. तसेच मी स्वतः रोज येऊन त्यांना शिकवायला तयार आहे असेही म्हटले. संचालकांना माझी कल्पना आवडली व आमचा साक्षरतेचा वर्ग सुरू झाला. सुरुवातीला खूप बायका आल्या; परंतु तितकी चिकाटी राहिली नाही. तरी पण १०–१२ बायका मात्र नेटाने येऊ लागल्या. त्यांना हा एक तास कामातून मुद्दाम दिला होता. सखूबाईही माझ्या क्लासला येऊन बसत. तशा त्या हुशार होत्या. लिहायला वाचायला लवकर शिकल्या. त्यांना अक्षरओळख व्हायलाही वेळ लागला. मुख्य म्हणजे ह्या क्लासमध्ये बायका सुरुवातीला अगदी खाली मान घालून बसत. काही विचारले तर तोंडातून शब्द निघत नसे. पण वर्षभरात त्या सर्व मुळाक्षरे शिकून लहान लहान पुस्तके वाचायला लागल्या. सुरुवातीला मी शासनाने लिहिलेली काही पुस्तके आणली व मी ती वाचून त्यांना अर्थ सांगत असे. बरीचशी पुस्तके मी नेहेमीची राहाणी, आरोग्य व रोगराईचे आजार तसेच पंडीत नेहरू, महात्मा गांधी ह्यांची चरित्रे त्यांना आणून दिली. त्यांची लिहिण्यावाचण्यात खूप प्रगती झाली. दररोज मी ३–४ बायकांना वाचायला सांगत असे व त्याचा अर्थ विचारीत असे. आता ह्या बायका खूपच बोलत. क्लासनंतर त्यांना स्वतःची हकीगत सांगावी वाटे. म्हणून क्लासनंतर मी १०–१५ मिनिटे गप्पांकरता ठेवत असे. त्यांच्या गप्पांतून मला त्यांचे वैवाहिक व कौटुंबिक जीवनाची कल्पना आली. जवळ जवळ तीनशे बायका काम करीत होत्या, त्यापैकी एकाही बाईचे वैवाहिक जीवन मला सुखी दिसले नाही. इथे आठ तास कामाच्या गर्दीत त्या घरातल्या समस्या विसरत असत असे त्या सांगत. क्लासनंतरची थोडा वेळ मी ह्या बायकांची हकीगत ऐकायची असे ठरविले. आमच्या शालनबाई लिहिण्या-वाचण्यात हुशार होत्या. त्या सांगत होत्या, त्यांचे लग्न वयाच्या १३–१४ व्या वर्षी वडिलांनी करून दिले. सासरी आल्या व नांदू लागल्या. ५–६ वर्षे अशी गेली. मूलबाळ झाले नाही, नवऱ्याने त्यांना एक दिवस माहेरी पोचविले. पुन्हा सासरी येऊ दिले नाही. बिचाऱ्या आईजवळ राहू लागल्या. कुणाच्या तरी ओळखीने किचनमध्ये आल्या. आता ७–८ वर्षे तिथे आहेत. नवऱ्याने दुसरी बाई ठेवली व तिला त्याच्यापासून दोन मुले झाली. पुन्हा त्या बाईबरोबर भांडण केले व कळले की, शालनबाईला चांगला पगार मिळतो. एक दिवस शालनबाईकडे नवरा आला, माफी मागितली व तू माझ्याबरोबर राहा म्हणू लागला, व म्हणाला, ती बाई सोडून गेली पण मुलं त्याच्या गळ्यात पडली. तेव्हा ती शालनबाईंनी सांभाळायचे कबूल

केले. आता चिक्कीचे दुकान काढले आहे. दारू वगैरेही पीत नाही. शालनलाही आता दोन मुले झाली; पण त्यानंतर तिने ऑपरेशन करून घेतले असे मला म्हणाली. तिच्या जीवनात फरक पडला. आता मजेत आहे असे शालनबाई म्हणाल्या.

लक्ष्मीबाईचा नवरा एका रात्री पळून गेला. तो दारू खूप पीत असे. आता ७-८ वर्षे झाली त्याचा पत्ता नाही. ही आपल्या आईजवळ राहते व किचनमध्ये काम करते. रोज रडत दिवस काढते. काय करणार ? मूलबाळही नाही.

शकुंतलाबाई अतिशय शांत बाई. चार मुली झाल्या पण ऑपरेशनचा विचार नाही. नवरा चांगला आहे असे म्हणतात.

एक दोन बायकांनी नवरे दारू पितात म्हणून त्यांना सोडले. मुलांना घेऊन त्या स्वतंत्र राहातात. प्रत्येक बाईचे प्रश्न वेगळे. वैवाहिक सुख नाही हा त्यातला अर्थ. बायकोला टाकायचे, पण घटस्फोट द्यायचा नाही हे प्रामुख्याने आढळले.

एक दिवस मी असाच क्लास घेत होते. एक पुस्तक "लहान मुलांना वळण कसे लावावे" यासंबंधी होते. त्या लहान मुलांचे आईवर किती प्रेम असते हे त्या गोष्टीत दाखविले होते व ती गोष्ट बायका मनापासून ऐकत होत्या. माझी गोष्ट संपतच आली होती पण मला कोणीतरी मुसमुसून रडत आहे असा भास झाला. गोष्ट संपल्यावर मी इकडे तिकडे पाहिले तर सखूबाई डोळ्याला रुमाल लावून खरंच रडत होत्या. त्यांना गहिवरून आले. मला काहीच कळेना. "सखूबाई, माझं काही चुकलं का?" एवढेच मी म्हटले. तेव्हा त्यांना जास्तच रडू आले. त्या जागेवरून उठल्या व माझ्या पाया पडल्या. मी उठा म्हटले. मी त्यांचे डोळे पुसले. त्या म्हणाल्या, "बाई तुम्ही मारणेवाडीला माझ्या खेडेगावात येत होतात. माझी हकीगत ऐकून तुम्ही मला किचनमध्ये घेतले. बाई नवऱ्याने मला टाकले, पण मुलगा तो घेऊन गेला. मला पोराच्या गोष्टीवरून आठवण झाली आणि रडायला आले. पोर कसं आहे ठाऊक नाही." मी तिची समजूत घातली.

एक दिवस सखूला मी म्हटले, "तुमची हकीगत मला केव्हातरी सांगाल का? तुमची हकीगत मी कुठेतरी लिहून पाठवीन. तुमचे प्रश्न समाजापुढे आणायला हवेत." तिला काय वाटले कुणास ठाऊक, एक दिवस घरी आली व मनमोकळेपणाने सर्व सांगू लागली.

सखूचा जन्म—मारणेवाडी या खेडेगावात झाला आणि तेथेच ती लहानाची मोठी झाली. तिचे आईवडील, एक थोरली बहीण व थोरला भाऊ व सखू सर्वांत

शेंडेफळ. बापाची शेतीभाती व भाऊ लहानपणापासून वडिलांना मदत करीत असे. ते त्या गावाचे सरपंच होते. पुढे भावाचे लग्न झाले. बायको त्याच गावाची. बहिणीचे सासरही तिथेच. बहिणीचा नवरा एस्. टी.त काम करी. त्याला गावाबाहेर कामाला जावे लागे. पण मुक्काम त्याच गावात. अर्थात त्याचे व बहिणीचे वेगळे बिऱ्हाड होते. वडिलांच्या हातून वयोमानाप्रमाणे तितकेसे काम होईना. पण भावाला शेतीची माहिती चांगली होती, व तो तेथे काम आवडीने करे. सखू लहानपणापासून आईला कामात मदत करी. ती सात-आठ वर्षांची असताना तिच्यावर एक गंडांतरच आले होते, तिच्या वयाच्या मुली व ती शेजारच्या घरातल्या अंगणात झिम्मा—लाडू खेळ खेळत होत्या. खेडेगावातील शेणामातीची घरे तशी कच्चीच असतात. मुली खेळण्याच्या नादात खेळ खेळत होत्या, एवढ्यात शेजारच्या घराची एक पडकी भिंत नेमकी तिच्याच अंगावर पडली व खालची जमीन पावसाने भुसभुशीत झाल्यामुळे सखू जमिनीत खोलात पडली व तिच्यावर माती पडून ती त्या खड्ड्यांत गाडली गेली. दुसऱ्या कोणाला काहीही दुखापती झाल्या नाहीत. मुलींनी आरडाओरडा केला व शेजारची मंडळी धावत आली. त्यातल्या एका माणसाने माती बाजूला सारली तेव्हा सखू मातीत गाडलेली त्याला दिसली. दोन माणसांनी तिला खेचून बाहेर काढले. थोडा वेळ ती बेशुद्धावस्थेत होती. शेजारी एक म्हातारे वैद्यराज राहात होते. त्यांना बोलावून आणले. औषधपाणी केले. तिच्या उजव्या हातावर भिंतीचा मोठा भाग पडला होता, व बारीकसारीक लहान मोठ्या बऱ्याच जखमा झाल्या होत्या. तिला वडील नंतर मुंबईला घेऊन गेले. हाताचे हाड थोडे मोडले होते म्हणून सहा आठवडे हात प्लॅस्टरमध्ये ठेवला होता. प्लॅस्टर काढल्यावर हाताला मॉलिश वगैरे करून तसा तो बरा झाला. पण तसा तो थोडा कायमचा अशक्त राहिलेला आहे असे तिच्या बोलण्यावरून कळाले. बाकी तिची तब्येत पूर्ववत चांगली झाली.

अशा काही अडचणी तिच्या आयुष्यात आल्या;: पण आईवडिलांजवळ ती सुखात होती. तशी वयात आल्यावर ती आपल्या भावजयीलाही घरकामात मदत करीत असे. खरे म्हणजे तिचे बालपण लाडातच गेले.

आता हळूहळू ती तारुण्यातच पदार्पण करीत होती व वडिलांना तिचे लग्न करून टाकावे म्हणजे आपली शेवटची जबाबदारी संपली असे साहजिकच वाटे. वडिलांची शेतीव्यतिरिक्त ते त्या गावचे सरपंच होते. त्यामुळे गावात त्यांचा

दरारा व वचक असे. गावकरी लोकांना ते आवडत असत व गावातल्या गुंतागुंतीत ते रमलेले दिसत.

खेडेगावात तरुण मुली वयात आल्या की आईवडिलांना लग्नाची घाई असते. सरपंचही ह्या नियमाला अपवाद कसे असतील? शेजारीपाजारी विचारू लागले, "अहो सरपंच, मुलीला कधी उजविणार?" सरपंचांना गावात सर्व लोक ओळखीत असत. एकदा एक मित्र एका मुलाचे स्थळ घेऊन आला व त्याला जी माहिती होती ती त्याने सरपंचांना दिली. सरपंचांनी दुसरीकडे कुठेही स्थळाची चौकशी केली नाही. मित्रावर विश्वास ठेविला. मुलाने मुलगी पाहिली व लग्न ठरले. लग्न थाटामाटाने त्या खेड्यातच झाले. हुंडा रु. ३५००/– दिला, दोन्हीकडचा खर्च व सर्व व्यवस्थित करून दिले.

सखू लग्न झाल्यावर सासरी पुण्याला आली. तिला सासू, सासरे, लग्न झालेली नणंद, एक मोठा दीर व त्याची बायको एवढी मंडळी एकत्र राहात होती. नणंद तिच्या नवऱ्याजवळ; पण शेजारीच वेगळे बिऱ्हाडात राहात होती.

सखुचे सुरुवातीचे दिवस घरात बरे गेले. तिला लग्नानंतर लगेच दिवस राहिले व मुलगा झाला. तिची मोठी जाऊ तिच्या लग्नाला ३–४ वर्षे झाली; पण तिला मूलबाळ होत नव्हते. तिला सखूचा मत्सर वाटू लागला. नवरा कुठेतरी मजुरी करून चार पैसे मिळवी. त्यामुळे त्याला कायमची नोकरी नव्हती, त्यात मित्रांच्या संगतीने दारूचे व्यसन जडले. तेव्हा दारू पिऊन घरात बायकोला मारहाण होत असे. शिवाय जावेच्या नवऱ्याला नोकरी. त्यामुळे सखुचा ती द्वेष करू लागली व सासुच्याही मनात सखू वाईट आहे असे तिने भरवून दिले. तेव्हा मोठ्या जावेने व सासरच्या मंडळींनी सखू वाईट आहे असे तिच्या नवऱ्याच्या मनात भरविले. मग उपाशी ठेवणे, मारहाण करणे, लुगडी फाटकी नेसायला देणे, कोणत्याही प्रकारे तिला सुख लागू नये असे तिच्या सासरच्यांनी ठरविले. त्यात सखुचे दुर्दैव की नवऱ्याची नोकरी सुटली. तो घरातच लोळत बसला.

अशा परिस्थितीत सखू वैतागली. तिला काय करावे कळेना. एक दिवस जावेने तिचे मंगळसूत्र, बांगड्या, जोडवी काढून घेतली व जा माहेरी असे सांगितले व तिला पुण्यातच मावशी होती तिथे तिच्या घरी पाठविले. मुलगा मात्र जावेने आपल्याजवळ ठेवून घेतला. बाईंच्या सांगण्यावरून ती किचनमध्ये नोकरीला आली.

मावशी एका खोलीत राहात होती. तिलाही नवऱ्याचे सुख नव्हते, पण तिचा काही पुरुषांशी संबंध होता. त्यामुळे सखूला फार दिवस सांभाळणे तिला पसंत नव्हते.

एकदा मावशी सखूला म्हणाली की तिच्या ओळखीत एक वयस्क माणूस होता त्याचे बरोबर लग्न कर. एकदा लग्न करून सुख लाभले नाही, आता लग्न करायचे नाही असे ती म्हणाली. पण मावशीला ते पटले नाही. किचनच्या बायका मध्ये पडल्या व त्यांनी मोडता घातला. सखू संतापली, ती तर जीव द्यायला निघाली. संचालकांनी तिची समजूत घातली व तिचा जीव वाचविला. सखू ऐकत नाही म्हणून रागाने मावशीनेही तिला घराबाहेर काढले. आता घरदार नाही, राहायला जागा नाही, तिचे डोके भणभणू लागले. कामात लक्ष लागेना, वेड्यासारखी वागू लागली. काय करावे तेच तिला कळेना. संचालकांना भेटली. त्यांना दया आली.

किचनमधल्या एका बाईला त्यांनी विनंती केली. तिने तिला ठेवून घेतली. त्या बाईचा नवराही दारू पीत असे, मारहाण करीत असे, म्हणून तिने त्याला सोडून दिले. तिला दोन मुलगे होते. त्यांना घेऊन ती एका खोलीत भाड्याने रहात होती. सखुचे वय लहान, तिला एकटीला राहणे धोक्याचे होते. ती काय करणार, तिला त्या बाईबरोबर राहणे भागच होते. तिला कोणी बायका खोचून बोलतात. तिच्या दुःखावर डागण्या देतात; पण तिला हे सर्व सहन करावे लागते.

माहेरी खेडेगावात आईवडिलांकडे कायम राहणे तिला पसंत नव्हते. शिवाय तिला तेथे नोकरी कोण देणार? अशा जीवनात तिला सुखाचा घास कुठे मिळणार? समाज तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहाणार. तारुण्य वाया जात आहे. नवऱ्याने काडीमोड दिलेला नाही. तो पुण्यातच कुठेतरी राहतो, बाई ठेवली आहे. चार पैसे मिळवितो व दारूत घालवितो. मुलगा ती बाई संभाळते. काडीमोड घेतल्याशिवाय त्याला दुसरे लग्न मान्य नाही. पण अशी माणसे कायदा न जुमानता हुंडा घेऊन पुन्हा लग्न करतात.

सखू किचनमध्ये त्या बाईबरोबर ३–४ वर्षे राहिली; पण त्या बाईची वागणूकही बरी नव्हती. अशा बाईबरोबर राहणे सखूला पसंत नव्हते. आता तशी ती लहानही नव्हती. तिने मनाचा धीर केला व स्वतंत्र खोलीत राहू लागली. परपुरुषाकडे पाहायचे नाही व पुन्हा लग्न करायचे नाही असे तिने ठरवून टाकले.

सखुचा चेहेरा नेहमी हसतमुख असे. तशी ती हुशार आहे. आता पुस्तके वाचण्याचा तिला नाद लागला आहे. थोडे दिवसांपूर्वी किचनमध्ये काही समारंभ होता, म्हणून मी गेले होते. मला म्हणाली, "बाई एक आनंदाची बातमी सांगायची आहे." मी उत्सुकतेने ऐकू लागले. ती म्हणाली, "माझा मुलगा मला नवऱ्याने आणून दिला. तोआता माझ्याजवळ राहतो." मी म्हटले, "अग नवऱ्याचे काय ?" ती म्हणाली, "अजून दारू आहेच, नोकरी नाही, आणि मला संभाळायला तयार नाही. तेव्हा मुलाला घेऊन मी आता राहते.. तो शाळेत जातो. मी त्याची पुस्तके वाचते व नोकरी करते. बाई, लहानपणी आमच्या गावात येऊन आमचं गाव तुम्ही खूप सुधारलं, मुलांना शिक्षण दिलं, पण मला वडिलांनी शिकवलं नाही बघा. उलट लवकर लग्न करून टाकलं. माझ्यासारख्या बायकांच्या जीवनात एवढाच बदल झालाय की, आता आम्ही नोकरी करू शकतो व नवऱ्याच्या जाचातून सुटू शकतो. आम्हा बायकांना रोजगार मिळालेला पुरुषांना आवडतो; पण त्यांच्या व्यसनाला आळा बसत नाही." हातभट्टी खेडेगावात सर्रास चालू असते. ही एक मोठी शोकांतिकाच म्हटली पाहिजे. आशा एवढीच की, आजच्या शिक्षणातून उद्याला पुरुषांत अस्मिता निर्माण होऊन मुल्यांची जरूर कदर वाढेल व आपली जबाबदारी ओळखून तो उत्तम नागरिक बनेल.

# स्त्रीस्वातंत्र्य व कुटुंब संस्था

स्त्रीमुक्ती या विषयावर दोन-तीन वर्षांपूर्वी श्री. ग. वा. बेहेरे यांनी सोबत साप्ताहिकात बरीच वाचा फोडली. आपणही आपले विचार मांडावे असे मला वाटले म्हणून दोन लेख त्यांना पाठविले. त्यात मांडलेले काही मुद्दे भगिनींना आजही उद्‌बोधक वाटतील असे वाटते.

स्त्रियांच्या स्त्रीस्वातंत्र्याच्या (स्त्रीमुक्ती) कल्पना काय आहेत व त्यात काय बदल हवा, याचा विचार करणे जरुरीचे आहे. केवळ शिक्षण आहे म्हणून कर्तव्ये बाजूला सारून त्यांचे उल्लंघन करून मुक्ती मिळेल का ? तेव्हा समाजाचे खरे चित्र काय हे पाहाणे अत्यंत जरुरीचे आहे.

आपण पाहतो पुरुषांच्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना दुय्यमपणाची वागणूक मिळते. हुंड्यासारख्या प्रथेमुळे स्त्रियांची कुचंबणा होते व पैशापायी अविवाहित राहण्याची पाळी येते, व "स्त्री बंधनातून कधीच मुक्त होत नाही" असे सूर हल्ली नेहमी परिसंवादातून व व्याख्यानातून ऐकायला मिळतात. त्या व्याख्यानबाजीचा परिणाम बऱ्याच घरी दिसू लागतो व असंतोषाचे वातावरण निर्माण होते. पूर्वी वस्तुस्थिती कदाचित तशी असू शकेल, पण हल्ली स्त्रिया सुशिक्षित आहेत.

शहरात राहाणाऱ्या स्त्रियांना भरपूर शिक्षणाची संधी मिळते. आज आपण पाहाल तर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया नोकरी करीत आहेत. पदवीधर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मान मिळत आहे.

नवरा व बायकोच्या शिक्षणात जर तफावत नसेल व दोघांनाही आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणे नोकऱ्या मिळालेल्या असतील, तर संध्याकाळी कामावरून आल्यावर एकमेकांच्या भावना ते जाणू शकतील व चहाची देवाणघेवाणही होऊ

शकेल. आता एखादी स्त्री नुसती ग्रॅज्युएट आहे. तिच्या आईवडिलांची श्रीमंती असेल तर आईवडील तिच्यापेक्षा जास्त शिकलेला जावई पसंत करतात व मुलीच्या नावाने पैसे व दागिने घेतात. जरी मुलाकडचे लोक तिच्याइतके श्रीमंत नसले तरी मुलगी हे सर्व पसंत करते. कारण परिस्थितीच्या फरकामुळे तिचा ह्या घरात वरचष्मा राहणार आहे हे ती जाणून असते.

लग्न झाल्यावर नवऱ्याला चांगला पगार असल्याची तिला ऐट असते व माहेरची श्रीमंती असल्यामुळे चांगले कपडे धालावे, सिनेमाला जावे, मुलांना शिकवायला शिकवणी ठेवावी व स्त्रीमुक्तीची व्याख्याने ऐकून ही बंधने नकोत म्हणून एखाद्या शाळेत मास्तरणीची नोकरी धरावी. नवऱ्याच्या व सासू-सासऱ्यांच्या संमतीने मिळालेली ही मुक्ती तिला पुरत नाही. संध्याकाळी नवरा ऑफिसातून आल्यावर त्याला घरात शांती व समाधान पाहिजे असते. बायकोने घरातल्या कामाला थोडा हातभार लावावा, मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे, त्याच्या आईवडिलांना सुख द्यावे असे त्याला वाटत असते; पण कामाच्या वाटणीचे तराजू एका बाजूलाच झुकते व थोडेच दिवसांत कदाचित संसार विस्कळीत होतो. येथे शिक्षण व विचार यांची असमानता दिसते.

स्त्री व पुरुष एकाच समाजातून व एकाच परिस्थितीतून जन्माला आले असतात. हल्लीच्या काळात सुशिक्षित स्त्रिला संसार करायचा असतो; पण नवऱ्याची बंधने नकोत. पुष्कळ वेळा कॉलेजात मुले-मुली एकत्र येतात व लग्नेही जमवितात. आईवडिलांनी काही सल्ला दिल्यास त्यांना तो पटत नाही. शेवटी आईवडिलांच्या संमतीशिवाय ते लग्न करून मोकळे होतात. लग्न झाल्यावर संसार मांडतात, एकाचे पैसे पुरत नाहीत म्हणून दोघेही नोकऱ्या करतात. दोघांचेही वय लहान, जबाबदारीची जाणीव नाही, तेव्हा संसाराचे रूपांतर भांडणात होते व शेवटी आत्महत्या अथवा घटस्फोट ह्यातला प्रकार घडतो. शिक्षणाबरोबर स्त्रिला जो सुसंस्कृतपणा यायला पाहिजे तो येत नाही. ज्या स्त्रिला उच्च शिक्षणाची पदवी मिळाली आहे, तिने शिक्षणाच्या प्रौढीत न राहता त्याबरोबर सुसंस्कृतपणा व तडजोड याची जोड दिल्यास तिला संसारात जास्त सुख लागेल. नवऱ्याला त्याच्या कामात मदत करणे, मुलांना शिक्षणात हातभार लावणे व घरातले वातावरण आनंदी ठेवणे, हे गुण जर जातीने तिने अंगी बाणविले तर नवरा स्वतःहून तिला काही तरी—सोशल वर्क—कर म्हणेल. स्त्री मुक्ती मागून मिळणार

नाही, ती आपल्या आचरणाने मिळविली पाहिजे.

आता हुंड्याची पद्धत ग्रामीण भागात जास्त आहे. पैसा नसला तरी कर्ज काढून हुंडा द्यावा लागतो. मुली १२–१३ वर्षांच्या झाल्या की, त्यांची लग्ने उरकतात. जितक्या जास्त मुली तितका कर्जाचा डोंगर वाढत जातो. ह्या स्त्रिया लग्न होऊन पुष्कळ वेळा शहरात येतात. नवरा दारूपायी बायकोचे हाल करतो. त्या वेळी त्यांना नुसती मुक्ती मिळवा म्हणण्यापेक्षा थोडे साक्षर केले तर निदान त्या आपल्या पायावर उभ्या राहातील. त्यांना स्वातंत्र्याचा अर्थ पटवून दिला पाहिजे।

स्त्रिचे ज्ञान घरात गंजते अशी पुष्कळांची समजूत आहे, पण घरकाम, स्वयंपाक करायलासुद्धा ज्ञान लागते. ती जर ज्ञानी असेल, संसारात प्रत्येक गोष्टीत रुची निर्माण करेल, घरकामाचा मोबदला जर तिने पैशात मागितला तर ते काम मोलकरणीसारखे होईल. उलट काटकसर करून पैसे वाचविले तर तिला प्रेमाचा मोबदला म्हणून म्हणता येईल.

पाश्चिमात्य देशांत पुष्कळ ठिकाणी पुरुष महिन्याच्या पहिल्या तारखेला बायकोला काही ठरावीक रक्कम देतो व घरातल्या खर्चाची विभागणी ते दोघांनी मिळून करतात. पैशाचा हिशोब ठेवण्याचे हे एक साधन आहे. स्त्रिला स्वतंत्रपणे खर्च कसा करावा हेही कळते ह्याचेच रूपांतर आपल्याकडे घरकामाचा मोबदला नवऱ्याजवळून घेण्यात आले आहे.

अमेरिकेसारख्या संपन्न देशात आज–स्त्रीमुक्ती—(Women's Liberty) ही चळवळ कित्येक वर्षे चालू आहे. तेथे काय नाही हा प्रश्नच आहे. पैसा, संपत्ती, स्वतःची घरेदारे, संशोधनाची साधने सर्व काही आहे, पण समाजाची बंधने इंतकी शिथिल आहेत की, संसार हे बंधन नसून एक भातुकलीचा खेळ आहे. ह्या मुक्तीच्या पायी– नवराबायको अगदी स्वैर वृत्तीने वागतात. प्रत्येकाची लग्ने किती होतात व किती मोडतात ह्याची गणतीच नाही. आपल्याकडे तेच वारे येऊ लागले आहे. उथळ पाण्याला खळखळ फार अशी स्त्रियांची स्थिती झाली आहे. अमेरिकेत घटस्फोट, अत्याचार, अविवाहित तरुणींचे गर्भपात यांची संख्या साठ टक्केहून जास्त आहे. ह्या मुक्तीच्या हट्टापायी कित्येक बायका एकट्या पडल्या आहेत. त्यांचे हाल विचारू नका. आपल्याकडे जर एखादी बाई नवऱ्याशी भांडून घटस्फोट घेईल तर तिला एकटे तर राहाता येतच नाही; पण पुन्हा लग्न करणेसुद्धा

कठीण जाते.

पुष्कळ वेळा स्त्रिला दुय्यमपणाची वागणूक तिच्या हेकेखोर स्वभावामुळे मिळते. काही स्त्रिया पदवीधर झाल्यावर जर आईवडिलांनी लग्नाची सूचना दिली तर ती फेटाळून लावतात. पुरुषांप्रमाणे आम्ही नोकरी करून पैसे मिळवू, संसाराची बंधने नकोत. पुढे लग्नाचे वय निघून जाते, कित्येक वेळा आईवडिलांचे छत्र नाहीसे होते, अशा वेळी तिला जोडीदाराची आठवण होते. कारण ती एकटी राहू शकत नाही. नोकरी करूनही कंटाळलेली असते. शेवटी एखादेवेळी तिचा कुणातरी वयस्क माणसाबरोबर विवाह होतो व त्याच्या बंधनात तिला कायमचे राहावे लागते.

तुम्ही म्हणाल, रांधा, वाढा, उष्टी काढा हे परंपरेने चाललेले काम आता स्त्रियांना कसे आवडेल? त्यात मोनोटनी आहे, खरे आहे; पण उलटपक्षी मास्तरणीची, बँकेतील व कारकुनी ह्या नोकऱ्यांत काय आहे, रोज तेच ते पंचवीस-तीस वर्षे करा व घरी आल्यावर त्याचा राग नवऱ्यावर काढा.

आता अर्थार्जनासाठी स्त्रियांना नोकऱ्या करणे भाग आहे. त्याचा अर्थ संसारात कुरकूर का? घरी आल्यावर वडीलधाऱ्या माणसांना थोडे सुख द्यावे, मुलांशी प्रेमाने वागावे व ते तसे काही न करता वडीलमंडळींची मर्जी न सांभाळता उलट त्यांना वृद्धाश्रमात पाठविणे हा कुठला मार्ग? ज्या आईवडिलांनी खस्ता खाल्ल्या त्यांना तुमच्या स्त्रीमुक्तीचे हे फळ की काय? ती मंडळी ज्या आत्मीयतेने घरातली कामे करतात ती कामे पैसे देऊन ठेवलेली मोलकरीण करेल का? उलट तिच्याच मर्जीने तुम्हाला वागावे लागते. सासू बोलली तर अपमान होतो, पण मोलकरीण बोलली तर अपमान गिळावा लागतो.

नवऱ्याची आर्थिक स्थिती चांगली असल्यास स्त्रिने कंटाळवाणी नोकरी धरू नये, याचा अर्थ तिने घरात कोंडून बसावे असा नाही. तिच्या शिक्षणाचा उपयोग तिने तिच्या आवडीच्या क्षेत्रात करावा व विना वेतन केल्यास तिला वेळेचे बंधन राहाणार नाही. घर व संसार दोन्हीही करता येईल.

मी स्वतः एका मतिमंद शाळेत मुलांना शिकवायला जाते. मैत्रिणी म्हणतात त्यात काय आहे? पण खरे म्हणजे त्यात मला तरी आनंद वाटतो. दुर्दैवाने ही मतिमंद मुले, आपण त्यांच्यावर ओरडू शकत नाही. त्यांना आत्मीयतेने, प्रेमाने गोड बोलून आपल्या भावना त्यांच्यात ओताव्या लागतात व सहनशीलता व गोड

बोलणे हे आपण तेथे शिकतो. मुख्य म्हणजे त्यांचे आईवडील ८ तास सुखाने नोकरी करू शकतात. पुण्यात कम्युनिटी किचनमध्ये असलेल्या संस्थेतील स्वयंपाक करणाऱ्या बायकांना मी साक्षर करण्याचा प्रयत्न करीत आहे. संसार संभाळून हे काम करण्याची संधी मला मिळाली ही मी मुक्ती समजते.

माझी एक मैत्रीण आहे. ती मला सनातन म्हणते. ती सदोदित मुक्ती चळवळीत रमलेली असते. स्त्रीसखी, नारीमंच, मोर्चे ह्यात तिचा प्रामुख्याने भाग असतो. पुण्यातल्या मोलकरणींच्या संपामध्ये तिने प्रामुख्याने भाग घेतला होता. लग्न झालेले आहे, नवरा, संसार व मुले सर्व सुस्थितीत आहे. आपल्या कामात अडचण नको म्हणून तिने काहीही केले तरी नवरा बोलत नाही. त्यामुळे गळ्यात मंगळसूत्र घालायचे नाही, कुंकू लावायचे नाही, बांगड्या घालायच्या नाहीत अशी तिची मते.

एक दिवस ती माझ्याबरोबर एका लग्नाला आली. तेथे रिसेप्शनला येणाऱ्या बायकांना हळदीकुंकू, नारळ व पेढे देत होते. हिला फक्त पेढे दिले व मला बाकी सर्व दिले. घरी आल्यावर फरक तिच्या लक्षात आला. मी तिला स्पष्टीकरण केले, "काहीही न घालता तुम्ही लग्नाला गेलात व सवाष्ण बाईचे लेणे जर तुम्हाला दिले नाही तर मग कशाला राग मानायचा." तेव्हा ती उलट म्हणाली, "बायकांच्यात कधीही सुधारणा होणार नाही, त्या नेहमी सनातनीच राहणार." मी काय बोलणार, गप्प बसले.

सांगण्याचा मुद्दा, मुक्तीचा अर्थ जोपर्यंत समजला नाही तोपर्यंत नुसत्या वल्गना काय उपयोगाच्या? संसारात स्त्रिने स्वातंत्र्याच्या कल्पनाच बदलल्या पाहिजेत. आत्मविश्वास व आत्मनिरीक्षण हे गुण अंगी बाणल्यास आपण कुठे चुकतो ते तिला कळेल. नुसत्या मिरवणुकीने हे काम भागणार नाही.

तेव्हा सांगायचा मुद्दा—मागून तुम्हाला स्वतंत्रता मिळणार नाही. सुविचार व सुबुद्धी ठेवून संसार करा. मुक्ती दूर नाही ती तुमच्या हृदयात आहे.

हे विचार वाचल्यावर साहजिकच मनात विचार येतात की, स्त्रीस्वातंत्र्य (स्त्रीमुक्ती) जर पाहिजे असेल, कुटुंबसंस्था शाबूत राहाण्यास स्त्री-पुरुषांचा समान वाटा आहे याचा विचार करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. माझ्या पाहण्यात अशी बरीच बोलकी उदाहरणे आहेत, त्यातली काही जोडपी अमेरिकेत राहाणारी आहेत व काही भारतातील आहेत.

आमच्या ओळखीचे एक महाराष्ट्रीयन डॉक्टर व त्यांची पत्नी मुंबईहून डॉक्टरची पदवी घेऊन आता अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. मेडिकल कॉलेजात असताना दोघांची ओळख झाली व त्याचे लग्नात रूपांतर झाले. अमेरिकेत गेल्यावर नवऱ्याने लहान मुलांचे तज्ज्ञ (Specialist) म्हणून उच्च पदवी घेतली व बायकोने (Pathology) मध्ये डिग्री घेतली. अमेरिकेतले धावपळीचे जीवन सुरू झाले. सकाळी आठ ते साडेपाचपर्यंत दोघे कामावर जात. बाई घरी आल्यावर स्वयंपाक व घरकामाला लागत. यजमान घरकामाला मुळीच हात लावीत नसत. ते घरी आल्यावर आरामात टी.व्ही. बघत अगर वर्तमानपत्रे वाचीत.

असे बरेच महिने चालले होते. कधी कधी तिला नवऱ्याचा राग येई. "अरे अनिल, जरा मदत करायला ये की. मी सुद्धा तुझ्यांसारखीच नोकरी करते!" हा गृहस्थ काहीही बोलत नसे व करीत नसे. ह्या ठिकाणी दोघांच्याही समान पदव्या आहेत. ही मुलगी जर स्त्रीमुक्तीकरता भांडत बसली असती तर त्याचा विपर्यास झाला असता व त्यातून निष्पन्न काहीच झाले नसते, हे सर्व ती जाणून होती. नवऱ्याला बायकोचा स्वभाव माहीत होता. लग्नानंतर दोन वर्षांनी मुलगा झाला. आता मूल जरी घरात असले तरी करिअर सोडायची तिची इच्छा नव्हती. ती महत्त्वाकांक्षी होती; पण हटवादी नव्हती. तिने मुलाला आईकडे पाठवून दिले. आपल्या मुलीची शिकण्याची हौस पाहून आईने मुलाला दोन-तीन वर्षे सांभाळले. सासूने मुलाची जबाबदारी घेतली म्हणून जावई खूष होते.

मुलगा मोठा झाल्यावर मुलीने व जावयाने मुलाला आपल्याकडे आणले. नोकरी सांभाळून मुलाला घरी आल्यावर कोण सांभाळणार म्हणून त्याला Baby Sitting कडे व्यवस्था केली व दोघांची कामे सुरूच होती. आपल्या बायकोला बरेच काम पडते हे नवऱ्याच्या लक्षात आले होते, पण त्याला ते कृतीत जमत नव्हते. हळूहळू तो बायकोच्या स्वयंपाकघरात लक्ष घालू लागला. त्याने कुठलेही काम केले तरी बायको न चिडता त्याला उत्तेजन देई. सुरुवातीला तो टेबल लावी व हळूहळू तो भांडी व प्लेटी मशिनमध्ये टाकू लागला, उरलेले अन्न फ्रीजमध्ये ठेवी, कोणी मित्रमंडळी आली तर तो स्वतः होऊन आनंदाने चहा करी. तिच्या उत्तेजनामुळे तो बरीच कामे, बागेतले काम, केरवारा, धुवायला कपडे मशिनमध्ये टाकणे व बाजारहाट अशी सर्व कामे करू लागला. शेवटी घरातल्या कामाची

वाटणी करावी लागली. त्याला बायकोची हुशारी कळली; पण ती कळायला वेळ लागला. ती शिक्षणामुळे विचारशील होती, तेव्हा मनाचा संयम तिने आततायीपणाने सोडला नाही. आता तिला संशोधन करण्याकरता म्हणून असिस्टंट प्रोफेसर नेमले आहे. त्याचेही लहान मुलांच्या किडनीवर संशोधन सुरू आहे. त्यामुळे दोघांच्याही नोकऱ्या समान दर्जाच्या आहेत. कधी कधी तिला मीटिंगकरता बाहेरगावी जावे लागते. नवरा व्यवस्थित घर सांभाळतो, मुलाचे करतो व अजूनही स्वयंपाक तितकासा जमत नाही म्हणून ती गावाला जाताना स्वयंपाकाचे पदार्थ शिजवून फ्रीजमध्ये ठेवते. नवऱ्याला चहा, ऑम्लेट, टोस्ट, सूप व भात इतकेच जमते. दोघांनी एकमेकांच्या अडचणी समजून घेतल्या, आता संसार सुखाचा चालला आहे. अनिल यांच्या विधानाप्रमाणे स्त्रिया सुशिक्षित झाल्या, बहुश्रुत झाल्या, पुरुषांच्या बरोबर समान पदव्या घेतल्या, तरी संसारात पडल्यावर गुंतागुंतीचे प्रश्न उद्‌भवणारच. त्याला सामना द्यायचा असेल तर एकमेकांची मने व भावना ओळखल्या पाहिजेत. वादावादीने व अट्टाहासाने हे प्रश्न सुटणार नाहीत. तेव्हा संसारात पडताना स्त्रीने पूर्ण विचार करावा म्हणजे पश्चात्तापाची पाळी येणार नाही.

आणखी एक तिकडचेच उदाहरण देते. ही मुलगी महाराष्ट्रीयन आहे. ती बी. कॉम. झालेली असून तिला पुण्याला बँकेत नोकरी होती. टेल्कोमध्ये काम करणाऱ्या एका मद्रासी मुलाबरोबर तिची मैत्री जमली. मुलीचे आईवडील पुण्यालाच असतात, त्यामुळे आपले लग्न जमविल्याचे तिने आईवडिलांना सांगितले. मुलगा व नोकरी चांगली म्हणून त्यांनी लग्नाला संमती दिली. मुलाच्या आईवडिलांना ते तितकेसे पसंत नव्हते, पण मुलाला दुखविण्याची त्यांची इच्छा नव्हती. मुलाच्या आईवडिलांच्या संमतीने लग्न जुन्या पद्धतीने साजरे झाले.

लग्नाला दोन–चार महिने झाल्यावर मुलाने अमेरिकेला शिकागो युनिव्हर्सिटीत जायचे ठरविले. तेथे तो इंजिनीअरिंगला पीएच्.डी. करणार होता. दोघे अमेरिकेला आले. एकाच्या नोकरीवर संसार करणे अमेरिकेत शक्य नसल्याने तिलाही नोकरी करणे भाग पडले. आता तिने फुलटाईम नोकरी घेतली, सकाळी आठ ते साडेपाचपर्यंत. त्याला युनिव्हर्सिटी जवळ होती, त्यामुळे तो बऱ्याच वेळा घरी बसून अभ्यास करीत असे. तेथे कामाला नोकर नाहीत व दोघांनाही घरकामाची सवय नाही, पण काय करणार? थोडीफार कामे वाटून घेतली व

आता दोन वर्षे झाली, नवरा बरीच कामे करायला शिकला. बायकोला घरी यायला उशीर झाला असला तर ती त्याला फोन करी, हा भात, भाजी, व पीठ भिजवून ठेवी. त्याला पोळ्या जमत नाहीत. ती घरी आल्यावर दोघे मिळून करीत असत. आता पाहा, ती सर्व तऱ्हेने मुक्त आहे. तिने आरडाओरडा करून मुक्ती मागितली नाही, पण युक्तीने मिळविली यात तिचे कसब आहे. इतका सुरळीत संसार असेल यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. मी स्वतः त्यांचा संसार पाहिला आहे. सुरुवातीला थोडे खटके उडत, पण शेवटी दोघांनाही कळले की आपण एकमेकांवर अवलंबून आहोत.

स्त्री मिळवती असो वा नसो, घरात येणारा पैसा हा दोघांचा आहे. मिळवती असेल तर त्यात दोघांचा समान मोबदला आहे, श्रमाचे मूल्य समान आहे. मला दोघांच्या सुखी संसाराचे कौतुक वाटले.

आता स्त्रीमुक्तीचे उदाहरण सांगते. मागच्या महिन्यात मी अमेरिकेला गेले होते. आमचे एक यु.पी.मध्ये राहाणारे मित्र गणिताचे प्रोफेसर आहेत. ते, त्यांची बायको व तीन मुले गेली वीस–पंचवीस वर्षे अमेरिकेतच राहात आहेत. मोठ्या दोन मुलांची लग्ने भारतातील मुलींशी झालेली आहेत. धाकट्याच्या लग्नाचा विचार होता. हा मुलगा अत्यंत हुशार आहे. त्याला अमेरिकेतील बर्कले विश्वविद्यालयात असिस्टंट प्रोफेसर म्हणून वयाच्या २९ व्या वर्षी उत्तम नोकरी मिळाली. आपल्याला शिकलेली मुलगी व भारतीय मिळावी अशी त्याची इच्छा होती. त्याचा विषय Economics होता. कर्मधर्मसंयोगाने एका भारतीय मुलीशी त्याची ओळख झाली. तीही पीएच्.डी. करण्याकरता नुकतीच तेथे गेली होती. तिची त्याची ओळख झाली आणि प्रथमदर्शनी प्रेमामध्ये रूपांतर होऊन थोडेच दिवसांत तो चतुर्भुज झाला.

लहानपणापासून भारतात वाढलेली, आईवडिलांचे भारतीय संस्कार असलेली पण भारतात स्त्रीमुक्तीची भाषा बोलणारी असे तिचे व्यक्तिमत्त्व होते. अमेरिकेत एका वर्षाच्या अवधीत ती संपूर्ण अमेरिकन बनली होती. लग्न झाल्यावर तिने मुक्तीची भाषा सुरू केली. स्वतःच्या शिक्षणाची तिला एवढी ऐट की, नवऱ्याशी पटवून घेणे ही कल्पनाच तिला सहन झाली नाही. इतकेच नव्हे तर नवऱ्याची हुशारीही तिला कळली नाही. तिचे म्हणणे, "मीच का स्वयंपाक व भांडी करावी?" प्रत्येक गोष्टीत ती त्याची बरोबरी करू लागली. तो अमेरिकेत वाढल्यामुळे

त्यालाही घरकामाची सवय होती व तो तडजोडीने काम करायला तयार होता; पण तिच्या कोशात तडजोड व भावना हे शब्दच नव्हते, त्यामुळे संसारात सारखे खटके उडू लागले. संसाराची घडी बसण्याऐवजी विस्कटतच चालली. त्यांच्या संसारात सारखा व्यत्यय येऊ लागला, मनःस्वास्थ्य हरपले. मला आता मूल नको तेव्हा स्वतंत्र खोलीत झोपा, येथपर्यंत तिची मजल पोचली. दोन-तीन महिन्यांत घरात चुरशीचे सामने सुरू झाले. त्याच्यातील पुरुष जागा झाला. त्याने सरळ सांगितले, "तुझे हे घरात आदळआपट व भांडणे मला पसंत नाहीत." ती म्हणाली, "मला तुमची बंधने नकोत." शेवटी संतापून दोघांनी घटस्फोट घ्यायचा ठरविले. चार-पाच महिनेच झाले होते तेवढ्यात हे महाभारत घडले. तिने तेवढ्या अवधीत त्याचे बरेचसे पैसे आपल्या नावावर करून घेतले होते. दागिने कबजात घेतले होते. तिने वकील दिला, त्याची फी द्यायची ठरली, शिवाय California च्या नियमानुसार आणखी चार-पाच महिने वाट पाहावी लागली. आता केस चालू आहे. सर्व गोष्टींचा निकाल लागेपर्यंत एक वर्ष तरी लागेल असा अंदाज आहे. त्याचे वडील आम्हाला भेटले, ते म्हणाले, "आमच्या कमाईचा पैसा तिला विनासायास मिळाला." इतक्या थराला गेलेली मुलगी ही मला पहिलीच भेटली. स्त्रीमुक्तीच्या पायी बायका कोणत्या थराला गेल्या आहेत हे ज्वलंत उदाहरण माझ्या डोळ्यापुढे आहे. म्हणतात त्याप्रमाणे स्त्रिने उच्च शिक्षणानंतर काय करायचे याचा पूर्ण विचार करावा. मुक्तीच्या पायी दुसऱ्याचा संसार तरी उध्वस्त करू नये.

आता भारतातले एक उदाहरण डोळ्यासमोर आहे. या ठिकाणी दोघांचेही शिक्षण बेताचेच आहे. नवरा इंटरपर्यंत शिकलेला आहे व त्याला बँकेत नोकरी आहे. त्याची फॅमिली मोठी आहे. पाच-सहा भाऊ-बहिणी, आई-वडील वगैरे आहेत. त्याच्या रूपरंगाच्या कुठल्याच अटी नव्हत्या. फक्त मोठ्या घरात समंजसपणे राहाणारी व सामावून घेणारी मुलगी त्याला पाहिजे होती. त्याप्रमाणे त्याने वधू पसंत केली. घराणे सुशिक्षित व सुसंस्कृत पाहिले. मुलीलाही कॉलेजातली डिग्री नव्हती. पण लहानपणी ती कॉनव्हेंटमध्ये शिकल्यामुळे तिचे इंग्लिश बोलणे सफाईचे होते. नवरा लग्नाच्या आधी मित्राबरोबर खोली घेऊन राहात होता. त्याला घरातले काम, बाजार व स्वयंपाक याची आवड होती.

लग्न झाल्यावर एक लहानसे तीन खोल्यांचे अपार्टमेंट घेतले. मुलगी वर्णाने काळी, शिक्षण बेताचे व उंची जास्त यामुळे लग्न जमायला बराच उशीर लागला.

त्या दृष्टिकोनातून मुलीने विचार केला की, सुज्ञतेने व नवऱ्याला सांभाळूनच संसार करावा. नवऱ्याचे सर्व नातेवाईक नेहमी येत, त्यांचे आगतस्वागत ती प्रेमाने करी. नवऱ्याला तशी घरकामाची आवड असल्यामुळे तोही हिला हरप्रसंगी मदत करीत असे. तिला लहान मुलांना शिकवण्याची आवड होती. ती संध्याकाळी १–२ शिकवण्या करीत असे. तिला दोन मुले झाली. त्यांचा सांभाळ व घरकाम हाच तिचा व्यवसाय झाला.

अशी ५–६ वर्षे निघून गेली. प्रपंच वाढू लागला, वाढत्या महागाईला तोंड देणे कठीण झाले. तिच्या मनात विचार आला, आता मुले जाणती आहेत, कुठे नोकरी मिळाली तर पाहावी. एक दिवस तिच्या मैत्रिणीने तिला बातमी दिली की, कॉन्व्हेंट शाळेत शिक्षिका पाहिजे आहे. ती मैत्रिणीबरोबर गेली व नशिबाने तिला नोकरी मिळाली. नवऱ्यानेही तिला संमती दिली. तिची शाळा ७ ते १२–३० पर्यंतच असते. सकाळी जाण्यापूर्वी ती स्वयंपाक करून ठेवते. मुले डबा घेऊन १०–३० वाजता जातात व नवराही तेव्हाच जातो. सबंध टाईम टेबल व्यवस्थित चालले आहे. एकदा तिने संध्याकाळी जेवायला बोलाविले. मी संध्याकाळी ७ ला गेले. बाई दुपारी घरीच होत्या. २–३ दिवस त्यांची पाठ दुखत होती म्हणून ४ वाजता त्या डॉक्टरकडे गेल्या, यायला उशीर झाला. त्यामुळे स्वयंपाक व बाजार करायला वेळ झाला नाही. नवऱ्याची वाट पाहात बसल्या, नवरा ६ वाजता घरी आला तेव्हा बायको म्हणाली, "आज इंदूताईंना बोलाविले आणि काही करायला वेळच मिळाला नाही." नवरा थोडा चिडला, कारण तो दमून आला होता; पण माझ्यापुढे तमाशा नको म्हणून म्हणाला, "चला मीराबाई, बसा स्कूटरवर", आणि मला टी.व्ही. पाहात ठेऊन दोघे बाहेर गेले.

येताना खीमा, बन व गाजरे एवढे घेऊन ते घरी आले. आल्याबरोबर लगेच स्वयंपाक घरात जाऊन त्याने खीमा केला. कोशिंबीर व गरम बन्स असा बेत केला. आम्ही अर्ध्या तासातच जेवायला बसलो. सुटसुटीत व चविष्ट स्वयंपाक झाला. मी त्यांची स्तुती केली, मी तिला म्हटले, "असा नवरा मिळायला भाग्य लागतं." घरी आल्यावर त्याला दुसरे काहीच काम नसे; पण पुष्कळसे पुरुष काम नसले तर घरकाम करीत नाहीत, तो आमचा विषय नाही म्हणतात. घरात बायकोला मदत करणारे पुरुष कमीच आहेत; पण आहेत यात शंका नाही. अनील यांच्या म्हणण्याप्रमाणे येथे दोघेही शिक्षणात कमी असून त्यांनी एकमेकांच्या

भावना ओळखल्या आहेत व तडजोड करून संसार चालला आहे. सुखी संसाराचे गमक त्यांना कळले आहे, तसेच लग्न करताना आपल्याला योग्यतेनुसार जोडीदार निवडावा हेही त्यांनी सिद्ध केले आहे.

हल्ली पुष्कळशा स्त्रिया उच्च शिक्षण घेऊन पदवीधर होतात. आता शिक्षणाची सर्व दालने स्त्रियांना खुली आहेत. इंजिनीअर्स, डॉक्टर, आय.ए.एस., संगीत, राजकारण, एम.बी.ए., सी.ए. अशा मोठमोठ्या क्षेत्रांत आमच्या स्त्रियांनी नाव कमविले आहे व त्यांनी करिअर हे आपले ध्येय ठेवले आहे. त्या मुक्तीकरता कुणाशीही भांडत नाहीत, पण आज त्या सदैव मुक्त मनाने राहात आहेत. अशा स्त्रिया बोटाने मोजण्याएवढ्या आहेत.

उलटपक्षी ग्रॅज्युएट होणे ह्यात काहीच विशेष नाही. ते मिनिमम क्वॉलिफिकेशन असते, कारण लग्नानंतर व आधी त्या नोकरी करू शकतात. अशा या ग्रॅज्युएट झालेल्या बायका स्त्रीमुक्तीच्या चळवळीत पडलेल्या दिसतात. ह्या बायका खेडेगावात जातात व तिथल्या बायकांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करतात. त्यात काही वाईट नाही; पण त्यांना शिक्षण देतात, त्यांना देवळात जाऊ नका, हळदीकुंकू करू नका, हातात बांगड्या घालू नका, मंगळसूत्र व कुंकू ह्यात काही अर्थ नाही अशा तऱ्हेचा उपदेश करून त्यांच्यात सुधारणा होणार आहे का ? त्यांना स्त्रीमुक्तीचे धडे देणार. तेव्हा अलंकाराचा व स्त्रीमुक्तीचा काय संबंध आहे ? ह्या सुशिक्षित बायका खेडेगावात राहू शकत नाहीत. त्यांना संरक्षण पाहिजे.

सध्या सोने घालणे धोक्याचे म्हणून घालू नका हे सांगणे बरोबर आहे, पण कुंकू आणि काचेच्या बांगड्या यात वाईट काहीच नाही. अंधश्रद्धा दूर करण्याचा हा उपाय नव्हे. त्यांना पटणाऱ्या गोष्टी सांगूनच सुधारणा होईल.

शिक्षणाच्या जोरावर स्त्रिने रात्री स्कूटरवरून एकटे जाणे धोका आहे हे माहीत असतानासुद्धा मुद्दाम जायचे व चुकून बलात्कार झाला तर आपल्याला अपघात नाही का होत हे समजून घेण्यात काय अर्थ आहे? मला तर त्यात मोठेपणा वाटत नाही.

शिकलेल्या बायकांचे ज्ञान घरात कुजावे असे माझे मुळीच म्हणणे नाही. ज्या गोष्टी आपल्याला जमत नाहीत त्यात नवऱ्याची बरोबरी करून आपला पाणउतारा करून घेऊ नका. परमेश्वराने स्त्री व पुरुष हे वेगवेगळे घटक म्हणून

जन्माला घातले. शिक्षणाने स्त्रिया बहुश्रुत झाल्या तरी पुरुषांच्या बरोबरीने त्या सर्व बाबतींत कामे करू शकणार नाहीत. समाजकार्य जरूर करावे, पण त्यात भरीवता पाहिजे, नुसता डामडौल उपयोगी नाही. थोडेच काम करावे, पण त्याने समाजाला सुखी करण्याचा प्रयत्न करावा.

माझ्या आयुष्यातली ३० वर्षे मी भारताबाहेर घालविली आहेत. अमेरिकेसारख्या व इतरही संपन्न देशांत मुलांना सेक्स विषय वयाच्या १० ते १२ या वयात शिकवितात. त्यामुळे ह्या विषयाची उत्सुकता वयाप्रमाणे वाढत जाते. ह्या वयात जर एखादा मुलगा व मुलगी एकत्र आले नाहीत तर ते सरळ मुलांना विचारतात, "समथिंग इज रॉंग विथ यू?" त्यांना संतती नियमनाची साधने सर्व माहीत असतात. शिवाय ती कोठेही मिळतात. आईवडिलांचा ताबा तेव्हापासून मुलांवर नसतो. जवळ जवळ ६० टक्के मुले स्त्रिला कौमार्यावस्थेत झालेली असतात. मूल झाल्यावर नको असल्यास संस्था त्यांचे पालन करतात. समाजात स्त्रियांना कुठलीच बंधने नाहीत. त्या सदैव मुक्त असतात. विवाहसंस्थेला त्यांच्या समाजात कुठलाच विशेष अर्थ नाही.

माझा सांगण्याचा मुद्दा असा आहे की, आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये विवाहसंस्थेला फार अर्थ आहे आणि त्यांच्याप्रमाणे जर मुक्तीच्या मागे लागलो तर कुटुंबसंस्थाच मोडकळीला येईल. त्यांच्याप्रमाणे लग्नाला अर्थ राहाणार नाही व पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे आपण अधांतरी राहू!

अमेरिकेत अशा विस्कळीत कुटुंबसंस्थेमुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. लग्न किती व घटस्फोट किती ह्याचा हिशोबच ठेवता येणार नाही.

पुष्कळ ठिकाणी स्त्रिया एकट्या राहातात; पण तरीसुद्धा त्यांना भीती आहे. सरळ घरात शिरून पुरुष अत्याचार करतात अशी पुष्कळ उदाहरणे आहेत. शिकागोला मी पाहिले आहे, संध्याकाळी एकटे फिरण्याची सोय नाही. तरुण मुली पर्समध्ये शिट्टी ठेवतात. कोणी ज़वळ आले की ती वाजवितात व माणसे गोळा होतात. स्त्रिला नेहमीच स्वतंत्र राहाण्याची सवय नडते. म्हातारपणी तर काहीच आसरा नाही तेव्हा वृद्धाश्रम आहेतच.

आता जपान देशही सुधारणेच्या आघाडीवर आहे. तिथल्या बायकासुद्धा घर, सांसार, नवरा सांभाळून असतात. नुसते स्त्रीमुक्तीच्या मागे लागून त्यांचे नुकसान होते हे त्यांना कळले आहे. सोशल पार्ट्यांमधून तर जपानी स्त्रियांना

बोलावत नाहीत. प्रोटेक्शनशिवाय स्त्रिला मुक्तपणे राहणे वाटते तितके सोपे नाही, याचा अर्थ स्त्रियांनी घाबरून राहावे असा नाही. हल्ली स्त्रिया मर्दानी खेळ, जयुडो वगैरेत खूप पुढाकार घेतात, पण पुरुषाची एक पुरुषवृत्ती की त्याला पैसा व स्त्री यांचा मोह आवरणे कठीण जाते. त्या मोहापायी तो स्त्रियांना घाबरवितो; पण आता ज्युडो कराटे हे खेळ स्त्रिया शिकू लागल्या आहेत. त्यामुळे आता त्या कदाचित स्वतःचे संरक्षण करू शकतील.

तेव्हा लग्न करायचे असांयास एकट्या नवऱ्याला सांभाळण्याची सहनशीलता जर स्त्रीत असेल तर ती नक्की सुखी होईल.

इटली, लंडन, थायलंड, फिलिपीन वगैरे सर्व देशांत हिंडून मी स्त्रियांचे नमुने पाहिले. जर स्त्रिया लग्न झाल्यावर मुक्तीच्याच मागे असतील तर त्यांचे संसार सुखी नाहीत हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. आयुष्य शेवटपर्यंत सुखात जावे अशी इच्छा असल्यास कुटुंबसंस्थेत राहूनच सुख लागेल व स्त्रीमुक्ती आपोआप मिळेल. परदेशात मुक्तीच्या पायी कुटुंबसंस्था मोडली, स्वतःच्या घरात तिला संध्याकाळी कैद्याप्रमाणे बसावे लागते हे मी पाहिले आहे.

कित्येक वेळा म्हाताऱ्या बायका नवऱ्याशी न पटल्यामुळे स्वतंत्र राहतात. त्या घटस्फोट घेत नाहीत, पण सेप्रेशन घेतात. नवऱ्याकडून पैसे मिळतात.

अमेरिकेला एका कुटुंबाकडे गेले होते. त्या दोघांचे दोन वेळा घटस्फोट होऊन आता ते तिसऱ्यांदा लग्नाच्या बंधनात पडले होते. त्यांनी मला विचारले, "हाऊ बिग इज युवर फॅमिली ?" मी म्हटले, "आम्हाला चार मुले आहेत." तेव्हा त्यांना कळले की, आमच्या लग्नाला बरीच वर्षे झालेली आहेत. तिने आश्चर्याने विचारले, "तुम्ही इतकी वर्षे एकत्र कसे राहिलात ? तुम्ही कंटाळला नाही ?" तेव्हा मी तिला म्हटले, "आमच्या भारतीय संस्कृतीमध्ये कुटुंबसंस्था टिकविणे ह्यात आम्ही मोठेपणा समजतो."

नंतर मलाही तिला काही प्रश्न विचारण्याची उत्सुकता होती. मी तिला म्हटले, "तुम्ही दोघे लग्नात सुखी झाला नाहीत, मग आता म्हातारपणी लग्नाच्या बंधनात का पडलात ?" एकमेकांना समजून राहायला पाहिजे हे आता आम्हाला कळले.

वृद्धाश्रमात हटवादीपणा करून घरच्या माणसांना सोडून राहतात; पण तेथेही एकटेपण भासते. मग तिथेही लग्ने जमवितात. आयुष्याच्या शेवटी ज्या वेळी मीपणा जातो त्या वेळी तडजोड व भावना याची आठवण येते.

सुधारलेल्या देशात जाऊन आपल्या स्त्रियांनी जरूर उच्च शिक्षण घ्यावे; पण स्त्रीमुक्तीच्या पायी संसाराची धुळधाण, आत्महत्या, सासूशी भांडण, नवऱ्याशी भांडण असे करू नये व नवऱ्याला व समाजाला गोत्यात पाडू नये.

कोर्टसुद्धा स्त्रीमुक्तीच्या बायकांना न्याय द्यायला घाबरते. तेव्हा पटत नसेल तर नवऱ्याला घटस्फोटाची संमती द्यावी, त्याचे तारुण्य व पैसा वाया घालवू नये. त्याला ताटकळत ठेऊन मुक्ती मिळणार नाही.

* * *

## पाहुणा

पाहुणा म्हणजे गृहिणीपुढील एक मोठे प्रश्नचिन्ह. घरातील पुरुष मंडळी कामानिमित्त बाहेर आणि पाहुण्यांची सरबराई करण्याची जबाबदारी मात्र घरच्या मालकिणीवर. काही वेळा नको तो पाहुणा असे म्हणण्याची पाळी येते; पण माझ्या सुदैवाने मोठ्या अभिमानाने नावे उच्चारावीत अशा थोरामोठ्यांचा पाहुणचार करण्याचीही संधी मला मिळाली आणि असे पाहुणे घरी येणे म्हणजे आनंदपर्वणीच.

आम्ही दिल्लीला होतो तेव्हा आमचे एकत्र कुटुंब. घरात सर्व सासरची मंडळी व एवढी महागाई नव्हती, त्यामुळे दोन नोकर सबंध दिवस घरातली कामे करीत. त्या वेळी पाहुणा नाही असा क्वचितच आठवडा जात असे. एवढ्या मंडळीत एक-दोन पाहुणे सहज सामाविणे कठीण नव्हते.

त्यानंतर १९५१ साली आम्हाला रोमला नोकरी मिळाली. आता एवढ्या लांब आल्यावर भारतासारखे वारंवार पाहुणे येणार नाहीत असे मला वाटे आणि त्याप्रमाणे २–३ वर्षे पाहुण्याविना गेली. आता आम्हीही तिथल्या वातावरणात हळूहळू रुळू लागलो होतो. पाहुणे आले नाहीत याचीसुद्धा खंत वाटली नाही.

एक दिवस माझे यजमान ऑफिसमधून येताना एक पत्र घेऊन आले. स्त्री व किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. नुकुंदराव किर्लोस्कर यांचे ते पत्र होते. ते काही तरी मीटिंग करता येणार होते. परदेशात येणाऱ्या पाहुण्याचा हा पहिला पाहुणचार, त्यात महाराष्ट्रीयन पाहुणा म्हणून मला विशेष आनंद. मराठी बोलणारे तेथे फक्त आम्हीच, त्यात हे मासिकाचे संपादक म्हणजे विशेष काहीतरी ऐकायला मिळेल ही अपेक्षा.

ठरल्याप्रमाणे आम्ही मुकुंदरावांना घरी घेऊन आलो. त्या दिवशी मी भारतीय

व इटालियन असा मिक्स स्वयंपाक केला होता. ते आनंदाने व रुचीने जेवले. दुसरे दिवशी मी त्यांना गाडीतून बाहेर नेले. ईस्टरचा सण लगेच होता म्हणून मी त्यांना त्या सणाची माहिती व पोपचे चर्च, त्यांच्या धर्मगुरूची शिकवण वगैरे माहिती थोडक्यात दिली. ते भाग्यवान आहेत असे ते मला म्हणाले.

दुसरे दिवशी ते लवकर उठले, न्याहरी केली व प्रवासाला साजेसा पोशाख केला. खांद्यावर दोन कॅमेरे लटकाविले व मी सांगितल्याप्रमाणे बसने गेले. त्यांना तो समारंभ खूप आवडला. तीन-चार तासांनंतर घरी परतले. त्या दिवशी संपूर्ण इटालियन पद्धतीचा मी स्वयंपाक केला. टोमॅटो सूप, ताजी ब्रेड, चीज, सॅलेड व स्पगेटी व शेवटी केक. त्यांना जेवण आवडले.

पुण्याच्या व इतरही भारतातल्या गप्पा बऱ्याच दिवसांनी ऐकायला मिळाल्या. माझाही स्वभाव बोलका, त्यामुळे गप्पांना रंग चढत होता. खरे म्हणजे मुकुंदरावांचा व माझा पूर्व परिचय काहीच नव्हता. साहित्यिक ह्या नात्याने त्यांची वाणी गोड व दुसऱ्यावर छाप टाकणारी होती. त्यांना जी माहिती हवी होती ती त्यांनी मला विचारली व मी जे मला माहीत होते ते सर्व त्यांना सांगितले.

एक दिवस सकाळी मी त्यांना माझ्याबरोबर भाजी बाजारात घेऊन गेले. वाटेत एक वृद्धाश्रम लागला. तिथला एक म्हातारा दरवाजातून बाहेर येत होता. मला मुकुंदराव म्हणाले, "त्याच्याशी इटालियन बोला." मी त्याला क्षणभर थांबायला सांगितले व मी त्याच्याशी वृद्धाश्रमातल्या थोड्या गप्पा मारल्या. जवळ माझा छोटा मुलगाही होता. लगेच मुकुंदरावांनी त्या म्हाताऱ्या समवेत माझा व मुलाचा फोटो घेतला. तो आभार मानून पुढे गेला. पुढे भाजी बाजारात शिरलो. एका बोळात गाडी पार्क करून ठेवली. हा बाजार रस्त्याच्याच चौकात भरतो, सकाळी ७ ते १-३० पर्यंत. आम्ही बाजारात शिरलो. आमच्या दोघांच्या हातात भाजीच्या टोपल्या होत्या. मला पाहिजे ती भाजी मी घेत होते. मुकुंदरावांना भाषा येत नसल्याने ते पिशवी घेऊन माझ्याबरोबर चालत होते. तिथेच एक म्हातारी होती, लगेच मुकुंदरावांनी त्या भाजी विकणाऱ्या म्हातारीचा फोटो घेतला. ती थट्टेने म्हणाली, "तरुण गृहस्था, एखाद्या तरुणीचा फोटो घ्या. माझा म्हातारीचा नको."

इटालियन लोकांना थट्टा-मस्करी खूप आवडते, म्हणून मी तिला उत्तर दिले, जरूर तरुणीचा फोटोघेतो."आणखी एके ठिकाणी टोमॅटोचा ढीग होता. तेथे एक तरुणी व तरुण टोमॅटो विकत होते. त्या बाईने टोमॅटो दिले व मुकुंदरावांकडे डोळे

मिचकावून हे कोण असे मला विचारले. मी ते पाहुणे म्हणून सांगितले. मी ही आता बोलण्यात पक्की इटालियन बनत चालले होते. मलाही जरा थट्टा करायची लहर आली. मी तिला सरळच विचारले, "काय ग नवरा-बायको मिळून धंदा करता छान." हे ऐकून ती खूप हसली. कपाळावरचे केस मागे सारीत ती म्हणाली, "(ऐ सीनीयोरा) अहो, बाई हा माझा बॉय फ्रेंड आहे, नवरा घरी आहे." आम्हाला हे ऐकून गंमत वाटली. लग्न झाल्यावरसुद्धा ही परपुरुषाबरोबर सलगीने वागते याचे मुकुंदरावांना थोडे आश्चर्य वाटले. मुकुंदरावांना एक ना अनेक अशा गंमती सांगून मी त्यांची २–३ दिवस भरपूर करमणूक केली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ते निघणार होते. दुपारी जेवणे झाल्यावर ते मला म्हणाले, "इंदूताई २-३ दिवस तुम्ही माझी खूप करमणूक केलीत व आम्हाला खूप माहिती दिलीत. ती आम्हाला मिष्टान्नापेक्षाही गोड लागली. तुमचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आता आमच्या भारतीयांना इथले जीवन व राहाणी कशी कळणार, मला वाटते तुम्ही या विषयावर एक लेख लिहा, आम्ही त्याला स्त्री मासिकात प्रसिद्धी देऊ." त्यांच्या सुचनेने मला हसू आले. मी त्यांना म्हटले, "मी आतापर्यंत काहीही लिहिलेले नाही व मी लेखिकाही नाही." तेव्हा ते म्हणाले, "मी संपादक व लेखकही आहे. लेखकाचे अंतःकरण जाणण्याचा गुण माझ्यात आहे व हा गुण तुमच्यात आहे हे मला तुमच्याशी बोलण्याने कळले. तुम्ही मला इतकी माहिती थोड्या वेळात सांगितलीत की, लेखनाचा गुण तुमचा सुप्तावस्थेत आहे, त्याला जागृत करण्याची ही वेळ आहे." मी त्यांना नुसते हो म्हटले. संध्याकाळच्या विमानाने ते भारताला परत गेले.

त्यानंतर मुकुंदरावांना वचन दिल्याप्रमाणे माझा पहिला लेख—मला दिसलेले रोम—ह्या मथळ्याखाली 'स्त्री' मासिकात छापून आला. त्याला प्रसिद्धी मिळाली. माझा लेख खूप लोकांना आवडला. मला अभिनंदनाची पत्रे आली. माझ्या आयुष्यातला हा पहिला लेख. माझा आनंद गगनात मावेना. त्यानंतर रोमहून मी ३-४ लेख विविध विषयांवर लिहून पाठविले ते सर्व छापून आले. माझी खात्री झाली की, मनात आले तर मी काही तरी लिहू शकते. त्यानंतर माझे लिखाण चालूच होते. मुकुंदरावांनी ही मोलाची दिलेली शिदोरी मला आयुष्यभर साथ देत आहे आणि त्यानंतर पुढे पाहुणे येतच राहिले.

श्री. पु. शं. पतके, त्यांच्या पत्नी व प्रसिद्ध अभिनेत्री उषा किरण ही मंडळी लंडनला काही मिटींगकरता आली होती. श्री. पतके यांचा व आमचा खूपच वर्षां- पासून स्नेह होता. त्या वेळी ते दिल्लीला शेठ डालमिया यांचे खाजगी काम पाहात होते. साहजिकच आम्ही ह्या मंडळींना रोमला आग्रहाने बोलाविले. श्री. पतके व सौ. पतके यांना आम्ही घरीच ठेवणार होतो. उषा किरण यांना आम्ही कधीच पाहिलेले नव्हते. लोकप्रिय अभिनेत्री असल्याने त्यांची व्यवस्था आम्ही हॉटेलमध्येच केली होती. पतके यांच्याकडे वळून त्या म्हणाल्या, "मी आप्पासाहेबांच्या बरोबर आले", असे म्हणून त्यांनी माझ्या सोफाकडे बोट दाखविले व त्या म्हणाल्या, "मी ह्या सोफ्यावर निजेन." मला क्षणभर काहीच कळेना. ही सिनेमातली प्रसिद्ध अभिनेत्री, आता हिचा पाहुणचार कसा काय होणार, मला थोडी काळजी पडली; पण त्या घरी राहते म्हटल्यावर मी त्यांची घरीच व्यवस्था केली.

दुसरे दिवशी सकाळी आमचा सर्वांचा ब्रेकफास्ट झाला. मला काही महत्त्वाचे काम होते म्हणून बाहेर जावे लागले. तेव्हा मिसेस पतके व उषाताई यांनी स्वयंपाकघरात जाऊन माझे सामान हुडकून काढले व भाजी आणि पोळ्या सर्वांकरता करून ठेवल्या. मी घरी आल्यावर स्वयंपाकघरात गेले तो हे पदार्थ तयार दिसले, मला फार गंमत वाटली. उषाताईंच्या साधेपणाची माझ्यावर चांगलीच छाप पडली. सिनेमाच्या स्टुडियोमध्ये मी अभिनेत्री व घरात गृहिणी असे त्यांनी मला सांगितले.

दुपारची जेवणे झाल्यावर मी त्या सर्वांना बाहेर घेऊन गेले. वाटेत उषा किरण माझ्याशी गप्पा मारीत होत्या. त्या मला सांगत होत्या की, त्यांचे नुकतेच लग्न झालेले आहे.

डॉ. मनोहर खरे हे व्यवसायाने डॉक्टर म्हणून सबंध दिवस कामात व ह्या अभिनेत्री म्हणून सबंध दिवस स्टुडियोत. संसारात काय गोष्टी घ्यायच्या व कुठे मांडायच्या हे त्या म्हणाल्या आम्ही फोनवर ठरवितो व अशा तऱ्हेने सर्व संसार फोनवर मांडला गेला. तसेच रोमला त्यांना कोणी ओळखत नसल्यामुळे त्या माझ्याबरोबर सगळीकडे दुकानात हिंडल्या, काही खरेदी केली. भारतात त्या एकट्या बाहेर पडू शकत नव्हत्या. घर व स्टुडियो ही दोनच त्यांची ठिकाणे होती.

विमानतळावरसुद्धा त्यांचा फॉर्म कुणीतरी लिहूनच दिला होता. तसेच साड्या व कपड्याचे व्यापारी त्यांना घरीच नमुने आणून दाखवितात, त्यामुळे दुकानात जाणे त्यांना माहितच नाही.

दुसरे दिवशी सकाळी उठल्या, स्नान करून मेक-अपची पेटी समोर घेऊन बसल्या. माझा धाकटा मुलगा त्याला ह्या सिनेमात काम करतात हे ऐकून माहीत होते म्हणून तो त्यांच्या मागे मागे फिरत असायचा. दारात मागे उभे राहून त्या प्रसाधने कशी वापरतात हे बघत होता. सर्व मेक-अप झाल्यावर त्यांचा चेहरा जास्त खुलून दिसू लागला. विकासला ते सर्व नवीन होते. तो मला म्हणाला, "आई, तू पण थोडे शिकून घे, सुंदर दिसशील." मला त्याच्या बोलण्याची गंमत वाटली. बालवय ते किती त्याचे निरीक्षण बघून मला कौतुक वाटले, मी त्याला जवळ घेतले व बरं म्हणाले.

उषा किरण दोनच दिवस राहिल्या, माझ्या मनाला सुखाचा ओलावा देऊन गेल्या. एकदा आम्ही मुंबईला आलो असे त्यांना कुणाकडून तरी कळले. त्यांनी आम्हाला फोन केला व जेवायला बोलाविले. गाडी पाठविली व आम्ही दोघे जेवायला गेलो. बंगला साधा पण सुंदर सजावट, मला घर खूप आवडले. जेवायला बिरड्याची उसळ (जी मला रोमला मिळत नसे), भाजी, आमटी,पोळ्या, साधाच पण चवदार बेत. त्यांच्या जेवणाची गोडी कितीतरी दिवस तोंडात राहिली होती. आपण त्या सिनेमा नटी म्हणून त्यांचेकडे वेगळे बघतो, पण उषा किरण ह्या नियमाला अपवाद आहेत. त्यांचे घर, संसार, पती व मुले ह्यातही त्या आनंदाने रस घेतात यात शंका नाही. तिथेही पाहुणे घरच्यासारखेच राहिले.

एक दिवस दुपारी ४ चे सुमारास फोन आला. तिकडून मराठीत आवाज आला. मी दत्तो वामन पोतदार ह्यांचे नाव पुण्यात ऐकलेले होते; पण प्रत्यक्ष परिचय झालेला नव्हता. त्यामुळे मला एकदम उत्तर सुचेना व मी जरा गप्पच बसले. तेव्हा ते पुन्हा म्हणाले, "मी जरा अडचणीत आहे व तुमच्याकडे यायचे ठरविले आहे, तेव्हा कसा येऊ ते सांगा. घरी आल्यावर सर्व खुलासा करीन." माझा नाइलाज झाला. एवढे म्हातारे गृहस्थ, मला त्यांना टॅक्सी करून या सांगणे जीवावर आले. मी म्हटले, "मी गाडी घेऊन हॉटेलात येते व आपण बरोबर येऊ."

फोन ठेवून मी ह्यांना सर्व सांगितले. ते गृहस्थ मोठे इतिहासकार म्हणून प्रसिद्ध आहेत व त्यांचे ह्या विषयाचे संशोधन आहे हे मला माहीत होते. मी गाडीतून

त्यांच्या हॉटेलमध्ये गेले. आत गेल्यावर ते रिसेप्शन हॉलमध्ये बॅग ठेवून बसले होते. मी त्यांना नमस्कार केला व आत चला म्हटले. त्यांची बॅग घेतली व बाहेर येऊन गाडीच्या डिकीत ठेवली व ते पुढच्या सीटवर माझ्या शेजारी बसले. पांढरी सरवार, काळा अचकन, खांद्यावर उपरणे व पायात स्लीपर असे हे उमदे व्यक्तिमत्त्व पाहून मला फार आनंद झाला. आम्ही घरी आलो. घरातली त्यांना एक स्वतंत्र खोली दिली. संध्याकाळी मला ते दमलेले दिसले म्हणून लवकर जेवणे केली व ते झोपले.

दुसरे दिवशी जेवणे झाल्यावर आमच्या गप्पा सुरू झाल्या. ते म्हणाले, "मी सात-आठ दिवसांकरता इकडे आलो आहे. मला सर्व मित्रमंडळींनी गरम कपडे दिले व थॉमस कुक या कंपनीने माझी सर्व व्यवस्था केली व त्याप्रमाणे मी प्रथम रोमला मीटिंगकरता आलो ते दोन दिवस हॉटेलात होतो. पण व्यवस्था आवडली नाही. मीटिंग संपली व मी फ्लॉरेन्सला गेलो. इतिहास संशोधक म्हणून एक दिवस पायी निघालो. शाहू महाराजांची समाधी कोठे आहे असे रस्त्याने विचारीत होतो. प्रत्येकजण कोपऱ्यावर हात दाखवी. सबंध गाव पायी हिंडलो. शेवटी समाधीचे दर्शन झाले व पायाचे तुकडे पडले. तेथून रोमला आलो. येथे आल्यावर कुठल्याच हॉटेलमध्ये रिझर्व्हेशन नाही. कंपनीने काय व्यवस्था केली कळायला मार्ग नाही. भारतातून निघताना फॉरेन एक्स्चेंज इतका कमी मिळाला की, ते पैसे इथे कशाला पुरणार, शेवटी तुम्हाला फोन केला व हा ब्राह्मण इथे आला." आम्ही त्यांना सांगितले, तुम्ही येथे ५–६ दिवस राहा. आमची कोणतीही गैरसोय नाही. तेव्हा ते आम्हा दोघांना उद्देशून म्हणाले, "मी शाकाहारी आहे. जे कराल ते आवडीने खाईन. मी मात्र सारखा बोलत असतो; पण तुम्हाला जेव्हा ऐकायचा कंटाळा येईल तेव्हा सांगा मी गप्प बसेन." त्यांचे स्पष्ट बोलणे ऐकून गंमत वाटली.

आमची त्यांनी भरपूर करमणूक केली व पुण्याची बरीच माहिती सांगितली. जुने अवशेष, किल्ले, थडगी, ह्या सर्वांचा इतिहास त्यांनी शोधून काढला. इटालियन पदार्थही मी त्यांना खायला दिले ते त्यांनी आवडीने खाल्ले.

एक दिवस एक गंमत झाली. त्यांना इंडियन एम्बसीमधील ॲम्बेसिडर थिवी यांना भेटायला जायचे होते. मला म्हणाले, "मी बसने जातो. कसे जायचे ते सांगा." खरे म्हणजे तिथली इटालियन भाषा त्यांना येत नव्हती, तेव्हा ते एकटे कसे जातील असा मला प्रश्न पडला; पण ते म्हणाले, "तुम्ही काळजी करू नका,

मी जाईन." तेव्हा मी त्यांना बसमार्ग सांगितला. ही बस आमच्या घरापासून थेट एम्बसीच्या बरीच जवळ उभी राहात होती व तो शेवटचा स्टॉप होता व तेथून एम्बसी दिसत होती.

दुसरे दिवशी सकाळी ते निघाले. मी त्यांना बसमध्ये बसवून दिले. एम्बसीच्या आधीच्या एका स्टॉपवर बस रिकामी झाली. त्यांना वाटले हाच शेवटचा स्टॉप, कारण सर्व मंडळी उतरली. पण खरे म्हणजे तो एक आधीचा स्टॉप होता. अर्थात ते त्यांना कळायला मार्ग नव्हता. पाहुणे बसमधून उतरले. इकडे–तिकडे एम्बसीची पाटी दिसते का ते पाहू लागले. कुठेही पाटी दिसेना. तेव्हा रस्त्यावर विचारत उभे राहिले. पाहता पाहता त्यांच्याभोवती ५०–६० मंडळींनी घोळका केला. इटालियन लोक चूप बसणारे नाहीत, ते हातवारे करून त्यांना विचारू लागले. त्यांचा तो रुबाबदार चेहरा, अचकन व सरवार, उपरणे, पायात स्लीपर व डोक्यावर लाल पगडी हे पाहून हा भारतातला कोणीतरी राजा असावा असे लोकांना वाटले म्हणून ते एकमेकात भारतातला राजा (रे दी इंडिया) असे सांगत सुटले. तेव्हा पाहुण्यांच्या लक्षात आले की आपण स्टॉप चुकलो. तेव्हा त्यांनी खिशातून एम्बसीच्या पत्त्याची चिठ्ठी काढली व एकाला दाखविली, तेव्हा लगेच एक माणूस टॅक्सी घेऊन आला व त्यांना टॅक्सीत बसविले. खरे म्हणजे एम्बसी जवळ होती पण लबाड टॅक्सीवाला, त्याने अर्धातास फिरविले व बरोबर साडेअकरा वाजता टॅक्सी एम्बसीच्या पुढे उभी केली व भरपूर पैसे घेतले. येताना ते न चुकता बसने आले. त्यानंतर १–२ दिवसांत ते भारतात परत आले. महाराष्ट्रातले प्रसिद्ध साहित्यिक, नाटककार, नट व उत्तम वक्ते व वक्तृत्व म्हणजे हसून हसून पोट दुखविणारे असे प्र. के. अत्रे हेही आमचेकडे रोमला आलेले पाहुणे होते. त्यांनी माझ्या सासूबाईंनी लिहिलेल्या 'गेले ते दिवस' ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली होती, त्यामुळे त्यांची व आमची बरीच ओळख होती. मुंबईला आम्ही केव्हाही आलो तरी त्यांचे नाटक पाहिल्याशिवाय ते आम्हाला जाऊ देत नसत. रात्री नाटक संपल्यावर ते आम्हाला त्यांच्या गाडीतून परस्पर विमानतळावर पोचवीत असत. त्यांची पुस्तके, 'कऱ्हेचे पाणी' ही सर्व पुस्तके त्यांनी आम्हाला भेट म्हणून दिली आहेत.

तेव्हा असे हे बहुरूपी पाहुणे येणार असे जेव्हा आम्हाला पत्र आले तेव्हा साहजिकच आम्हाला खूप आनंद झाला. पत्रात त्यांनी लिहिले होते, "मला घरी

राहण्यापेक्षा हॉटेलात राहणे जास्त पसंत, कारण आमची आन्हिकाची सोय हॉटेलात व्यवस्थित होईल. घरी आमच्या सवयी आपल्याला तापदायक होतील. त्यांच्या स्वभावात स्पष्टवक्तेपणा नेहमी असे. तेव्हा आम्ही आमच्या घराजवळच्या हॉटेलमध्ये त्यांची सोय केली व त्यांना पत्र लिहिले,"तुमच्या इच्छेप्रमाणे हॉटेलमध्ये सोय केली आहे मात्र जेवणखाण आमच्या घरी व तुम्ही आमचे पाहुणे."

आणि त्याप्रमाणे आम्ही रोमला विमानतळावरून त्यांना घरी आणले. दुपारी चहापाणी व रात्री जेवण करून ते हॉटेलमध्ये गेले. दुसरे दिवशी ते सकाळी न्याहरीला आले. तो शनिवार होता, त्यामुळे माझा शाळेत जाणारा मुलगा घरी होता. त्याला कोणी मराठी बोलणारे पाहुणे आले की फार आवडे. पाहुण्यांशी बोलण्यात तो रस घेत असे. पाहुण्यांना रोम दाखवायला तो नेहमी नेत असे. त्याप्रमाणे तो अत्रे साहेबांना घेऊन बाहेर पडला. त्यांनी माझ्या मुलाला सांगितले, मला बसमधून शहर दाखवायला ने. त्याप्रमाणे बसमधून त्याने सेंट पीटर चर्च व कलोसियम दाखविले. चर्च खूपच मोठे आहे; पण ते सर्व त्यांनी सगळीकडे चालून पाहिले. तसेच कवी शेले व कीथ यांची थडगी पाहिली आणि सांगायचे कारण त्यांना ह्या कवीबद्दल इतके प्रेम होते की, थडग्यावर पडून ते अक्षरशः रडले. माझ्या मुलाला फार आश्चर्य वाटले, त्याने त्यांना कारण विचारले तेव्हा त्या कवीची माहिती त्यांनी सांगितली. दुपारी जेवायला घरी आले. ते निसर्गप्रेमी व साहित्यिक असल्यामुळे संध्याकाळी आम्ही त्यांना गाडीतून व्हिला बोर्गीस बाग, तिव्होलीचे पाण्याचे झरे वगैरे खूप निसर्ग दाखविला. त्यांना ते सर्व खूप आवडले. संध्याकाळी १०-१२ भारतीय मंडळी जेवायला बोलावली होती. जेवणानंतर चार शब्द बोला म्हणून आग्रह केला तेव्हा नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे खूप गप्पा, उदाहरणे देऊन सर्वांची भरपूर करमणूक केली.

एक दिवस रात्री Open air opera पाहायला गेलो. हा ऑपेरा पूर्वी राजे लोकांचे आंघोळीचे ठिकाण (Caracalla Baths) म्हणून प्रसिद्ध आहे. त्या पार्श्वभूमीवर एका वेळी ह्या उघड्या थिएटरवर जवळ जवळ १०० ते १५० मंडळी गाण्यामध्ये हावभाव करून हे नाटक चालते. सर्व नाटक संगीतातच असते. मंडळी उघड्या मैदानावर खुर्चीवर बसतात. रोममध्ये हा ऑपेरा प्रसिद्ध आहे. अत्रे साहेबांना नाटक व गाणे प्रिय, त्यामुळे त्यांना हा ऑपेरा फार

आवडला. आम्ही खुर्चीवर बसल्यावर ते खुर्चीवरून उठले व एका बाजूला उभे राहिले. दहा-पंधरा मिनिटांनी त्यांनी सर्व देखाव्याचे, खुर्च्यांच्या ओळी, स्टेजची रचना, पडदे, सर्व गोष्टी न्याहाळून घेतल्या. पाच मिनिटांच्या आत सर्व गोष्टींचे त्यांना आकलन झाले.

ऑपेरा रात्री १२ चे सुमारास संपल्यावर आम्ही घरी येत होतो. त्या वेळी गाडीत ते मला गहन विचारात दिसले. हॉटेलमध्ये जेव्हा उतरले तेव्हा म्हणाले, "आज रात्री माझ्या वर्तमानपत्राकरता काय लिहायचे ते निजण्यापूर्वी लिहून काढतो." त्यांची लिहिण्याची शैली इतकी जलद होती की ते सांगत एकदा ते लिहायला बसले की कधीही खोडत नसत व किती पाने लिहिली याचा त्यांना हिशोबच नसे. अचाट बुद्धिमत्ता व लिहिण्याची कला अलौकिक होती यात शंकाच नाही.

रोज आमच्या घरी आल्यावर ते इतके मनमोकळेपणाने बोलत की, कुणाचीही टीका ते भरपूर करीत असत. त्यांची गाजलेली नाटके डॉ. लागू, संत सखू, तो मी नव्हेच, आणखी कितीतरी नाटके त्यांनी आम्हाला दाखविली.

एक दिवस ते म्हणाले, "त्यांना टिपिकल इटालियन पदार्थ खायचा आहे," तेव्हा आम्ही त्यांना गावात एका बोळगल्लीत एका स्पेशल रेस्टॉरंटमध्ये नेले. याची रचना व डेकोरेशन सर्व टिपिकल इटालियन पद्धतीचे होते. भितीवर सगळीकडे रिकाम्या वाईनच्या बाटल्या लटकत होत्या. लाल प्लॅस्टिकच्या मिरच्या, भिंतीवर जुने फोटो, मंद दिवे असा थाट होता. एक Alfred नावाच्या इटालियन गृहस्थाने काढलेले हे स्पेशल रेस्टॉरंट होते. ह्या रेस्टॉरंटची स्पेशालिटी म्हणजे—फेतुचीनी—हा इटालियन लोकांचा आवडता पदार्थ आहे. इथे हा पदार्थ ताजा बनवितात. मैदा, अंडे याचा पीठ मळून गोळा करून तो मशिनवरून काढतात, तो स्पगेटीप्रमाणेच पण चपटा व ताजा असतो. हे रेस्टॉरन्ट फक्त फेतुचीनीकरताच प्रसिद्ध आहे. Alfred ला King of Fetucini म्हणतात. हा माणूस दिसायला लठ्ठ, खूप गोरा, केस छान वळविलेले व मोठ्या मिश्या असा भारदस्त दिसतो. सदा हसतमुख, त्यामुळे लोकांना आवडतो.

आम्ही एका टेबलावर बसलो. त्यांची पद्धत आहे, प्रथम मालक येऊन आपल्याला हस्तांदोलन करतो. त्याने प्रथम मला हस्तांदोलन केले. मी पाहुण्यांची त्याला ओळख करून दिली व मुद्दाम तुझ्याकडे आलो, असे सांगितले. आम्हा

फॉरीनर्सना पाहून तो खूष झाला. मला इटालियन येत होते त्यामुळे मी त्यांच्याशी थोड्या गप्पा मारल्या. ह्या रेस्टॉरंटमध्ये नेहमीच एक गाण्याचा संच कोपऱ्यात उभा असतो, ते लोक आपली वाद्ये घेऊन टेबलाजवळ येतात व आपल्या आवडीचे गाणे वाजवितात. अत्रे साहेबमला म्हणाले, "सांगा एखादे गाणे." मी म्हटले, (Arrivi derchi Roma) गुडबाय रोम हे गाणे म्हणा. त्या लोकांनी ते गाणे इतके सुरेल आवाजात म्हटले की, आमचे पाहुणे फारच खूष झाले व त्यांनी लगेच एक नोट काढून त्यांच्या हातावर ठेवली. त्या लोकांनी लगेच आभार मानले. अत्रे साहेबांनी फोटोग्राफरला बोलाविले. मालकाला टेबलाजवळ उभे केले. अत्रे साहेबांनी आमच्या दोघांच्या गळ्याभोवती हात ठेवले व म्हणाले, "हं,काढा आता फोटो." फोटोत आम्ही सर्व खूप हसलो. फोटोची कॉपी मालकांनी नंतर आम्हाला घरी पाठविली.

फेतुचिनी तयार झाल्यावर ती एका सुंदर लांबट प्लेटमध्ये त्यावर भरपूर लोणी व किसलेले चीज घातलेले असते. मालक स्वतः ती प्लेट घेऊन टेबलावर ठेवतो व स्वतः हाताने सर्वांना वाढतो व प्लेट मध्यभागी ठेवतो. सुंदर ताजी वाईन प्यायला ठेवलेली असते. रोमला साधे नळाचे पाणी कोणी पीत नाही, वाईन किंवा मिनरल वॉटर हेच असते. अत्रे साहेबांना हा पदार्थ खूप आवडला. निघताना आम्ही मालकाचे खूप आभार मानले व हस्तांदोलन करून आम्ही रेस्टॉरन्टच्या बाहेर पडलो. तोही आम्हाला Good Bye म्हणाला. आम्ही घरी आलो.

त्यानंतर एकदा संध्याकाळी आन्हिके आटोपून ते जेवायला आलेले होते. ते म्हणाले, "मुंबईला माझ्या ऑफिसमध्ये हे सगळ्यांना माहीत आहे, आपल्याकडे चोरीचा मामला नाही" असे ते नेहमी थट्टेने बोलत; पण ते सर्वथैव सत्य असे.

दुसरे दिवशी दिवसभर गप्पा, बोलण्याचा कधी कंटाळाच नाही. संध्याकाळी विमानतळावर पोचवायला गेलो तेथे व्ही.आय.पी. खोलीत एम्बसी मधून काही मंडळी त्यांना भेटायला आली होती. बोलण्याच्या नादात आपल्याला गावाला जायचे आहे हेही ते विसरले. शेवटी विमानात जाऊन बसा अशी सूचना मला ऐकू आली तेव्हा मी म्हटले, "अत्रेसाहेब तुमचे विमान निघाले." तेव्हा चटकन ते उठले, आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. अत्रेसाहेब विमानाची शिडी चढले व

आम्ही परत फिरलो.

मुंबईला पोचल्यावर त्यांचे पोचल्याचे पत्र आले. त्यांच्या —मराठा— वर्तमानपत्रात त्यांच्यावर एक अग्रलेख लिहिला. त्यात एक वाक्य मजेदार होते, सेंट पिटर चर्च पाहताना आमच्या पायांना जन्मात व्यायाम झाला नव्हता इतका झाला, तसेच आमचा फोटो फेतुचीनी खाताना फारच सुंदर आला होता. तोही पेपरात दिसला. ह्या लिखाणावरून त्यांचे लिखाण किती जबरदस्त असे याची आम्हाला कल्पना आली. तसेच 'मराठा' हे वर्तमानपत्र वाचायला मिळाल्याचा आनंद झाला. त्यांचे प्रेम आम्ही कधीही विसरू शकत नाही. त्यांच्यासारखा अचाट बुद्धीचा माणूस आपणाकडे पाहुणा म्हणून आला व कायम प्रेम देऊन गेला हे आमचे आम्ही भाग्य समजतो.

आता आमचे आणखी एक पंजाबी मित्र श्री. रामशरण कोशाल हे होत. त्यांची व आमची १९४० सालापासून ओळख होती. माझ्या यजमानांच्यापेक्षा ते १०–१२ वर्षांनी मोठे होते. दोघांची ओळख होण्याचे कारण दोघेही संख्याशास्त्रज्ञ. त्यामुळे मीटिंगला बरोबर असत. ते त्या वेळी पुण्याच्या शेतकी खात्यात मुख्य अधिकारी होते. दिल्लीला ते नेहमी आमचेकडे यायचे.

आमचे घरी ४ वाजता अर्धी चड्डी घालून आमच्या नोकराच्या खोलीत जात, त्याला उठवत व चहा पीत असत. त्यानंतर सात वाजता टोस्ट व अंडे. त्यानंतर ९ वाजता मुलांच्या पंगतीत पोळी व भाजी व नंतर मात्र माझे यजमान व ते ऑफिसात जात असत व संध्याकाळी ९ वाजता घरी येत. आल्यावर जेवण करून काम करीत. रात्री १० वाजता पुन्हा मिठाई खात व १२ वाजता झोपत. करारी स्वभाव पण मायाळू तितकाच, ह्यांच्यावर खूप प्रेम करीत. ताप आला तर बायकोला म्हणत बदामाची खीर दिली नाहीस.

१९५४ मध्ये ते भारतामधून सेवानिवृत्त झाले. माझे यजमानांनी त्यांना रोमला आपल्या इंटरनॅशनल ऑफिसमध्ये जागा दिली. त्यांची नोकरी खुद्द रोममध्ये नव्हती. काही वर्षे कायरो, बगदाद; पण रोमला नेहमी रिपोर्ट द्यायला यावे लागे. कधी कधी ते हॉटेलमध्ये राहात; पण पुष्कळ वेळा आमच्या घरीही राहात असत. कारण त्यांना रिपोर्ट माझ्या यजमानांनाच द्यायचा असे. ते ऑफिसमध्येही खूप मोठ्याने बोलत, त्यामुळे इतर लोक ह्यांना म्हणत, "अरे त्यांना हळू बोलायला सांग ! पण त्यांची बडबड सुरूच असे.

हे दोघे नवराबायको आमचेकडे नेहमी येत तेव्हा मला आनंद होत असे. कारण त्यांची बायको शांती माझ्याशी खूप बोले, कामात मात्र सचोटी, त्यामुळे हे त्यांना मान देत. ते जातीने पंजाबी त्यामुळे हिंदीतून बोलत. ते येणार असे कळले की मी ताटभर रसगुल्ले अगर गुलाबजाम करून ठेवी. जेवणही भरपूर व आवडीने खात. कधी कधी मी म्हणे, "तुम्ही पोटभर जेवता, आता बशीभर मिठाई खायला भूक आहे का ?" तेव्हा ते म्हणत, "मिठाईका कोना पेटमें अलग होता है" आणि खरोखरच ते भरपूर खात. मला ते पाहून आश्चर्य वाटे; पण पचवीत असत हेही खरेच.

बहुतेक दर दोन-तीन महिन्यांनी त्यांची खेप असे. एकदा ते असेच आमच्याकडे आले होते. २-३ दिवस ते व माझे यजमान सतत काम करीत बसलेले असत, कधीतरी जेवायला उठत. मला ते काम पाहून कधी कधी कंटाळा येत असे. तो दिवस शनिवार होता व ऑफिसला सुट्टी होती. दुपारचे ४ वाजले होते, तेव्हा मी मध्येच म्हणाले, "चलिये कोशालसाब, समुंदरपर जायेंगे." ते उन्हाळ्याचे दिवस, त्यांनी येण्याचे कबूल केले. तेव्हा फाईल गोळा करून हातात घेतल्या व आम्ही चौघेजण गाडीत बसलो. मी गाडी चालवीत होते व कोशाल मागच्या सीटवर गाडीत डाराडुर झोपले होते. तसे ते हॅपी-गो-लकी (Happy-go-lucky) होते. दमले की कुठेही झोपत असत व घोरत असत, तसेच काम करायला लागले तर दिवसरात्र बघत नसत. ते खूप दीर्घोद्योगी होते.

रोमला ऑस्टीया नावाचा समुद्रकिनारा आहे. तेथे उन्हाळ्यात खूप मंडळी येतात. आम्ही वाळूत जाऊन बसलो. तेथे एक होडी रिकामी पडली होती त्यावर हे दोघे बसले. कोशालसाहेबांनी तिथेही फाईव उघडली व ह्यांना दाखवू लागले; पण वारा फार असल्याने कागद उडू लागले. तेव्हा हे म्हणाले, "अरे जरा कागद बाजूला ठेव. चल आपण पाण्यात जाऊ." त्यांच्याजवळ पोहण्याचा पोशाख नव्हता. तेव्हा तिथल्या दुकानात आम्ही पोशाख घ्यायला गेलो. आमचा मित्र असा अगडबंब, पोट सुटलेला, जाडजूड, उंची बेताची, खाणे भरपूर व व्यायाम नाही. दुकानातल्या बाईचा हात माप घ्यायला टेपही पुरेना. तिने टेपचे एक टोक त्यांच्या पोटावर ठेवले व गोल फिरली. आम्हाला ते पाहून हसू आले. "तुमच्या मापाचा पोहायचा पोशाख नाही (Costume)" असे ती म्हणाली, तेव्हा आमचे मित्र तिच्यावर हिंदीत ओरडले, "क्यू नहीं रख्खा." त्यांना आपण किती लठ्ठ, याची

कधीच कल्पना नव्हती. खाणे, झोपणे व काम हे तीनच शब्द त्यांना माहीत.

परत वाळूत येऊन खाली बसलो. तेव्हा बिकीनी घातलेल्या मुली पाहून म्हणाले, "अरे ये तो सब लडकी है. मैंने तो देखा भी नहीं." तेव्हा हे म्हणाले, "अरे किती ओरडतोस, जरा हळू बोल."

एकदा एक आंतरराष्ट्रीय मीटिंग होती. त्याकरता कोशालना बोलाविले होते. ऑफिसमध्ये येताना कपड्याकडे कधीच लक्ष नसे. त्या दिवशी एक तऱ्हेची पॅंट व दुसराच कसला तरी कोट घालून आले. घरी आल्यावर बायकोवर ओरडले, "मेरे कपडे देखती नहीं." बायकोवर तर नेहमी ओरडणे. ती बिचारी मुकाट्याने ऐकून घेई.

एक दिवस आमचेकडे असताना रात्री ९–१० वाजता घरी आले व लिफ्टमध्ये बसले व तळमजल्याची घंटी दाबली. लिफ्ट तळमजल्यात उभी राहिली. दरवाजा उघडला, सर्व अंधार होता. पुन्हा ओरडत,"अरे मे कहा हूँ."शेवटी कोणीतरी ओरडणे ऐकले व त्यांना पुन्हा लिफ्टमध्ये बसविले व चौथ्या मजल्यावर आम्ही राहात होतो तेथे पोचविले.

एकदा फार मजेदार प्रसंग घडला. आमच्याकडे असताना रात्री १२ वाजले तरी त्यांचा रिपोर्ट संपेना. हेही कंटाळले होते. तेव्हा ह्यांनी एक युक्ती केली. आत जाऊन एका ग्लासात व्हिस्की घालून आणली व त्यांना म्हणाले,"एवढी पी मग काम करू." ते पाण्यासारखी ती व्हिस्की प्याले व पुन्हा कामाला बसले. पण १०–१५ मिनिटांत व्हिस्कीचा अंमल होऊ लागला व बडबड सुरू झाली. ह्यांनी त्यांना हातानी धरून खोलीत नेले, तेथे त्यांना झोप लागली व हे स्वतः झोपायला गेले.

दुसरे दिवशी ह्यांना म्हणाले, "कल क्या हुवा पता नहीं." तेव्हा हे म्हणाले, "कुछ नहीं हुवा. तुला विश्रांती दिली."कधी कधी बदल म्हणून सिनेमाला नेत असू; पण तेथे सिनेमा बघण्याऐवजी मोठमोठ्याने ओरड व ऑफिसच्या गप्पा. दुसऱ्या लोकांना त्रास तेव्हा मुकाट्याने आम्ही घरी येत असू. काय करणार ?

एकदा ती मंडळी कायरोला होती व आम्ही तेथे मीटिंगकरता गेलो होतो. त्यांचेकडे एक दिवस राहिलो होतो. तेव्हा आम्हाला तिथला प्रसिद्ध 'किटी' डान्स बघायला एका हॉटेलात घेऊन गेले. आमच्या बरोबर आणखी चार मंडळी टेबलाभोवती बसतात व किटी बिकीनी घालून टेबलाच्या मध्यभागी पोट वेळावून

नाच करते व मधूनच कुणाचे तरी मांडीवर बसते. कोशाल आमचे होस्ट. आम्ही सर्व नाच पाहण्यात व गप्पा मारण्यात रमलो होतो. समोर ड्रिंकचे पेले व खायला बदाम, काजू, दाणे वगैरे ठेवले होते. मधून मधून ती पुरुषांकडे पाहून डोळे मिचकावीत होती. कोशालचे तिच्याकडे लक्ष होते; पण त्यांच्या गप्पा जोरात सुरू होत्या. कोशालचे मोठे पोट तिला दिसले व ती त्यांच्या पोटावर जाऊन बसली. आम्ही इकडे तिकडे पाहतो तो ती खुशाल हसत होती. इतक्या मोठ्या पोटावर ती व्यवस्थित बसलेली दिसली. आम्हाला सर्वांना खूप हसू आले. आम्ही टाळ्या वाजविल्या. कोशाल ओरडले,"उठ जा."अशी गंमत झाली. ते सर्व गोष्टी हसून नेत, त्यामुळे ते सर्वांना प्रिय असत.

असे हे आमचे मित्र १६ वर्षे ह्या इंटरनॅशनल ऑफिसमध्ये काम करीत होते. किती वेळा रोमला आले गणतीच नाही. वयाच्या सत्तराव्या वर्षी ऑफिसमध्ये मेडिकल चेकअप झाला. सर्व प्रकृती उत्तम सांगितले. तेव्हा अजूनही काम करण्याची इच्छा होती. पण ह्यांनी सांगितले,"आता भारतात जा. तेव्हा पुण्याला आले. मुंढवा येथे जमीन घेतली. शेती सुरू झाली. लिंबू, दाणे, डाळिंबे वगैरे खूप लावले, पाण्याचा पंप बसविला. स्वतः उन्हात बसून ७–८ तास काम चालू असे. चार खोल्याचे घर व घराला नाव 'शांती फार्म' ठेवले. परदेशातून गाडी व खूप सामान आणले. नवराबायको आनंदात होती. मुले येऊन–जाऊन असत. तिथल्याच खेडेगावातल्या लोकांना रोजगार देऊन कामाला ठेवले.

दोन–तीन वर्षांपूर्वी एक दिवस गाडीतून जात असताना बायकोच्या मानेवर डोके टेकले व जगाचा निरोप घेतला. ४० वर्षांच्या सहवासातला आमचा मित्र आम्हाला सोडून गेला. त्या आठवणी नेहमीच जागृत राहणार.

डॉ. पानसे यांचा व आमचा दिल्लीपासूनचा परिचय होता. ते इंदोरला संख्याशास्त्र ह्या विषयात काम पाहात होते. ह्यांची व त्यांची खूप मैत्री होती व कामही एकत्र चाले. पुष्कळ वेळा मीटिंगच्या निमित्ताने ते दिल्लीला येत व नेहमी आमच्या घरी राहात असत. दिल्लीला असताना ह्यांनी इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च ही संस्था स्थापन केली व त्यांचे डायरेक्टर म्हणूनच ते काम पाहात होते. जेव्हा आम्ही रोमला गेलो तेव्हा डॉ. पानसे यांची नेमणूक त्याच जागेवर झाली. त्यामुळे आम्ही परदेशात गेल्यावरही डॉ. पानसे व हे पुष्कळ वेळा एकमेकांना भेटत असत. आणि खरे म्हणजे ह्यांनीच त्यांना दोघांना बोलाविले

होते. तेव्हा ते येणार हे पत्र आल्यावर साहजिकच आम्हा दोघांना आनंद झाला व तुम्ही जरूर या असे आम्ही त्यांना अगत्याचे पत्र लिहिले.

त्याप्रमाणे ती मंडळी आमचेकडे राहायला आली. बरेच दिवस राहणार म्हणून आम्ही त्यांना स्वतंत्र खोली दिली. माझा धाकटा मुलगा, तो मावशी म्हणून त्यांच्याशी खेळे व आपल्या गोड बोलण्याने त्यांची करमणूक करी. घरातल्या वातावरणात तशा त्या रमल्या; पण भारतातले जेवण, भाज्या वगैरे तेथे त्यांना मिळत नसत म्हणून नाराज असत.

पाहुणे भारतातून आले म्हणून पहिले काही दिवस मी भारतीय पद्धतीचा स्वयंपाक केला व हळूहळू त्यांना तिथली माहिती द्यायला सुरुवात केली. तुम्ही हळूहळू इथले पदार्थ पाव लोणी खायला सुरुवात करा. पण त्यांना काहीही पटेना, पहिल्या प्रथम परदेशात आलेल्या त्यामुळे इथले जीवन जड वाटे.

त्यानंतर एकदा त्यांचे यजमान त्यांना १५ दिवस रोमच्या बाहेर प्रसिद्ध असलेली गावेच फ्लॉरेन्स, टॉवर ऑफ पिसा, नेपल्स वगैरे ठिकाणी घेऊन गेले. तेथे त्यांना हॉटेलमध्येच राहावे लागले. पंधरा दिवस बाईंनी ब्रेड व लोणी खाऊन काढले. चहाही मिळाला नाही, कारण बहुतेक लोक तेथे काळी कॉफी पितात. खरे तर इटालियन पदार्थ चविष्ट असतात. स्पगेटी, मॅकरोनी, पिझ्झा (पिझा) वगैरे. पण बाईंनी त्या गोष्टी कधीच खाल्ल्या नाहीत. तेव्हा ते कसे आवडणार?

एक ना दोन हजार भानगडी, माझी मती गुंग होत असे. नवऱ्याबरोबर रोज वादावादी, एकट्या परत जायला तयार नाहीत. तशा बाई स्वभावाने थोड्या जालीम; पण गप्पा मारायला मनमोकळा स्वभाव. माझ्याबरोबर बाहेर येत, घरातही मला बरीच मदत करीत. त्यांना दर शनिवारी व रविवारी आम्ही गाडीतून हिंडायला नेत असू. सर्व रोम व आसपासची गावे पाहून झाली. अशा परिस्थितीत २ महिने गेले. पण जेवण आवडतच नव्हते.

भारतात त्यांना रोज आमटी, भात, तूप व पोळ्या खायची सवय होती व दोन वेळा चहाची सवय होती. त्यांच्या सवयीप्रमाणे त्यांना काहीच मिळेना. मी माझ्याकडून जे मिळेल ते करून घालत होते. पण माझाही नाइलाज होता. त्यांना मधून मधून उपास असत. साबुदाणा व वऱ्याचे तांदूळ मिळत नसत. तेव्हा रताळ्याचा कीस व फळे तेही खाऊन कंटाळल्या. यजमान त्यांची समजूत घालत; पण त्यांचे एकच वाक्य, मला कशाला आणलेत. एकदा ताप आला. परदेशी

डॉक्टर नको. ताप साधा होता म्हणून बऱ्या झाल्या. नवऱ्याचे काम संपेपर्यंत राहणे भाग होते. आमच्याबरोबर कुठल्याही पार्टीला यायला तयार नाहीत. त्यामुळे घरात वादावादी होई. आलेला दिवस संपत होता पण पाहुण्या नाराज म्हणून वाईट वाटे.

एकदा ऑफिसमध्ये एक इंटरनॅशनल कॉन्फरन्स पाच–सहा दिवस सुरू होती. रोज २–३ पार्ट्या असायच्या, कधी कॉकटेल्स तर कधी जेवणे असे असायचे. मला अशा पार्ट्यांना जायला आवडे. मी एक दिवस बाईंना म्हटले,"चला हो आज रात्री जेवणाला आपण चौघेजण जाऊ."त्यांना काय वाटले कुणास ठाऊक, पण यायला तयार झाल्या. मला खूप आनंद झाला. त्या खूप छान साडी नेसल्या, दागिने घातले, मीही माझी उंची साडी परिधान केली. त्या आनंदात दिसल्या. आम्ही चौघेजण गाडीतून पार्टीला गेलो.

ही जेवणाची पार्टी एका हॉटेलात होती. आलिशान हॉटेलात त्याची गणना आहे. सात–आठशे मंडळी तेथे बोलावली होती. अशा मोठ्या पार्टीत आपले नाव ज्या टेबलावर लिहिले असेल तेथेच बसायचे अशी पद्धत आहे. त्यामुळे आपला नवरा कोठे आहे हे दिसते; पण त्याच्या जवळ आपण बसू शकत नाही. त्यामुळे शेजारी दोन्ही बाजूला जे पुरुष असतील त्यांच्याशी बोलावे लागते. ह्या बाई नाव पाहून आपल्या टेबलावर बसल्या. मला त्या कुठे बसल्या ते दिसत होते.

जेवण सुरू झाले, पहिला कोर्स टोमॅटोचे सूप व ब्रेड हा होता. दुसरा कोर्स कोंबडीचा पाय, शेंगभाजी उकडलेली व बटाटे, गाजर उकडलेले असा होता. प्यायला पाणी नसून वाईन होती. हे जेवण जवत असताना घरी गेल्यावर काय वादळ होणार हे विचार माझ्या मनात घोळतच होते. तिसरा कोर्स काही तरी गोड आपल्या हॉटेलचे काही तरी नावीन्य म्हणून. त्यांची पद्धत स्वीट हॉलमध्ये आणायचे आधी दिवे बंद करतात. हॉलमध्ये यायला दरवाजे बरेच असतात, त्या दरवाज्यांतून वेटर्सच्या हातात सुंदर ट्रे, त्यात एक मेणबत्ती लावलेली व ट्रेमध्ये मध्यभागी जेलीपुडिंग व त्याला डेकोरेशन म्हणून चारी बाजूला मासे (Lobsters) केशरी रंगाचे ठेवले होते. सर्व जेवायला बसलेली मंडळी दरवाज्याकडे माना करतात व हे वेटर्स दिमाखात मेणबत्तीच्या उजेडात हॉलमध्ये येतात. सर्व मंडळी तो देखावा बघतात व टाळ्या वाजवितात. पार्टीचा आनंद व्यक्त करण्याचा हा प्रकार आहे.

आमच्या बाई अंधारातून उठल्या व सरळ हॉटेलच्या बाहेर जाऊन पायऱ्यावर बसल्या. मी गोड पुडिंग खात असताना मला त्यांची खुर्ची रिकामी दिसली. मी त्यांच्या यजमानांना खूण केली. ते खुर्चीवरून उठले. दोन–तीन वेटर्स घाईघाईने त्यांच्या मागे धावले. बाई आरामात रस्त्याकडे पाहात बसल्या होत्या. त्यांना यजमानांनी आत बोलाविले; पण त्यांनी नकार दिला तेव्हा वेटर्सला सर्व ठीक, तुम्ही आत चला, असे म्हणून सर्वजण जागेवर आले.

दुसरे दिवशी बाईंचा व यजमानांचा खूप वाद झाला. बाई बडबडत होत्या, मला परदेशात कशाला आणलेत. देव नाही, धर्म नाही, वाटेल ती जनावरे खायची, मला व्हेजिटेरियन म्हणून मासाचे तुकडे बाजूला काढून भात दिला. आपली सुखाने घरी राहिले असते." त्यानंतर २–३ आठवडे त्यांनी तसेच कुरकुरत काढले व शेवटी दिल्लीला परत गेले. मला त्यांचे पत्र आले. तेथे गेल्यावर मुख्य म्हणजे मनाजोगते जेवण मिळाले व सर्व राग शांत झाला. इतके दिवस पाहुणे येत जात; पण इतके दिवस कोणीच राहिले नाही. वयस्क बाईला परदेशात राहणे सोपे नव्हते हे मलाही दिसत होते, हा एक आगळाच अनुभव.

पंजाबराव देशमुख हेही आमचे मित्र (Agriculture Minister). हे नेहमी ऑफिसमध्ये मीटिंगकरता भारतातले डेलिगेशन घेऊन येत, त्या वेळी आमच्याकडे नेहमी जेवायला येत. एकदा मला आठवते, आम्ही २०–२५ मंडळी जेवायला बोलावली होती. पंजाबरावांनी मला फोनवर सांगितले की, मी मिरच्या खाणारा माणूस आहे. मुद्दाम तेव्हा टेबलावर एका बशीत मी मिरचीचे लोणचे ठेवले होते. ते जास्त तिखट असे. मी परदेशीयांना सुचविले तरी एक माणूस शेंगाची भाजी म्हणून एक मिरची खाऊन गेला व ओरडत सुटला. त्याला गार पाणी व खडीसाखर दिले. त्यानंतर पंजाबरावांनी ती बशी सोफावर ठेवली. जेवण जेवले इतकेच नव्हे तर त्यांना मी दुसरे दिवशी ते मिरचीचे बी दिले त्यांनी भारतात येऊन बागेत लावले.

आर. के. पाटील (मिनिस्टर) पण त्या वेळी ते विनोबाजींच्या भूदानमध्ये काम करीत होते. तिथूनच ते व विमलाबाई ठकार ही मंडळी आली होती. आम्ही त्या वेळी बीचवर राहायला गेलो होतो. तेथे ही मंडळी भेटायला आली. बीचवर आम्ही एकत्र जेवलो, पोहलो व गप्पा झाल्या. दुसरे दिवशी आम्ही गावात घरी आलो. पाटील साहेबांना एम्बसीमध्ये Ambassedor ला भेटायला जायचे होते.

११.३० ची वेळ दिएी होती, त्याप्रमाणे ते बसने निघाले. एम्बसीत ५ मिनिटे आधी पोहोचले व वाट पाहात बाहेर बसले. कार्ड आत पाठविलेले होते. ११.३० नंतर दहा मिनिटे जास्त वाट पाहिली व बाहेर पडून घरी निघून आले. घरी आल्यावर "भेट झाली का ?" असे मी विचारले तेव्हा म्हणाले, "दिलेली वेळ निघून गेली. कदाचित आता मी मिनिस्टर नाही म्हणून Ambassador ला मला भेटायचे नसेल" ह्यावरून ते कसे मानी होते हे माझ्या लक्षात आले.

सकाळचे संपादक परुळेकर हेही आमचे पाहुणे होते. तेही बाहेर हॉटेलमध्ये राहात होते. आम्ही त्यांना जेवायला बोलाविले. जेवण झाल्यावर थोडा वेळ गप्पा चालल्या. मला म्हणाले, "पुण्याला आलात तर भेटायला या." मी थट्टेने म्हणाले, "कसे यायचे, तुमच्याकडे इतकी गर्दी असते. क्यूच लागलेला असतो." तेव्हा त्यांनी मला उत्तर दिले, "चिठ्ठी पाठवा. मी तुम्हाला लगेच भेटेन." नंतर म्हणाले, "तुम्हाला भारतातून काय पाठवू ?" मी म्हटले, "हापूस आंबा आम्हाला मिळत नाही." अशा गप्पा करून ते दुसऱ्या दिवशी भारताला आले. लगेच ३–४ दिवसांत ४ डझन आंबे आले पण परवानगी मागितलेले पत्र नाही म्हणून आम्ही देत नाही असा विमानतळावरून निरोप आला. फळे पाठवायला स्पेशल परवानगी लागते. आम्ही ऑफिसमधून त्यांना सकाळ ऑफिसात फोन केला. लगेच फोनवर त्यांनी परवानगी मागितली व आंबे घरी आले. आम्ही किती वर्षांत हापूस आंबे खाल्ले नव्हते. त्यामुळे ही पाठविलेली भेट अमोल वाटली. एवढा मोठा माणूस अतिशय साधा व सज्जन.

काही पाहुणे असे आले की, नुसती तोंडओळख, तर काही ओळख नसताना केवळ महाराष्ट्रीयन म्हणून व रोम पाहायचे म्हणून येत.

एकदा हॉटेलमधून मध्यंतरी एक फोन येतो व त्या बाई म्हणतात, "विमानतळावर आला नाहीत, पत्र पाठविले होते तुम्हाला. विचार केला आणि परस्पर हॉटेलातच आलो." संपामुळं पत्र मिळालं नाही पण माणुसकी म्हणून मी पुढे म्हटलं, "काही पैशाची जरूर लागली तर सांगा." तेव्हा त्या बाईंना राग आला. त्या म्हणतात, "आमच्याजवळ पैसे आहेत." मी फोन ठेवून दिला. दोनच दिवसांनी भारतात जायला निघाल्या. हॉटेलचे बिल द्यायला भारतातून आणलेले पैसे कसे पुरणार ? तो जाऊ देईना. शेवटी मी हॉटेलवाल्याला सांगितले, "बाईंना जाऊ दे, मी उद्या तुला बिल देते." त्यानंतर त्या कोण हे आम्हाला कधीच

कळले नाही.

पाश्चात्त्य देशांत जितक्या सुविधा तितकाच त्रास. फोन हा एक तसाच सोयीचा पण अतिशय त्रासदायक. फोन आला की उचला, मग कोण येईल नेम नाही. ओळखीची मंडळी भेटली की खरंच आनंद होतो, पण काही वर्षांनी असे पाहुणे आले की, ज्यांची ओळख तर नाही, पण घरीच राहायचं. एक दिवस विमानतळावरून एक बाई बोलतात, "अहो, मी पुण्याहून आले." पण कोणाच्या ओळखीनं हे काहीच नाही. तेव्हा पुढे बोलतात, "मी तुमच्याकडे राहणार नाही, एम्बसीत रिझर्वेशन केलं आहे." मी म्हणाले, "मग तिकडे जा परस्पर, मी पत्ता देते." बाई तशा वस्ताद. त्या म्हणाल्या, "तुम्हाला भेटायचीही इच्छा आहे." माझा नाइलाज झाला. टॅक्सीनं या म्हटलं आणि बाई खरंच घरी आल्या, मी बिल दिलं. म्हणतात कशा, "शंभर रुपये काहीच नाही. तुम्हाला इथला पगार मिळतो." दुपारी जेवण झालं, एम्बसीत फोन केला. ते म्हणाले, "मिनिस्टर लोकांचे रिझर्वेशन आम्ही करतो. तुमचं इथं काही नाही." बाई म्हणतात, "एम्बसीचे लोक आपले, पण मदत करतात का ?" आता आली पंचाईत. आम्ही म्हटलं, १–२ दिवसांत जातील, पण बाई वस्ताद. माझ्याकडून पैसे घेऊन त्या खुशाल बसमधून हिंडल्या. रात्री ११ वाजेपर्यंत टेलिव्हिजन पाहायचा, आयतं जेवण, सर्व व्यवस्थित, जाण्याचं नावच नाह(. शेवटी दोन दिवसांनी हे म्हणाले, "पाहुणे असले की माझं काम होत नाही." तेव्हा त्यांचं उत्तर, "मला अजून खूप पाहायचं राहिलंय. पुन्हा कोण येतंय ?" शेवटी दोन दिवस आम्ही त्यांना हॉटेलात पाठविलं व पैसे भरले. ह्वायच्या आधी नमस्कार करून गेल्या व नावाचं कार्ड दिलं. ना ओळख ना देख, फुकट पाहुणचार झाला. एकदा हे मुंबईला एक नाटक पाहायला गेले. तेथे शेजारीच ही बाई. तेव्हा म्हणते, "डॉक्टर साहेब, ओळखलं नाही ? मी रोमला आले होते !" हे म्हणाले, "असेल !" मग पुढे म्हणते, "उद्या घरी याल ? आपण बरोबर कुठे तरी जाऊ. त्यांच्या लक्षात बाईचा चेहरा आला. ते म्हणाले, "आलो असतो, पण रात्रीच्या विमानाने परत जातोय." ह्या बाई एकट्याच असाव्यात. बॉसच्या सांगण्यावरून त्यांना रोमला येण्याचा चान्स मिळाला असे आम्हाला नंतर कळले.

आणखी एक उदाहरण. बाई स्वतःच्या खर्चाने हॉटेलात उतरतात. भारतात कुणीतरी पत्ता दिलेला म्हणून फोन करतात. आता महाराष्ट्रीयन म्हणून मी म्हटलं, "उद्या जेवायला या." त्याप्रमाणे टॅक्सी करून आल्या. बाई श्रीमंत. एक

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
३२८९
२१५७०२
विषय ___ क्रमांक




वर्षाकरता परदेशात आलेल्या. जेवायला बसलो. माझे यजमान पायजमा व शर्ट घालून आले. मी ओळख करून देणार एवढ्यात तुच्छतेचा चेहरा करून, "हे कोण हो?" मला ह्या प्रश्नाने राग आला. मी म्हटलं, "माझ्या घरात परपुरुष कोण असणार?" जेवताना स्वतःच्या श्रीमंतीच्या गप्पा. हे जेवून ऑफिसात निघून गेले व पुन्हा म्हणतात, "तुम्ही लोक फारच साधे दिसता हो! काही क्लब, डान्स, सिनेमा वगैरे बघायला जाता की नाही, काय छान आहे इथलं लाईफ." मी काहीच बोलले नाही."संध्याकाळी Open air opera ला तुमचे यजमान येतील का हो माझ्याबरोबर?" मी सांगितलं, "त्यांना वेळ नाही, तुमची जाण्याची मी व्यवस्था करते." आणि त्याप्रमाणे माझ्या नोकराबरोबर त्या जायला तयार झाल्या. दुसरा उपायच नव्हता, कारण ऑपेरा तर बघायचा तेव्हा तिथे संध्याकाळी मी त्यांना पोचवून आले.

जेमतेम १५ मिनिटे ऑपेरा पाहिला व नोकराने त्यांना हॉटेलात पोचविले. नोकर म्हणाला, तुमच्यावर बाई रागावलेल्या दिसल्या. मी बरं म्हटलं.

आणखी एक गंमत. एकदा एक बाई विमानतळावरून टॅक्सी करून दुपारी १ चे सुमारास सरळ घरी आल्या. आत घरात आलेल्या बाईला एकदम जा तरी कसं सांगायचं म्हणून त्यांनी तिला घरात घेतले, जेवण दिले. बाई ह्यांच्याशी मजेत गप्पा मारू लागल्या. मी भारतात होते. जेवण झाल्यावर हे ऑफिसात जायला निघाले, तेव्हा बाई म्हणाल्या, "माझे विमान रात्री १–३० ला आहे, मी येथेच राहते." त्यांना काहीच सुचेना. ते म्हणाले, "माझी बायको घरात नसताना तुम्ही घरात राहावं असं मला नाही वाटत." तेव्हा त्या म्हणतात, "त्यात काय झाल. हा परदेश आहे." ह्यांनी मुकाट्याने त्या बाईची बॅग गाडीत ठेवली व तिला विमानतळावर पोचविले. मला आल्यावंर सांगितले. अशा आगाऊ बायका येतात, काय करावं कळत नाही.

ह्या व्यतिरिक्त कित्येक पाहुणे येत–जात असत. कोणी नुसते भेटायला येत. आमचे मित्र डब्ल्यू. आर. नातू, टेक्सटाईल कमिशनर, मुंबईला होते. ते नेहमी येत असत. डॉ. मिसेस सुरू एक दिवस भेटून गेल्या. रँग्लर महाजनी व सौ. इंदूताई, काही आय.सी.एस्. मंडळी, कामत, जोशी, द्रविड, दामले वगैरे सहज येऊन नुसते भेटून गेले. त्यांच्याकरता विशेष काहीच केले नाही, पण त्यांना भेटण्याचा आनंद मात्र होत असे.

गेल्या २५ वर्षांत किती मंडळी आली याची गणतीच नाही. आम्हालाही वयोमानाप्रमाणे तितकी देखभाल होईना म्हणून पाहुण्याची व्यवस्था आम्ही हॉटेलमध्ये करू लागलो. जेवणखाण व भेटणे आपल्याकडे व रोम पाहणे, हॉटेलमधून आमचे पाहुणे म्हणून हॉटेलचा खर्च आम्ही देणार ह्या व्यवस्थेत कुणालाच बंधन नको, पाहुणे खूष व आम्ही खूष.

# मला दिसलेले रोम

पुण्याला येऊन आज बारा वर्षे होत आली पण आयुष्यातली सुरुवातीची इतकी वर्षे परदेशात घालवली त्यामुळे साहजिकच तिकडच्या आठवणी अजून नेहमी डोळ्यापुढे तरळत असतात. रोममध्ये तारुण्यातले दिवस केव्हा संपले हे कळलेही नाही. मुले वाढली, मोठी झाली, कर्तीसवरती, झाली, आपआपल्या मार्गाला लागली. आता वृद्धापकाळी नुसत्या आठवणी ओठावर येतात. आम्ही दोघे कधी कधी त्या आठवणींत इतके रममाण होतो की, असं वाटतं मधून मधून तिथे जावं, आणि खरंच सेवानिवृत्त झाल्यावरही आम्हाला ३–४ वेळा जाण्याचा पुन्हा योग आला. माझे यजमान (डॉ. सुखात्मे) यांना अजूनही मीटिंगला बोलावितात व मीही बरोबर जाते. रोम हे माझे दुसरे घरच मी समजते. त्यांच्या जीवनाशी मी समरस झाले आणि म्हणूनच इतकी वर्षे केंव्हा गेली हे समजलेही नाही.

सुरुवातीचे दिवस मला आठवतात. आम्ही १९५२ मध्ये तेथे गेलो तेव्हा सुरुवातीला काय काय अडचणी आल्या त्या ऐकण्यासारख्या आहेत. आम्ही रोमला गेलो त्या वेळी चार-पाचच भारतीय कुटुंबे तेथे होती, त्यामुळे साडी, कुंकू, केशरचना या सर्वांचेच इटालियन लोकांना कुतूहल वाटे. इटालीमध्ये भारतीय स्त्रियांना बहुतेक नोकरीत प्रवेश मिळत नाही, त्यामुळे आम्ही कोणीही नोकरी घेतली नाही. त्यातून आंतरराष्ट्रीय कचेरीत भरपूर पगार मिळत असतो आणि नोकरटंचाईमुळे भरपूर घरकामही असते.

सुरुवातीला घर मिळेपर्यंत आम्ही हॉटेलमध्ये राहात होतो. ह्या हॉटेलात टिपिकल (ठरावीक) इटालियन जेवण स्पगेटी, चिकन, मासे, भाजी, सॅलेड, केक वगैरे मिळत असे. मला हे पदार्थ आवडत नसत म्हणून मी बरेच टाकून देत असे.

हे लोक अतिशय बोलके व चौकस वृत्तीचे. सर्व लोकांना आमचा एक विषयच झाला होता. बायका खोलीत येऊन काही तरी बोलत, त्यामुळे थोडी भाषा येऊ लागली व बसमधून फिरण्याची सोय झाली.

एकदा मी बसमधून आमच्या यजमानांच्या ऑफिसमध्ये जायला निघाले. बस स्टॉपवर माणसे गर्दी करून उभी होती. क्यू करण्याची पद्धत नाही. बस थांबल्यावर प्रत्येकाने दुसऱ्याला ढकलून आत शिरायचे व जितकी बसमध्ये मावतील तितकी माणसे भरायची अशी येथील पद्धत आहे. बस सुरू झाल्यावर दारे आपोआप बंद होतात, एवढा सुरक्षिततेचा मार्ग आहे. चढल्यावर लगेच उजव्या हाताला कोपऱ्यात कंडक्टर बसलेला असतो. त्याच्याजवळून तिकीट घ्यावयाचे व पुढल्या दारापर्यंत उतरण्याकरिता पोचायचे. ह्या सर्व गर्दीतून मी एकदाची बाहेर पडले, पण उतरल्यावर माझ्या लक्षात आले की, मी एक स्टॉप चुकून पुढे उतरले आहे. रस्त्यावर थोडी उभी राहून मी ऑफिसची इमारत कुठे आहे ते पाहात होते; परंतु तेवढ्यात माझ्याभोवती माणसांची गर्दी जमू लागली व प्रत्येकजण हातवारे, खाणाखुणा करून माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करू लागले. मी काय बोलणार! खुणेने त्यांना इमारत दाखविली व मुकाट्याने त्या दिशेने चालू लागले.

एक महिना हॉटेलमध्ये राहून घराच्या शोधाला लागलो. तिकडे अशी पद्धत आहे की, एखाद्या कंपनीकडून लोक इमारत बांधतात व नंतर त्यातील प्रत्येक घर वेगवेगळ्या लोकांना विकतात. शिवाय भाड्याचे घरही मिळते पण ते फार महाग पडते. चार खोल्यांच्या ब्लॉकला त्या वेळी रु. ५००–०० पडत. घर घेतानाही घासाघीस असतेच. आम्ही एका इटालियन मित्राच्या ओळखीने घर घेतले व भाडेही ठरविले. आम्हाला दोन महिने गावाला जायचे होते, तेव्हा तो म्हणाला, 'घर ठेवतो, आल्यावर पैसे द्या.' आम्ही दोन महिन्यांनी परत आलो व कळले की त्या मालकाने घर दुसऱ्याला जास्त भाड्याने दिले व ताबडतोब पैसे घेतले. आम्ही काय भांडणार? दुसरे घर शोधले, पण एक धडा मात्र शिकलो. दुकानात तुम्ही काही घ्यायला गेलात तर चटकन काय घ्यायचे ते ठरवावे लागते, नाही तर बरीच भांडणे होतात. एकदा माझी मैत्रीण हिंदुस्थानातून आली होती. तिला स्वेटर घेण्याकरता आम्ही दुकानात गेलो. खूप स्वेटर पाहिले पण तिला कोणताच पसंत पडेना. आपल्याकडे आपण कित्येक वेळा पसंत न करता निघून जातो, पण इथे ती

बाई चिडली. ती म्हणाली, 'शो केसमध्ये सर्व नमुने ठेवले आहेत, त्यातला पसंत करा व मला सांगा. मला जास्त वेळ नाही', असे म्हणून ती दुसऱ्या गिऱ्हाइकांना स्वेटर दाखवू लागली.

इटालियन लोकांना आपल्याला भाषा येवो अगर न येवो चौकशी केल्याशिवाय राहवणार नाही. याचे एक उदाहरण सांगावेसे वाटते. माझी मुलगी एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत येथे आली होती. ती त्या वेळी दिल्लीला शिकत असल्याने तिला तेथील पंजाबी मुलींप्रमाणे सलवार-खमीस घालण्याची सवय होती. आम्ही एकदा रस्त्यावरून जात असताना सरळ एका बाईने आम्हाला प्रश्न केला, 'तुम्ही निजण्याचा पोषाख (Sleeping Suit) घालून रस्त्याने का हिंडता?' मला थोडा वेळ समज होईना, शेवटी ध्यानात आले की पंजाबी पोषाखाला ही बाई निजण्याचा पोषाख म्हणते. तेव्हापासून माझ्या मुलीने तो पोषाख घातला नाही.

पुष्कळ वेळा रस्त्यावरून जाताना कित्येकांना आपले कुंकू पाहून, हे रक्त आले आहे असे वाटते, तर कित्येक हे मोठ्या घराण्यातले शुभ चिन्ह समजतात. हा लाल ठिपका कायमचा की तात्पुरता, हे त्यांना कोडे पडते. तेव्हा कुंकवाचे महत्त्व काय व ते आपण कसे लावतो हे त्यांना समजावून सांगावे लागते.

साडी पाहून त्यांना हा कपडा कसा गुंडाळला आहे, हे कोडे पडते. त्यामुळे रस्त्यात अथवा दुकानात ते नेहमी विचारतात. इतकेच नव्हे, कोणीही हिंदी स्त्री चाललेली दिसली की तिच्याकडे बायका-पुरुष स्वस्थ उभे राहून निरीक्षण करतात. मोटारीतून जाणारे लोक मुद्दाम गाडी थांबवून पाहताना दिसतात.

एकदा आमच्याकडे एक पाहुण्या आल्या. त्या शरीराने जरा स्थूल व वयस्कर होत्या. त्यांना रोम दाखवायला म्हणून मी रोज बाहेर घेऊन जात असे. आमचे शेजारचे सर्व लोक आम्हाला जाताना पाहात असत. थोड्या दिवसांनी पाहुण्या बाई आपल्या गावाला गेल्या कारणाने मी एक दिवस एकटीच काही कामाला निघाले. मला वाटेत एकीने विचारले, 'तुमची आई कुठे गेली?' मला अर्थबोध होईना. शेवटी ठरल्याप्रमाणे तिने खाणाखुणा, हातवारे करून मला समजाविले, आणि मग माझ्या ध्यानात आले की, आमच्या पाहुण्यांना ही बाई माझी आई समजत होती. सांगायचा मुद्दा असा की, नवीन व्यक्तीला पाहून स्वस्थ न बसता मनात येतील ती नातीगोती लावून ते स्वतःच्या मनाचे समाधान करून घेतात. त्यांचे चेहरे भोळे वाटतात तर काही वेळा त्यांच्या क्षुल्लक प्रश्नाने ते अडाणी

वाटतात.

येथे आल्यावर प्रथम भाषा शिकावीच लागते. इथल्या बायकांच्या चौकशा संपतच नाहीत म्हणून एकटे जाऊन बागेत बसता येत नाही. पुष्कळ वेळा मी नातवाला घेऊन बागेत फिरायला जाते तेव्हा मी तोंड उघडायचा अवकाश की, शेजारच्या बाईची चौकशीला झालीच सुरुवात. तुम्हाला किती मुले आहेत, वय किती आहे, राहता कुठे, नोकरी कुठे वगैरे ठरावीक प्रश्नमालिका सुरू होते व जणू तिची–माझी वर्षानुवर्षे ओळख असल्यासारखी ती बाई मला घरातले सर्व सांगते. कित्येक वेळा त्यांचे चऱ्हाट ऐकून कंटाळा येतो, म्हणून काही वेळा मला भाषा समजत नाही असे मी दाखवीत असे. तरी पण हातवारे करून ती काही तरी बोलतच असते. त्यांना काळे डोळे व काळे केस फार आवडतात. बाई सबंध दिवस कितीही कामात असली तरी मुलांना एक तासभर तरी मोकळ्या हवेत घेऊन जाईलच.

**सामाजिक परिस्थिती :**

येथील सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर असे आढळून येते की, हिंदुस्थानातल्याप्रमाणे इथे बेकारी बरीच आहे. शिकलेल्या लोकांना चांगली नोकरी मिळावयास बरेच वशिले लावावे लागतात. मुलांना पहिली पाच वर्षं फुकट शिक्षण घेता येते, त्यामुळे अशिक्षित विशेष आढळत नाहीत. त्यानंतरच्या शिक्षणाचा खर्च जशी माणसांची ऐपत असेल त्यावर अवलंबून राहतो. गरिबांची मुले कुठेतरी दुकानात अथवा हॉटेलात नोकरी धरतात. पगाराचे मान फार मोठे नसते.

इकडील मध्यमवर्गातील बायका घरातील बरीचशी कामे स्वतः करतात. कपडे बाहेर दुकानात धुवायला देणे फार महाग पडते म्हणून पुरुषांचे शर्ट, मुलांचे कपडे, चादरी ह्या सर्व गोष्टी हाताने धुवाव्या लागतात. कपडे धुण्याचे मशिन अगर कपड्याला इस्त्री करण्याचे मशिन कोणाच्या घरी माझ्या पाहण्यात आले नाही. कपडे धुण्याशिवाय स्वयंपाक, मुलांची व नवऱ्याची देखरेख त्या स्वतः करतात.

घरकाम करण्यास बायका मिळतात. एका तासाला त्यांचा दर फार आहे, ज्याला जसे परवडत असेल त्याप्रमाणे करतात. कित्येक श्रीमंत कुटुंबांत घरातील

मुलांना खर्च द्यावा लागतो. वेगळे राहून दोघेही मन लागेल तसे वागत असतात. कित्येक जोडपी जन्मभर स्वतंत्र राहतात. वाटल्यास ते पुन्हा एकत्र राहू शकतात, पण असे क्वचितच आढळते.

इतर देशांतल्या मानाने इटालियन लोक जुन्या वळणाचे आहेत. ते मुलीवर नजर ठेवतात. संध्याकाळी वगैरे ते तिला एकटीला पाठवत नाहीत. पुष्कळ वेळा पाऊल घसरण्याचा संभव असतो तरी पण लग्न होण्यास त्यामुळे जास्त अडचण येते असे नाही. आपल्याकडील मुलींचा उच्च शिक्षणाकडे जास्त कल आहे. येथे पहिल्या पाच इयत्तांचे शिक्षण फुकट आहे त्यामुळे अशिक्षित कोणी आढळत नाही. मुलींना टाईपिंग, स्टेनोग्राफीसारखा कोर्स घेतल्यामुळे चटकन नोकरी मिळते. मध्यमवर्गीय लोकांतही घरातील एकट्या पुरुषाने नोकरी करून भागत नाही त्यामुळे मुलींना नोकऱ्या कराव्याच लागतात. विद्यापीठात जायला पुरेसे पैसे नसतात त्यामुळे उच्च शिक्षणाच्या मागे कोणी लागत नाही.

लग्नानंतर महत्त्वाची घटना म्हणजे मूल लवकर होणे. इटालियन लोक मुलांचे फार शौकीन आहेत. मूल नाही म्हणजे संसार नाही असे ते म्हणतात. तेव्हा एखाद्या जोडप्याला जर मूल लवकर झाले नाही तर लगेच असंतोष निर्माण होऊ लागतो व पुन्हा घटस्फोट अगर वेगळे राहण्याची चिन्हे दिसू लागतात.मूल न होता प्रेमाने संसार करणारी जोडपी विरळा आहेत. आपल्याकडे निदान वडिल माणसे ह्या बाबतीत थोडाफार हातभार लावतात. पण इकडे कित्येक बायकांना तारुण्याचा भर संपल्यावर जन्मभर अविवाहीत राहावे लागते. जोडीदार शोधताना तारुण्य व रूप हेच प्रथम मनात भरते. व नंतर गुणांची परीक्षा होते, ती परीक्षा प्रेमसागराच्या लाटांत कळून येत नाही. दोघेही आपापल्या परीने चांगले वागण्याचा प्रयत्न करतात. त्यात खरा मनुष्यस्वभाव कळत नाही. शेवटी लग्न झाले की थोडे दिवस गाडी रुळावर चालते पण केव्हा घसरेल याचा नेम नसतो. मजूर वर्गातील पुष्कळशी लग्ने सुखावह झालेली आढळत नाहीत शेवटी अशा वेगळ्या राहिलेल्या बायका मोलमजुरी करून पोट भरतात व मुलांचाही सांभाळ करावा लागतो.

सर्व मुलींचे लग्न जमविण्याचे प्रकार सारखेच नसतात. काही मुली आपले प्रेम एखाद्या मुलावर बसले तर त्याला आपल्या घरी आणून आईवडिलांची व घरातील मंडळींची ओळख करून देतात. तो मुलगा नेहमी घरी येतो व घरातील

काम करण्यास सबंध दिवसाची बाई ठेवतात. एक बाई सबंध दिवस जेवूनखाऊन ठेवल्यास खूप खर्च येतो, परंतु एक बाई भांडी घासण्यापासून, धुणे, इस्त्री, मुलांचे काम, स्वयंपाकघरात मदत ह्या सर्व गोष्टी करते. आपल्याकडे एवढे काम करायला तीन नोकर ठेवावे लागतील व शिवाय घरात मालकिणीला राबावे लागेल निराळेच. मुलांना स्वच्छ व नीटनेटके ठेवण्यात इकडच्या स्त्रिया तरबेज आहेत. अगदी मोलकरणीची मुलगी जर तुम्ही रस्त्यात पाहिली तर ती आपल्याकडील साहेबांच्या मुलींपेक्षा सरस वाटेल. मुलांना शिस्त लावण्याच्या बाबतीत ते जास्त खबरदारी घेतात. लहान मुलांच्या कपड्यावर व साधनांवर ते फार खर्च करतात. खातील गरिबांचे, पण कपड्यात हाल करणार नाहीत. आपल्याकडील मध्यम स्थितीतला माणूस मुले लहान असताना बाबागाडी घ्यायची की नाही याचा शंभर वेळा विचार करील व घेणार नाही. मूल मोठे झाल्यावर गाडी वाया जाईल म्हणून तो गाडीऐवजी दुसरी एखादी आपल्याला संसाराला लागणारी उपयुक्त वस्तू घेईल. तिथल्या लोकांना असा पुढचा विचार करायची सवय नाही व पैसा मिळाला की, तो खर्च करायचा अशा वृत्तीचे ते आहेत. मुलांच्या करता स्वतःच्या जीवाची काटकसर करून संपत्ती ठेवावी असे वाटत नाही.

इकडचा नोकरवर्ग कसा काम करतो? असा प्रश्न मी हिंदुस्थानात आले असताना मला पुष्कळ भगिनी विचारतात. त्याचे उत्तर म्हटले म्हणजे आपल्याकडील कामाचे नोकर व इथल्या कामाच्या बायका यांच्यात बरेच साम्य आढळून येते. कामचुकारपणा, अविश्वास, पैसे मिळाल्यावर मालकाची पर्वा नाही. मात्र येथे बाई कामाला ठेवली व ती नशिबाने चांगली मिळाली तर मात्र मालकिणीला मदत होते, पण विश्वासू बाई मिळणे कठीण. माझ्याकडे रोमला आल्यापासून एक तरुण मुलगी होती. तिला आपला सर्व स्वयंपाक करता येतो व ती अतिशय विश्वासू व मायाळू, पण अशा बाया फार क्वचितच आढळतात. आपले काम साधेल त्याप्रमाणे त्या भटकत असतात. मालकाच्या कल्याणाकरिता झटायचे हा व्यवहार त्यांना नसतो. विशेषतः इटालियन तरुण मुली परदेशी माणसांची नोकरी पसंत करतात, कारण त्यांना पगार जास्त मिळतो व स्वातंत्र्यही मिळते. कामाच्या दृष्टीने पाहिले तर ह्यांची काम करण्याची पद्धत आपल्यापेक्षा पुष्कळच सुधारलेली आहे. काम करण्यात त्या ताकदवान आहेत, पण एका घरी

चिकटून राहणे त्यांना पसंत नाही. बेकारी असल्याने ह्या मुली परदेशी माणसाशी लग्न करू इच्छितात.

आपल्याकडील अविभक्त कुटुंबपद्धती येथे पुष्कळ घरांत पाहायला मिळते. एखाद्या वेळेस भावाभावांचे व त्यांच्या बायकांचे पटणार नाही, परंतु वडिलधाऱ्या माणसांना सर्व मुले मान देतात व त्यांनी आपल्याला लहानाचं मोठं केलं ही जाणीव त्यांना असते. रस्त्यातून हिंडताना पुष्कळ वेळा म्हातारी आई मुलाचा आधार घेऊन चाललेली दिसते. बागेत आजी नातवंडांना खेळविताना दिसते. तरुण मुली कामावर जाताना त्यांची मुले, म्हातारी माणसे प्रेमाने सांभाळताना दिसतात. वेगळे बिऱ्हाड केले तरी आईवडिलांना भेटायला येणे ते आपले कर्तव्य समजतात.

**स्त्री जीवनाची कहाणी :**

तरुण मुली तर कारखान्यात जाणे जास्त पसंत करतात. दुसऱ्याची ताबेदारी त्यांना नकोशी वाटू लागली आहे. कारखान्यात किंवा दुकानात आठ तास काम करावे लागते आणि राहिलेल्या वेळात आपल्या प्रियकराबरोबर उद्यानात, समुद्रकाठी अगर डोंगरावर फिरावे आणि वेळ मजेत घालवावा असे त्यांना वाटते. दुसऱ्याच्या घरी काम करणाऱ्या मुलींना तरुणही कमी लेखतात. आमच्या एका बाईला आम्ही ६०० रुपये पगार देत होतो. आठवड्यातून दोन सुट्ट्या. आमचे जेवण तिला आवडत नसे म्हणून तिचा वेगळा स्वयंपाक. पगाराव्यतिरिक्त तिला इन्शुअरन्स् व डॉक्टरी मदतीसाठी वेगळे पैसे द्यावे लागत. उन्हाळ्यात १५ दिवस समुद्रावर जाण्यासाठी ती पगारी सुट्टी घेई आणि वर म्हणते बाई मी स्वतंत्र नाही. घरचे काम तिला काबाडकष्ट वाटत. बक्षीस देऊन तिला मी लवकरच निरोप दिला.

येथील स्त्रिया वरवर खूप आनंदी दिसतील. त्यांचे सामाजिक जीवन सुखाचे आहे असे वाटेल. गुलाबाचे फूल वरून सुंदर दिसते पण त्याला हात लावला तर त्याचे काटे टोचतात. येथील तरुण-तरुणींना लग्न जमविण्याकरता भ्रमराप्रमाणे एका फुलावरून दुसऱ्या फुलावर मध चाखीत हिंडावे लागते. इटालियन लोक कॅथॉलिक धर्माचे आहेत. त्यांच्यात घटस्फोट मिळत नाही. काही विशेष कारण असेल तरच मिळतो. नवरा बायकोचे पटत नसल्यास त्यांना कायद्याने वेगळे राहण्याची परवानगी मिळते. नवरा नोकरीत असला तर त्याला बायकोला व

मंडळीही त्यांची थोडीफार स्वभावपरीक्षा करतात. हाही एक लग्न जमविण्याचा प्रकार आहे. इकडे लहानपणापासून मुलगे व मुलगी एकत्र वाढल्याने साहजिकच संकोचाचे वारे नाहीसे झालेले असते. सार्वजनिक बागेत पुष्कळ वेळा एका ठरावीक जागेत नाच चाललेला असतो. ज्याला पाहिजे त्याने तिकीट घेऊन आत जावे व नाचात भाग घ्यावा. तसेच उन्हाळ्याच्या दिवसांत समुद्रकिनाऱ्यावर वाळूत पडून राहिलेली कित्येक जोडपी दिसतात. अशा तऱ्हेने एकमेकांच्या सहवासात राहून ती आपले प्रेम व्यक्त करू शकतात. सिनेमा व नाटकगृहे ही दालनेही प्रेम करण्यास असतात. समाज त्यांच्याकडे वाकड्या नजरेने पाहात नाही.

येथे स्त्रियांना नोकरी करण्याची काही दालने स्वतंत्र आहेत. त्या ठिकाणी पुरुषवर्ग कमी दिसतो. उदाहरणार्थ, भाजी बाजारात, वर्तमानपत्रांच्या दुकानात, बायकांच्या केस कापण्याच्या दुकानात, किरकोळ मालाच्या स्टेशनरी दुकानात, ग्रामोफोन, रेडियो वगैरे दुकानात, फोटोच्या दुकानात, फर्निचरच्या, कापडाच्या व मोठमोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये सर्व ठिकाणी बायका उभ्या दिसतात. आंतरराष्ट्रीय कचेरीत तर टायपिस्ट, स्टेनोग्राफर म्हणून बायकाच घ्याव्यात असा प्रघात आहे. ह्यावरून असा अर्थ होतो की, पुरुषांच्या बरोबरीनेच काय थोडीशी जास्त दालने स्त्रियांना नोकरी करण्यास उघडी आहेत. घरगुती कामाला मात्र फक्त स्त्रियाच मिळतात.

**घरातले काम :**

इथल्या बायका लग्न झाल्यावर बहुतेक नोकरी करीत नाहीत. घरातले काम स्वतःच करतात. मध्यम वर्गातल्या काही बायका नोकऱ्या करतात. त्या आपली मुले सकाळी ८ ते ४ वाजेपर्यंत शाळेत ठेवतात. पुष्कळशा शाळा नन्स् (Nuns) चालवितात. त्यात फी १०–१२ रुपये होती. ह्या नन्स् मुलांची चांगली काळजी घेतात. दुपारी खायला देतात व त्यांना खेळवितात. काही शाळा येथे खासगी आहेत. त्यात मात्र १२० ते १२५ रुपये फी त्या वेळी होती. ह्यात एक वर्षापासून मुले सांभाळतात. त्यांच्या खाण्यापिण्याची, झोपण्याची, खेळण्याची सोय उत्तम असते. अशा काही शाळा मॉंटेसरी पद्धतीवर चालतात. घरी कामाला बाई म्हणून तिच्यावर मूल सोपविण्यापेक्षा शाळेत पाठविणे त्यांना जास्त पसंत पडते.

आईला याबाबतीत मुले बिघडतील म्हणून काळजी करण्याचे कारण नसते. संसार खूप टापटिपीचा व आकर्षक दिसतो. मुलांना शिस्त फार कडक असते. समुद्रावर मुले खेळताना बिनइस्त्रीचे कपडे घालतील पण फिरायला नेताना मुलांना इस्त्रीशिवाय कपडा घालणार नाहीत. कपड्यांसाठी व मुलांकरिता बराच खर्च करतात. बायका आपल्यासारखीच काटकसर करतात. त्यांची टापटीप व स्वच्छता घेण्यासारखीच आहे.

कॅथॉलिक धर्माप्रमाणे संततिनियमन करता येत नाही. आपल्याकडील खेडेगावांत जशी पुष्कळ मुले होतात तशीच येथेही आहेत. त्यामुळे भारताप्रमाणेच भरमसाठ लोकसंख्या व बेकारी येथे दिसते. शहरातील राहणाऱ्या कुटुंबांत मात्र सुधारणा आढळते.

इटालियन लोकांची घरे स्वच्छ दिसतात याचे मुख्य कारण वर्षातून ९ महिने थंडी असल्याने दारे खिडक्या बंद ठेवायची पद्धत आहे. घराला काचेचे व लाकडाचे असे दुहेरी दरवाजे व खिडक्या असतात. रात्री दिवे सुद्धा कामापुरते लावतात. येथे ऑफिसची वेळ सकाळी ८ ते २ पर्यंत असते. घरी येऊन व्यवस्थित स्पगेटी, मांस, फळे वगैरे भरपूर जेवून, दारे खिडक्या बंद करून झोपतात. त्यानतर पुन्हा ४ ते ८ ऑफिस असते. ह्या दुपारच्या झोपेला शिएस्ता म्हणतात.

माझ्या पाहण्यात आणखी एक गोष्ट नेहमी येत असे ती म्हणजे, हे लोक फुलांचे खूप शौकीन आहेत. प्रत्येक घराला व्हरांडा अगर मोकळी जागा असलीच पाहिजे. त्यातून तऱ्हेतऱ्हेचे वेल व फुलझाडे लावलेली दिसतात. गरिबी असो, श्रीमंती असो फुलांचा गुच्छ घरात असलाच पाहिजे. जागजागी रस्त्याच्या कोपऱ्यात फुलांची भरपूर दुकाने असतात. ऋतूप्रमाणे गुलाब, शेवंती, कॉर्नेशन्स्, ट्युलीप्स्ची फुले फेब्रुवारी मार्चमध्ये येतात. त्याचे रंग व आकार फारच आकर्षक दिसतात. फुलांची प्रदर्शने, खेड्यातून फुलांची मॉडेल बनवून मिरवणुका काढतात. आपल्याकडील जत्रेप्रमाणे लोकांच्या झुंडीच्या झुंडी खेडेगावांत पाहायला जातात. चांगल्या मॉडेलला बक्षीस ठेवलेले असते.

ह्या लोकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदरसत्कार. स्वभावाने लहरी व रागीट असतील पण आभारप्रदर्शन जरूर करतील. घरी येणारा दूधवाला, केरवाला, कामाची बाई यांचे सारखे आभार मानावे लागतात. नाही तर त्यांचा अपमान होतो. भाषा बोलायला मंजूळ व जोडाक्षरे नाहीत. मूल बोलायला लागले

की, त्याला पहिला शब्द आभार शिकवितात. त्याचे एक उदाहरण डोळ्यासमोर आहे. मी एकदा आमच्या मेंडच्या (कामाची बाई) आग्रहावरून तिच्या घरी गेले. तिचे गरिबाचे घर तीन खोल्यांचे. त्यात राहणारी माणसे, तिचे आईवडील व पाच भावंडे. आम्ही गेल्यावर प्रथम तिने घरातील सर्व माणसांची आमच्याशी ओळख करून दिली व मी इटालियनमध्ये त्यांच्याशी बोलू लागले. घर अतिशय स्वच्छ ठेवलेले दिसले. घरात पाणी व दिवे होते. निजायला पलंग व जेवायला टेबल खुर्च्या मांडलेल्या दिसल्या व त्यांच्या पद्धतीप्रमाणे जेवण केले व नंतर थोडा वेळ गप्पा झाल्या. आम्ही इतक्या मनमुराद गप्पा मारल्या की, मी प्रथमच तिच्या घरी आले ही जाणीवसुद्धा मला झाली नाही.

ह्या लोकांची बोलताना नेहमी हातवारे व अवीर्भाव करून मोठमोठ्याने बोलण्याची पद्धत आहे. वेळेचे भान नाही. एक मिनिट म्हणजे एक तासानेही माणूस यायचा. ठरल्या वेळी येणे व काम करणे हे त्यांच्या ध्यानीमनी नसते. उशिरा आल्यावर, माफ करा म्हणतील म्हणजे त्यात सर्व अर्थ आला.

इथे कुणीही इटालियन कुटुंबात गेले तर असेच अगत्य दिसते, मग तो गरीब असो अगर श्रीमंत असो. 'When you are in Rome do as Romans do ह्या म्हणीप्रमाणे थोडी Vino (द्राक्षाची दारू) पिण्यास शिकावे लागते. तुम्ही केव्हाही गेलात तरी ते तुम्हाला पेय दिल्याशिवाय राहणार नाहीत. जेवतानासुद्धा ते व्हिनो घेतात. एक बाटली व एक लिटर साध्या पाण्यात चुना जास्त असल्याने ते पिण्यास जड असते त्यामुळे मिनरल वॉटर (झऱ्याचे पाणी) बाजारात बाटल्यांतून मिळते ते पिण्याची पद्धत आहे. आम्ही तेच पीत होतो.

इथे गरीब लोकसुद्धा आठवड्यातून एकदा बाहेर जेवायला जातात. संध्याकाळी पिझ्झा (Pizza) नावाची भाकरी व त्याबरोबर ताजी दारू पिण्याची पद्धत आहे. हे जेवण दोन-तीन रुपयांत होते. पिझ्झा ही भाकरी मैद्याची केलेली असते. त्यावर ताजे चीज, टोमॅटो, तेल वगैरे घालून ती कोळश्यावर भाजतात. ही भाकरी आपल्या लोकांनाही फार आवडते. मजूर लोक दुपारचे जेवण म्हणून पावामध्ये मांस घालून केलेला सँडविच व बाटलीभर ताजी व्हिनो पितात. खेडेगावातसुद्धा प्रत्येकाला राहायला घरे आहेत. घरात इलेक्ट्रिसिटी व पाणी सर्वांना भरपूर आहे. गरिबी असली तरी आपल्यापेक्षा त्यांना पोटाला पुरेसे व पौष्टिक अन्न मिळते. रोमच्या आसपास आम्ही बरीच खेडेगावं पाहिली पण

उघडीनागडी मुले कुठेच दिसली नाहीत. खाऊनपिऊन सुखी लोक दिसतात.

**भाज्यांची विपुलता :**

सकाळी ८ च्या सुमारास भाजीबाजार उघडतो. त्या वेळी ताजी भाजी मिळते. प्रत्येक मोठ्या चौकात ही दुकाने बसतात. हा बाजार दुपारी १ वाजेपर्यंत उघडा असतो. बायका हातात टोपली अगर ढकलगाडी घेऊन जातात. मध्यभागी भाजी व बाजूला मांसाची दुकाने असतात. सर्व भाव वस्तूवर लिहिलेले असतात. भाज्या हिंदुस्थानपेक्षा महाग आहेत. फळे भरपूर, द्राक्षे, अंजीर, स्ट्रॉबेरी, चेरीज, सफरचंद, संत्री, मोसंबी, वगैरे मिळतात. केळी मात्र आफ्रिकेहून येतात. द्राक्षाच्या खूप बागा आहेत त्यापासून खेडेगावात बिअर व व्हिनो तयार करतात. ऋतूमध्ये द्राक्षांची मिरवणूक खेडेगावांतून काढतात. लोक ती बघायला जातात. लहान-सहान सील केलेल्या व्हिनोच्या बाटल्या लोकांच्याकडे मिरवणुकीतून फेकतात.

मसूर व मटार एवढ्याच डाळी मिळतात. मसाल्याचे पदार्थ, धने, जिरे, हळद, मोहोऱ्या, दालचिनी, लवंगा, वेलदोडे, केशर वगैरे मिळते. मसाल्याचे एकच दुकान आहे. माल अगदी जुना असतो म्हणून आम्ही घेत नाही. पोळीचे पीठ सर्रास दुकानात मिळत नाही. त्याचेही एकच दुकान आहे. तो हिंदी कुटुंबाकरिता हे पीठ करतो. बेसनही तेथेच मिळते.

इथला भाजीबाजार दुपारी एक वाजता बंद होतो. नंतर ती जागा स्वच्छ धुऊन संध्याकाळी हवा खाण्यास खुर्च्या टेबले मांडतात व मोकळ्या हवेवर लोक कॉफी पिण्यास थंडीच्या दिवसांत थोड्या उन्हात बसतात. येथे चहा बहुतेक लोक पीत नाहीत. तरुण मंडळी आहाराकडे लक्ष ठेवतात पण लग्न झालेल्या स्त्रिया व विशेषतः मुले झालेल्या स्त्रिया लठ्ठ असतात. आहारात भरपूर तेल, तळलेले पदार्थ व स्टार्चयुक्त जिन्नस भरपूर असतात.

मोकळ्या हवेचे महत्त्व या लोकांना फार वाटते. रोमची हवा नेहमीच चांगली असते. उन्हाळ्यात उष्णतामान ३८ डिग्री (सें.) पर्यंत जाते, त्याला हे लोक अतिशय उन्हाळा समजतात. त्या वेळी रस्त्यात, घरीदारी Caldo, Caldo (गरम, गरम) असे शब्द ऐकू येतात. जुलै व ऑगस्ट हे महिने उन्हाळ्याचे असतात. त्या दिवसांत समुद्रकिनाऱ्यावर घरे घेऊन लोक राहतात. ऑफिसला पुष्कळसे लोक सुट्टी घेतात, मग सबंध दिवस समुद्रात पोहणे व वाळूत पडून करपणे (Tan) हे त्यांना फार आवडते. हे दोन महिने सोडले तर बाकी

थंडीच असते. रोमला बर्फ विशेषतः पडत नाही पण उत्तरेच्या बाजूला पडतो. दोन वर्षांपूर्वी एकदा येथे बर्फ पडला होता त्या वेळी गेल्या तीस वर्षांत असा बर्फ पाहिला नाही असे लोक म्हणत होते. थंडीच्या दिवसांत उन्हात फिरणे, पिकनिकला जाणे ह्या गोष्टी ते सर्रास करतात. मोटारीतून लांबलांब फिरण्याची त्यांना फार हौस आहे. मुलांना बाबागाडीतून फिरविताना पुष्कळशा बायका दिसतात. सुट्टीचा दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते बाहेर घालवितात. रोमच्या आसपास सहलीला जाण्याच्या खूप जागा आहेत. सरोवरे व बागा मोठ्या प्रमाणावर आहेत. कुठेही गेले तरी बसण्याची व खाण्याची सोय असते. ज्या लोकांना मोटार नसेल ते स्कूटरवरून जाताना दिसतात. खेड्यातील लोक पायी ऊन खाताना दिसतात.

इटालियन सरकारतर्फे येथे एक म्हाताऱ्या मंडळींच्याकरिता संस्था काढलेली आहे. त्यात पेन्शनर पुरुष व बायका, ज्यांना कोणी नात्याची माणसे नसतील असे लोक ह्या संस्थेत राहतात. सरकारतर्फे त्यांना खाणेपिणे व राहायला जागा मिळते. ज्यांना आपले आयुष्य कंटाळवाणे झाले आहे असे कित्येक लोक इथे आनंदात राहतात. त्यांना पाहिजे असलेली त्यांच्या वयाची संगत मिळते. हे लोक नेहमी मोकळ्या हवेत आनंदाने दिवस घालवताना दिसतात.

इथे नातेवाईक मंडळी सणाच्या दिवशी एकमेकांकडे जेवायला जातात. पण राहायला जाण्याची पद्धत त्यांच्यात नाही. लग्नप्रसंगी सुद्धा राहायला जात नाहीत. लग्नाचा आहेर आदले दिवशी पाठवितात व त्यात शुभ चिंतनाची एक चिठ्ठी असते. लग्नानंतर हे जोडपे पाहिजे असल्यास स्वतंत्र राहते, अगर मुलगी व जावई मुलीच्या घरी राहतात. जावयाला सासूकडे राहायला संकोच वाटत नाही. राहाण्याचे व जेवणाचे थोडे पैसे देतात. सासरच्या माणसात मुलीने राहण्याची पद्धत नाही. जर ती स्वतंत्र बिऱ्हाड करून राहात असेल तर नवऱ्याला सोडून आपल्याकडील पद्धतीप्रमाणे माहेरपणाला अगर बाळंतपणाला राहायला येत नाही. आपल्याप्रमाणे मुलांची नावे नवीन नवीन न ठेवता जुनीच आजी-आजोबांची नावे पुन्हा प्रचारात आणतात. बहुतेक नावे साधुसंतांची ठेवतात. हॉस्पिटलमधून आल्यावर स्त्रिला कुठलेच पथ्य नसते. मुलाला दहा दिवसापासून मोकळ्या हवेत ठेवतात. दोन महिन्यापासून शिजलेल्या भाज्या, मांसाहारी सूप द्यायला सुरुवात करतात. चांगले अन्न व मोकळी हवा यामध्ये वाढलेली मुले बाळसेदार असतात.

हॉस्पिटलमधून औषधे फुकट मिळण्याची सोय आहे. लहान मुलांची खेळणी व कपडे येथे छान मिळतात.

**लोकभ्रम :**

आपल्याप्रमाणे लोकभ्रमही ह्या लोकांत पुष्कळ आहेत. तेरा तारीख नेहमी वाईट समजतात. मांजर घरात आल्यास, त्याला खाऊपिऊ घालायचे. शुक्रवारी जनावराचे मांस खायचे नाही. त्या दिवशी मासे व भिजवलेले हरभरे खातात. दर रविवारी चर्चमध्ये जायचे. तसेच त्या दिवशी दफनभूमीवर जाऊन आपल्या पूर्वजांना फुले वाहायची. येशू व त्याची आई (मरीया) ह्यांच्या तसबिरी घरी व रस्त्यावर कोपऱ्याकोपऱ्यात आहेत. त्या तसबिरीजवळ फुले व मेणबत्ती ठेवलेली असते.

**परदेशी पाहुणे :**

रोममध्ये टुरिस्ट ही एक आजीब चीज आहे. रोमला ऐतिहासिक दृष्टया फार पुरातन काळापासून महत्त्व आहे. तिथले जुने अंश, कलोसियम, सेंट पीटर चर्च, व्हिला बोर्गीस, बाग व आजूबाजूचे तलाव, तिव्होलीचे नैसर्गिक पाण्याचे झरे वगैरे अनेक गोष्टी लोकांना आकर्षक वाटणाऱ्या आहेत. शिवाय हवामान उत्तम त्यामुळे साधारण एप्रिल महिन्यापासून टुरिस्टची गर्दी गावात दिसू लागते. त्या वेळी पाहुणे मंडळीचे तांडे फिरत असतात. विशेषतः सेंट पीटर चर्च पाहण्यास सबंध जगातले लोक इस्टरला व नाताळात खूप जमावाने येतात. चर्चचा सबंध चौथरा माणसांनी फुलून गेलेला असतो. पोपचे दर्शन त्या दिवशी घडते. त्याची समजूत की, पोपच्या आशीर्वादाने आपली पापे आपोआप धुऊन जातात. धर्मगुरू पोप सेंट पीटरच्या एका भव्य खिडकीतून आपले दोन्ही हात बाहेर काढून सहा वेगवेगळ्या भाषांत लोकांना आशीर्वाद व येशूचे महत्त्व पटवून देतात.

ह्या टुरिस्टमुळे रोम शहराला नवीन पालवी फुटते व जुने झालेले अवशेष दुरुस्त करण्यास लागणारा खर्च सरकारकडून सढळ हाताने केला जातो. ही टुरिस्टची सोंगे बघण्यासारखी असतात. रस्त्यांत मोठ्याने बोलणे, हातात रोमचे गाईड व नकाशा, गळ्यात जानव्याप्रमाणे अडकविलेला कॅमेरा व जागोजाग प्रेक्षणीय स्थळांचे फोटो घेणे चालू असते. ह्यात विशेष संख्या अमेरिकेतील वयस्क

स्त्रियांची असते. आयुष्य उपभोगून राहिलेला पैसा असा खर्च करतात. पाऊस असो, थंडी असो, वारा असो अंगात व्यवस्थित कपडे घातलेली ही सोंगे रस्त्याच्या मध्यभागी उभी राहून कुठेतरी निसर्ग पाहताना दिसतात. शहराला हे तीन चार महिने नवचैतन्य आलेले दिसते. वसंत ऋतूची झाडाला हिरवी पालवी फुटूलागते. कधी पाऊस, तर कधी ऊन असा हा निसर्गाचा लपंडाव चाललेला असतो. जणू काही हिरवा गालीचा पसरल्याचा भास होतो. जागोजाग थंड पाण्याचे नळ सतत वाहात असतात. तिव्होलीचे झरे शोभायमान दिसतात. रायवर नदीचा ओघ संथपणे सबंध गावात वाहात असल्याने सगळीकडे गारवा पसरलेला वाटतो. अशा ह्या सुंदर नगरीत टुरिस्ट आल्यास नवल ते काय ? इटालियन सरकारला टुरिस्टचे उत्पन्न भरपूर मिळते. ह्यावरून टुरिस्टच्या उत्पन्नावर लोकांची उपजीविका किती अवलंबून आहे हे कळून येते.

**भारतीय स्त्रियांचे जीवन :**

आमचा वेळ कसा जातो हा मोठा प्रश्न मला नेहमी इकडे आले असताना आमच्या भगिनी विचारतात. रोममध्ये विशेषतः परदेशी साडीवाल्या बायका एकट्या फिरत नाहीत. लोक पाठीमागे लागतात व सुरक्षिततेच्या दृष्टीनेही धोक्याचे आहे. तसे कामानिमित्त बाहेर जावेच लागते. घरातले काम करायला बहुतेक तासाच्या हिशोबाने बाई ठेवतो. त्यामुळे बाहेरची कामे घरच्या गृहिणीला पाहावी लागतात. जेवायला आठवड्यातून एकदा तरी मंडळी बोलवावी लागतात. मग हे स्वयंपाकाचे काम स्वतः गृहिणीला करावे लागते त्यामधून केव्हातरी आपल्यालाही बाहेर पार्टीला आमंत्रण असते. घरात मूल एकटे असल्यास बाईची सोय करावयास पाहिजे. त्याशिवाय मोटारीतून सहलीला जाणे, सिनेमाला जाणे, नाचाला जाणे, पत्ते खेळणे हे कार्यक्रम सुट्टीच्या दिवशी असतात. शिवाय आमची सर्व हिंदुस्थानी कुटुंबे जवळजवळ राहात असल्याने जाणे येणे नेहमीच चालू असते.

आम्ही सर्व हिंदू कुटुंबे मधून मधून एकमेकांकडे जातो. महिन्यातून एकत्र जेवतो. प्रत्येकाने प्रत्येक पदार्थ करून आणायचा व घरच्या बाईने फक्त भात करायचा. त्याला पॉट लक म्हणतात.

आणखी एक मोठी जबाबदारी आम्हाला घ्यावी लागते. आपल्याकडे श्रीमंत लोक ज्यांना परवडेल ती मोटार चालविण्यास ड्रायव्हर ठेवतात परंतु सामान्य

माणसाला येथे ड्रायव्हर ठेवणे परवडत नाही. माझा ह्या बाबतीतला अनुभव ऐकण्यासारखा आहे. येथे ड्रायव्हिंग शिकविण्याचे बरेच वर्ग आहेत. मात्र इटालियन बायका विशेष गाडी चालविताना दिसत नाहीत. पहिल्या दिवसापासून ते आपल्याला मोठ्या रस्त्यावर गाडी चालवायला शिकवतात. अशा तऱ्हेने दोन तीन दिवस गेल्यावर आपला भित्रेपणा नाहीसा होतो व आपल्याला बराच विश्वास वाटू लागतो. दहा ते बारा धडे घेतले की, ते लायसेन्स् घ्या असे सांगतात. लायसेन्स देताना प्रश्न व नियम विचारतात पण एकदा लायसेन्स हातात पडले की, मग नियम वगैरे गुंडाळून गाडी चालवायची. भर रस्त्यावर लाल दिवा पाहून आपण थांबलो व मग सुरू करायला वेळ लागला तर मागच्या थांबलेल्या लोकांना बिलकूल धीर नसतो. ते नियमाच्या विरुद्ध वाटेल त्या बाजूने तुमच्या पुढे जातात. प्रत्येकाने शक्य तितक्या लवकर पुढे जायचे हे एकच धोरण आहे. त्यामुळे अपघाताचे प्रकार जास्त होतात. पोलिस पुष्कळ वेळा परदेशी बाई पाहून मदत करतात. एकदा आमच्या एका मित्राने एका इटालियनला विचारले, " अहो ! येथे गाडी किती वेगाने चालवायची परवानगी आहे ? " तो हे ऐकून रागावला व म्हणाला, " अहो ! मर्यादा कसली? गाडी वाटेल त्या वेगाने चालवावी. " आमचे सद्गृहस्थ गप्प बसले. डिप्लोमॅटिक स्टेटसच्या गाडीवर सी.डी. अशी पाटी असेल तर मात्र पोलिस हमखास मदत करतात. येथे लोकरीचे कापड, स्वेटर, रग, चामड्याच्या पर्स, बूट, काचा, पांढरा दगड हे सर्व खूप मिळते. त्यामुळे पैसे खर्च करण्यास बराच वाव मिळतो. कधी कधी चैनीची सवय लागते. साड्या मात्र कधीच मिळाल्या नाहीत. दुसऱ्या देशाहून आम्ही मागवत असू. तिथले नाणे लिरा हे आहे,त्या वेळी पाच लिरापासून हजार लिरापर्यंत नोटा असत त्यामुळे तिथल्या पैशात आपण लक्षाधीश आहोत असे वाटे.

यांत्रिकी युग :

इतर सुधारलेल्या देशांप्रमाणे रोम आता यांत्रिकी युगात खूप पुढे येत आहे. आम्ही होतो त्या वेळचे रोम व आताचे यात खूप फरक आढळतो. आता तेव्हापेक्षा दहापट महागाई झाली आहे. कामाला बाई ठेवणेही परवडत नाही. तासाला १५ रुपये पडू लागले आहेत. आंतरदेशीय लोकांचे पगारात वाढ आहे, पण इटालियन लोकांचे पगार त्या मानाने वाढले नाहीत. बऱ्याच गृहिणी आता कपडे धुण्याचे

मशिन, प्लेटी धुण्याचे मशिन, केर काढण्याचे मशिन, टोस्टर वगैरेचा उपयोग करीत आहेत. रस्त्यावर धुण्याची यंत्रे लावली आहेत. त्यामुळे पुष्कळशा स्त्रिया दुपारी कपडे धुवायला दुकानात जातात.

स्त्रियांच्या पोषाखात बदल झाला आहे. आता स्कर्ट ऐवजी पॅन्ट व टॉप (कुडता) असा पोषाख झाला आहे. घरभाडी, किराणा माल, भाजीपाला सर्व राहणीमान दसपट वाढले आहे. Self Service (स्वतः दुकानातून घेणे) ची दुकाने निघाली आहेत. त्यात खाण्याचे पदार्थ, तयार बॅगमध्ये मिळतात. दरवाजात आत गेल्यावर ढकलगाड्डी घेणे व जे सामान पाहिजे ते गाडीत ठेवणे, कॅशियरजवळ पैसे देणे, ह्यात सर्व भाज्या, कडधान्ये, तसेच बर्फात शिजवून ठेवलेले पदार्थ प्लॅस्टिक बॅगमध्ये मिळतात. घरी आल्यावर ते नुसते गरम करून खाणे.

रोमला चार पाच वर्षांपूर्वी ह्यांना ऑफिसमध्ये काही सेमिनारसाठी बोलाविले होते. पंधरा दिवस आम्ही दोघे गेलो होतो. काही जुने मित्रमंडळी भेटली. खूप आनंद झाला. इटालियन मैत्रिणी भेटल्या. एकटे फिरण्याची आता सोय नाही. सगळीकडे भित्या निर्माण झाल्या आहेत. आता जवळ जवळ चाळीस भारतीय कुटुंबे आहेत.

तेथे असताना एक दिवस आम्ही फिरायला म्हणून बाहेर पडलो व कॉफी घेण्यास उन्हात टेबले ठेवली होती त्यावर बसलो. दोन कापूचिनो (कॉफी) व दोन चीज सँडविच घेतली. काऊंटरवर जाऊन बिल घेतले. बिलावर लिरा ३५०० असे होते. आम्हाला बिल पाहून खूपच आश्चर्य वाटले. पूर्वीपेक्षा हे बिल दहापट होते. साधे सॅलड भाजी वगैरे सर्व किमती अशाच वाढलेल्या आढळल्या. हॉटेलचे दरही असेच वाढलेले आढळले. आम्ही मित्रांच्याकडे जेवत होतो त्यामुळे आम्हाला तसा खर्च आला नाही.

माझे पंधरा दिवस खूप मजेत गेले. मित्रमंडळीबरोबर जुन्या आठवणींवर गप्पा झाल्या. इटालियन मैत्रिणींबरोबर इटालियन बोलायला मिळाले. माझी जुनी मेड (कामाची बाई) भेटायला आली. मला खूप आनंद झाला. रोज इटालियन जेवण जेवायला मिळे. कॉफी पार्टी, ब्रीज वगैरे खेळून घेतले व त्या सुखद आठवणी घेऊन भारतात परतलो. रोम खूप बदलले यात शंकाच नाही.

--x--

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२८९
२५७०२
२८।८।८८

# जया

हॉलंडची राजधानी Amsterdam येथे दोन वर्षांपूर्वी जाण्याचा मला योग आला. माझ्या यजमानांना Statistical Conference करता दोन आठवडे तेथे बोलाविले होते. म्हणून मीही त्यांच्याबरोबर गेले होते. ह्या Conference ला जवळ जवळ हजार डेलिगेशन्स आले होते. ह्यांच्या शाखेतील बरेचसे जुने मित्रमैत्रिणी भेटतील म्हणून आम्हाला आनंद वाटत होता. ठरल्याप्रमाणे Conference चे उद्‌घाटन झाले व बऱ्याच लोकांची भाषणे झाली. संध्याकाळी Reception चा प्रोग्रॅम होता. सर्व स्त्रीपुरुष Formal पोषाखात दिसत होते. सर्व जातीय लोकांत एकात्मता दिसत होती. आमच्या काही मित्रमंडळींच्या समवेत आम्हीही आनंदाने गप्पा मारीत हिंडत होतो. वेगवेगळ्या देशांतून, भारतीय लोकही बरेच आले होते. आम्ही आमच्या काही मित्रांबरोबर एका टेबलावर खातपीत बसलो होतो. इतक्यात यांच्या ओळखीचे एक स्त्री व पुरुष भेटले, त्यांनी ह्यांना हॅलो केले. माझी ह्यांनी त्या बाईशी " जया " व पुरुषाची " म्हल्होत्रा " म्हणून ओळख करून दिली. मीही हॅलो केले व म्हटले "Whydon t you join us" लगेच ते "O.K." म्हणाले व आपल्या प्लेटी घेऊन आमच्या टेबलावर बसले. जया व मी शेजारी शेजारी गप्पा मारायला बसलो. तिने वेषभूषा छान केली होती. रेशमी पटोला, त्यावर साजेसा ब्लाउज, कानात मोत्यांची कर्णफुले, त्याला मॅचिंग मोत्याचा सर, बांगड्या, हातात मखमली पर्स असा तिचा थाट होता. तिच्या केसांचा बॉबकट तिला खुलून दिसत होता. दिसायला म्हणावं तर काळी, भयंकर उंच पण मेकपने सर्व झाकून टाकले होते. तिला बायकी गप्पात एवढा रस दिसला नाही. का कुणास ठाऊक कदाचित ती स्वतः संख्याशास्त्रात प्रोफेसर होती व त्याकरिता ती ह्या Conference ला आली होती. मला ह्यांनी

जयाची ओळख करून दिली व मल्होत्राची वेगळी ओळख करून दिली. त्यावरून त्यांचे दोघांचे नाते नाही व ती अविवाहित असावी असे वाटले.

सबंध दिवस Conference चाले. दुपारी लंचकरिता दोन तास मिळत. जया आमच्याच हॉटेलमध्ये होती. कारण दुसरे दिवशी आम्ही सकाळी ब्रेक–फास्टला टेबलावर बसलो. ती आम्हाला 'हॅलो' म्हणून आमच्याच टेबलावर बसली. ह्यांचा व तिचा विषय Statistics असल्याने तिला ह्यांच्याशी बोलायला आवडे व बऱ्याच गोष्टी ते चर्चा करीत. तिची व ह्यांची खूप वर्षाची ओळख असावी असे मला वाटले.

त्यानंतर शेवटच्या दिवशी आम्हाला sight-seeing ला नेले होते.त्या दिवशी जयाने अमेरिकन पोषाख केला होता. निळ्या रंगाची जीन, लाल टी शर्ट, मध्ये भांग व दोन्ही बाजूला उडते केस असा प्रवासी पोषाख तिला छान दिसत होता. ती स्मार्ट दिसत होती.

Conference चे दोन आठवडे मजेत गेले. मंडळी आपआपल्या गावी निघून गेली. आम्हीही तेथून शिकागोला आमच्या मुलाच्या घरी गेलो. शिकागोला असताना माझ्या मनात रोज मीटिंगचे हे दोन आठवडे आठवत असत. मी जयाला रोज पाहात होते. तिने मला हॅलो म्हणण्यापलीकडे काहीही विचारले नाही. तशा बायका बऱ्याच आल्या होत्या. आम्हाला दुपारी २ ते ५ पर्यंत साईट सीईंगला नेत होते पण जया नेहमी मीटिंगमध्येच बसलेली असे. तिला एकाही बाईशी बोलताना मी पाहिले नाही, आणि का कुणास ठाऊक तिला पाहिल्या पासून माझ्या मनांत काही वेगळेच कुतूहल वाटत होते. कारण उंची पुरुषासारखी जवळ जवळ ५–७ इंच, वर्ण काळा, आवाज घोगरा व पुरुषी चालण्याची ढब, सरळ ताठ मानेची, छातीचा आकारही वेगळा, केस राठ व राकट हे सर्व पाहून मनात वाटे ही अमेरिका आहे. काही तरी इथे वेगळे पाणी मुरत आहे. पुरुषाशी बोलताना स्त्रीची नैसर्गिक शालीनता कुठेच दिसली नाही. मीटिंगला पुष्कळ तिच्यासारख्या शिकलेल्या बायका आल्या होत्या. माझ्याशी बोलत होत्या व आम्ही एकमेकींशी आमचा संसार, मुले वगैरेही विषयही बोलत असू. पण जया मात्र नेहमी पुरुषांना लगट करून बोलताना दिसे. हे प्रकरण दिसते तितके साधे नाही असे मला वाटे. माझ्या डोक्यात तिचे विचार सतत घोळत राहिले. मुलांच्यासमोर मला ह्यांना जयाबद्दल विचारायचे नव्हते, पण एक दिवस मुले व नातवंडे काही कामाला बाहेर

गेले होते. मला जयाचे कोडे जाणून घेण्यांची उत्सुकता होती. त्या दिवशी मी त्यांना सरळच प्रश्न केला तेव्हा ते म्हणाले, " तुझी उत्सुकता रास्त आहे. जया ही खरी पुरुष होती. पण तिला स्त्री व्हावे असे वाटले आणि म्हणून ती स्त्री झाली ". मी हे ऐकून आवाक झाले आणि म्हणाले, " काय तरी बाई अमेरिकेत काय घडेल याचा नेम नाही. " तेव्हा ह्यांनी सांगितले, " तो एक मोठा इतिहास आहे. केव्हातरी सर्व सांगेन." आता तरी तुझी उत्सुकता भागली ना? इतक्यात मुले आली व आम्ही संभाषण तेथेच थांबविले.

एक दिवस सकाळी आम्ही ब्रेक–फास्ट वगैरे करून बाहेर जाणार होतो एवढ्यात टेलिफोन वाजू लागला. आमच्या मुलाने फोन घेतला व तो ह्यांना म्हणाला, "डॅडी, तुमचा फ़ोन आहे." ह्यांनी रिसीव्हर उचलला व ते बोलू लागले. ह्यांचा विद्यार्थी डॉ. शास्त्री म्हणून पिटस्‌बर्गला राहात होता त्याचा फोन होता. तो ह्यांना लेक्चरला बोलावीत होता. ह्यांनी आमंत्रण मान्य केले. दोन तीन दिवसांनी ते तेथे गेले.

तेथे पुन्हा त्यांना जया भेटली. तीही काही लेक्चर्स देण्याकरिता आली होती. ती ह्यांना म्हणाली, "उद्या माझेकडे तुम्ही चहाला या." हे 'होय' म्हणाले. तिने आपल्या गाडीत ह्यांना बसविले, जाताना वाटेत केक घेतला. घरी तिने चहा केला व दोघांनी केक व चहा घेतला. ती एकटीच होती. लेक्चर देऊन हे परत शिकागोला आले.

त्यानंतर लवकरच आम्ही परत पुण्याला आलो. नेहमीप्रमाणे आमचे व्यवहार सुरू झाले. मात्र ह्या ट्रीपवरून आम्ही घरी आलो पण का कुणास ठाऊक जयाचा विचार अजूनही मनात सारखा घोळत होता. पुरुषांबरोबर तिचे मनमोकळे बोलणे, वागणे हे तर होतेच. अमेरिकेत स्त्री पुरुष मनमोकळेपणाने वागतात. त्यांच्यात समाजाची बंधने शिथिल आहेत हे सर्व मी पाहिलेले होते. पण तसे पाहिले तर तिचे वय ६० च्या घरात असावे असा मी अंदाज केला, आणि ह्या वयात सेक्स बदलणारे मला विपरीतच वाटले.

एक दिवस ह्यांच्या ऑफिसमधून मी लंचला येत नाही, जया येथे आली आहे, तिच्याशी काही discuss करावयाचे आहे असा फोन आला. मी एकटीनेच जेवून घेतले. पण मनात विचार आला ह्यांच्याशी लगट करते हे मला पाहावत

नाही, काय नेम सांगावा. दुसरे दिवशी मी ह्यांना म्हटले, 'अहो.' "जया जया" करता ही बाई वृत्तीने कशी आहे हो? अमेरिकेत राहून पुरुषांशी किती लगट करते. तुम्ही तिच्या फार जवळ जाऊ नका. मला तिचे वागणे आवडत नाही." तेव्हा हे म्हणाले, "अग ह्या वयात ती मला काय करणार आहे? मी तिला व आणखी एक माणसाला लंचला बोलाविले आहे." मी बरं म्हटले, दुसरे काय करणार?

दुसरे दिवशी बोलावल्याप्रमाणे जया सुंदर साडी, दागिने वगैरे घालून व्यवस्थित आली होती. ऑफिसमधून येताना ते जयाला व दुसऱ्या गृहस्थांना घेऊन आले. आमचे दुसरे मित्र पुण्याचेच होते. ते आपल्या घरून आमचेकडे लंचला आले. त्यांची व जयाची ओळख नव्हती. ह्यांनी त्या गृहस्थांची ओळख करून देताना जयाकडे पाहून हे म्हणाले, "हे जयप्रसाद माझे मित्र I mean जया, अमेरिकेला असतात," ह्यांच्या तोंडातून जयप्रसाद हे नाव ऐकल्यावर मी मनात म्हणाले की जयाचे खरे नाव जयप्रसाद आहे? ते मित्र हे नाव ऐकून थोडा वेळ बघतच राहिले. चुकून ह्यांच्या तोंडात दुसऱ्याचे नाव आले असे ते धरून चालले. मीही त्या वेळी काय बोलणार? काहीच बोलले नाही. आमची सगळ्यांची जेवणे झाली व मंडळी शेकहँड करून निघून गेली.

संध्याकाळी सहा वाजता हे नेहमीप्रमाणे घरी आले. आम्ही दोघे चहा घेत होतो. आज मी ह्यांना विचारायचं ठरविलं. माझ्या मनात एकच विचार घोळत होता. मी ह्यांना म्हटले, "तुम्ही जयाला जयप्रसाद का म्हटलंत" तेव्हा ते म्हणाले, "अग तो खरा पुरुषच होता." मी उद्गारले, "हो! ते मला तुम्ही सांगितलेत, पण माझा विश्वासच बसत नाही." मी पुनः म्हंटले, "अहो खरं सांगा ना हा तुमचा मित्र पुरुष होता, मग बाई कशी झाली? मला जयाचं कोडं पडलं आहे" आणि त्या दिवशी ह्यांनी मला जयाची संपूर्ण हकीगत सांगितली.

जयप्रसाद हा दिल्लीत राहणारा. त्याची भाषा हिंदी व मूळचा तो यु.पी.त राहणारा. दिल्लीला त्याने संख्याशास्त्रात डिग्री घेतली. नंतर त्याच्या हुशारीमुळे त्याला अमेरिकेत प्राध्यापकाची नोकरी मिळाली. त्याचे लग्न जुन्या पद्धतीने झालेले असून त्याची बायको तशी शिकलेली नव्हती. त्यांना चार मुले. अमेरिकेत मुले चांगली शिकली सवरली व शहाणी झाली. संसार व्यवस्थित चालला होता. बायको जुन्या वळणाची. ती नोकरी वगैरे करीत नव्हती. नवऱ्याची व मुलांची ती

मनापासून काळजी घेई.

असा जवळ जवळ २०–२२ वर्षांचा काळ निघून गेला. जयप्रसाद बावीस वर्षांत अमेरिकेतल्या वातावरणात खूपच रमला होता. मित्रमंडळींचा परिवार वाढला होता. नेहमी पार्ट्या करी, बायको स्वयंपाक वगैरे छान करी. मित्रमंडळी बरोबर थोडे ड्रिंक घेणे त्याला आवडे. पण व्यसनाच्या अधीन मात्र तो झाला नाही. तसेच तिकडच्या वातावरणामुळे त्याला बायकांशी गप्पा करायला आवडत व पार्टीत तो खेळीमेळीचे वातावरण निर्माण करी. घरात पत्नीबरोबर व मुलांबरोबरही तो चांगला वागे. खरे म्हणजे त्याला नावे ठेवायला कुठेच जागा नव्हती. ह्यांचा तर तो कित्येक वर्षे मित्र आहे.

आता एकाएकी ह्याच्या भावना का बदलत चालल्या हे घरात कुणालाच कळले नाही. त्याने सेक्स बदलण्याचा निर्णय घेतला. तो डॉक्टरकडे तपासणीस गेला व डॉक्टरांनी त्याला तपासून सांगितले की ह्या गोष्टीस ३–४ वर्षे लागतील, कारण दोन तीन वर्षे औषधे घेऊन शरीरातले हारमोन्स बदलावे लागतील. तसेच ही फार अवघड तपश्चर्या आहे. एकदा बाई झाल्यावर पुरुष होता येणार नाही. तुमचा संसार, बायको, मुलेबाळे ह्याबद्दल तुमच्या भावना वेगळ्या होतील. ते तुमच्याकडे वेगळ्या भावनेने पाहतील तेव्हा बायकोचा घटस्फोट व मुलांची संमती ह्या गोष्टींचा पूर्ण विचार आधी करावा लागेल.

ह्या सर्व अटी मान्य करणे वाटते तितके सोपे नव्हते. पण त्याचा सेक्स बदलण्याचा निश्चय कायम होता. त्याकरता तो वाटेल ते करायला तयार होता. डॉक्टरांनी हे सर्व सांगितल्यावर त्याने स्वतःचे डिपार्टमेंटमध्ये एक नोटीस पाठविली. त्यात २–३ वर्षांत आपण स्त्री होणार आहोत. " स्त्री " झाल्यावर मी शिक्षक या नात्याने शिकविण्याचे काम जरूर करीन. आपण मुलांनी जो आदर मला पुरुष या नात्याने देता तोच आदर द्यावा. ही विनंती केली होती. तसेच मुलांना व बायकोला सांगितले, " माझे नाते तुमच्याशी वेगळे राहील. " बायकोला घटस्फोट देऊन तिचा पत्नी ह्या नात्याने त्याच्याशी संबंध राहणार नाही. ह्या नोटिसा दिल्यावर विद्यार्थ्यांनी व नातेवाइकांनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण त्यात कुणालाच यश आले नाही. त्याचा निश्चय पक्का होता. घरात राहूनच त्याची treatment सुरू झाली. मुले हॉस्टेलमध्ये राहात होती. ट्रीटमेंट सुरू केल्यापासून बायकोचे अस्तित्व कमी झाले. ती बिचारी सनातनी मताची

नवरा कसाही वागला तरी त्याला सांभाळत होती.

हळूहळू ट्रीटमेंटमुळे त्याच्या स्वभावात व वागण्यात बायकीपणा येऊ लागला. बोलताना बायकांप्रमाणे लकबी, चालताना बायकी चाल, तसेच दाढीमिश्यांचे केस हळूहळू कमी होणे, आवाजात बदल वगैरे गोष्टी दृष्टोत्पत्तीस येऊ लागल्या. डोक्याचे केसही कापून बायकांप्रमाणे त्याने खांद्यापर्यंत ठेवले. शिकविण्याचे काम चालू होते. मेंदू शाबूत होता. विद्यार्थ्यांना नोटिसा दिल्यामुळे तेही त्याचेकडे कुतूहलाने पाहात असत. सबंध कॉलेजमध्ये ही बातमी वणव्यासारखी पसरली. ज्याच्या त्याच्या तोंडी हीच भाषा.

अशी तीन-चार वर्षे गेली. आता डॉक्टरांनी सांगितले. बायकोशी घटस्फोट घ्या व तिला वेगळे करा. त्याप्रमाणे वकिलाच्या सल्ल्याने तिला काडीमोड दिला. ती एका मुलाकडे जाऊन राहिली. तिला काय वाटले असेल याची कल्पना न केलेलीच बरी.

डॉक्टरांच्या सांगण्यानुसार दिवस मुक्रर केला व एकदाचे ऑपरेशन करून तो संपूर्ण स्त्री बनला. आता ह्या गोष्टीला ३–४ वर्षे झाली. त्याला पाहून तो पुरुष आहे असे कोणीही म्हणणार नाही. दिसायला चेहरा पुरुषी असल्याने स्त्रीचे सौंदर्य त्याला नाही. पण चेहरा डॉक्टर बदलू शकले नाहीत. पण हावभाव संपूर्ण स्त्रीचे आहेत. आता त्याने " जया " नाव घेतले आहे.

नोकरी व काम नेहमीप्रमाणे चालू आहे. आता जयाने वेगळे Apartment घेतले आहे. स्वतः स्वयंपाक व सर्व काम करते. बायकोचे घर त्याच गावात आहे. मुले येऊन जाऊन तिच्याकडे राहतात. तिने हॉस्पिटलमध्ये नोकरी घेतली आहे. तिला तो बहीण मानतो. आपला नवरा स्त्री झालेला पाहून तिला वाईट वाटते पण ती काय करणार? तिचा नवरा ह्या नात्याचा संबंध कायमचा तुटला आहे.

मी असे ऐकले की जया आता बऱ्याच पुरुषांशी मैत्री करते. लहानपणी Boy-friend म्हणून त्याचेवर प्रेम करणे वेगळे व आता वेगळे. " स्त्री " झाल्यापासून जया खुशीत आहे एवढे मात्र खरे.

आता साठीच्यापुढे का स्त्री व्हावे वाटले हे कोडे मात्र मला उलगडले नाही. मी काही तज्ज्ञांना हा प्रश्न विचारला. ते म्हणाले, " कुणाकुणाला काही वयानंतर सेक्स बदलण्याची भावना होते असे म्हणतात. अजून सबळ कारण सापडले नाही."

जगात विज्ञान किती पुढे गेले आहे याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. सुधारलेल्या

देशात अशा गोष्टी नेहमी घडत असतात. ह्या ऑपरेशनकरता जयाला किती लक्ष डॉलर्स खर्च करावे लागले असतील. शिवाय मुले व बायको यांचा संबंध तुटल्यामुळे म्हातारपणी एकटे जीवन जगणे भाग पडत आहे. जगाच्या दृष्टीने हे विचार गुंतागुंतीचे झाले, पण जयाचे चेहऱ्याकडे पाहून ती दुःखी आहे असे कोणालाही वाटणार नाही. कारण हा निर्णय घेताना तिने संपूर्ण आयुष्याचा विचार केलेला आहे. आणि म्हणूनच ती उजळ माथ्याने व आनंदाने सभा-समारंभांत काम करीत आहे.

# एडस् (AIDS)

एकदा अमेरिकेत शिकागोला ह्यांना (डॉ. सुखात्मे) मीटिंगला बोलाविले होते. तेथे असताना आम्ही दोघे एका पार्टीला गेलो होतो. उन्हाळ्याचे दिवस म्हणून संध्याकाळी बारबेक्यू (Barbeque) म्हणजे कोंबडी लाकडावर भाजणे असा प्रकार असतो. पोहोण्याची व्यवस्थाही तेथे होती, त्यामुळे बरेचसे लोक पोहोण्याच्या पोषाखात पोहत होते व मजेत गप्पा चालल्या होत्या. भाजलेली कोंबडी व पिण्यास मद्य असले की त्या मंडळींना दुसरे काही लागत नाही. काही लोकांशी बोलता बोलता मी म्हणाले, "We have just celebrated our 50th wedding Anniversary." त्यावर जवळचे लोक म्हणाले, "congratulations", पण काही लोकांना हे बोलणे विचित्र वाटले. त्यातले एक गृहस्थ म्हणाले, "काय तुम्ही इतकी वर्षे एकमेकांना चिकटून राहिलात ! कमाल आहे तुमची." तेव्हा हे म्हणाले, "हो, तीच आमची संस्कृती, आमच्या संस्कृतीत कुटुंबसंस्थेला महत्त्व आहे." मद्य प्यायल्यावर मंडळींच्या गप्पा जास्त रंगत. त्यांच्या गप्पातून आम्हाला कळले की, बहुतेक लोकांची दोन-तीन लग्ने झालेली असत. कुणी कुणी लग्नानंतर पार्टनर बदललेले कळले. त्यांच्या भाषेत लग्नाची काय जरुरी. सांगायचे कारण इतक्या स्वतंत्र विचाराची व आचाराची ही मंडळी आणि ही सर्व सुशिक्षित, मोठमोठ्या जागेवर काम करून नाव मिळविलेली अशी होती. तुम्ही लग्न करा अथवा न करा, एकत्र राहिलात की, इन्कमटॅक्सच्या कारणाकरता तरी तुमचे लग्न झालेले आहे असे Internal Revenue Service गृहीत धरते.

शिकागो. हे विश्वविद्यालयही अमेरिकेत प्रसिद्ध आहे. मात्र तेथे गुंडगिरी करणारे लोक बरेच आहेत. त्यांच्या वस्तीमुळे गोरे लोकांनाही तो उपद्रव भासू लागला आहे. सगळीकडे भित्या निर्माण झाल्या आहेत. काळ्या लोकांच्या वस्तीत

गेल्यास जीवाला धोका आहे. कॉलेजात विद्यार्थीसुद्धा रात्री लायब्ररीत येतात, पण वसतिगृहात जाताना शिपाई घेऊन जावे लागते. काही तरुण मुली पर्समध्ये शिटी ठेवतात. प्रसंग आला तर शिट्टी वाजवितात म्हणजे कुणीतरी येईल ही आशा. दिवसा फिरू शकता पण संध्याकाळ झाली की घरातच बसावे लागते. एकदा एका भारतीय तरुणीचा खून झालेला ऐकला. शहरात भीतीचे वातावरण असते. संध्याकाळी गाडीतून बाहेर जाणे जास्त सुखकर असते.

दुसरे दिवशी संध्याकाळी ६ च्या सुमारास आम्ही बाहेर जायला निघालो. निघताना चौकीदाराला सहज विचारले, “काय रे, समोर टेलिग्राफ अव्हेन्यु हा मोठा रस्ता दिसतोय तिकडे जाऊ का ?” तेव्हा त्याने तिथली माहिती सांगितली. ह्या रस्त्यावर हिप्पी लोकांची वस्ती आहे. त्यांना घरदार काही नसते. सर्व जीवन भटके असते. पुरुषांचे केस व दाढी वाढविलेली, घाणेरडे अंग, लोकांना किळस वाटावी असे ठिगळाचे कपडे, बायका पुरुषांचे एकच कपडे, कोणीही कुठलेही घालावे. राहायला घर नाही. गाडी मात्र कर्ज काढून घेतलेली. त्याला ट्रेलर लावलेली. स्वयंपाक, जेवण, निजणे, सर्व त्यातच. एका जागेत किती माणसे निजतात पत्ता नाही. रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांकडून पैसे मागायचे व खायला मागायचे व जीवन जगायचे हाच धंदा आणि लोक पीडा नको म्हणून पैसे व खायला देतात. मिळालेले पैसे मादक पदार्थांचे सेवन करण्यात खर्च करायचे. कुठलाही पुरुष व कुठलीही स्त्री एकत्र झोपतात. बहुतेक ही तरुण मंडळी आहेत. संसार, मुले याला अर्थ नाही. दारूच्या नशेत कित्येक स्त्रीपुरुष नगनांवाड्ईव पडलेले दिसत व L.S.D. ही इंजेक्शन्स् एकमेकांना देत. संध्याकाळी त्या रस्त्यावर कोणी जातच नसे. आपण काय पाहतो यावर विश्वास बसत नाही. पण सत्य परिस्थिती होती म्हणणे जास्त बरोबर होईल.

ह्या विश्वविद्यालयाच्या कम्पाऊंडमध्ये मी नेहमी फिरत असे. अमेरिकेत हे एक प्रमुख विश्वविद्यालय समजले जाते. उच्च शिक्षणाकरता देशदेशचे विद्यार्थी येथे येतात. डिग्री मिळवतात, वसतिगृहात राहतात, जेवणखाण सर्व campus मध्ये मिळते. लायब्ररी रात्रभर उघडी असते. उत्तम दर्जाचे प्रोफेसर व संशोधनाकरता योग्य वातावरण असे हे कॉलेज जीवन आहे.

एकदा माझ्या यजमानांचे campus च्या पटांगणात आहारशास्त्रावर एका मोठ्या हॉलमध्ये व्याख्यान ठेवले होते. विषय सर्वांच्या आवडीचा असल्यामुळे

हॉल विद्यार्थ्यांनी तुडुंब भरला होता व प्रचंड समुदायाने लोक अले होते. त्यात बायका, पुरुष, मुले सगळ्यांचा समावेश होता. मीही व्याख्यानाला गेले होते. व्याख्यान सुरू असताना ही व्यक्ती स्वातंत्र्याची आधुनिक मंडळी काय करतात इकडे माझे लक्ष वेधले. प्रेक्षक बहुतेक विद्यार्थीच होते. व्याख्यानमाला चालू असताना काही मुले सँडविच, फळे, कोकाकोला, बिअर वगैरेंचा आस्वाद घेत होती तर तरुण लग्न झालेल्या मुली चिमुकल्याला छाती उघडी टाकून पाजीत होत्या. काही मुलेमुली आपआपल्या प्रियकरांच्या बरोबर प्रेम करीत होते. व्याख्यान एक तास, प्रश्नोत्तरे मंडळींनी बरीच विचारली व टाळ्यांच्या प्रचंड गजरात कार्यक्रम संपला.

ह्या लोकांचे स्वातंत्र्य इतक्या थराला गेलेलं आहे की, मूल लग्नापूर्वी अथवा लग्नानंतर केव्हा झालं याची खंत नाही. बायका पुरुषांची स्वैरवृत्ती, व्यक्ति-स्वातंत्र्याच्या फाजील कल्पना, बायका पुरुषांच्या समान नोकऱ्या, समान हक्क यामुळे वैचारिक स्वातंत्र्य व पैसा इतका मुबलक झाला आहे की, त्यामुळे वैयक्तिक तत्त्वज्ञान व सामाजिक बांधिलकीची जबाबदारीची जाणीव होत नाही. यामुळे काही मुले वाईट मार्गाला लागलेली आढळतात. भगवान रजनीशांच्या नादी लोक लागले नव्हते का ? हे लिहिण्याने त्यांनी जी पुस्तके लिहिली ती कमी लेखण्याचा हेतू नाही पण त्यांची शिकवण जर खरोखरीच श्रेष्ठ असती तर समाजात पसरली असती. फाजील लैंगिक इच्छा व अंमली पदार्थांचे सेवन याचा परिणाम याची मुळे आता फार खोलवर गेली आहेत..विशेष करून मादक इंजेक्शन्स्च्या सुईमुळे पेशीतील रंगसूत्रात व वंशसूत्रात बदल होतो असे आढळून आले.

आतापर्यंत फक्त बायकाच वेश्या व्यवसाय करतात असे ऐकत होतो पण आता पुरुषही तोच धंदा अमेरिकेत करतात.यामुळे होणारे रोग गनोरिया, सिफिलिक्स् हे निर्माण होतात यावरही उपाय व औषधे आहेत पण अमेरिकेत एक नवीनच फॅड निघाले आहे.Homosexuality बायका बायकांचे संबंध, तसेच पुरुषा पुरुषांचे संबंध हे फार ऐकू येऊ लागले आहेत. यातून काय समाधान मिळते ते त्यांनाच माहीत. यांच्याकरता स्पेशल साधनेही मिळतात. कोणत्याही बायका पुरुषांचे अनैतिक संबंध हे नेहमीचेच आहे..एकमेकांची अती चुंबने, स्पर्श, संभोग हे तर आहेच. तेव्हा अमेरिकेत नवीनच पसरत चाललेल्या AIDS (एडस्) ह्या रोगाला

*हमखास आमंत्रण दिल्यासारखे आहे.*

गेल्या २–३ .वर्षांपासून लोकांच्या लक्षात आले आहे की, अशा व्यभिचारातूनच हा रोग फोफावत आहे. वर्तमानपत्र उघडले की, एडस्च्या केसेस दिसू लागतात. कोणी सेनेटर, फिल्मस्टार, बिझनेस executive असे मोठमोठे लोकही ह्या रोगाला बळी पडत आहेत. आपला अपराध नसताना आपण गोवले जातो. रक्त देताना तर त्या माणसाला एडस् असेल तर तो दुसऱ्यालाही पसरतो. ह्या रोगाने प्रतिकारशक्ती कमी होते, शरीर हतबल होते, ज्याला तो झाला तो तर मरणारच पण त्याची मुलंबाळंही संसर्गजन्य होतात व अशा माणसाचे रक्त व थुंकी यातून रोग पसरतो. आता अशा केसेसचे प्रमाण जॉमेट्रिक प्रोग्रेशनप्रमाणे वाढत चालले आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे कृत्रिम जीवन प्रथम नवजवान मंडळी ज्यांना कसलीही बंधने नसलेली, आपण कोठून आलो, जीवन म्हणजे काय ह्याचा विचारही मनात न शिवलेली, जीवनात काही तरी पोकळी निर्माण झाली एवढे ज्ञान व ती भरण्याकरता Rock-Music एकमेकांपासून मिळणारे लिंगसुख गुंगी आणणारी L.S.D. मेरूजनासारखी मादक द्रव्ये या नशेत जनावरासारखे पडून राहणे, भूक लागली की खाणे अशा अवस्थेत मेंदूची विचार करण्याची शक्ती कमी झाली तर नवल काय ? माणूस एक उपभोग्य वस्तू, बिझिनेस लाईफ, कॉलेजचे शिक्षण, केवळ नोकरी म्हणून, मुलींना वेगळेपणा नको, सुट्टीवर मुले मुली एकत्र सहलीला जातात तेव्हा Room Available with sex and utility अशा खोल्या घेतात. होस्टेलमध्ये मुलामुलींच्या खोल्या शेजारी शेजारी असतात. संडास मोरी सर्वांना एकच. कुठलेही बंधन नको. तत्त्वज्ञान व संस्कृती मागे पडली तर नवल काय ?

वरवर दिसते ते दांभिक आहे. शांत विचारी मन, ज्याला जबाबदारीची जाण कळते, ज्यातून माणुसकीचे खरे दर्शन घडते, सामाजिक बंधने, कुटुंबसंस्था, धर्म, देश ह्याबद्दलच्या भावना जागृत होतात हे सर्व ही मंडळी चैनीच्या सवयीत विसरतात. प्रथम प्रथम त्यांना वाटे यात वाईट काय आहे, पण आता ते आटोक्याबाहेर गेले, याचा परिणाम इतका भयंकर होईल याची या जवानांना कल्पना नव्हती. लाखो लोक एडस्च्या धोक्यात आज राहात आहेत व हजारो मरत आहेत, मनाचा मोठेपणा, दुसऱ्याबद्दल सहानुभूतीही गेली. चांगले वाईट कळेनासे

झाले. मुलाला जन्मापासून आईवडिल पारखे झाले तेथे गृहशिक्षण कुठले ? घराला घरपण नाही. थोडक्यात कुटुंबसंस्था मोडली हे सिद्धच झाले. त्यातूनच एडस् जन्माला आला.

आता अमेरिकेतले हे घसरडे जीवन जास्तच अधोगतीला जात आहे. लहान वयात लैंगिक संबंध व त्यातून गर्भधारणा व जोडीदार वेळोवेळी बदलणे ही आता दृश्य कारणे दिसू लागली आहेत. रोगाचे मूळ आफ्रिकेतून आले असे ऐकतो. त्यावर Condoms (साधने) वापरा असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. टीव्हीवर जाहिराती देतात व मुली पर्समधून ही साधने वापरतात. पुरुष मात्र ही वापरण्यास नाकारतात. बायकांना गर्भधारणेची भीती असल्याने वापरणे भाग पडते, पण पुरुषाला जर हे एडस्चा संसार्ग असेल तर बायकांना ही साधने वापरूनही हा रोग होणारच हे निश्चित.

डॉक्टर लोक लस निर्मितीच्या शोधात आहेत, पण तोपर्यंत अशा कुटुंबियांना व त्यांच्या मैत्रीत असणाऱ्यांना वेगळे ठेवणे एवढाच उपाय दिसतो. डॉक्टरांना अशा रोग्याची थुंकी अथवा रक्त तपासायला भीती वाटते. अमेरिकेत आता ह्या गोष्टी जास्त थराला गेल्या आहेत. एडस्ने कोणी आपल्या निकटवर्तीयांतून मेला तर ती गोष्ट शरमेची वाटते, कारण प्रत्येकाला आज ना उद्या हे होणार, मग डॉक्टरसुद्धा येणार नाहीत, नोकरीवरून काढतील व जीवन असह्य वाटू लागेल.

W.H.O. ह्या युनोच्या संघटनेने प्रसिद्ध केलेल्या माहितीप्रमाणे आजपर्यंत कमीत कमी एक लाखाहून जास्त लोक एडस्ने मेले व १० कोटीहून जास्त लोक एडस्च्या जंतूने संसर्गित झाले. कित्येक वेळा हा जंतू शरीरात महिने महिने सुप्त अवस्थेत राहतो व एकदम एक दिवस रोगाचे स्वरूप धारण करतो. पाण्यात दगड टाकला म्हणजे वर्तुळ पसरत जाते तसे एडस्च्या जंतूंचे विस्तृतीबद्दल म्हणता येईल. एडस् झालेल्यांना तो लपवून ठेवण्याची वृत्ती असते, पण त्यामुळे दुसऱ्याचे जीवन आपण धोक्यात घालतो ही कल्पना येत नाही.

हा रोग ज्यांना होतो त्यांनाच त्याची चीड येते व रागाच्या भरात ते रक्तदान करतात. इच्छा अशी की, आपल्याबरोबर आणखी मरू देत. ही सूडाची भावना निर्माण होता. हा रोग झाला की, ऑफिसमध्ये कोणी जवळ येऊ देत नाही, उलट हा नोकरी सोडून गेला तरच बरे असे लोकांना वाटते. मुलांना शाळेत जाण्यास मनाई करतात. इन्शुअरन्स कंपन्यासुद्धा इन्शुअरन्स बंद करा म्हणतात किंवा

प्रीमियम वाढवितात.

ह्या रोग्यांना उपचार करण्यास भीती वाटणे साहजिक आहे. तरी सर्वच डॉक्टर्स ह्या मताचे नाहीत किंबहुना कायद्यानेसुद्धा त्यांना उपचार नाकारता येत नाही. याबाबतीत डॉक्टर Frieddand यांचे अनुभव व उद्‌गार मोठे मार्मिक आहेत. न्यूयॉर्कजवळ Monk-Liore नावाच्या एका Medical centre चे ते संचालक आहेत. १९८५ मध्ये त्यांनी ३०० हून अधिक एडसूच्या रोग्यावर उपचार केले. अर्थात या उपचाराचा फार उपयपा झाला नाही, कारण २०० हून अधिक लोक मेले. डॉक्टरांना दुःख होते ते हे की, जेथे औषधे नाही तेथे सहानुभूतीशिवाय काय करणार आणि कितीही सहानुभूती दाखावेली तरी "बाबा रे तू आता मरणार आहेस पण औषध नाही" हे सांगण्याचे धैर्य होत नाही. सुरुवातीला डॉक्टरांना वाटे ब्रॉंकायटीस (Bronchitis) असेल, श्वासाला त्रास होत आहे, गाठी दिसत आहे म्हणून तो Antibiotics देई, पण त्याचा उपयोग नाही असे पाहिल्यावर तो परत फक्त तपासणी करी व त्यात एडसूचे जंतू सापडत.

एकदा त्यांचेकडे मरीया नावाच्या तरुण मुलीची केस आली. मरीयाला तीन मुले, पहिली दोन चांगली सशक्त व निरोगी, दोन मुलांनंतर नवऱ्याबरोबर भांडण व घटस्फोट घेतला. थोडे दिवसांत पुन्हा एका तरुणाच्या प्रेमात पडली व लग्नात रूपांतर, त्याच्यापासून तिसरे मूल झाले. तो नवराही पूर्वीचा घटस्फोट घेतलेला व अंमली पदार्थाचे व्यसनाधीन. मरीयाला त्याने हे सांगितले नव्हते. मरीया स्वतःच ज्या वेळी आजारी पडली त्या वेळी तिला शंका आली आणि तिची शंका खरी ठरली. तिला एडसूचे जंतू त्याचेकडून मिळाले व मूलही तसेच झाले. शेवटी मरीया रोगाला बळी पडली. जंतू सापडल्यावर प्रश्न काही कालावधीचाच असतो. डॉक्टरांच्या अंदाजाप्रमाणे आणखी पाच वर्षांत निदान ३,००,००० एडसूने मरतील. डॉक्टर नेहमी म्हणायचा, 'Medicine was the birthright of every man.' त्याला वाटे आपण फीसुद्धा घेऊ नये व एडसूच्या रोग्याला घरच्यासारखे वागविले पाहिजे.

एकदा डॉक्टरांच्याकडे तीन केसेस आल्या. सर्वांना श्वासाचा त्रास होत होता. ह्या केसेस त्याला नेहमीपेक्षा वेगळ्या वाटल्या. त्याने त्यांना प्रश्न विचारले तेव्हा बायकांनी सांगितले की, त्यांचा लैंगिक संबंध घराबाहेर नाही, पण डॉक्टरांचा विश्वास बसेना. बोलता बोलता त्या तिघांनी कानात घातलेल्या रिंग्जकडे

डॉक्टरांचे लक्ष वेधले. ह्या रिंग्ज Gay cummunity चे सभासद घालतात हे त्याला माहीत होते व ते खरे ठरले. डॉक्टरांनी त्यांना तसे विचारले व त्यांनी कबूल केले की ते त्या कम्युनिटीचे सभासद आहेत व रोज Intravenus औषधे घेत असत व कित्येकदा एकच सुई तिघे वापरत. आता त्यामुळे ते बायकांना व पुढे होणाऱ्या अपत्यांना एडस्‌ची बाधा होणार हे निश्चितच. अशा वेळी परमेश्वरसुद्धा त्यांना वाचवू शकत नाही.

अशा केसेस डॉक्टरकडे सारख्या येऊ लागल्या—कधी उपचार करताना रक्ताची चिळकांडी उडे, कधी कोणाचे डोके दुखे, कधी कोणाच्या अंगावर पुरळ येई, मग नर्सेस घाबरून जात. Interns तर रोग्याजवळ जायला भिऊ लागले, पण काम केले नाही तर नोकरी सुटेल ही भीती. डॉक्टरांची बायको व मुले घाबरून जात. त्यांची बायको म्हणे, "तू असे सामाजिक कार्य करीत राहिलास तर तुला तर हा रोग होणार नाही ना ?" तो स्वतःची काळजी घेई. सारखे हात धूत असे, हातमोजे घाली. स्वतःला रोग होणार नाही याची त्यालाही खात्री नसे, तसा तो स्वतःही कधीच घाबरलेला नव्हता. तो उलट म्हणे एडस्‌च्या रोग्याबरोबर काम करणे हे (Gun Hill Road) न्यूयॉर्कजवळ गुंड लोकांच्या रस्त्यावर चालण्यापेक्षा नक्क(च जास्त सुरक्षित आहे.

खरे म्हणजे एडस्‌चा रोगी स्वतः भयभीत असे. त्याच्यात शक्तीच उरत नसे. पूर्वी Gay life असले तरी अशा असहाय्य स्थितीत त्याच्याबद्दल सहानुभूती वाटे. जरा बरे वाटले तर रोगी घरी जई व डॉक्टर सांगे, "तुला औषधाने गुण आलेला दिसतोय." पण दुर्दैवाने तोच माणूस कठीण परिस्थितीत परत येई. बहुतेक मेलेल्याच स्थितीत असायचे, तरी पण त्यांच्या आवडीचे जेवण व पेय तो देत असे. त्या कारणाने रोग्याचे प्रेम सहाय्य त्याला मिळे. पुष्कळ रोगी डॉक्टरावर चिडायचे, किंचाळायचे, शिव्या द्यायचे, अन्न फेकून द्यायचे, औषधे फेकायचे, काही वेडे होत, नर्सेस पळून जात, काहींना त्यांच्या बायकांच्या सांगण्यावरून नळ्यांनी जखडून ठेवायचे व नळीवाटे अन्न व श्वासोच्छ्‌वास चाले. खरे म्हणजे ह्या उपचाराचा उपयोग नसे. कुटुंबियांना हा जिवंत आहे एवढेच समाधान. काही आत्महत्याही करीत. काही २० ते ३० वयोगटातले असत त्यांना जगावे असे वाटे व ते देवाला म्हणत, "आम्हाला बरे कर, आम्ही अशा चुका करणार नाही." कळत होते की, आयुष्यात काही तरी चुकलंय पण त्या सवयी इतक्या अंगवळणी पडल्या

होत्या की सुटणे कठीण होते.

अमेरिकेत एक जग प्रसिद्ध धर्मगुरू आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व व भाषाशैली तर इतकी प्रभावी आहे की, या वयातसुद्धा बायका त्याच्याकडे आकर्षिल्या जात पण त्यांनी लैंगिक विषयापासून स्वतःला अलिप्त ठेवले, पण तसे करणे त्याला सोपे नव्हते. त्याच्या सर्व हालचाली त्याची सेक्रेटरी गुप्त ठेवीत असे.

टी.व्ही.वर पुष्कळ वेळा धर्मगुरूंची भाषणे होतात. त्यांना धर्मप्रचाराकरता पैसे मिळतात. एकाने त्यातले ऐंशी मिलीयन डॉलर्स घेतले व एका बाईबरोबर पळून गेला. ही हकीगत त्याच्या ॲसिस्टंटने टी.व्ही.वर सांगितली. चर्चचे पैसे असे खर्च केल्यामुळे टी.व्ही.च्या भाषणाकरता पैसे उरले नाहीत व संस्था बंद पडणार अशी भीती त्यने व्यक्त केली. शेवटी त्याने कसेबसे पैसे जमा केले. आता दोघांच्यात भांडणे सुरू आहेत हा धर्मगुरू Gay कम्युनिटीमध्ये वावरतो. त्याचे नग्न फोटो पुरावा म्हणून ॲस्टिंटने दाखविले पण ते त्याने नाकारले. तो म्हणतो, "मी खरा धर्मगुरू आहे," आता कोर्टात केस चालू आहे.

एके काळी Nuns व धर्मगुरू तात्त्विक व भाविक वृत्तीचे होते असे वाटे, पण आता ते सर्रास लग्न करतात. पुष्कळांचे जीवन Romantic असते. असे म्हटल्यास आतशयाक्ता नाहा. Sex हा एक जबर मोहाचा विषय आहे हे नाकारता येत नाही. तसे नाकारणे म्हणजे, कुटुंब संस्थेला फाटा देऊन कुत्रिम जीवन जगणे होय.

काही लहान बालकांना जन्मापासून एडस् होतो. त्यांच्या करताही वेगळी हॉस्पिटल्स आहेत. पुष्कळशा समाजकार्य करणाऱ्या स्त्रिया तेथे काम करतात.

शाळेतल्या मुलामुलींना लैंगिक शिक्षण आता प्रामुख्याने देतात म्हणजे वयात येणाऱ्या मुलामुलींना औषधे घेणे किंवा लैंगिक संबंधाचे धोके त्यांच्या लक्षात येतात. मोठ्या मुलांना जर रक्तात एडस्चे जंतू सापडले तर आईवडिलांना ते सांगण्याची लाज वाटते, कारण वडिलांची नोकरी जाते काही कंपन्या थोडीफार मदत करतात.

रोग्याला वेदनाशमन करण्याची औषधे दिली जातात, पण हा असा रोग आहे की, पाठीवर कोणी थोपटले व 'How are you?' विचारले तरी रोग्याला बरे वाटते. एकदा रोगाचे नैराश्य तोंडावर आढळून आले की, त्याला वाचविणे कठीण. कोणी आत्महत्येचा विचार करतात, झोपत नाहीत, चिडचीड, भूक नसते, वजन कमी होते, उत्साह नाही, विचारांची शक्ती कमी, वेदना सुरूच

असतात. अशा वेळी Brain mapping आणि Shock treatment ची जरुरी असते. काही डॉक्टर्स Anti-depressing औषधे देतात, काही मानसिक उपचार देतात. जितके करता येईल तितके करतात. सर्व विनामुल्य असते.

ह्या रोगाचे स्वरूप आता इतके भयंकर आहे की, जागरूक राहून समाजात चाललेल्या गोष्टींना आळा घालणे हेच श्रेयस्कर. मुलांच्या रक्ताची तपासणी वारंवार केली पाहिजे. पूर्व संस्कृतीवर गाडी आणणे म्हणजे लग्नाचे महत्त्व पटवून देणे, लग्नापूर्वी लैंगिक संबंधात उत्तेजन न देणे, घटस्फोटाचे वाढते प्रमाण कमी करणे, ध्यानधारणेनेही मदत होते असे म्हणतात.

आनुवंशिक म्हणजे जन्मजात जे गुण आईवडिलांकडून मिळतात ते व आपल्या भोवतीचे वातावरण जे मिळते ह्या दोन्ही घटकांच्या क्रिया व प्रक्रिया होऊन बाळ पोटात वाढते व त्या जीवाला वळण लागते व त्यातून बाळाचे जीवन घडत असते म्हणून आई जी औषधे घेते त्याचा परिणाम गर्भावर होतो व बाळाला विकृती होण्याचा संभव असतो म्हणून गर्भात मूल असल्यापासून त्याची काळजी घेतली पाहिजे.

आता ह्या रोगावर लस शोधून काढण्यात डॉक्टर मंडळी गर्क आहेत. त्यात त्यांना यश मिळत आहे असे संशोधन संस्थेचे रिपोर्टस् आहेत. त्याबरोबर हे जंतू एक प्रकारचे नसून अनेक प्रकारचे आहेत असे आढळले. मनात आले तर सर्व जंतूंना लागू पडणारी लस शास्त्रज्ञ शोधून काढतील, पण वेळ लागेल शिवाय जितके प्रकार जास्त तितके संशोधन कठीण. खरे म्हणजे स्त्रिने कुटुंबसंस्थेच्या दृष्टीने जास्त विचार करावा म्हणून शिक्षण जे द्यायचे ते समाजाला पोषक पाहिजे. लहानपणी मुली वयात येण्यापूर्वीच ते दिले पाहिजे, तरच शरीर व मन काबूत राहण्याची शक्यता आहे आणि त्या शिक्षणावर इतका भर दिला पाहिजे की, मुलामुलींना मादक द्रव्याचा दुष्परिणाम, लैंगिक स्वातंत्र्यामुळे आपले सबंध आयुष्य कसे बरबाद होते हे दाखवून दिले पाहिजे. हे परिणाम नुसते वापरून दूर होणार नाहीत. शेवटी कुटुंबसंस्थाच ही स्थिरता आणण्यास मदत करेल हे त्यांना बिंबवून दिले पाहिजे.

अमेरिकेसारख्या देशाने एकदा मनावर घेतले तर ते आटोकाट प्रयत्न करणारच. ज्या देशाने विज्ञानाच्या जोरावर चंद्रावर झेप घेतली व जगातल्या कानाकोपऱ्यात काय चालले ते उपग्रहाच्या मदतीने पाहता येते तेथे लस आज ना उद्या उपलब्ध होईल, पण वृत्तीत बदल घडवून आणणे सोपे नाही. असे असते तर

Star-Wars सारख्या योजना आखल्या गेल्या नसत्या. त्या देशात आत्मविश्वास दांडगा आहे. प्रयत्नांची शिकस्त आहे. नुसत्या नोबेल लॉरीएट्सची यादी बघा. अजूनही विज्ञानाच्या जोरावर ते काहीही करू शकतात अशी त्यांची ख्याती आहे. पण नुसत्या विज्ञानाच्या जोरावर एडस्वर मात करता येईल का ? अजून तरी उत्तर सापडले नाही.

माणूसच शेवटी स्वतःच्या नाशाला कारणीभूत होणार हे जोपर्यंत कळले नाही तोपर्यंत असेच चालणार. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, तरच ह्या प्रश्नाचे उत्तर सापडेल आणि ते उत्तर तो ज्या संस्कृतीत वाढत गेला त्यातूनच मिळेल. संस्कृतीचे वैशिष्ट्य मुळी हे की, सभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाला तोंड देताना माणसाला हजारो वर्षांच्या अनुभवातून जी समाजरचना तंत्रज्ञान व ज्ञान समुचित दिसले तसा तो राहू लागला. कौटुंबिक जीवन हा त्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यातही बदलत्या परिस्थितीत फरक होत आहे व होणारच, कारण जेथे निरनिराळ्या संस्कृत्या एकत्र येतात, तेथे एकमेकांपासून शिकण्याची संधीही मिळते. नुसत्या परिस्थितीचा ताबा मिळवून संस्कृतीला अजिबात फाटा देणे हे त्याला उत्तर नव्हे.

अमेरिकेतल्या लोकांना ह्या रोगामुळे जीवन असह्य होत आहे हे दिसतच आहे, पण तेथे राहाणाऱ्या भारतीय नागरिकांना आपल्या पुढच्या पिढीचे कसे होणार हा विचार सतावत आहे व तिकडे राहिल्याने आपणही आपल्या संस्कृतीला व मूल्यांना विसरू लागलो की काय ह्या विचारांना चालना मिळते आहे. शिक्षणाच्या व नोकरीच्या निमित्ताने भारतीयांची संख्या बरीच आहे. उच्च पदावर डॉक्टर, इंजिनीअर, बिझनेस मॅनेजमेंट, कॉम्प्युटर अशा विविध क्षेत्रांत भारतीय आघाडीवर आहेत व चांगले नाव मिळवीत आहेत. काही लोकांनी तिथले नागरिकत्वही घेतले आहे, पण संस्कृती सोडलेली दिसत नाही. इतकेच नव्हे तर गुजराथी व दक्षिण भारतातले लोक आपली संस्कृती जपून आहेत. कित्येक तर अजूनही पूर्ण शाकाहारी आढळतात. त्यांना काळजी पुढच्या पिढीची आहे. ती लहानपणापासून अमेरिकन शाळेत जातात व जवळ जवळ सबंध दिवस त्यांचा शाळेत जातो. मुलेमुली एकत्र वावरतात. तिथलेच खाणे त्यांना आवडते व ह्यांच्या सवयी बदलतात. त्यात त्यांचा काय दोष ? पण तो परिणाम होऊ नये म्हणून भारतीय आता जागृत झाले आहेत.

नवरा बायको नोकरीवर त्यामुळे मुलांच्याकडे लक्ष द्यायला फारसा वेळ मिळत नाही. तरी जो वेळ मिळतो तेव्हा आईवडील मुलांचा अभ्यास घेतात व मुले काय करतात इकडे लक्षही असते. AIDS सारखा रोग मुलांच्या स्वैरवृत्तीने व अती स्वातंत्र्य दिल्याने पसरत आहे हे आता ह्या तरुण पिढीला माहीत झाले आहे. त्यामुळे त्याला आळा घालण्याच्या दृष्टीने भारतीयांचे प्रयत्न चालले आहेत. गेल्या ४–५ वर्षांत भारतीयांना त्याची विशेष जाणीव झाली आहे आणि वेळेवरच ह्या गोष्टींना आळा घातला गेला पाहिजे असे त्यांना वाटत आहे. आपली संस्कृती, धर्म, गीतेची शिकवण, भाषेचा अभिमान हे सर्व मुलांच्यात लहानपणा–पासून जागृत केले जात आहे. न्यूयॉर्क, शिकागो, पिटस्बर्ग वगैरे ठिकाणी संगमरवरी दगडाची देवळे बांधली आहेत. त्यात वर्षाचे येणारे सणवार फलकावर लिहिले आहेत. लोक बहुसंख्येने तेथे येतात व सणवार साजरे करतात. दिवाळीसारखे उत्सव खूपच थाटाने होतात.

काही गावात Sun-day School ह्या नावाखाली दर पंधरा दिवसांनी १५–२० भारतीय कुटुंबे एकत्र जमतात. त्यांनी त्याकरता एक हॉल घेतला आहे. तेथे हा त्यांचा प्रोग्राम २ तास चालतो. एका टेबलावर देवांच्या तसबिरी मांडतात, फुले वाहून बायका आरती म्हणतात व मुलेही त्यात भाग घेतात. गीतेचा एक पाठ कोणीतरी मुलांना वाचून दाखवितात व त्याचा अर्थ सांगतात. 'ओऽम् सहना भवतु सहनौ भन्नतु' हे सर्वजण म्हणून कार्यक्रमाला सुरुवात होते. मुलांना काही बायका हिंदी व मराठी शिकवितात. तसेच महात्मा गांधी, जयप्रकाश, पंडित नेहरू, स्वामी विवेकानंद अशा युगपुरुषांची पुस्तके मुलांना वाचायला देतात व प्रत्येक मुलाला त्यातला एक विचार वर्गात वाचायला सांगतात ती मुले आता त्यात रस घेऊ लागली आहेत.

मोठी माणसे आध्यात्मिक विषयावर चर्चा करतात. लहानपणापासून चांगले संस्कार व्हावेत हा उद्देश. गुजराथी समाजात तर गणेशचतुर्थी करतात, गणपतीपुढे आरास मांडतात व पूजा वगैरे सर्व मिळून करतात. झांजा वाजवून आरत्या म्हणतात पुरुष व मुले कुडता पायजमा असा पोषाख तर बायका सुंदर जरीच्या साड्या व दागिन्यांनी नटलेल्या असतात. खव्याचे मोदक घरी केलेले असतात. भारताच्या बाहेर आपण आहोत ही जाणीवही होत नाही. पूजेनंतर शाकाहारी जेवण असते. हा कार्यक्रम सर्वांना खूप आवडतो. पुष्कळ वेळा हे

गुजराथी लोक एक हॉल भाड्याने घेऊन गरब्याचा कार्यक्रम करतात. त्यात बायका, पुरुष, मुले सर्व भाग घेतात. तीन-चार तास हा कार्यक्रम चालतो. भारतातले सिनेमे थिएटरमध्ये दाखवितात व त्या वेळी भारतीय लोक खाण्याची दुकाने ठेवतात. त्यात जिलेबी, सामोसे, बटाटेवडे, गुलाबजाम, बर्फी, चिवडा, लाडू वगैरे खूप पदार्थ ठेवतात. मंडळी मजेत दिवस घालवितात.

भारतातली काही नाटकेही तिकडे जातात. त्याशिवाय व्हिडियो टेपमुळे तर भारतातली गाणी, सिनेमे वगैरे व्यवस्थित घरी बसून बघायला मिळते. पुष्कळ वेळा स्वामी चिन्मयानंद, दयानंद सरस्वती ह्यांनाही ही मंडळी व्याख्यान देण्यास बोलावितात.

काही भारतीय मुलामुलींनी परजातीय विवाहही केले आहेत, पण आता अमेरिकेतही ही बदलती वृत्ती पाहून काही मुलेमुली थोडा विचार करू लागली आहेत. भारतीय मुलामुलींना, एकत्र भेटायला हल्ली बरीच दालने उघडी आहेत. काही मासिकांतून वधूवरांची माहिती भारतीयांना हवी असल्यास मिळू शकते. भारतात थोडे दिवसाकरता व लग्न करून येणे हे तितके सोपे नाही. कारण मुलामुलीना लग्नापूर्वी थोडे दिवस एकत्र घालवावे व मग निर्णय घ्यावा असे वाटते. काही अमेरिकन मुलांनी भारतीय मुलींशी लग्ने केलेली आढळतात. त्यांच्या मते भारतीय मुली लहानसहान गोष्टीवरून काडीमोडीची भाषा बोलत नाहीत. थोडा तडजोडीचा प्रयत्न करतात. अर्थात काही ह्याला अपवाद असतात. शिकागोला एक देऊळ आहे, तेथे पुरोहित पण असतात. ते वैदिक पद्धतीने लग्ने लावून देतात.

आता थोडे दिवसांपूर्वी आमच्या नात्यात दोन लग्ने एकमेकांच्या कुटुंबातल्या ओळखीने जमली. आम्ही त्या लग्नाला भारतातून मुद्दाम गेलो होतो. दोन्हीकडची मंडळी हौशी व आनंदी, त्यांना देवळात लग्ने करायची नव्हती. पण वैदिक पद्धतीने करायची होती. अमेरिकेत नोकरी करीत असलेल्या काही मंडळींनी ह्या लग्नविधीचा अभ्यास केला आहे. त्यांना आम्ही बोलाविले. त्यांनी लग्नविधीचा एक फॉरमॅट छापून तयार केला आहे. त्यात मुख्य चार विधींचा समावेश आहे. असे पुरोहित आम्हाला लाभले होते. आम्ही फॉरमॅटच्या छापून प्रती काढल्या होत्या. त्या सर्वांना वाटल्या होत्या. लग्नविधी सर्वांना दिसावा म्हणून एक platform (लाकडी) तयार केला होता. त्याला चारी बाजूला लाकडी खांब उभे करून

सर्व बाजूंनी फुलांच्या माळा सोडल्या होत्या. बाजूला सुंदर फुलांच्या कुंड्या ठेवल्या होत्या व सर्व मांडव सुशोभित दिसत होता. त्या plat-form वर पाटावर वधूवर व वधूवरांचे आईवडील बसले होते. पुरोहितही वधूवरांजवळ पुढे माईक ठेवून बसले होते. प्रेक्षक सर्व खुर्च्यांवर बसले होते. वधूला शालू व दागिने घालून एका बाजूच्या टेबलावर गौरीहाराला बसविले होते. वराच्या हातात नारळ दिला होता व वरपक्षाकडील मंडळी मांडवाच्या सुशोभित दारात आली. वराला वधूच्या आईने ओवाळले व तो plat-form वर आला. त्याने रेशमी कुडता व सलवार असा पोषाख परिधान केला होता. वधूकरता स्पेशल सुंदर गालिचा पसरला होता त्यावरून चालत वधू मामाचा हात धरून plat-form वर आली. अंतरपाट धरला गेला व मंगलाष्टकांच्या मंजूळ स्वरांनी हॉलमध्ये सुमधुर मंगलाष्टके सुरू झाली. त्यानंतर सर्व शांततामय वातावरणात सर्व विधी, पुण्याहवाचन, कन्यादान, होमहवन, सप्तपदी व शपथा हे चालले होते. पुरोहित फॉरमॅटमध्ये लिहिल्याप्रमाणे सर्व समजावून सांगत होते.

लग्नाचे वेळी वधूवरांचे हातात फुलांचे हार दिले होते,ते हार त्यांनी मंगलाष्टके संपल्यावर एकमेकांच्या गळ्यात घातले. मंगलाष्टके दोन्हीकडच्या आजांनी केली होती. तो सुद्धा एक कौतुकाचा भाग होता.

अमेरिकन लोकांना हे लग्न खूप आवडले. त्यांना विधीचे अर्थ आवडले. त्यांनी विधी संपल्यावर टाळ्यांच्या गजरात आपला आनंद व्यक्त केला. मुख्य म्हणजे वधूवरांनी विधीचे अर्थ समजावून घेतले. परदेशी मंडळींना हे लग्न कौतुकास्पद वाटले. लग्नविधीनंतर सर्वांना पेढे दिले. व खुर्चीवर बसून सर्वांनी भोजन घेतले. भोजनाला भारतीय तसेच अभारतीय मंडळी होती. एक मोठा केक डेकोरेशन करून ठेवला होता. तो मुलामुलीने कापायचा असतो. भोजनाचे सुरुवातीला अमेरिकन पद्धतीप्रमाणे वधूवरांना शुभेच्छा म्हणून टोस्ट करायची पद्धत आहे पण वधूवराला ते पसंत नव्हते. मुलाचे आईवडील, आजीआजोबा तसेच मुलीचे आईवडील आजीआजोबा अशी मंडळी एका स्पेशल टेबलावर बसली होती. वधूवरांचे मित्रमंडळी गावोगावाहून लग्नाला आले होते. जवळ जवळ ४०० मंडळी जेवायला होती.

अमेरिकन पद्धतीप्रमाणे टोस्ट नाही असे कळल्यावर तरुण मंडळी गप्प कशी बसणार. त्यांनी ग्लासवर चमच्याने टिंग् टिंग् असा मोठा आवाज करायला

सुरुवात केली. हेतू हा की, वधूवरांनी एकमेकांचे चुंबन घ्यावे. पण वधूवरांना आपल्या वडील मंडळींचे समोर कदाचित तसे करवेना. भारतीय पद्धतीप्रमाणे सर्वांच्या समोर चुंबन घेण्याची पद्धत नाही. मंडळींचा टिंग् टिंग् आवाज थांबेना शेवटी वडील मंडळीकडे वधूवरांनी पाहिले व चुंबने घेतली तेव्हा आवाज बंद झाला. जेवणानंतर वधूवर उठून मित्रमंडळींच्या टेबलावर भेटायला गेले. वधूचा सुंदर बुट्टयांचा शालू व दागिने सर्वांना खूप आवडले. वराचा पोषाख सूट बूट व टाय असा होता.

समारंभ आटोपल्यावर लिमोसीन (Limousin) गाडीतून वधूवर घरी आले व मुलगी सासरी उंबरठ्यावरचे माप ओलांडून आत आली. वधूवरांना वराच्या आईने ओवाळले. सोफावर बसून सर्वांच्या थोड्या गप्पा झाल्या. वधूला साडी दिली व संध्याकाळी ते मधुचंद्राला निघून गेले.

अशी दोन लग्ने थाटामाटाने साजरी झाली. लग्ने पाहून वाटले की काही भारतीयांनी तरी आपली संस्कृती अजून ठेवली आहे. निदान ती जागृत राहावी या दिशेने भारतीय पाऊले टाकू लागले आहेत. आता सर्वच असे आहेत असे नाही. प्रत्येक गोष्टीला अपवाद असतोच. काही भारतीय तर अमेरिकेच्या वातावरणात खूप बदलले आहेत. काही व्यसनाधीन झाले आहेत. काही कुटुंबे विस्कळीत, संस्कृती व मुल्ये पार विसरलेली. मुलेही घरातल्या वातावरणामुळे स्वैरवृत्तीने वागणारी, असेही कित्येक ठिकाणी आढळते. निदान अशा क्रिया प्रक्रियेची काही भारतीयाना जाणीव झाली आहे ही त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट आहे. त्यातून माणसाला मनःशांती लाभून पुढचा मार्ग सुखकर दिसू लागेल. अशी आशा मानायला हरकत नाही.

# पराधीनता

दहा-बारा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आम्ही त्या वेळी रोमला होतो. पाच-सहा खोल्यांचा आमचा ब्लॉक होता आणि आमच्या दरवाज्यासमोरच दुसऱ्या ब्लॉकमध्ये एक इटालियन कुटुंब राहात होते. त्यांच्या घरात नवरा-बायको व दोन मुली. नवऱ्याचे वय ७० च्या घरात व बायको त्याच्यापेक्षा ५-६ वर्षांनी लहान. एक मुलगी ४० वर्षांची व दुसरी तिच्याहून दोन वर्षांनी लहान होती. मोठी मुलगी फियाट कंपनीच्या एका ऑफिसमध्ये नोकरीस होती व धाकटी घरातच असे. ह्या मुलीची मिळकत व वडिलांची पेन्शन यावर संसार चांगला चालला होता. वडिलांना सर्व पप्पा म्हणत. पप्पाला थोडा पॅरेलिसिस झाला होता त्यामुळे तो बहुतेक घरातच असे. आई संसार काटकसरीने करीत असे. नवऱ्याला आंघोळ, जेवण अगदी व्यवस्थित देत असे. त्याचे कपडे नेहमी सुंदर इस्त्री केलेले असत व सर्व दिवसाचा कार्यक्रम ठरलेला असे. मी त्यांच्याकडे आठवड्यातून एकदा तरी जात असे. मला त्यांची इटालियन भाषा चांगली अवगत असल्याने माझ्या व त्यांच्या गप्पा अगदी रंगात येत असत. मी त्यांना भारतातल्या व आमच्या मुलांच्या गप्पा सांगत असे. माझ्या धाकट्या मुलाला ते नेहमी बोलावीत व स्पजेटी, सॅलड, ब्रेड वगैरे त्याला खायला देत. मीही त्यांना कधी कधी पार्टीला बोलावीत असे. माझी व त्यांची खूपच मैत्री जमली होती.

असेच आमचे एकमेकांच्या सहवासात सुखात दिवस चालले होते. एकदा पपाची बायको रोमहून तिच्या गावी बहिणीकडे काही दिवस राहावयास गेली होती. ती खिडकीला पडदे लावण्याकरिता म्हणून स्टूलावर चढली व पाय घसरून पडली व बेशुद्ध होऊन एक-दोन दिवसांत हे जग सोडून गेली. मुली रोमहून तेथे गेल्या व त्यांनी तिचे सर्व व्यवस्थित केले. पपाला नेणे अवघड म्हणून तो गेला नाही.

मुली ३-४ दिवसांत परत रोमला आल्या. आता आईची उणीव चांगलीच भासत होती. धाकटी मुलगी स्वयंपाक वगैरे करी, पण तिने पपाचे काम कधीच केले नसल्याने तिला ते जमत नसे. मोठी नोकरीत असल्याने तिला वेळ नाही, नर्स ठेवावी तर एवढे पैसे नव्हते. त्यामुळे काही दिवस असेच गेले. पपाचे कपडे धुणे व त्याचे काम करणे कठीणच होऊन बसले. त्याला स्वतःला तर काहीच करता येत नसे. बायको गेल्यावर तो बिचारा खरोखरीच अश्रू गाळीत असे. बाई खूप आनंदी, उत्साही व घरकाम व्यवस्थित करणारी होती, त्यामुळे सर्वांना सर्व व्यवस्थित मिळत होते, पण आता सर्वच प्रश्न उभे राहिले. घरात डबलबेड होता त्यावर त्या दोघी बहिणी निजू लागल्या व बाथरूमजवळच्या लहान खोलीत पपा राहू लागला. मी कधी कधी दुपारी जात असे. पपा नेहमीप्रमाणे बोलत नसे. त्याला हे दुःख सहन होत नव्हते व स्वतःला करण्याची ताकद नव्हती. जीवन जगायचे म्हणून जगत होता; पण त्यात राम नव्हता.

ह्या घटनेला आता ५-६ महिने झाले. नेहमीप्रमाणे मी एक दिवस पपाच्या दाराची घंटा वाजवली. धाकटी बहीण घरात होती, तिने दार उघडले व ती मला नेहमीप्रमाणे "सीनीओरा (बाई) ये" म्हणाली. मला घर भकास दिसले, पपा दिसला नाही, म्हणून मला रडूच कोसळले. तेव्हा धाकट्या बहिणीने खुलासा केला. दोन दिवसांपूर्वी दोघी बहिणींनी पपाला एका वृद्धाश्रमात नेऊन ठेवले होते. त्या म्हणाल्या, "पपा जायला तयार नव्हता; पण आम्ही त्यांचे कसे काय करणार, तेव्हा वृद्धाश्रमात निदान त्यांची काळजी घेतली जाईल." तो म्हणत होता, "थोडे दिवस राहतो व आवडले तर राहीन." पण बहिणींनी त्याचे सांगण्याकडे एवढे लक्षच दिले नाही व थोडे दिवस वगैरे काहीही विचार न करता एक वर्षाचे रु. ३०,००० ह्याप्रमाणे चार वर्षांचे पैसे भरून बिनधास्त घरी आल्या. दोघीजणी स्वयंपाक करून जेवून-खाऊन मजेत होत्या. पपाला भेटायला त्या आठवड्यातून एकदा जात असत.

मलाही पपाची फार आठवण होत असे म्हणून मी एकदा पपाला थोडी फळे घेऊन बहिणींच्या बरोबर भेटायला गेले. मला पाहिल्यावर पपाने मला त्यांच्या पद्धतीप्रमाणे आलिंगन दिले. तो स्वच्छ कपडे वगैरे घालून बसला होता.

मी वृद्धाश्रम ह्यापूर्वी कधीच पाहिलेला नसल्यामुळे मला तो सर्व पाहण्याचे कुतूहल होते. वृद्धाश्रमाची इमारत गावापासून दूर, जेथे विशेष घरेदारे नाहीत

अशा एका डोंगरावर होती. सुंदर बगीचा फुलझाडांनी बहरलेला दिसत होता. रोमची हवा उत्तम त्यामुळे तेथे अगदी मोकळे वाटत होते. प्रत्येकाला स्वतंत्र खोली, खोलीत टेलिव्हिजन, रेडिओ, निजायला पलंग, कपड्याचे कपाट वगैरे सर्व आधुनिक फर्निचर. पपाचे सर्व काम करायला एक माणूस होता. शिवाय आल्यागेल्यांना बसायला एक मोठी खोली. जेवणाचा हॉल, बैठे खेळ वगैरे व्यवस्था उत्तम होती. पपा हॉलमध्ये एका खुर्चीवर बसला होता. आम्ही तिघीही तेथेच खुर्चीवर बसलो. जवळपास तीन-चार बायका, पुरुष असेच गप्पा मारत बसले. पपाने माझी त्या मंडळींशी ओळख करून दिली. मी साहजिकच त्या मंडळींत गप्पा मारू लागले. त्यांचे जीवन जाणून घेण्याचीही मला उत्सुकता होती. त्यातले एक पति-पत्नी होते. वयोमान दोघांचेही ६५ च्या आसपास असावे. त्यांना पेन्शनही चांगले होते. ती दोघे घरातून मुलांना त्रास नको म्हणून खुशीने आली होती. आणि खरे म्हणजे म्हणण्यासारखी शरीराला व्याधी वगैरे नसल्याने ती दोघे तिथल्या स्वातंत्र्यात मजेत दिसली. दुसरी एक बाई विधवा होती. ती म्हणाली, “मला घरातले काम होत नव्हते, पण येथे आल्यापासून मी स्वतंत्र आहे. खाते, पिते, झोपते. आजारी पडले तर डॉक्टर आहेत.” शिवाय तिचे दोन मुलगे चांगल्या पगारावर नोकरीत होते. त्यामुळे दर आठवड्याला मुलगे, सुना, नातवंडे येऊन म्हातारीशी भरपूर बोलून जात. तिच्या आवडीचे काही खायलाही घेऊन येत. रोममध्ये अजून बऱ्याच ठिकाणी अविभक्त कुटुंबे आहेत. तेव्हा मनमोकळ्या गप्पा माराव्या, खावे-प्यावे, सर्व व्यवस्थित चालते. बायका घरातली कामे व नवऱ्याचे हौसेने करतात. नवऱ्याला चांगला पगार असला तर बायकोने नोकरी करू नये असे तिथल्या पुरुषांना वाटते. बरेचसे लोक स्वखुशीने आलेले दिसले. तसे पाहिले तर, ह्या वृद्धाश्रमात मला कोणतीच कमतरता दिसली नाही. कित्येक विधुर व विधवा वयाची ७० वर्षे गाठली तरी पुन्हा संसारात पडतात. एकटे राहण्यापेक्षा सोबत असावी एवढीच अपेक्षा असते. त्यांची मुलेही त्यांना त्या बाबतीत अनुमोदन देतात.

आता पपा खरे म्हणजे घरी असताना आजारी असला तरी बायकोच्या सुश्रूषेने व आनंदी स्वभावाने सुखात होता. तो स्वभावाने थोडा भावनाप्रधान असल्याने त्याला बायकोची उणीव जास्त भासत होती. बायको वारल्यावर मुलींच्यावर जास्त जबाबदारी पडली हे त्याला कळत होते. मुलींना आपले स्वातंत्र्य गमावून

त्याच्याबरोबर सतत राहणे पसंत नव्हते.

पपा माझ्याशी खूप बोलत होता. पण त्याला सारखे गहिवरून येत होते. सर्व घरच्या आठवणी त्याला येत होत्या. सांध्याकाळी ६ वाजता भेटण्याची वेळ संपली तेव्हा पपाचा निरोप घेऊन आम्ही तिघी घरी परतलो.

त्यानंतर मधून मधून मी तेथे जात होते. आता वृद्धाश्रमात येऊन जवळ जवळ २ वर्षे झाली होती. मी अशीच एकदा मुलींच्या बरोबर तेथे गेले. जाताना थोडी फळे मी पपाकरता नेली. तेथे गेल्यावर पपाने मला आलिंगन दिले व त्याला खूप रडे आले. मलाही फार वाईट वाटले. मी रुमालाने त्याचे डोळे पुसले. नंतर थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. त्याने व्हीलचेअर बोलावली व त्यात तो बसला. तिथल्या माणसाने त्याला त्याच्या खोलीत नेले. तेथे आमच्या सर्वांच्याकरता कॉफी व बिस्किटे त्याने मागविली.

आता तो खूपच अशक्त झाला होता. बोलण्याने त्याला शीण येत होता. सात–आठ वर्षांचा आमचा सहवास, त्यामुळे नाते अतूट जमले होते. "केवळ आयुष्य आहे म्हणून जगतो", असे तो मला म्हणाला. मला काय वाटले कोणास ठाऊक. मी त्याच्या पाठीवरून हात फिरवला व म्हटले, "पपा, माझी इच्छा आहे, मी तुला एक दिवस घरी घेऊन जाईन व तुझ्या आवडीचे स्पगेटी, मारो, सूप, सॅलड वगैरे करून घालेन. संध्याकाळी मी तुला पुन्हा आणून पोचवीन." मुली समोरच बसल्या होत्या. त्या रागाने त्याचेकडे पाहात होत्या. त्यांना वाटत होते, पपा घरी आला की कदाचित पुन्हा वृद्धाश्रमात जाणार नाही. तेव्हा त्या रोखलेल्या नजरा पपाच्या लक्षात आल्या व तो मला म्हणाला, "सीनीओरा (बाई) माझ्या मुलींनी इथे चार वर्षांकरता पैसे भरले आहेत. तेव्हा इथले जेवण वाया जाईल." खरे म्हणजे त्याला एकदा घरी जावे असे वाटत होते, पण मुलींच्या भीतीने त्याने मला ती सबब सांगितली. मी काय बोलणार. मी गप्प बसले. मनात मात्र वाईट वाटले. पपाच्या मनाचा विचार मुलींनी कधीही केला नाही. म्हणून बायको गेल्यावर तो खंगत चालला. त्याला डोळ्याने सर्व दिसत होते पण उपाय नव्हता.

तेथून निघताना पुन्हा मला कडकडून मिठी मारली व पाणावलेल्या डोळ्यांनी आम्ही एकमेकांचा निरोप घेतला आणि तो निरोप शेवटचाच ठरला.

त्यानंतर दोन महिन्यांनी मी भारतात सुट्टीवर आले होते. मला एक दिवस पपाचा फोटो व त्याखाली मृत्यूची बातमी छापलेले असे एक कार्ड मुलींच्याकडून

आले. मी त्या फोटोकडे अश्रुपूर्ण नेत्रांनी पाहिले व सुटला बिचारा म्हणून एक निःश्वास सोडला.

# "उभा जन्म उन्हात"

आज बारशाचा दिवस. वेणूताई व तिची बहीण आक्का दोघीही आनंदात दिसत होत्या.

आक्काला सर्व गोष्टींची खूप हौस होती. वेणूताईचे पहिले बाळ त्यामुळे सर्वांनाच कौतुक. त्या दिवशी बारसे होते. आक्काने बऱ्याच बायका बारशाला बोलाविल्या होत्या.

दुपारची जेवणे गोडधोड खाऊन सर्व मंडळी आनंदात होती. चार वाजता बाळाला पाळण्यात घालायचे ठरले होते. पाळणा रंगीत फुलांनी सजविला. पाच जणींनी ओवाळून मुलीचे नाव " विमल " ठेवण्यात आले. खरे म्हणजे मेहुण्यांनी बारशाला यावे असे आग्रहाचे पत्र आक्काच्या यजमानांनी पाठविले होते. पण पत्राचे उत्तर नाही. तरीपण कदाचित शेवटी येतील असे सर्वांना वाटत होते, पण आले नाहीत त्यामुळे सर्वांची खूप निराशा झाली.

बायका कुठेही समारंभाला गेल्या तरी काही बायकांचा स्वभाव असा असतो की जे बोलू नये ते त्या बोलतात. आमच्या नलिनीताई त्यातल्याच एक. त्या पाळण्याजवळ आल्या व मुलीला पाहून उद्‌गारल्या, " अगं वेणू, मुलगी एवढी काळी का गं ? कुणाचे रूप घेतलं कोण जाणे." त्यावर दुसऱ्या बाई म्हणाल्या, " अहो वडील काळे असतील. " त्यावर बायकांची कुजबूज सुरू झाली. त्यातली आणखी एक म्हणे, " वडील फक्त गोरे नुसते मदन ! बरं वेणूताईही गोरीच मग हे असं का?" तेव्हा तिसरी म्हणे, "नशीबाने मुलगी, त्यात काळी म्हणजे पुढे नेहमीच काळजी." असे बायकांचे ताशेरे सुरू होते.

खरं म्हणजे कोणाचे मूल आणि काय कशाला एवढ्या चांभार चौकशा. त्यावर एक सुधारक बाई म्हणाल्या, "तुम्ही कशाला वेणूताईच्या मुलीची चर्चा करता?"

उद्या मुलगी शिकली व कमावती झाली की कोणीही करून घेईल. सर्वजण काय नुसतं रूपच बघतात का ? अहो गुण बघणारेसुद्धा आहेत पुष्कळ. " अशा तऱ्हेच्या बायकांच्या गप्पा चालूच होत्या. चहापाणी फराळ झाले व बायका घरोघर निघून गेल्या.

आक्काने बाळंतविडा खूप कौतुकाने केला होता. बाळंतविड्यावर अंगडी, टोपडी, दुपटी व पाकिटात पैसे असे खूप सामान आले होते, ते सर्व आक्काने आवरून ठेवले व वेणूताईची व बाळाची फुलांनी व मीठमोहऱ्यांनी दृष्ट काढली. आज तिने दागिने घातले होते. नवीन साडी नेसली होती. त्यामुळे ती खरोखरच सुंदर दिसत होती. रात्रीची जेवणे झाली. झाकपाक झाली. घरातल्या कामाने बायकाही दमल्या होत्या. सर्वजण आपापल्या खोलीत जाऊन झोपले. वेणूताई व तिची धाकटी बहीण सुंद्राताई माजघरात गाद्या टाकून पहुडल्या होत्या.

आज तिला काही केल्या झोप येईना. बाळ पाळण्यात झोपले होते. बाहेर चंद्राचे चांदणे स्वच्छ दिसत होते. त्या आकाशाकडे पाहात ती जागी होती. बारशाला आलेल्या बायकांचे संवाद तिच्या कानावर घाव घालीत होते ! मुलगी व त्यात काळी ह्या दोन्ही गोष्टींचा विचार तिला शिवला नव्हता, पण आजच्या समारंभाने तिला जागे केले होते व पुढील भवितव्याचे स्वप्नच ज़णू काही तिला दिसले. ती विचार करू लागली. खरेच आपण दोघेही गोरे असताना हे कन्यारत्न कोणासारखे झाले हा विचार तिला स्वस्थ बसू देईना. बाबूराव संशयी आहेत हे तिला लग्न झाल्यापासून माहीत होते तेव्हा ही शंका जर त्यांना आली तर आपल्या आयुष्याची राखरांगोळी होणार. तिला काही केल्या झोप येईना व दोन वर्षाचा ' लग्नाचा सारीपाट ' तिला दिसू लागला.

जेमतेम तिचे दोन वर्षांपूर्वी बाबूरावांच्या बरोबर लग्न झाले. तिचे माहेर कोल्हापूरला. तिचे आईवडील व दोन बहिणी अशी मंडळी कोल्हापूरला थत्ते यांच्या वाड्यात राहात असत. तिच्या वडिलांना आम्ही ' तात्या ' म्हणत असू. त्यांचे कापड दुकान होते. त्यांचे भाऊ आण्णा हे आमचे आजोबा. माझ्या वडिलांना दादा म्हणत. वेणूताई ही माझी आत्याच. तिचे शिक्षण ३-४ इयत्तेपर्यंत झालेले होते. खरे म्हणजे कोल्हापूरचेच स्थळ बाबूरावांची मावशी व तात्या यांचा पूर्व परिचय असल्याने हे लग्न चटकन जमले. बाबूरावांचे वय २५ च्या आसपास, शिक्षण एम्.ए. पर्यंत. उमदे व्यक्तिमत्त्व आणि वेणूताईही दिसायला त्यांच्याच

तोलामोलाची.तिचे वय १३-१४ असावे.

झाले! लग्नाचा दिवस मुक्रर झाला. तात्यांनी दोन्हीकडचा खर्च १६ तोळे सोने, वाकी, कर्णफुले, पाटल्या, तोडे वगैरे सर्व देऊन व्यवस्थित कन्यादान केले. लग्नात आई आजारीच होती. ती पुढे ७-८ महिन्यांत गेली. बाबूराव तसे आधुनिक मताचे होते. त्यांना जास्त फापटपसारा नको होता. फक्त महत्त्वाचे चार विधी केले. वरात, बँड वगैरे पसंत नव्हता. घोडागाडीतूनच मुलगी बसून सासरी आली. बाबूरावांच्या आजीने मरताना बरेच दागिने व शेतीवाडी मावशीजवळ दिली होती व मावशीच बाबूरावांचे सर्व करीत असे. घरात त्यांची मावशी व तिचा नवरा काही दिवस होते. मावशीला चार मुली व नवरा राजाराम कॉलेजात शिकवीत होता.

आता बाबूराव व आत्या ही लक्ष्मीनारायणाची जोडी. जमखिंडीला बाबूरावांच्या आजीचे घर होते त्या वाड्यात राहायला आले. हा वाडा जुन्या पद्धतीचा होता. पुढे पडवी ओटा, बोळ, स्वयंपाकघर, माजघर वगैरे होते. बाबूराव घरीच मुलांना शिकविण्याचे काम करीत. जमखिंडीकर त्यांना रु. ६०-७० पगार देत. त्यामुळे घरी बसून त्यांना पैसे मिळत. शिकविण्याचे पैसे ते घेत नसत. त्यांचा आवडता विषय संस्कृत होता.

त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय उमदे होते. त्या वेळचा त्यांचा पोषाख धोतर, पांढरा सदरा व त्यावर पांढरे उपरणे, काळी टोपी, बारीक कापलेले केस, चष्मा व पायात चपला. ताठ चालण्याची ढब, शरीरयष्टी बारीक, उंची ५'-५", वर्ण गोरा, असा हा खाक्या असे. शिस्तीला फार कडक, प्रत्येक गोष्ट वेळेवर झालीच पाहिजे.

आत्याला सुरुवातीला हे फार जड गेले, पण हळूहळू ती त्यात रुळली व घरातले सर्व काम ती त्यांच्या तंत्राने करू लागली.

लग्नानंतरचे नव्या नवलाईचे दिवस प्रत्येकाच्या आयुष्यात येतच असतात. त्यात तारुण्य व सौंदर्य, तेव्हा त्या राम-सीतेला काय कमी होते. (वेणूताईचे सासरचे नाव सीता व बाबूरावांचे सखाराम अथवा राम) कधी कधी ते बाहेर फिरायला जात. वाड्यात घागर कमरेवर घेऊन ती पाणी आणी. एक गोष्ट म्हणजे तिचे सौंदर्य अप्रतिम. त्यामुळे रस्त्याने जाताना देखील लोकांच्या नजरा खिळत असत. ती खाली मान घालून बाबूरावांच्या बरोबर चाले. पण त्यांची नजर चोरटी व संशयी. वाड्यात आपल्या बायकोकडे लोक बघतात हे त्यांच्या लक्षात आले

होते. बाबूरावांचा बराचसा वेळ लायब्ररीत जात असे. पुस्तके वाचण्याचा त्यांना नाद होता. तसेच अध्यात्माचा नाद होता. ज्ञानेश्वरी वाचन व नामस्मरण ते नेहमी करीत. बाहेरून घरी आल्यावर ते कधी कधी आत्याला विचारीत, "का ग, घरी कोणी आलं होतं का ?" त्यांचा स्वभाव संशयी, त्यामुळे आत्या सांगे "नाही", पण ते त्यांना खरे वाटत नसे. तसे पाहिले तर ते तिचे कौतुकही करीत. एकदा काळी चंद्रकळा घेऊन आले. ती नेसण्यास सांगून तिला घेऊन ते फिरायला गेले व घरी येऊन तिला आलिंगन देऊन ते म्हणाले देखील, "वेणू, आज तू किती सुंदर दिसतेस, तुझी दृष्ट काढायला हवी."

एकदा जमखिंडीकर घरी आले. बाबूराव कपडे धुऊन वाळत टाकीत होते. एकदा एक मित्र त्यांना नाटकाची तिकिटे फुकट देत होता, पण ह्यांनी त्याला पैसे दिले. ते आत्याला घेऊन "आत्मयज्ञ" ह्या नाटकाला गेले. कोणापुढे हांजी हांजी करणारा हा माणूस नव्हता. तसे पाहिले तर हौशी पण स्वभाव विचित्र.

एकदा एक बाका प्रसंग तिच्यावर आला. त्यांच्या वाड्यात एक २२ वर्षांचा तरुण राहात होता. तो आपल्या बायकोकडे ती पाणी भरत असताना गॅलरीतून पाहतो असा बाबूरावांना संशय आला, म्हणून एक दिवस बाबूरावांनी त्याला दुपारी घरी बोलाविले. चहा वगैरे घेऊन झाल्यावर तो खुर्चीवर मागे हात ठेवून बसला होता. बाबूराव स्वयंपाकघरात गेले व सुरी घेऊन त्याचे मागे उभे राहिले व बोटांवर सुरीने घाव घातले. त्याचा हात रक्तबंबाळ झाला. आत्याला हा प्रकार नवीनच होता. ती खूपच घाबरून गेली. बाबूरावांनी असे का केले ते तिला समजले नाही. ती खाली बसून रडू लागली तेव्हा ते खेकसले व म्हणाले, "कशाला त्याचेकडे पाहत होतीस ?" ती मुकाट्याने पाणी व कपडा आणायला आत गेली पण तेवढ्यात मित्र रागाने घरी निघून गेला होता.

पुनः स्वयंपाकघरात येऊन आत्याला दमदाटी केली व "किती लोकांना तू जाळ्यात पकडणार आहेस", असे म्हणाले. आत्याने खरे सांगितले. पण तिच्यावर कोण विश्वास ठेवणार?लग्न झाल्यापासून तिने कोणाकडेही पाहिले नव्हते व ज्या मित्राला त्यांनी मारले तोही कधी आत्याकडे वाईट नजरेने पाहत नव्हता. केवळ बाबूरावांचा संशयी स्वभाव. त्याला सीमा नव्हती. मित्र ते घर सोडून दुसरीकडे राहायला गेला.

मनात बायका बारशाला काय बोलल्या हे विचार सतत चालू होते आणि तसं जर

झालं तर काय होणार, अशा तऱ्हेचे विचार तिच्या मनात सतत येत. पण ओली बाळंतीण, तिला कोण लवकर जाऊ देणार. आक्काला आपले दुःख दिसू नये म्हणून आला दिवस ती आनंदात घालवीत असे. शेवटी तीन महिन्यांनी ती विमलला घेऊन आनंदाने परत बाबूरावांच्याकडे जमखिंडीला आली. आपल्या वेलीवर आलेली ही पहिली कळी पाहून तिला वाटले बाबूरावांना आनंद होईल, पण कसचे काय? आल्याबरोबर बाबूरावांच्या प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. सर्व उलटच प्रकार घडत चालला. बाबूरावांना मुलगा हवा होता, ती मुलगी झाली व दुसरे म्हणजे विमल रंगाने काळी, रूपाने अगदी डावी होती. "आपण दोघेजण सुंदर असताना हे कन्यारत्न वेगळे कसे काय झाले? हे आपले नव्हे!" त्यांनी आत्याला विचारले. ती म्हणाली, "मुलगी काळी असली तर काय झालं? माझे आई-वडील गोरे, पण आम्ही तीन बहिणीतही एक बहीण अगदी काळी व दिसायला चांगली नाही, पण माझ्या आई-वडिलांनी तिचा द्वेष केला नाही. ही मुलगी आपलीच आहे. तुम्ही असले संशय घेऊन मनाला त्रास का करून घेता?" त्यांना तिचे उत्तर पटले नाही. ते चिडले व निघून गेले.

आणि सांगायचे कारण तेव्हापासून त्यांचा स्वभाव प्रत्येक बाबतीत शंका घेऊ लागला. घरात कोण कोण येते ह्यावर ते चोरटी नजर ठेवू लागले. घरातली शांती ढळली व सारखे खटके उडू लागले. बाबूरावांचे मन अस्वस्थ झाले व त्यांना ताप येऊ लागला. तेव्हा डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ते शिरगावला कोकणात आपटे यांच्या वाड्यात राहायला आले. आत्याही त्यांचेबरोबर होती.

ह्या वाड्यात यमूताई आपटे म्हणून एक बाई होत्या. त्यांच्याबरोबर बाबूरावांचा परिचय झाला व मैत्री वाढू लागली. त्यानंतर शिरगाव व जमखिंडी अशा दोन्ही ठिकाणी ते अधूनमधून राहात एवढ्या पाच-सहा वर्षांत आत्याला आणखी एक मुलगा व मुलगी अशी एकंदर तीन अपत्ये झाली. पण नशिबाने सगळीकडे दगा दिला. एकाही अपत्याने त्यांचे दोघांचे रूप व रंग घेतला नाही.

आता संसारात अर्थच राहिला नाही असे आत्याला वाटे. किडामुंगीप्रमाणे मुले वाढत होती. घरात संशयाचे जाळे पसरत चाललेले. त्यांच्या डोक्यात बायकोला टाकले तर समाज काय म्हणेल, एक ना दोन हजार विचार. शेवटी वडिलांकडे पाठविणे उत्तम असाच विचार ते करू लागले.

मध्यंतरी आणखी एक घटना घडली. यमूताईला जमखिंडीलाच मास्तरणीची

नोकरी मिळाली व ती तेथेच राहायला आली. त्यामुळे बाबूरावांचा प्रश्न आपोआप सुटला.

जमखिंडीत लोक बोलू लागले, सोन्यासारखी बायको आता टाकणार की काय? तसे पाहिले तर यमूताईही विधवा होती, पण बाबूरावांची इच्छा तिच्याबरोबर लग्न करण्याची नव्हती. पण लोकांना काय जे दिसते ते बोलतात. लोकांत वाईट दिसते म्हणून आत्याला कायमची सोडचिठ्ठी द्यायलाही ते तयार नव्हते. एकदा आत्याकडे तात्यांचे मित्र तुळपुळे आले होते. त्यांनी विचारले, "काय ग वेणू, बाबूरावांचे हे काय प्रकरण आहे?" त्यावर तिने प्रत्यक्षच बाबूरावांना विचारले, "काय हो, मी हे काय ऐकते? पुनर्विवाह करणार की काय?" तेव्हा त्यांनी तिला उत्तर दिले, "तुझ्यासारखी बायको असताना मी पुनर्विवाह करायला काय मूर्ख आहे की काय?" केवढा सुज्ञपणा. ह्या उत्तराने तुळपुळे व आत्या स्वस्थ बसले.

शेवटी त्यांना करायचे तेच त्यांनी केले. आत्याला तीन मुलांसकट वडिलांकडे कोल्हापूरला पाठविले. आत्याला वाटले थोडे दिवसांनी परत बोलावतील. पण त्यांनी हा शेवटचाच निर्णय घेतला व मनाने पुनश्च ही संसाराची कटकट नको असेच जणू काय त्यांनी मनाशी ठरविले.

आत्याचा संसार हा असा संशयाच्या जाळ्यात ७-८ वर्षे झाला. ती मुकाट्याने मुलांना घेऊन काही दिवस मामा थत्ते यांचेकडे राहिली. तात्याही (वडील) तिथेच रहात. तिची धाकटी बहीण सुंद्राताई हिचे थोडेच दिवसांत लग्न झाल्यावर नवऱ्याने माहेरी म्हणून पाठविले, ती नवऱ्याकडे कधीच पुन्हा गेली नाही. तिचे लग्न आत्या जमखिंडीला होती तेव्हा कोल्हापूरला झाले. तिला बाबूरावांनी लग्नाला पाठविले नव्हते व त्या दिवशी 'आमरस खाऊ' असे आत्याला म्हणाले.

अशा रीतीने तात्यांच्या दोन्ही मुली लग्न करून घरी परत आल्या. 'काही दिवस कोल्हापुरात राहून आता तू वडिलांना घेऊन सांगलीला राहा, त्यांना तुझ्या मदतीची जरुरी आहे', असे बाबूरावांनी सांगितले आणि त्याप्रमाणे ती सर्वजण सांगलीला आक्काच्या शेजारी राहू लागले.

बाबूराव सर्वांना सांगत की तिचे वडील म्हातारे आहेत म्हणून ती तिकडे राहते. महिन्याला थोडे पैसे खर्चाला पाठवीत. मधूनमधून तिला खुशाली कळवीत. त्यांच्या मित्रमंडळींनी खूप समजूत घातली, पण तो विषय काढू नका असे ते

म्हणत. मी बायकोला टाकलेली नाही, असे ते सर्वांना सांगत. तसे पाहिले तर यमूताई बाबूरावांचे सर्व व्यवस्थित करीत. दोघांनाही लग्न करून राहण्याची इच्छा नव्हती. बायकोचा बंदोबस्त मात्र त्यांनी कायमचा केला होता. दिसायला चित्र आतून बाहेरून वेगळे होते. त्यांना मुलांचा व बायकोचा पाश नकोच होता.

तात्यांचे बिऱ्हाड नावालाच वेगळे होते. खरे म्हणजे आक्काची मुले व आत्याची मुले एकत्रच वाढत होती. आक्काने स्वतःची मुलं व आत्याची मुलं यात फरक केला नाही. उलट तिला वाटे आपल्या मुलांत त्यांना चांगले संस्कार घडतील. म्हणून त्यांना आपले वडील जवळ नाहीत ही भावनाही शिवली नाही. आक्काचे यजमानही सज्जन माणूस. त्यांनाही आत्याची अडचण वाटली नाही. ते दोघे सर्वतोपरी आत्याच्या संसाराचा भार हलका करीत असत. मुलांनी काय पाप केले म्हणून त्यांना शिक्षा असे आक्काला वाटे व बहिणीची मुले ती आपलीच मानी. मुलांचे वडील जमखिंडीला असतात एवढेच मुलांना माहीत होते.

आक्काला बारा मुले झाली व शेवटच्या बाळंतपणात ती आजारी झाली व हे जग सोडून गेली.

मग आक्काचा संसार, तिची नणंद व ह्या दोन बहिणी यांनीच सांभाळला. आत्या, तिची मुले व आक्काची मुले ही सर्व आक्काचे घरातच वाढली. आत्याला व सुंद्राआत्याला आक्का आईसमान होती. तिने आत्याला तिच्या पडत्या काळात मदत केली व शेवटी आत्यावर सर्वच मुलांची जबाबदारी पडली. गाडगिळांचे जवळ पैसा होता त्यामुळे आत्यालाही पैशांची तूट भासली नाही. त्यामुळे आत्या कायमचीच तेथे राहिली.

आक्काची मुले व आत्याची मुले शाळेत जात होती, मोठी होत होती. आत्याने आक्कांच्या मुलांची लग्ने करण्यात खूप हातभार लावला. नियतीचे रहाटगाडगे चालूच होते. घरातले काम व मुले ह्यात किती व ॅ गेली हे कळलेही नाही.

सांगलीला आल्यावर सात-आठ वर्षांनंतर एक दिवस अचानक बाबूरावांनी आत्याला बोलाविले असा मावशीचा निरोप आला. तिला थोडा आशेचा किरण दिसला व वाटले बाबूराव कदाचित आपल्याला आता ठेवून घेतील म्हणून ती आशेने जमखिंडीला गेली. तेथे गेल्यावर बाबूराव आत्याशी एक शब्दही बोलले नाहीत. ती त्यांच्या खोलीत गेलीही नाही. फक्त तिने केलेला चविष्ट स्वयंपाक जेवत होते व एकदा मावशीला विचारले, "आमटी कोणी केली?" तेव्हा "तुझ्याच

बायकोने" असे ती म्हणाली. मावशी गावातच होती. तिला वाटले आता बाबूरावांचे मन बदलेल. कारण आता यमूताई त्यांच्याजवळ राहात नव्हत्या. पण कसचे काय. आत्या दोन–तीन दिवस न बोलता मुकाट्याने राहिली. पण बाबूराव एक चकार शब्दही बोलले नाहीत. आत्याला राग आला व शेवटी बाबूरावांना न सांगता ती निघून आली. तिच्या मनाला काय यातना झाल्या असतील देव जाणे! सांगलीला आल्यावर तात्यांनी विचारले तेव्हा ती म्हणाली, "माझ्याशी बाबूराव बोलले नाहीत, तेव्हा आता मी तिकडे जाणार नाही." दिवसामागून दिवस चालले होते. लग्न झाल्यापासून मुलांच्यातच आयुष्य चालले होते. विमल आता लग्नाची झाली. तिचे लग्न करावे व एका जबाबदारीतून बाहेर पडावे असे तिला वाटले आणि सुदैवाने गाडगिळांचे जावई बार्शीला होते, तिथे रघुनाथ प्रिंटिंग प्रेसमध्ये एक होतकरू मुलगा कामाला होता, त्याची बायको नुकतीच वारली होती व त्याला दोन वर्षांचा एक मुलगा होता. हे स्थळ चांगले आहे असे आक्काच्या मुलीकडून कळले व विमलचे लग्न विष्णुपंत पेंडसे यांचेबरोबर थोडक्यात उरकून घेतले. बाबूराव लग्नाला तर आले नाहीतच व कोणतीही मदत त्यांनी केली नाही. गाडगिळांच्या मदतीने हे लग्न झाले व विमल बार्शीला सासरी राहायला गेली.

आता आत्या दोन मुलांना घेऊन राहात होती. आपण आता एका जबाबदारीतून सुटलो म्हणून तिला जरा बरे वाटले. बाबूराव पैसे मात्र नियमित पाठवीत असत व येणाऱ्या–जाणाऱ्या जवळ आपली खुषाली कळवीत. त्यामुळे नवऱ्याने आपल्याला कायमचे टाकले ही कल्पनाही तिला आधी शिवली नाही. कधीतरी ते आपल्याला बोलावून घेतील या आशेवर ती जगत होती. आक्काची मुलांची जबाबदारी आता संपली होती. ती जाणती होती व आपापल्या व्यवसायात होती, पण आता विमलचा पाळणा दरवर्षांनी हलू लागला आणि जावयांनी आपली मुले आत्याकडे पाठवायला सुरुवात केली. ती काय बोलणार? बोलली तर जावयाबरोबर भांडण. तेव्हा मुकाट्याने मुले सांभाळणे भाग पडले. म्हणजे पुन्हा मुलीची बाळंतपणे. तात्यांचे महिन्याचे रु. ३००/– येत व बाबूरावांचे पैसे यावर प्रपंच उभा होता. दिवसामागून दिवस जात होते, पण नवऱ्याचे सुख नव्हते. मात्र तिची जिद्द.

विमलचा पाठचा भाऊ बाळकृष्ण. त्याला 'भाऊ' म्हणत. तो त्यावेळच्या मॅट्रिकपर्यंत शिकला. पुढे शिकायला पैसे नव्हते. तेव्हा तो कुठेतरी नोकरीच्या

खटपटीत होता. आत्याचे सुखस्वप्न भाऊला नोकरी मिळेल आणि जरा सुखाने स्वतःच्या घरी राहू. आता तो २२–२३ वर्षांचा होता. त्याला आपले वडील जमखिंडीला असतात एवढेच माहीत होते. तेव्हा वडिलांना भेटून येतो असे तो आत्याला म्हणाला आणि एक दिवस तो सांगलीहून जमखिंडीला गेला. मावशीने भाऊ आला आहे असे बाबूरावांना सांगितले. भाऊ आत गेला, त्याने वडिलांना नमस्कार केला व 'भेटायला आलो' असे म्हणाला. तेव्हा ते चिडले व मावशीला म्हणाले, "ह्याचा माझा काहीही संबंध नाही. मला भेटायला हा कोणाच्या परवानगीने आला ? माझ्यापुढे तुझ्या आईचा विषय काढू नकोस. त्या विषयावर बोलायचे नाही. तू घरी जा." वडिलांनी केलेला हा अपमान त्याला सहन झाला नाही. त्याच्या मनाला ही गोष्ट चटका देऊन गेली. तो काहीही न बोलता सांगलीला परत आला.

घरी आल्यावर आत्याने त्याला विचारले. तिला वाटत होते ऐन तारुण्यात आलेला आपला मुलगा पाहून पित्याला आनंद वाटेल व कदाचित आपल्या नशिबाने आपल्याला पतिसेवेचा लाभ मिळेल. खरे म्हणजे आत्याने हा जवळ जवळ पंचवीस वर्षांचा काळ कसा घालविला, ते तिचे तिलाच माहीत. कधीतरी बाबूराव आपल्याला बोलावतील ह्या आशेवरच ती जगत होती. पूर्वीच्या बायका नवरा कसाही वागला तरी तो पती आहे, कुटुंबसंस्था जागृत राहावी म्हणून हाडाची काडे करीत.

भाऊ नोकरीच्या शोधात होता. आईला आपण सुखात ठेवू असे त्याला वाटत होते. पण तेथेही काळ त्याची वाट पाहातहोता. एक दिवस अचानक दुपारी त्याला ताप भरला. जुलाब सुरू झाले. जुलाब इतके झाले की शरीरातले सर्व पाणी संपून गेले. तो बेशुद्ध झाला. डॉक्टर आणले, पण उपाय झाला नाही आणि दुसरेच दिवशी तो हे जग सोडून गेला.

आत्या धाय मोकलून रडू लागली. तिच्या पोटचा गोळा, त्याच्या जीवावर ती जगली तो आशेचा किरण एकदम नाहीसा झाला. आता आपला वाली कोणी नाही. लहान चार नातवंडे व धाकटी मुलगी ह्यांना कसे वाढवायचे ही भ्रांत तिला भेडसावत होती. दैव तिची जणू परीक्षाच पाहात होते. तोंडाशी आलेला घास परमेश्वरानं खाऊ दिला नाही. ऐन तारुण्यात ज्या आक्काने तिला आधार दिला ती गेली तरीसुद्धा स्वतःचे धैर्य खचू न देता ती परिस्थितीशी झगडतच राहिली

आणि त्या दुःखात तिने आक्काची व आपली मुले घरात काटकसरीचा संसार करून वाढविली, पण हे पुत्रशोकाचे दुःख तिच्या आवाक्याबाहेरचे होते. तिला काहीच सुचेना. ही पोकळी कशानेही भरून येणारी नव्हती.

आत्याची प्रकृती एकदम ढासळली. तिचे कशातच मन रमेना. तात्या व सुंद्राताई सगळ्यांनाच हा दुःखाचा डोंगर उभा राहिला. सांगलीजवळ वाडी म्हणून एक लहानसे गाव आहे. तेथे तात्या थोडे दिवस तिला हवापालट म्हणून घेऊन गेले. तिला वाटले पतीची एक बोटभर चिठ्ठी तरी येईल. पण त्याचे काहीच पत्र नाही. आत्याला वाटे बाबूरावांचे हृदय दगडासारखे कसे झाले. पुत्रशोक आईला मग वडिलांना नसतो का ? नवऱ्याच्या कोड्याची उत्तरे तिला कधीच सापडली नाहीत. ती हतबुद्ध झाली. थोडे दिवस वाडीला राहून परत सांगलीला आपल्या घरकुलात आली. काय करणार ? आला दिवस गेला, तो कसा गेला हे तिचे तिलाच माहीत.

कधी कधी ती एकटी बसे व तिच्या मनात लग्नानंतरचा पंचवीस वर्षांचा काळ कसा गेला ह्या विचारात तिचे मन भूतकाळात पुनः वावरू लागे. त्या काळात बाबूरावांनी तिला तीन लहान अर्भकासह सांगलीला पाठविली. वडिलांच्या व बहिणींच्या संसारात ती मिसळून गेली. मुले लहानाची मोठी झाली. पतीचे सुख काय असते हे विचार करायलाही वेळ मिळाला नाही. तिचे जीवन पवनचक्कीसारखे फिरतच होते. विमल मोठी झाली. लग्न झाले म्हणजे जावयांनी आत्याला सांभाळायला हवे होते, पण कसचे काय ? आत्याचे जावई विष्णुपंत हे दिसायला गरीब पण लग्न केल्यावर संसाराची जबाबदारी असते याची त्यांना कधीच जाणीव झाली नाही. प्रेसमध्ये पगार बेताचा, पण दर दोन वर्षांनी घरात पाळणा हालतच होता. आत्या कशा परिस्थितीत मुले वाढवीत होती हे त्यांना माहीत होते तरीसुद्धा दर दोन वर्षांनी ते आपली मुलें आत्याकडे पाठवीतच राहिले. आत्याने एकदा स्पष्टच सांगितले. आहो काही विचार करा. तेव्हा काहीच बोलले नाहीत. आत्याला माहीत होते की परमेश्वराने ही नातवंडे जणू आपल्यालाच वाढवायला पाठविली आहेत. एखादे वेळी रागाच्या भरात विष्णुपंत मुले उचलून अनाथाश्रमात टाकतील, तेव्हा मुकाट्याने हालअपेष्टात का होईना त्या मुलांना सांभाळणे तिला भाग पडले. विष्णुपंत थोडे पैसे पाठवीत व संसार चाले. शेजारच्या बायका काहीतरी आणून देत.

ह्या काळात एक घटना घडली. आत्याला लग्नात घातलेले दागिने बाबूरावांनी डॉ. थत्ते (तात्यांचे मित्र) यांचेकडे कोल्हापूरला ठेवले होते. ते दागिने डॉ. थत्ते यांनी आत्याला सांगलीला आणून दिले. बाबूरावांना हे माहीत होते. पण त्यांनी हरकत घेतली नाही. तात्यांना हे ऐकून आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "वेणू ते दागिने अंगावर घाल." तिने ते घातले. देवापुढे पेढे ठेवले. तात्यांना वाटले आता समेट घडू  येणार, पण कसचे काय? बाबूरावांच्या बाबतीत समेट हा शब्द येणार? स्त्रीधन म्हणून ते परत दिले व त्यानंतर बाबूरावांनी पैसे पाठविणे बंद केले!

बिचारी आत्या काय कारणार? नातवंडांना शाळेत घातले. मुले नादारीवर शिकू लागली. प्रपंचाचा खर्च वाढला तरीसुद्धा तिने धैर्याने सर्वांना साथ दिली. हळूहळू दागिने विकण्याची पाळी आली. दागिने तरी किती पुरणार. अशा कठीण परिस्थितीत तिने भाऊलाही योग्य ते शिक्षण दिले आणि तोहीं गेला. तिचा आधार गेला. आ । पुनः संसार. तिचे  न क ।वरह स्थिरावत नव्हते. प्रतिकूल परिस्थितीशी झगडणे व आला दिवस कसा गेला विचारले तर उत्तर काय, आला तसा गेला. भूतकाळाशी झगडून काय मिळाले असा विचार नेहमी मनात येई आणि आता भविष्यावर आशा ठेवून जीव जगवायचा एवढेच तिच्या नशिबी होते. नुसती बाळंतपणं आणि पतीविना संसार हेच पालुपद, पण जिद्द सोडली नाही. किती उपास घडले याचा हिशेब नाही. मनाचा कोंडमारा तिने अपार सहन केला.

धाकट्या मुलीच्या लग्नाचा विचार आता सुरू झाला. नातवंडे शाळेत जात होती. जावयाची मुले गळ्यात, धाकटी मुलगी गंगू लग्नाची व म्हातारे वडील या सर्वांचे पालन पोषण करणे सोपे नव्हते. एक तीळ सातजणांनी वाटून घ्यावा असे जीवन ती जगत होती. स्वतःचे दुःख तिने नातवंडांना कधीच दिसू दिले नाही. उलट त्यांना आईपेक्षा आजीच जवळची वाटू लागली. आल्यागेल्याची तहानभूक ती स्वतःच्या उपासमारीने भागवीत होती. शेजारी-पाजारी तिला मदत करीत. तिच्या गोड वागण्यामुळे ती सर्वांना हवीहवीशी वाटे. नवऱ्याशी काडीमोड, पुन्हा लग्न हा विचारही तिला शिवला नाही. जन्मभर तडजोड, कुटुंब जोडणे, तोडणे नव्हे.

गंगूच्या लग्नाची खटपट करणे भाग पडले आणि योगायोग म्हणजे लग्न जमले. कोल्हापुरात आत्याचे मामा पेंडसे राहात होते. त्यांचे जावई डॉ. छत्रे यांना मुलगी माहीत होती. तेव्हा ते माझे वडील दादा देवल यांचेबरोबर मुलीला घेऊन मुधोळला गेले. मुलाच्या आई-वडिलांना व मुलाला मुलगी पसंत पडली. बाबूरावांनी

रु. १२०० लग्नाकरिता पाठविले. पण लग्नाला आले नाहीत. गंगूच्या सासूबाईंना बाबूरावांची माहिती होती, त्यामुळे लग्नात कोणताच अडथळा नाही. आत्याला नवऱ्याने टाकले हा शिक्का बाबूरावांनी शेवटपर्यंत लागू दिला नाही. मधून मधून पैसे पाठविणे, खुशाली कळविणे एवढ्यानेच आत्याचा जीव जगत होता. गंगूचे यजमान बापूराव फडके यांना मुधोळला शाळेत "इन्स्पेक्टर" म्हणून नोकरी होती. शिवाय शेतीभातीचे उत्पन्न होते. गंगू लग्नानंतर मुधोळला गेली. तिला सासर खाऊन-पिऊन सुखी मिळाले होते.

पहिला दिवाळसण व पहिले बाळंतपण आत्यानेच केले. हे सर्व ती कसे करी कुणास ठाऊक. मुख्य म्हणजे शेजाऱ्यांची मदत व स्वतःचे कष्ट. मुलांचे वाढदिवस व सणावाराला थोडे गोडधोड ती नेहमी करी.

बाबूरावांची बेळगावची मावशी थोडे दिवस बाबूरावांचेकडे राहायला आली होती. तिची सून तेथे बाळंतपणाकरिता आली होती. मावशीला घरातले काम व बाळंतपण ही दोन्ही कामे अवघड वाटत होती. तिला कोणीतरी मदतीला पाहिजे होते. आत्याचा जन्म मुलींची बाळंतपणे करण्यातच गेला तेव्हा तिला बोलवावे असा विचार तिने केला व आत्याला 'जमखिंडीला ये' म्हणून पत्र लिहिले. पत्र पाहून तात्यांना आश्चर्य वाटले. माणसाला आशा ही फार वाईट आहे. त्यांना वाटले वेणूताईला कदाचित ठेवून घेतील म्हणून त्यांनी आत्याला जमखिंडीला पाठवून दिले. तिला नेहमी वाटे म्हातारपणी पतीची सेवा करणे हे आपले कर्तव्यच आहे. तशी ती जुन्या मताची होती. नवऱ्याने बोलाविले की जायचे एवढेच तिला माहीत. ती जमखिंडीला आली.

बाबूरावांची प्रकृती म्हणण्यासारखी बरी नव्हतीच. आत्या त्यांच्या खोलीत कधी गेलीच नाही. ती स्वयंपाकघरात मावशीजवळ आतच बसे. स्वयंपाक, कपडे धुणे, झाडलोट सर्व कामे ती मुकाट्याने करीत असे. मावशीची सून सुखरूप बाळंतीण झाली आणि थोडे दिवसांनी आत्याला सांगलीला परत पाठवून दिले. आत्या जमखिंडीला असताना बाबूरावांनी तिला कधी पाहिलीच नाही व बोललेही नाहीत. मावशीने एक दोनदा विषय काढला पण मला तिला भेटायचे नाही असे त्यांनी स्पष्ट सांगितले. 'तिच्याकडून काम करून घे व तिला परत पाठव' असे त्यांनी मावशीला सांगितले. बिचारी आत्या काबाडकष्ट करायची ह्याकरताच तिचा जन्म होता. मोबदल्यात तिला थोडे पैसे व साडी मिळे इतकेच.

बाबूराव बोलले नाहीत म्हणून तिला फार वाईट वाटले. पण ती काय करणार ? मन मारून राहणे तिच्या अंगवळणीच पडले होते. ती परत सांगलीला आली. तिने तात्यांना सर्व.सांगितले. पण उपाय नव्हता. पालथ्या घागरीवर पाणी !

त्यानंतर गंगूचे दुसरे बाळंतपण करायला आत्या मुधोळला गेली. बाळंतपण आटोपून जमखिंडीला दोन दिवस आली. त्या वेळी बाबूराव आजारी होते. मावशी येऊन जाऊन होतीच. स्वयंपाक मात्र आत्या करीत असे. एक दिवस बाबूरावांनी मावशीला विचारले, "स्वयंपाक छान झालाय, कोणी केला ?" तेव्हा "तुझ्या बायकोने" असे त्यांनी सांगितले. त्यांना काय वाटले कुणास ठाऊक. आत्याला बोलाविले व म्हणाले, "आलात उपकार झाले." आत्याला वाटले की कदाचित त्यांना पश्चात्ताप झाला असेल. आता म्हातारपण व आजारपण तेव्हा आता आपल्याला ठेवून घेतील अशी एक वेडी फोल आशा तिच्या मनाला चाटून गेली. तिला काय वाटलं कोण जाणे पण प्रेमाने ती त्यांचेजवळ गेली व म्हणाली, "उपकाराची भाषा परक्याजवळ, माझ्याजवळ नाही. माझं व तुमचं नातं वेगळं आहे. मी तुमची आहे." हे शब्द ऐकून किडा झटकून टाकावा तसे तिचे हात झटकून ते म्हणाले, "सलगी करू नका. तुम्ही परत सांगलीला जा. तुमचा माझा काही संबंध नाही. मला तुमची जरुरी नाही." आत्या काय बोलणार. तिला दुःख आवरेना. ती दुसऱ्या दिवशी परत सांगलीला निघून गेली. दरवेळेला ती अपमानाने परत येत असे. कितीही झाले तरी तिचे पतिप्रेम विलक्षणच होते आणि त्या प्रेमाखातर ती नेहमी जमखिंडीला येत असे आणि दरवेळेस निराशेने परत जात असे. असा हा आयुष्यातला महत्त्वाचा जवळ जवळ २५ वर्षांचा काळ निघून गेला. आता पुढे काय हा प्रश्न मात्र तसाच सतावीत होता.

त्यानंतर नातवंडांना वाढविणे हे तिचे सुरूच होते. मुली मोठ्या होत होत्या.

त्यानंतर १९४८ सालात बाबूराव बरेच आजारी पडले. त्यांना गुडघेदुखीचा आजार बरेच दिवस होता. आता त्यांची शक्तीही कमी झाली होती व टी. बी. चा आजार बळावला होता. सर्व परस्वाधीन जिणे झाले होते. घरातले व बाबूरावांचे दोन्ही कामे यमूताईंना व मावशीला जमेनात. त्यांनी पुन्हा आत्याला पत्र लिहून बोलाविले. जरूर वाटली की तिला बोलवीत, काम करून घेत पण निष्पन्न काही नाही. तिला तात्या व मित्रमंडळी सांगत होती की, "तुझे जन्माचे नुकसान ज्याने केले तेथे तू जाऊ नकोस." पण तिला त्यांचे शेवटचे दर्शन घ्यायचेच होते. ती

गेली. बाबूराव शरपंजरी झाले होते. शरीरात व बोलण्यात त्राण नव्हता. त्यांना पाहिजे असलेले जेवण ती प्रेमाने करीत होती. मुकाट्याने ती जेवण भरवे व ते खात. तसेच त्यांचे शरीर पुसणे, त्यांना स्वच्छ ठेवणे, औषध वेळोवेळी देणे हे एखाद्या जाणकार नर्सप्रमाणे करीतच होती. ती म्हणे, " मला हे शेवटचे करावे लागले हे मी पुण्यच समजते." शेवटी मरणापूर्वी आत्याला म्हणाले, " माझ्याकडून बरेच काही चुकले आहे. डॉक्टरांनी मला तीन मुले झाल्यानंतर मी टी.बी. पेशंट आहे, बायकोपासून वेगळे राहा" असे सांगितले होते. तेव्हा आत्या फक्त म्हणाली, "तेव्हा का नाही सांगितलंत, मी जवळ राहिले असते." आता झाले ते झाले. शेवटी एक दिवस त्या आजारातच आत्या जवळ बसली असताना ते हे जग सोडून गेले. शेवटी का होईना आपल्याच हातची सेवा त्यांना घडली हे ती सर्वांना सांगत होती. त्या वेळी त्यांचे वय साठीच्या घरात होते. जवळ जवळ ३५ वर्षांच्या संसाराची पाळेमुळे नुसता पती जिवंत आहे ह्या आशेवर, आत्याच्या एकट्या वृक्षावर वाढली असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

बाबूरावांचे दिवसपाणी झाल्यावर ती तेथून मग कोल्हापूरला आली.

कोल्हापूरला तात्या व सुंद्राआत्या राहात होते. त्यामुळे मधून मधून ती विमलचे मुलांना तेथे नेत असे. त्या वेळी त्यांचे बिऱ्हाड पेंडसे मामांचेकडे असे. सुंद्राआत्याला कॅन्सरच्या दुखण्याने पछाडले व ती लवकरच हे जग सोडून गेली. तात्यांना म्हातारपणात हे दुःख सहन होईना. तेही त्यानंतर दोन वर्षांच्या आतच निवर्तले. आत्या मात्र आता पोरकी झाली. वडिलांचे छत्र नाही. गळ्यात नातवंडे, अशी स्थिती झाली. तीन मुलांची शालेय शिक्षणे नादारीत कोल्हापुरात झाली.

विष्णुपंत नेहमी म्हणत, " माझेजवळ पैसा नाही. " परमेश्वराने आत्याचा जन्म त्यांचे कष्ट उपसण्याकरताच घातला होता. पाच सहा मुले झाल्यावर तिने एकदा मनाचा धडा करून त्यांना सांगितले की, " तुमची मुले मी तरी कशी संभाळू आणि कोणाच्या जिवावर? सारखी बाळंतपणे, त्यामुळे विमलची प्रकृती ढासळत आहे. तेव्हा थोडा संयम ठेवा व खर्चाचा विचार करा. " पण विष्णुपंतांचा अवतार वेगळा. ते सासूबाईंचे बोलणे एका कानाने ऐकत व दुसऱ्याने सोडून देत. त्यांना माहीत होते की, त्यांची मुले आत्याकडे उपाशी नाहीत. शाळेतही जातात, तेव्हा सर्व ठीक आहे. पण कशी वाढतात हे आत्यालाच माहीत. आत्याची दागिन्याची

सामग्री संपायची वेळ आली. हिंदुमहासभेचे काम करणे व त्यात सर्व वेळ खर्च करणे हेच ते कर्तव्य समजत. शिवाय सरकारकडून त्यांना थोडी मिळकत मिळे. पण एवढ्या संसाराला किती पुरणार. प्रेसचे काम करायचे म्हणून करीत असत.

याप्रमाणे आत्याबाई कोल्हापूर, सांगली, बार्शी इथेच चकरा मारीत होत्या. दिवसामागून दिवस गेल४. नातवंडे मोठी होत होती तशी त्यांना आजीच्या कष्टाची जाणीव होत होती.

विष्णुपंतांनी कल्याणला एका प्रेसमध्ये नोकरी धरली. शेवटी व्हायचे तेच झाले. विमल मॅनिन्‌जॉयटीसने आजारी पडून हे जग सोडून गेली. आता संसार ५ मुली व २ मुलगे व एक सावत्र अशी सर्व मुले व जावई ही सर्व जबाबदारी एका आत्याच्या खांबावर उभी राहिली. परमेश्वराची साथ. द्रौपदीची थाळी कधीच रिकामी झाली नाही.

त्यानंतर एक दिलासा देणारी घटना घडली होती ती म्हणजे कुमुद (मोठी नात) २०–२२ वर्षांची असेल. तिला मुंबईला टेलिफोन एक्सचेंजमध्ये एक नोकरी सांगून आली. मुंबईला पाठविले व नशिबाने तिला नोकरी मिळाली. आजीच्या ओळखीची एक मैत्रिणीची मुलगी लीला फाटक हिने तिला आनंदाने ठेवून घेतले.

आता कुमुद थोडे पैसे मिळवू लागली. त्या अवधीत तिला जोडीदारही मिळाला. त्यांना मुंबईला–मुलुंडला पोस्टात नोकरी होती. दोघांची ओळख होऊन लग्न ठरले. आता ठरलेले लग्न ठेवू नये असे आत्याला वाटले म्हणून कुमुदचे लग्न करायचे ठरले. हे लग्न थोडक्यात पार पडले. मात्र रु. १,५०० विष्णुपंतांनी दिले ही, एक भाग्याची गोष्ट. नात व नातजावई आजीला व भावंडांना आपल्या परीने मदत करीत असत. तसेच दोन नाती यांनाही कोल्हापूरला सेन्ससचे काम मिळाले. आता थोडा पैसा हातात येऊ लागलां. तीन मुली मिळवू लागल्या.

थोडे दिवसानंतर कुमुदचे यजमान गोखले यांची सांगलीला बदली झाली. तेव्हा त्यांना पहिली मुलगी झाली. आत्या बाळंतपणाला गेली पण नंतर परत मुलुंडच्या जागेत आली तरी पण कुमुदची तीन बाळंतपणे तिनेच केली. त्या वेळी कुमुदला नोकरी असल्याने पैशाचा प्रश्न नव्हता. ४ मुली व २ मुलगे राहू लागले.

जावई विष्णुपंत हिंदुमहासभेचे काम करीत. त्यानंतर कुमुदच्या यजमानांच्या मित्राच्या ओळखीने आणखी एका नातीचे सुनीताचे लग्न झाले. ती डोंबिवलीला गेली. तिला एक मुलगी व एक मुलगा आहे. तीही बाळंतपणे आत्यानीच केली.

सुनीती व तिची धाकटी बहीण मीना यांना "इन्कमटॅक्स" ऑफिसमध्ये मुंबईला नोकऱ्या होत्या. आता तीन मुली मिळवत्या झाल्या. मीनाने त्यानंतर घराची जबाबदारी बरीच वर्षे घेतली. उत्पन्नाच्या मानाने माणसे जास्त तेव्हा भागणे कठीणच होते. लग्नाला पैसे नसल्याने मुलींची लग्ने कठीण; पण एकमेकींच्या सहाय्याने सर्व मुलांची लग्ने व जबाबदाऱ्या हळूहळू आत्याच्या संपवल्या.

आत्याची धाकटी मुलगी गंगू हिलाही सहा मुले झाली. त्या मुलांचीही जबाबदारी आत्या मधून मधून घेत असे. गंगू व तिचे यजमान आपल्या घरी सुखी आहेत. विष्णुपंत १९८० सालात वारले तेव्हा आत्या सांगत होती, हिंदुमहासभेचे म्हणून त्यांना खूप हार घातले व त्यांची प्रेतयात्रा लोकांनी अभिमानाने काढली. जावई कसाही वागला तरी तो आपला ही तिची भावना सदैव जागृत होती. जुना काळ तशीच मते; आत्याची तरी कशी बदलणार.

आता जर आपण आत्याच्या जीवनाचा विचार केला. तर १९१४ सालापासून ती विवाहाच्या चक्रव्यूहात सापडली. म्हणजे जवळ जवळ ६९ वर्षे तिला या चक्रव्यूहातून बाहेर पडायला लागली. त्यात मुले, नातवंडे व आता पतवंडे यांचा सर्वांचा समावेश आहे. एखाद्या आश्रमातील अशी २०–२५ मुले जर तिने सांभाळली असती तर लोकात तिचा किती गौरव झाला असता व शासनातर्फे एखादे पारितोषिकही मिळाले असते. पण आमची आत्या एका सामान्य घराण्यातील. तिने कुठलीच अपेक्षा केली नाही. आल्यागेल्याची तहानभूक ती स्वतःच्या उपासमारीने भागवीत होती.

तिच्या नाती म्हणतात, " आजीचे उपकार आम्ही फेडू शकत नाही. आमच्या कातड्याचे जोडे केले तरी ते अपुरे पडतील. " ज्या आत्याने स्वतःची पर्वा न करता सगळ्यांच्या सुखासाठी आपले प्राण शेवटपर्यंत वेचले त्या आत्याची नातवंडे व पतवंडे कौतुक करतात व आळीपाळीने ती सर्वांकडे राहते. आता ती सुखात आहे. पण 'हे सुखाचे दिवस यायला आयुष्य सरत आले' असे ती म्हणते.

आता आत्याचे वय ८५ च्या घरात आहे. अजून कुठलाही आजार नाही. दोन्ही डोळ्यांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन नातींनी स्वतःच्या खर्चाने केले. आता डोळे उत्तम आहेत.

तिचा रोजचा कार्यक्रम म्हणजे सकाळी ५॥–६ ला उठणे. त्यानंतर प्रातर्विधी आटोपून देवाला नमस्कार, अंगणात सडा रांगोळी, झाडलोट, तांबे घासणे, पुजेची

तयारी, दूर्वा, तुळसी, महाराजांची पूजा व नंतर स्वयंपाकाला लागते. नातवंडे, पतवंडे यांची जेवणे आटोपणे. नंतर दत्ताच्या देवळात जाऊन नमस्कार करणे व कनवटीचे १० पैसे देवाला ठेवणे. तसेच ज्ञानेश्वरी, व्यंकटेशस्तोत्र व महाराजांचे चरित्र एक समास हे नियमित वाचन अर्धा पाऊण तास चालते. देवाला नारळ फोडणे व प्रसाद सर्वांना राखून ठेवणे. नंतर एकटीच जेवते. अर्धा तास विसावा पुनः दुपारी निवडणे टिपणे, भाजी नीट करणे, काहीतरी फराळाचे नेहमी तयार असते. पतवंडे शाळेतून आल्यावर खातात. पुनः संध्याकाळचा स्वयंपाक. आठ वाजता जेवते व लगेच झोपते. गाढ झोप लागते. दुपारी कधी कधी देवळात कीर्तनाला अथवा प्रवचनाला जाते.

आताच एक वर्षापूर्वी तिची नात सुनीती व तिचा नवरा हे दोघेजण मुंबईहून तिला आगगाडीने फर्स्ट क्लासमधून इंदूरला घेऊन गेले. इंदूरहून उज्ञयीनीला आले. उज्ञयीनीत महादेवाचे दर्शन, लघुरुद्र, बेलाचे पान स्वतः वाहिले व पूजा केली. रु. ११ तिने देवाला ठेवले. त्यानंतर बसने ओंकारला गेले व देवळापर्यंत चढून गेली. तिथे महादेवाचे स्थान आहे. पायथ्याशी आली व तेथेही लघुरुद्र व पूजा केली. पुनः बसने इंदूरला येऊन व तेथून विमानाने मुंबईला आली. तिने विमानाने पहिल्यानेच हा प्रवास केला. आता नातवंडे कौतुक करीत आहेत. आयुष्य वाढतच आहे. काय खापरपणतूही पाहाणार का असे सर्व विचारतात.

इतके दिवस आळीपाळीने नातवंडांच्याकडे राहात होती. आता वयोमाना-प्रमाणे जास्त काम होत नाही. सध्या सांगलीला मोठ्या नातीकडे राहते.

गोंदवल्याचे महाराज ह्यांना ती दैवत मानते. गाडगिळांच्या घराण्यापासून महाराजांवर सर्वांची भक्ती व विश्वास आहे. गाडगिळांचा मोठा मुलगा आण्णा हा ब्रह्मचारीच राहिला आहे. त्याने गोंदवल्यात खोली घेतली आहे त्यामुळे आत्या तेथे जाऊन भाच्याजवळ राहते. रोज महाराजांच्या पादुकांवर पेढे, नैवेद्य, फुले व तुळसीचे पान वाहून येते. तसेच गुरुपौर्णिमेला अकरा रुपये पाठविते. तिला प्रसादाची साखर व अंगारा घरी येतो. मार्गशीर्ष महिन्यात पोथी घरात वाचते व पेढे, शिरा व एक पुरुष जेवायला बोलाविते. तसेच अधिक महिन्यात ती बसने गोंदवल्याला जाते. ब्राह्मण सोवळ्यात कद नेसून साखरभाताचा नैवेद्य दाखवितात. आत्या नमस्कार करून दहा पैसे व सुपारी ठेवते. तिचा महाराजांवर फार विश्वास आहे. ती सांगते की; "एकदा टेंपोने सांगलीहून गोंदवल्याला ही मंडळी निघाली व

मध्ये वाट चुकली. तेव्हा कुठून तरी आवाज आला ‘ मागे फिरा. ’ एक लुंगीवाले भटजी सामोरे आले. त्यांनी धर्मशाळा दाखविली व तेथे निजायला सांगितले. सकाळी उठले तेव्हा कोणी माणूस दिसला नाही. महाराजांनी रात्रीचे संकट वाचविले." तसेच ती सांगते, "मुलुंडला असताना खरकटी भांडी टाकली होती. सकाळी दुधाला द्यायला घरात पैसे नव्हते. भांड्यात दोन रुपये सापडले ते दुधाला दिले." आपल्या घरातही तिने महाराजांचा फोटो ठेवला आहे. त्याला हार घालून ती नैवेद्य दाखविते.

माझी आत्या एक सामान्य स्त्री. पण एका आयुष्यात किती घटना घडल्या व त्या सर्व तिने धिटाईने प्रसंगाला तोंड देऊन आनंदात घालविल्या.

केवळ कष्टाने तिने देह झिजविला. इतकेच नव्हे तर परिस्थिती ओळखून त्याप्रमाणे स्वतःच्या मतांचे परिवर्तन आधुनिक काळाला साजेसे घडविले. त्यामुळे आज तीन पिढ्यांत ती राहात आहे.

ह्या वडाच्या फांद्या सगळीकडे लोंबत आहेत. वडही थोडा कलला आहे. पण ताठपणे उभा राहून सर्वांना साक्ष देत आहे व सर्वांना सांगत आहे की, "बाबा रे खूप कष्ट करून देह झिजविला. आता खापरपणतू पाहिल्यावर बसल्या जागी डोळे मिटून हे शरीर परमेश्वरचरणी विलीन व्हावे एवढीच इच्छा. " कुटुंबाकरता केवढा त्याग ८५ वर्षांचे आयुष्य कसे गेले ही एक कथाच झाली. आता अशी जिद्द सापडणे कठीण. पूर्वीच्याच बायका असा त्याग करू शकतात. अशी माझी आत्या मला सदैव अजूनही नातीच्या घरात खापरपणतू मांडीवर घेतलेली वावरताना दिसते. मागच्या वर्षी अशीच एक दिवस माझेकडे आली व तिचा वृत्तान्त ऐकून मला गहिवरून आले, आम्ही दोघी प्रेमाच्या अश्रूंनी न्हाऊन निघालो.

* *

REFBK-0025702

श्री विद्या प्रकाशन

श्रीविद्या प्रकाशन